# अनुक्रमणिका


**4** अध्यक्षीय– जयंत पाटील– आता जनतेचं राज्य आणूया

**5** संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे– संघम् सरणं गच्छामि?

**10** शरद पवार यांनी आजतक चॅनेलला दिलेली मुलाखत
भाजपशी हातमिळवणी करणाऱ्यांना परत आमच्याकडे जागा नाही

**14** शरद पवार यांनी एबीपी माझाला दिलेली मुलाखत
मोदींच्या रुपाने नवा 'पुतीन' नको

**16** शरद पवार यांनी निवडणुकीच्या निमित्ताने विविध ठिकाणी केलेली भाषणे...
- देशाच्या घटनेचे अधिकार आम्ही जतन करणार
- मोदी सरकार मस्तवाल
- दुष्काळाच्या संकटाकडे सरकारचे दुर्लक्ष

**44** राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) शपथनामा (जाहीरनामा) प्रकाशन समारंभ,भाषणे.
१) पंतप्रधान मोदी यांचा दृष्टिकोन देशाच्या ऐक्याला धक्का देणारा– शरद पवार
२) देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचं काम करू– जयंत पाटील–४६
३) शपथनाम्यात सर्व घटकांबरोबर विविध क्षेत्रांत सुधारणांवर भर– वंदना चव्हाण–४९

**50** लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राकडे सर्वांचे लक्ष– व्यंकटेश केसरी

**53** नरेंद्र मोदी,डाव निसटू लागला, त्रिशंकू लोकसभेकडे वाटचाल– व्यंकटेश केसरी

**56** शरद पवार यांचा स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांशी संवाद
बेरोजगारी,पेपरफुटी, स्पर्धा परीक्षेसंदर्भात सरकारशी संघर्ष करू

**60** भारतीय अर्थव्यवस्थेचे भले,बुरे आणि वस्तुस्थिती– निखील इनामदार (बीबीसी प्रतिनिधी)

**70** औरंगजेबाप्रमाणे महाराष्ट्रात मोदी,शहा यांच्या स्वाऱ्या– संजय राऊत

**74** वखवखलेला आत्मा महाराष्ट्रात फिरतोय– उद्धव ठाकरे

**84** महाराष्ट्राचे बेजबाबदार शिंदे सरकार– जतीन देसाई

**86** कानोकानी– घंटाकर्ण (हलके–फुलके राजकीय किस्से)

**92** जाता–जाता : फिरस्ता (ही घबराहट कशासाठी?)

**102** शेवटचे पान– हेमन्त टकले– ऐक्य,मन व बुद्धीचे



**संचालक**
**हेमन्त टकले**
---
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
---
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.
---
**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी सहाय्य**
दिलीप रोडे
**फोटो**
प्रशांत चव्हाण
---
**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
---
मुद्रक, प्रकाशक हेमन्त प्रभाकर टकले यांनी 'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.' च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर–३, आरएससी–२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

अध्यक्षीय

# आता जनतेचं राज्य आणूया



काँग्रेस ही विकासविरोधी भिंत आहे, म्हणत असताना त्याच भिंतीच्या विटा मोदींच्या मागे बसलेल्या होत्या. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्यांना भीती दाखवून आपल्या पक्षात घेण्याची व्यवस्था सुरू केली. आज लोक भारतीय जनता पक्षाला भ्रष्टाचार जोडो पार्टी असं म्हणायला लागले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना गावात येऊ दिले जात नाही. इलेक्टोरल बॉण्डस्च्या नावाखाली भारतीय जनता पक्षाने दहा हजार कोटी रूपये गोळा केले.

५० टक्के महागाई कमी करणार असे सांगणाऱ्यांना ती कमी करता आली नाही. उलट ती दुप्पट झाली. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार असे म्हणणाऱ्यांना त्याचे खर्च दुप्पट झाले तरी बोलायला ते तयार नाहीत. दहा वर्षात देशातल्या शेतकऱ्यांनी आंदोलन केले, शेकडो शेतकरी मृत्युमुखी पडले. पण, मोदी साहेबांना त्यांना भेटायला वेळ नाही. पीक विमा कंपन्या श्रीमंत झाल्या, पण पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांना मिळाले नाहीत. पवार साहेब कृषी मंत्री असताना त्यांनी सहा हजार कोटींचे पॅकेज विदर्भासाठी जाहीर केले होते. देशात ७२ हजार कोटी रूपयांची कर्जमाफी केली. महाविकास आघाडीच्या सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. महाराष्ट्र सरकारने कोरोना काळात उत्तम काम केले हे जग मान्य करत आहे.

देशातले सध्याचे सरकार गरीबांसाठी नाही. या देशातल्या श्रीमंतांची काळजी घेणारे हे सरकार आहे. शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी कोणतीही योजना सरकारने केली नाही. वंदे भारतचे तिकीट पुण्याहून मुंबईसाठी ७०० रूपये आहे. पूर्वीची जनता रेल्वे तिकीट ११५ रूपये होते. सोयाबीनला दर नाही. पण, मोदी साहेबांनी ६ हजार रूपये टाकले याचा गवगवा व्हायला लागला आहे. एक लाख रूपयांचे खत टाकले, तर १८ हजार रूपये जीएसटीचे जात आहेत. म्हणजे ते आपलेच पैसे आहेत. देशात काहीही खरेदी करा, त्याच्यावर टॅक्स आहे. म्हणजे तुमच्याच खिशातून पैसे काढून तुम्हाला दिले जात आहेत. तुमच्या कपड्यांवर कर, चपलेवर कर, अन्नधान्यावर कर आहे. सगळ्याच गोष्टीवर टॅक्स लावला जात आहे. आज १८ टक्के असलेला टॅक्स निवडणूक झाल्यावर २१ टक्के केला, तर मला आश्चर्य वाटणार नाही. कारण, आपल्या डोक्यावर २१० लाख कोटी रूपयांचे कर्ज वाढलेले आहे. त्यामुळेच देशात जीएसटीच्या नावाखाली सर्वांची लूट सुरू आहे. जाहीरनाम्यात आम्ही सांगितलं आहे, की शेतकऱ्यांच्या अवजारावरील टॅक्स, गरीबांनी वापरण्यासाठीच्या गोष्टींवरील जीएसटी आम्ही काढू. अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर्स यांना आत्ता मिळत असलेले अनुदान आम्ही दुप्पट करू , असे आम्ही जाहीरनाम्यात सांगितले आहे. देशभरातून इंडिया आघाडीला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळत आहे. या देशामध्ये लोकांनी आपले मत नक्की केले आहे. इंडिया आघाडीला ते प्रतिसाद देतील. भारतीय जनता पक्षाच्या पायाखालची वाळू सरकायला लागली आहे आणि म्हणून त्यांना लवकर उमेदवारी निश्चित करता आल्या नाहीत. अनेक ठिकाणी उमेदवार बदलावे लागले आहेत. इंडिया आघाडीच्यावतीने आम्ही सगळे विनंती करतो, की देशातली महागाई,

(पान ९९ वर पहा)



## संपादकीय



# संघम् सरणं गच्छामि?

भारतात १८व्या लोकसभेसाठी निवडणुकांची प्रक्रिया सुरु झाली आहे. मतदानाच्या काही फेऱ्या पारही पडल्या आहेत. आता प्रतीक्षा आहे ४ जूनची, ज्या दिवशी या निवडणुकांचे निकाल जाहीर होतील. आतापर्यंत पार पडलेली निवडणूक प्रक्रिया, प्रचाराचे स्वरुप लक्षात घेता काही चिंताजनक गोष्टी ठळकपणे लक्षात आल्याखेरीज रहात नाहीत. केंद्र सरकार त्यांच्या पाळीव, पौरुषहीन आणि त्यांना शरणागत असलेल्या निवडणूक आयोगाच्या मार्फत कोणकोणते गैरप्रकार करवून घेत आहे याची अनेक उदाहरणे उजेडात आली आहेत. त्यामुळेच या निवडणुका खरोखर राज्यघटनेला अपेक्षित आहेत त्याप्रमाणे निकोप व खुल्या वातावरणात घेतल्या जात आहेत किंवा नाहीत अशी शंका मनाला भेडसावल्याखेरीज राहत नाही. २०१४ पूर्वीपर्यंत भारतात जेजे पंतप्रधान होऊन गेले त्यांनी निवडणूक प्रचाराची पातळी राखण्याबरोबरच लोकशाहीला अपेक्षित सुसंस्कृतपणा व सभ्यता या मूल्यांचे पालन केलेले आढळते. विरोधी पक्षांवर टीका करणे आणि त्यांच्यापेक्षा आपल्या पक्षाला मतदारांनी पसंती का द्यावी हे सांगण्याचा लोकशाहीत अधिकार प्रत्येक राजकीय पक्षाला व पक्षनेत्यांना असतो. परंतु टीका करतानाही सभ्यतेची पातळी न सोडण्याचे पथ्य २०१४ पूर्वीच्या प्रत्येक पंतप्रधानांनी पाळलेले आढळते. विरोधकांची निंदा करण्यासाठी सडकछाप व टाळीबजावू अशी सवंग भाषा वापरणे याला राजकीय सभ्यता म्हणत नाहीत. किंबहुना संसदीय लोकशाहीला अपेक्षित अशी ही राजकीय संस्कृती नाही. त्याला राजकीय विकृती म्हणणे अधिक योग्य ठरेल. या राजकीय विकृतीचे मोकाट, अनियंत्रित आणि गलिच्छ प्रदर्शन यावेळच्या निवडणूक प्रचारात पाहण्यास मिळाले आहे. या राजकीय विकृतीचा जन्म भयगंडातून झालेला दिसतो. कारण देशात सध्या जे वातावरण आहे ते सत्ताधाऱ्यांना फार अनुकूल आहे अशी स्थिती दिसत नाही. त्यामुळे येत असलेल्या नैराश्यातून, आगतिकतेतून आणि पराभवाच्या संभाव्य भीतीतून या राजकीय विकृतीचा जन्म झालेला दिसतो. एकीकडे एक अकेला सब पर भारी म्हणत तथाकथित ५६ इंची छाती पिटणे आणि दुसरीकडे पराभवाची भीती बाळगणे हा विरोधाभास आहे. जिंकण्याची एवढी जबरदस्त खात्री असताना दुसऱ्या बाजुला विरोधी पक्षांच्या गल्लीबोळातल्या कार्यकर्त्यांना देखील आपल्या पक्षात सामील करण्याची घायकुती केली जाणे हेही या विरोधाभासाचे आणखी एक उदाहरण. जिंकण्याची खात्री असतानाही विरोधी पक्षांचे उमेदवार, नेते यांच्याविरुध्दची जुनीपानी प्रकरणे उकरुन त्यांच्याविरुध्द कारवाईचा ससेमिरा लावणे आणि बेकायदेशीरपणे त्यांना तुरुंगात देखील डांबणे असले प्रकार करणे हाही विरोधाभासच आहे. या सर्व गोष्टींचा एकच अर्थ की सत्ताधाऱ्यांना विजयाची खात्री राहिलेली नाही. केवळ एकाच व्यक्तीच्या वलयाच्या आधारे निवडणुका जिंकण्याचे दिवस संपले आहेत याची जाणीव त्यांना झाली आहे. त्यामुळेच बहुमताला जागा कमी पडू नयेत यासाठी जो कुणी भाजपमध्ये सामील व्हायला तयार आहे त्याच्यासाठी पायघड्या घालून भाजप व संघपरिवार तयारीत बसलेला आहे. या भाजप व संघ परिवाराची मजबुरी आणि आगतिकता किती असावी याचे ढळढळीत ताजे उदाहरण सर्वांसमोर आले आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखाना सीलबंद करण्याची धमकी दिली जाते काय आणि संबंधित कारखान्याचे चेअरमन महाराष्ट्रातील भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांना भेटल्यानंतर, ''तुम्ही आम्हाला मदत करा, आम्ही तुम्हाला मदत करु'', असा सौदा जाहीरपणे केला जातो. एखाद्याला खिंडीत गाठून, कैचीत पकडून स्वतःच्या बाजुने वळविणे किंवा त्याच्याकडून पाठिंबा उकळण्याचा प्रकार हा गुन्हेगारी जगतातील खंडणी वसुलीवाल्यांना देखील खाली मान घालायला लावणारा आहे. भाजप आणि संघ परिवाराने राजकीय संस्कृतीची लक्तरे केलीच आहेत परंतु गुन्हेगारांप्रमाणे आता ते उघडउघड कारवाईची भीती घालून आपला राजकीय पाठिंबा विस्तारण्याचा निर्लज्ज प्रयत्न करताना दिसतात.

बहुमतासाठी वाटेल त्या खालच्या थराला जाण्यास भाजप संघ परिवार मागेपुढे पहात नसल्याचा आणखी एक महाकाय पुरावा आणि उदाहरण समोर आले आहे. भाजपने म्हणजेच मोदी व शहा जोडगोळीने कर्नाटकात पराभवाच्या भीतीने माजी पंतप्रधान व संधीसाधुपणाचे सर्वोच्च प्रतीक एचडी देवेगौडा यांच्याबरोबर निवडणूक समझोता केला. देवेगौडा यांचे कुटुंबिय भ्रष्टाचारात लिप्त असल्याचे अनेक प्रकार आतापर्यंत सार्वजनिक झालेले आहेत. परंतु राजकीय स्वार्थ, बहुमताचा हव्यास किंवा लालसा यापोटी भाजप संघपरिवाराने देवेगौडा यांच्या पक्षाशी हातमिळवणी केली. त्यांना लोकसभेच्या जागा सोडल्या.

यामध्ये हसन मतदारसंघाचा समावेश आहे. येथून देवेगौडा यांचे नातू प्रज्वल रेवण्णा यांना उमेदवारी देण्यात आली. देवेगौडा यांचे मोठे पुत्र एचडी कुमारस्वामी आणि दुसरे पुत्र रेवण्णा हे आहेत. प्रज्वल हे रेवण्णा यांचे चिरंजीव आहेत. ही सगळी घराणेशाही मोदी शहा जोडगोळीला खूपच आवडली असावी. तर हे प्रज्वल रेवण्णा किती लिंगपिसाट आहेत याच्या सुमारे २९०० चित्रफिती उघडकीला आल्या आहेत. यामध्ये हे प्रज्वल रेवण्णा नावाचे महाकामुक युवक अगदी लहान मुलींपासून ते साठी पार केलेल्या स्त्रियांपर्यंतच्या महिलांना त्यांच्या वासनेचे कसे शिकार करीत आहेत याचे साक्षात पुरावे आहेत. या प्रज्वल साहेबांच्या प्रचारासाठी पंतप्रधानसाहेबांनी सभा घेऊन त्यांच्या पाठीवर थोपटून त्यांना मते देण्याचे आवाहन कर्नाटकातील मतदारांना केले. प्रज्वल रेवण्णा यांचा हा लिंगपिसाटपणा सर्वांनाच माहिती होता. राजकीय वर्तुळात तो सर्वांनाच माहिती होता. त्यांच्या कारवायांच्या चित्रफिती आहेत याची माहिती देखील होती. भाजपच्या काही स्थानिक प्रमुख नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाला देवेगौडा यांच्याबरोबर समझोता न करण्याची तसेच विशेषतः प्रज्वल रेवण्णा यांना पाठिंबा न देण्याची सूचना लेखी पत्राद्वारे केलेली होती. परंतु सत्तेच्या मोहाने अंध झालेल्या जोडगोळीला सारासार विवेक राहिलेला नाही. त्यांनी देवेगौडा यांच्या घराणेशाहीबरोबर हातमिळवणी केली आणि आता भाजप संघ परिवाराचे तोंड पोळून निघाले आहे. हा सर्व गौप्यस्फोट झाल्यानंतर प्रज्वल रेवण्णा हे देशाबाहेर परागंदा झाले आहेत म्हणजेच पळून गेले आहेत. ते जर्मनीला गेल्याची माहिती मिळते. आपले सरकार फार कार्यक्षम आहे, गुन्हेगारांची गय न करणारे आहे अशी फुशारकी मोदी नेहमीच मारतात. आता प्रज्वलसारख्या लिंगपिसाटाला भारतात आणण्यासाठी ते कोणती सक्रियता व कार्यक्षमता दाखवतात ते पहावे लागेल. विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी, सेखसरिया कुटुंब यासारख्या आर्थिक गुन्हेगारांना भारतात परत आणण्याबाबतची मोदी सरकारची कामगिरी देशासमोर आहे आणि मोदी सरकार तोंडाने काहीही बरळत असले तरी ते अशा गुन्हेगारांना पाठीशी घालणारे आहे हे यावरुन स्पष्ट होते. देवेगौडा यांच्या या कुलदीपकाने जे दिवे लावले आहेत त्यामुळे देवेगौडा घराणे बदनाम झाले आहेच परंतु इतक्या वर्षांची त्यांची राजकीय कारकिर्दही धुळीस मिळाली आहे. नव्वदी पार केलेल्या एचडी देवेगौडा यांच्यावर ही नामुष्की सहन करण्याची पाळी यावी यासारखे दुर्दैव नाही. परंतु ज्ञान, चारित्र्य, एकता या मूल्यांच्या गप्पा मारणाऱ्या भाजप व संघ परिवाराचे काय असा प्रश्न आहे. यामध्ये पक्ष म्हणून भाजप आणि संघ परिवार यापेक्षा मोदी व शहा ही जोडगोळी या प्रकारास जबाबदार धरावी लागेल. प्रज्वलची माहिती असूनही मोदी व शहा या जोडगोळीने कर्नाटकात देवेगौडा यांच्याशी हातमिळवणी केली आणि खुद्द मोदींनी प्रज्वल यांचा प्रचार करणे हे मोदी व शहा यांना लांच्छनास्पद आहे. त्यांना इतरांची निंदा करण्याचा नैतिक सोडाच पण कोणताच अधिकार राहिलेला नाही. या दोघांनीही राजकीय नीतीमत्ता गमावलेली आहे.

या निवडणुकीतील प्रचाराचा स्तर घसरविण्यासही ही जोडगोळी कारणीभूत आहे. निवडणुकीत विरोधी पक्षांवर म्हणजेच प्रतिस्पर्धी पक्षांवर टीका केली जात असते. परंतु पातळी सोडून टीका करणे अपेक्षित नसते. त्याचप्रमाणे प्रतिस्पर्धी पक्षाबाबत खोटीनाटी विधाने करणेही अपेक्षित नसते. प्रचाराचा स्तर किंवा पातळी राखण्यासाठीच निवडणूक आचारसंहितेची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचबरोबर लोकप्रतिनिधित्व व निवडणूक विषयक कायद्यांमध्येही निवडणूक खर्च किती केला जावा, साधनसंपत्तीचा किती वापर केला जावा, प्रचारात विशिष्ट जाती किंवा धर्माच्या नावाने किंवा अन्य धर्म, जाती, संप्रदाय यांना बदनाम न करता प्रचार केला जावा याबाबत स्पष्ट असे मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. परंतु मोदी आणि शहा हे यापैकी कोणत्याही नियमाचे पालन करताना आढळत नाहीत. मोदी आणि शहा यांची प्रचारसभांमधील भाषणे ही विशिष्ट धर्माच्या विद्वेषाने बरबटलेली असतात. काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर टीका करताना तर हा खोटारडेपणा स्पष्ट झाला. काँग्रेस सत्तेत आल्यास महिलांची मंगळसूत्रे काढून घेणार, तुमची संपत्ती, मिळकत काढून घेणार आणि ती मुसलमानांमध्ये वाटणार असा धादांत खोटा प्रचार मोदी आणि शहा यांच्यासारखे सर्वोच्च आणि जबाबदार पदावरील नेते करीत असतील तर भाजप व संघ परिवारातील सर्वसाधारण कार्यकर्ते कोणत्या पातळीवर जाऊन प्रचार करीत असतील याची कल्पना केलेलीच बरी. असली छटाक व क्षुद्र मनोवृत्ती दाखविण्याचे प्रकार मोदी व शहा करताना पाहून त्यांची कीव येऊ लागते. काँग्रेसने त्यांच्या जाहीरनाम्यात महिला, शेतकरी आणि युवकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी काही पावले उचलण्याचे आश्वासन दिलेले आहे. या योजनेनुसार मोदींच्या कारकिर्दीत ज्या मूठभर भांडवलदार व बड्या उद्योगघराण्यांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे त्याला लगाम लावण्यात येऊन देशाची साधनसंपत्ती सर्वसामान्य लोकांमध्ये समान प्रमाणात कशी वाटता येईल यासाठी पावले उचलण्याचे आश्वासन आहे. त्यामध्ये कुणाची संपत्ती काढून घेण्याचा किंवा महिलांची मंगळसूत्रे काढून घेण्याचा उल्लेखही नाही. परंतु प्रतिपक्षाला बदनाम करण्यासाठी धादांत खोटारडेपणा करण्यासही या देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री मागेपुढे पहात नाहीत हे भारतीय लोकशाहीला लांच्छनास्पद आहे. निवडणूक प्रचार व राजकारणाची ही पातळी घसरविण्यास जबाबदार फक्त

मोदी व शहा आहेत. सरळसरळ हा सांप्रदायिक प्रचार करण्यात येत असताना निवडणूक आयोग कानाला झापडे लावून बहिरा झाल्याचे सोंग आणत आहे हे भारताचे दुर्दैव आहे. मोदींनी राजस्थानात प्रचार करताना मुसलमान हे घुसखोर असल्याच्या आशयाचे विधान केले होते. त्याबद्दल काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. भाजपनेही राहूल गांधी हे भाषिक अल्पसंख्यक समाजांमध्ये फूट पाडत असल्याचा आरोप केला होता. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी राष्ट्रपति द्रौपदी मुर्मु या आदिवासी असल्याने त्यांना राममंदिर उद्धाटनास बोलाविले नाही अशी टीका केली होती. निवडणूक आयोगाने यावेळी एक नवीन पायंडा पाडलेला आहे. ज्या पक्षाच्या प्रचारकाने आचारसंहितेचा भंग केला त्या प्रचारकाला नोटिस न पाठवता त्याच्या पक्षाध्यक्षाला नोटिस पाठविण्याचा प्रकार सुरु केला आहे. पंतप्रधानांना नोटिस पाठविल्याचा ठपका स्वतःवर येऊ नये या शंकेने आणि भीतीने निवडणूक आयोगाने पक्षाध्यक्षांना नोटिस पाठविण्याचा नवा पायंडा पाडला आहे. २०१९ मध्ये निवडणूक आचारसंहितेच्या भंगाबद्दल मोदी आणि शहा या दोघांना नोटिस जारी करण्याची शिफारस तत्कालीन निवडणूक आयुक्त अशोक लव्हासा यांनी केली होती. या दोघांच्या विरोधात सहा तक्रारी आयोगाकडे आल्या होत्या. इतर दोन निवडणूक आयुक्तांनी बहुमताच्या आधारे ती बाब अमान्य केली. परंतु यानंतर लव्हासा यांना मोदी शहांच्या रागाचे धनी व्हावे लागले. निवडणूक आयुक्त आहेत म्हणून काय झाले ? त्यांच्या या साहस व हिमतीबद्दल आणि कायद्यापुढे सर्व समान असतात या तत्वाला चिकटून राहण्याबद्दल शिक्षा मिळाली. त्यांच्याकडे बेहिशोबी मालमत्ता असल्याच्या बातम्या पेरुन लगेचच ईडीची चौकशी त्यांच्या, त्यांच्या पत्नी व प्रशासकीय सेवेतच असलेल्या त्यांच्या मुलीमागे लावण्यात आली. अखेर लव्हासा यांनी आयोग सोडला. निवडणूक आयोग आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडत नसल्याच्या तक्रारी सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचल्यानंतर न्यायालयाने निःपक्ष आणि स्वतंत्र तसेच सरकारी दबावापुढे बळी न पडणाऱ्या निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीच्या प्रक्रियेत बदल सुचविले होते परंतु मोदी व शहा यांच्या सरकारने ते नाकारले आणि कायदा करुन या प्रक्रियेतून सरन्यायाधीशांना वगळले. परंतु त्यानंतर लोकांच्या नजरेतही निवडणूक आयोगाची प्रतिमा खालावल्याने आता लाजेकाजेस्तोवर निवडणूक आयोगाने मोदींबाबतच्या तक्रारीसंदर्भात भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांना नोटिस जारी करण्याचे धाडस दाखविले आहे. अर्थात यासंदर्भात कोणता खुलासा केला जातो ते पाहणे महत्वाचे राहील. नड्डा यांच्याकडे खुलासा मागणे किती हास्यास्पद आहे हेच यावरुन सिध्द होणार आहे. कारण नड्डा यांच्या हातात पक्षाच्या नाड्याच काय साधा धागा किंवा सूतही नाही. सर्व नाड्या मोदी व शहांच्या हातात आहेत. बहुधा तेच नड्डा यांना खुलाश्याचे पत्र तयार करुन देतील आणि नड्डा ते निवडणूक आयोगाला सादर करतील.

मोदी त्यांच्या भाषणात राहूल गांधी यांना उद्देशुन शहजादे असा उल्लेख अनेक वेळेस करत असतात.

त्याच चालीवर मोदी व शहा यांच्या जोडगोळीस शहा आणि शहेनशहा असे म्हटले तर कुणाला कडू लागू नये. तर ही जी शहा व शहेनशहाची जोडी आहे ती निवडणूक आचार संहितेच्या बिनधास्त चिंधड्या उडवीत प्रचार करताना दिसत आहे. जानेवारीत अयोध्येत भव्य राम मंदिराची व राममूर्तींची स्थापना करण्यात आली. त्याचा उल्लेख करुन रामाच्या नावाने मतदान करण्याचे आवाहन या जोडगोळीतर्फे केले जात आहे. आचारसंहिता तसेच निवडणूकविषयक कायद्यांनुसार धर्म, धार्मिक प्रतीके, देवदेवतांच्या नावाने मते मागण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. जर एखाद्या उमेदवाराने तसा प्रकार केल्याचे उघडकीस आल्यास त्याची उमेदवारी रद्द केली जाऊ शकते. परंतु सध्या राम, कृष्ण, धर्म, संप्रदाय याबद्दल सर्रास उल्लेख करुन मते मागण्याचा प्रयत्न होताना दिसतो. त्याबद्दल निवडणूक आयोगाने कानात बोळे घातल्यासारखे दिसत आहे. परंतु या निवडणुकीत एक गोष्ट मात्र जरुर झाली की निवडणूक आयोगाकडून शहा व शहेनशहा यांच्यापुढे लोटांगण घालण्याचे प्रकार एवढे उघड झाले की लोकांमध्ये देखील त्याची चर्चा सुरु



झाली. आणखी बदनामी होऊ नये या भीतीने किमान विरोधी पक्षांमागेच नोटिसांचा ससेमिरा लावण्याच्या पक्षपातीपणाला किंचितसा तरी आळा बसला असे म्हणावे लागेल. आयोगाच्या पक्षपातीपणाबद्दल झालेल्या गवगव्यामुळे किमान एवढी तरी सुधारणा यावेळी झाल्यासारखी दिसते.

मतदानाच्या पार पडलेल्या फेऱ्यांमधील मतदानाची टक्केवारी यानिमित्ताने पाहणे महत्वाचे राहील. एकंदरीत टक्केवारी लक्षात घेता २०१४ व २०१९च्या तुलनेत ती कमी झालेली आढळते. आतापर्यंतच्या मतदान फेऱ्यांची सरासरी टक्केवारी काढली असता ती ६५ टक्क्यांच्या आसपास येते. २०१९च्या तुलनेत ती तीन ते चार टक्क्यांनी कमी असल्याचे आढळून येते. याचे कारण हवामान म्हणजेच तीव्र अशा उन्हाळ्याचे दिले जाणे स्वाभाविक आहे. परंतु जेव्हा एखाद्या नेत्याच्या कथित वलयावर आधारित निवडणुका लढविल्या जातात तेव्हा मतदानाचे हे घसरते प्रमाण चिंता उत्पन्न करणारे मानले जाते. ऐकीव स्वरुपात जी माहिती दिल्लीहून आणि अन्य सूत्रांकडून मिळत आहे त्यानुसार स्वतः शहेनशहा या मतदानातील घसरणीबद्दल चिंतित झाल्याचे आढळून येते. विविध माध्यमातून पुढे आलेल्या माहितीनुसार पंतप्रधानांनी त्यांच्या प्रचारदौऱ्यादरम्यान नागपूर येथे मुद्दाम रात्रीचा मुक्काम केला होता. या रात्री त्यांनी रा.स्व.संघाच्या उच्चपदःस्थांबरोबर चर्चा केली. या चर्चेत भाजप कार्यकर्ते आणि विशेषतः संघ स्वयंसेवकांमध्ये निवडणूक आणि मतदानाबाबत निर्माण झालेल्या उदासीनतेची चर्चा झाली. ही उदासीनता का निर्माण झाली याबद्दलची कारणमीमांसा काही संघ तज्ज्ञांनी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार शहेनशहांची धोरणे आता लोकांमध्ये पुरेशी प्रतिक्रिया उत्पन्न करताना आढळत नाहीत. बेकारी आणि महागाईबद्दल लोकांना अपेक्षा आहेत आणि मोदी व शहा हे मुख्यतः हिंदू विरुध्द मुसलमान यामध्ये ध्रुवीकरण करुन त्याआधारे निवडणुका जिंकण्याची जुनीच खेळी खेळत आहेत. आता लोकांना त्याचे फारसे आकर्षण राहिलेले नाही आणि त्यामुळेच आता त्यांच्या वलयाची चमक ओसरु लागली आहे. त्याचबरोबर मोदींनी केवळ त्यांच्या व्यक्तिमत्वावर आधारित प्रचार सुरु केला असल्याने ती बाब संघाला फारशी रुचलेली नाही आणि तसे संघातर्फे मोदींना स्पष्ट करण्यात आल्याचे कळते. याठिकाणी ही बाबही लक्षात ठेवावी लागेल की २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर प्रथमच मोदी हे संघनेत्यांना भेटण्यासाठी नागपूरमध्ये मुद्दाम गेले. अन्यथा त्यांना गेली दहा वर्षे त्यांच्यासाठी वेळ देण्याची गरज भासलेली नव्हती. मोदींना ही चिंता भेडसावू लागली आहे की संघ स्वयंसेवकांच्या उदासीनतेचा फटका त्यांच्या संभाव्य यशाला बसू शकतो आणि मग त्यांचे पुढील म्हणजेच सर्व भावी बेतच धुळीस मिळू शकतात. त्यामुळे मोदींना आता संघाच्या मदतीची आवश्यकता भासू लागल्याचे दिसते. जर या उदासीनतेमुळे आपल्याला यश मिळू शकले नाही तर संघासह सर्वजण अडचणीत येऊ शकतात अशी गर्भित धमकी किंवा इशाराही मोदींनी या संघाच्या उच्चपदःस्थाना दिल्याचे समजते. सत्तेत आल्यानंतर मोदी आणि संघ यांचे संबंध फारसे चांगले राहिलेले नाहीत हे अनेक प्रसंगांवरुन स्पष्ट झाले. मोदींनी संघ किंवा त्यांची संघटना कह्यात घेण्याचे प्रयत्न करण्याबरोबरच ती भाजपवर अवलंबुन कशी राहील यासाठी प्रयत्न केले. मोदींबरोबर फरफटत जाणे ही संघाची मजबुरी किंवा आगतिकता झाली. मोदी हे भाजप आणि संघापेक्षाही उत्तुंग झाल्याचे चित्र निर्माण केले गेले आणि संघाची त्यामागे फरफट सुरु झाली ती कायम आहे. संघाला मोदींवाचुन पर्याय राहिलेला नाही. परंतु मोदींनी भाजपच्या तंबूचे ते एकमेव खांब असल्याचे दाखवून दिले. २०१४ आणि २०१९ या लोकसभेच्या दोन निवडणुका त्यांनी त्यांच्या बळावर जिंकल्या. परंतु आता त्यांच्या निवडणूक जिंकण्याच्या तंत्राबद्दलचे आकर्षण पूर्वीच्या प्रमाणात राहिलेले नाही. त्यामुळेच नावीन्याचा अभाव असलेल्या त्यांच्या प्रचाराला लोकांकडून प्रतिसाद मिळेनासा झाला आहे. मोदी हे विकास व प्रगतीच्या नुसत्या वल्गना करतात परंतु प्रत्यक्षात मते मागताना फक्त हिंदू विरुध्द मुसलमान या ध्रुवीकरणाचा आधार घेतात. यामध्ये बेकारी व महागाईसारखे ज्वलंत प्रश्न दुर्लक्षिले जातात. मोदींची ही चलाखी आता मतदारांसाठी फारशी आकर्षक राहिलेली नाही हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. त्यामुळेच चिंतातूर शहेनशहांना आता रा.स्व.संघाला शरण जाण्याची बुध्दी सुचली असावी. खुद्द नागपूरमध्ये मतदानाची टक्केवारी कमी का झाली याबद्दलही मोदी यांनी चिंता व्यक्त केल्याचे सांगण्यात येते. नागपूरच्याच संदर्भात बोलायचे झाल्यास या निवडणुकीच्या निमित्ताने नितिन गडकरी यांचीही नाराजी आता उघडपणे दिसून येऊ लागली आहे. प्रकृतीच्या कारणास्तव गडकरी हे प्रचारातून बाहेर पडले आहेत. त्यांनी नावापुरत्या एकदोन सभा घेतल्या परंतु त्यानंतर प्रकृतीचे कारण देऊन त्यांनी भाजपचा प्रचार बंद केला.

या निवडणुकीत मोदींची आणखी एक अडचण झालेली आहे. या निवडणुकीसाठी ते विशिष्ट मुद्दा निर्माण करु शकलेले नाहीत. २०१४च्या निवडणुकीच्या वेळी त्यांची वलयांकित प्रतिमा आणि मनमोहनसिंग सरकारची प्रचारित करण्यात आलेली तथाकथित निष्क्रियता या मुद्याचे त्यांनी भांडवल केले होते. कालांतराने हे मुद्दे खोटे होते हे सिध्द झाले आहे. २०१९ मध्ये त्यांना पुलवामा येथे झालेला सुरक्षा दलावरील हल्ला व त्याला बालाकोटमध्ये देण्यात आलेले प्रत्युत्तर याचा फायदा त्यांना मिळाला. परंतु असे मुद्दे वारंवार वापरले जाऊ शकत नाहीत. पुलवामा प्रकरणातील सत्य बाहेर पडल्यानंतर या

देशातील जनतेचा भ्रमनिरास झाला. २०२४च्या निवडणुकीसाठी त्यांना अद्याप असा मुद्दा निर्माण करता आलेला नाही. हीच त्यांची खरी अडचण झालेली आहे. भ्रष्टाचाराबाबतचे त्यांचे सर्व दावे पोकळ ठरल्याचे जनतेला माहिती झाले आहेत आणि त्याबद्दल जनता उघडपणे बोलू देखील लागली आहे. एकीकडे भ्रष्टाचाराच्या विरोधात बोलायचे आणि दुसरीकडे ज्यांच्या विरोधात हे आरोप केले त्या नेत्यांनाच बिनधास्तपणे पक्षात घेतले जाते किंवा त्यांच्याबरोबर हातमिळवणी केली जाते. अजित पवार, एकनाथ शिंदे, अशोक चव्हाण ही महाराष्ट्रातील उदाहरणे आहेत. पश्चिम बंगालमध्ये सुवेंदु अधिकारी हे आणखी एक मोठे उदाहरण आहे. त्यामुळे मोदी भ्रष्टाचाराबाबत किती कठोर आहेत याचे पाणी जनतेने जोखले आहे. त्यामुळेच आता त्यांचा भ्रष्टाचारविरोधी अभिनिवेष बेगडी, पोकळ आणि हास्यास्पद होऊ लागला आहे. मोदींच्या वलयाची झळाळी आणि चकाकी आता उतरु लागली आहे. आता मतदारांना त्यांच्या शब्दातील पोकळपणा पूर्ण लक्षात आलेला असल्यानेच मतदारांची उदासीनता वाढल्याचे दिसून येऊ लागले आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना निवडणुकीच्या तोंडावर अटक करण्याचा निर्णय त्यांच्या अंगाशी येताना दिसत आहे. इतर पक्षातील नेत्यांची फोडाफोड करण्याचे त्यांचे तंत्र आता लोकांना नवे राहिलेले नाही. उलट आता त्याच्याबद्दल लोकांना किळस येऊ लागल्याचे दिसते. सूरत (गुजरात) मतदारसंघातील भाजपचे उमेदवार मुकेश दलाल हे बिनविरोध निवडून आले. त्यांच्याविरुद्ध असलेले काँग्रेसचे उमेदवार निलेश कुंभानी यांचा उमेदवारी अर्ज रद्द ठरविण्यात आला आणि उर्वरित अपक्ष उमेदवारांनी ठरविल्याप्रमाणे आपापले उमेदवारी अर्ज मागे घेतले आणि त्यामुळे प्रतिस्पर्धी उमेदवारच नसल्याने मुकेश दलाल यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. इंदोरमध्ये याच प्रकाराची पुनरावृत्ती झाली. तेथील काँग्रेसचे उमेदवार अक्षय कांति बम यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. येथे भाजपचे उमेदवार शंकर ललवाणी आहेत. मध्य प्रदेशातील एक मंत्री कैलाश विजयवर्गीय यांनी हे ऑपरेशन केले. अक्षय बम यांना भाजपकडे वळवून उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावला. अर्थात सूरत प्रमाणे अद्याप उर्वरित उमेदवारांनी आपापले अर्ज मागे घेतलेले नाहीत. परंतु आता ही निवडणूक एकतर्फी होणार हे स्पष्ट झाले आहे. हे प्रकार गंभीर आहेत. निवडणूक आयोगात किमान नैतिकता शिल्लक असेल तर त्यांनी या दोन्ही प्रकरणात तपास करण्याची गरज आहे. यापूर्वी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना फोडले जात असे आता भाजपने निवडणुकीच्या वेळी प्रतिपक्षाच्या उमेदवारांनाच पळविण्याचे उपद्व्याप सुरु केले आहेत. यामुळे लोकशाहीची अवहेलना केली जात आहे हे सत्तेच्या नशेत चूर असलेल्यांना लक्षात येईनासे झाले आहे. त्यांना फक्त येनकेन प्रकाराने सत्ता हवी आहे आणि त्यासाठी ते कोणत्याही थराला जाण्याच्या तयारीत आहेत. असले प्रकार करुन भारताची जगातल्या लोकशाही देशांमध्ये नाचक्की होईल याची किंचितशी फिकिर देखील त्यांना वाटेनाशी झाली आहे एवढे ते पुन्हा सत्तेत येण्यासाठी आसुसलेले आहेत.

मोदी आणि शहा यांच्याकडून प्रचाराची पातळी राखण्याची, राजकीय सभ्यता व सुसंस्कृतपणा टिकविण्याची अपेक्षा चूक आहे. कारण त्यांची राजकीय संस्कृती भिन्न आहे. ते स्वतःला रा.स्व.संघाच्या शिस्तीत तयार झाल्याचा दावा करतात परंतु त्यांचे हे राजकारण संघाच्या कोणत्या नैतिकतेत बसते हे विचारण्याची वेळ आली आहे. मोदी आणि शहा हे कोणत्याच राजकीय संस्कृतीचे प्रतिनिधित्व करीत नाहीत. ते एका राजकीय विकृतीचे प्रतिनिधित्व करतात. या विकृतीनुसार विरोधकांना निवडणुकीत यश मिळू नये यासाठी खालच्या पातळीवर जाऊन कारवाया करणे, त्यांच्या विरोधात खोटीनाटी प्रकरणे उकरुन काढणे, धाकदपटशा, बळजबरी यांचा वापर केला जातो. प्रचारसभांमध्ये ते पंतप्रधानपदाला शोभेल अशा भाषेचा वापरही करु शकत नाहीत अशी स्थिती आहे. शरद पवार यांच्यासारख्या नेत्याला भटकती आत्मा म्हणून हिणविण्याचा किळसवाणा प्रकार त्यांनी केला आहे. मोदी हे देखील आता ७५ वर्षांचे होतील. त्यांच्याच नियमाप्रमाणे ते त्यानंतर निवृत्त होऊन उदाहरण घालून देतील काय असा त्यांना प्रश्न आहे. मोदी हे पुढच्याच वर्षी ७५ वर्षांचे होतील आणि ते पंतप्रधानपद सोडून मार्गदर्शक मंडळात स्वतःला समाविष्ट करुन घेतील काय याचे उत्तरही त्यांनी दिले पाहिजे. त्यांनी जर ते केले नाही तर त्यांनाही या भटकत्या आत्म्याचे स्वरुप प्राप्त होईल. दुसऱ्याला नावे ठेवणे, दुसऱ्याची निंदा करणे, हेटाळणी करणे याला फार शहाणपणा लागत नाही. सभ्यतेसाठी सुसंस्कृतपणा लागतो आणि त्यासाठी सुशिक्षित असण्याची गरज असते. मतदारांना संभ्रमित करुन पंतप्रधानपदी आरूढ होणे हा पुरुषार्थ नाही. ज्याप्रमाणे विद्या ही विनयाने शोभते तशीच सत्ता देखील संयम, विनम्रता याने शोभून दिसते. उर्मट, उद्दामपणा अंगाशी आल्याखेरीज रहात नाही. एका व्यक्तीमुळे त्या व्यक्तीच्या अनुयायात आलेला उर्मटपणा व उद्दामपणा हा भयंकर असतो कारण जेव्हा संबंधित व्यक्ती सत्तेवरुन अंतर्धान पावते तेव्हा त्या व्यक्तीच्या अनुयायांची अवस्था भयंकर होते, ते वेडेपिसे होतात. परंतु त्यांना आधार द्यायला कुणी नसते. मोदी अशा एका व्यक्तिकेंद्रित समूहाची निर्मिती करीत आहेत. ते लोकशाहीला घातक आहे.

# अटक व प्रॉपर्टीजप्तीच्या भीतीमुळे नेते भाजपात गेले

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी १९ एप्रिलला बारामती येथे मुंबई तकला दिलेल्या एक्सक्लुझिव्ह मुलाखतीत सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करतानाच केंद्र सरकार आणि राज्य सरकारवर हल्ला चढविला. त्याचबरोबर पक्षातून बाहेर गेलेल्यांना आम्ही पुन्हा सोबत घेणार नाही, असे स्पष्टपणे नमूद केले. या मुलाखतीचा सविस्तर वृत्तांत.....**


# भाजपशी हातमिळवणी करणाऱ्यांना परत आमच्याकडे जागा नाही

## शरद पवार

**प्रश्न : १९६७ ते आत्तापर्यंत, यंदाची निवडणूक तुमच्यासाठी प्रचंड अवघड आहे असं वाटतं का तुम्हाला?**

शरद पवार : मला ही निवडणूक कठीण वाटत नाही. माझ्या दृष्टीने कठीण निवडणूक ही १९६७ सालची होती. कारण तेव्हा मी पहिल्यांदा लढलो. एक तर मी कॉलेजमधून बाहेर पडलो होतो. दुसरी गोष्ट म्हणजे इथे जो काँग्रेस पक्ष होता ते सगळे माझ्या विरोधी होते. ते सगळे सीनियर होते. दुसऱ्या बाजूने माझ्याविरुद्ध जो उमेदवार होता तो एका साखर कारखान्याचा चेअरमन होता. त्यामुळे जबरदस्त शक्ती होती. सीनियर लीडरशीप आपल्या बरोबर नाही. कारखानाच्या चेअरमन हा विरोधी उमेदवार आणि आम्ही सगळे तरुण. पण नव्या पिढीला मदत करावी ही भावना लोकांमध्ये होती आणि त्यांनी आम्हा लोकांना चांगलं मतदान केलं.

मला आठवतंय मला ३५ हजार मतं पडली आणि कारखान्याचे चेअरमन होते त्यांना १७ हजार मतं पडली होती. दुप्पट मतं मला पडली, पण त्यासाठी कष्ट खूप घ्यावे लागले. फिरावं लागलं, घरोघरी जाऊन लोकांना सांगावं लागलं. त्या दृष्टीने निवडणूक अत्यंत कष्टाची होती. दुसरीकडे साखर कारखानदारी ज्यांच्याकडे आहे अशा लोकांशी लढा आणि आम्ही सगळे फाटके यंगस्टर असा तो लढा होता. त्यामुळे ती निवडणूक आम्हाला अवघड गेली होती. त्यानंतर १९७७ सालची निवडणूक आम्हाला अवघड गेली. आणीबाणीनंतरची निवडणूक. कारण



त्यावेळी संपूर्ण देशातच चित्र वेगळं होतं.

**प्रश्न : आता तुमच्यासमोर आव्हान वेगळं आहे.. एका कुटुंबात मुलगी आणि सून एकमेकांविरोधात आले आहेत. त्यामुळे कुठे ना कुठे पवार कुटुंबात फूट पडल्याने तुमच्यासमोर आव्हान तर आहेच.**

शरद पवार : अजित पवार आणि त्यांचं कुटुंब वगळता सगळं पवार कुटुंब हे एकत्र आहे. सगळे कामही करतात. अजित पवारांचे सख्खे भाऊ सुद्धा हे आमच्यासोबत असून ते एका भागाची जबाबदारी घेत आहेत. सख्ख्या भावाच्या पत्नी आहेत त्या अतिशय प्रभावीपणे काम करत आहेत. सख्ख्या भावाचे चिरंजीव आहेत, ते चांगले उच्चशिक्षित आहेत तेही सगळे १२ ते १६ तास काम करत आहेत.

**प्रश्न असा एकच आहे, की एका घरात आतापर्यंत ही स्थिती नव्हती. नेहमी घरात एकमेकांना सहकार्य करण्याची भूमिका होती. त्या भूमिकेत एक सहकारी बाजूला गेला, कोणाच्या तरी सांगण्यावरून. आमच्या दृष्टीने आमची जी नेहमीची पद्धत आहे त्यापेक्षा त्यांनी (अजित पवार) वेगळा रस्ता स्वीकारला. हे याआधी कधी घडलं नव्हतं.**

घडलं होतं. पण, वेगळ्या पद्धतीने. माझे थोरले भाऊ, ते हयात नाहीत. वसंतराव पवार. ते शेकापचे होते. मी काँग्रेस पक्षाचा होतो. ते निवडणुकीला उभे राहिले होते. त्यांनी मला स्वत: सांगितलं होतं. की, तुझी विचारधारा काँग्रेसची आहे आणि माझी

विचारधारा शेकापची आहे. तू तुझ्या विचारधारेप्रमाणे काम कर.

**प्रश्न : पण यात आणि आत्ताच्यात फरक काय? अजित पवार म्हणत होते, की आम्हाला वाटत होतं, की भाजपसोबत जावं आणि तुम्हाला वाटत होतं की, जाऊ नये. म्हणून वेगवेगळे झालो आहोत. त्यामुळे त्या आणि या परिस्थितीत फरक काय?**

शरद पवार : फरक हा, की त्यावेळी माझे मोठे बंधू आणि मी, आमचं अंडरस्टँडिंग क्लिअर होतं. त्यामध्ये मी त्यांना सांगितलेलं की, मला तुमची भूमिका पटत नाही. त्यांनी सांगितलं की, त्यांची भूमिका ही होतीच. ते शेकापचे नेतेच होते. इथे असं काही चित्र नव्हतं. इथे कालपर्यंत अगदी विधानसभेची निवडणूक कोणत्या पक्षावर लढवली? राष्ट्रवादी, त्या पक्षाचे अध्यक्ष कोण होते? तर शरद पवार. पक्षाचे संस्थापक कोण होते शरद पवार. त्यांचं नाव, फोटो घेऊन तुम्ही निवडणुकीला गेलात. चालू विधानसभेच्या निवडणुकीला म्हणतोय मी.. जुन्या नाही. त्यानंतर सत्तेची सगळी केंद्रं तुमच्या हवाली केल्यानंतर एक काही कारणाने, त्याच्या खोलात आता मी जाऊ शकत नाही. इच्छित नाही. पण तुम्ही दुसरी टोकाची भूमिका घेतली. ज्या पक्षाच्या, ज्या नेतृत्वाच्या नावाने तुम्ही लढलात आणि यश मिळवलं ती लाइन सोडायची असेल तर पहिले तर राजीनामा तर द्यायला हवा.

**प्रश्न : खरी राष्ट्रवादी कोणाची शरद पवार की अजित पवारांची? ही लढाई महाराष्ट्रात आहे. तर खरी राष्ट्रवादी कोणाची?**

शरद पवार : साधी गोष्ट आहे. निवडणूक कोणाच्या नावाने लढलात? कोणत्या पक्षाच्या नावाने लढला? मतं कोणाच्या नावाने मागितली? फोटो कोणाचा वापरला? निवडणूक आयोगाच्या निर्णयावर मला काही भाष्य करायचं नाही. हल्ली त्यांचे काय निर्णय होतात आणि होत नाही हे सांगणं योग्य नाही.

आता साधी गोष्ट आहे, की महाराष्ट्रात पाच टप्प्यात निवडणूक होत आहे. तेही ४८ जागांसाठी. तर त्याच तामिळनाडूत एकाच दिवशी सगळ्या निवडणुका. काय निवडणूक आयोग याचं स्पष्टीकरण करणार आहे? पण ती संस्था आहे. तिच्याबद्दल लोकांमध्ये जास्त गैरसमज करणं योग्य नाही. म्हणून आम्ही थांबतोय. त्यामुळे त्यांनी चिन्ह कोणाला द्यायचं याचा निकाल दिला. माझी खात्री आहे, की हे प्रकरण सुप्रीम कोर्टात आहे. सुप्रीम कोर्ट याच्यासंबंधी निकाल देईल. अगदी साधी गोष्ट आहे. यांनी प्रचार सुरू केल्यानंतर सुप्रीम कोर्टात प्रकरण गेल्यावर कोर्टाने त्यांना आदेश दिले या लोकांना, की तुम्ही चिन्ह वापरत आहात तर त्या खाली लिहा, की हे प्रकरण कोर्टाच्या अधीन आहे. हे लोकांना कळू द्या. याचा अर्थ सुप्रीम कोर्टाची मानसिकता काय आहे हे स्पष्ट दिसतंय.

**प्रश्न : बारामतीची व्यवस्था अजित पवारांच्या हातात होती, अशा परिस्थितीत जो व्यवस्था बघत होता त्यांच्याकडून तुम्हाला आव्हान देण्यात आलं आहे. तुमच्या घरातील सून उभी राहिली त्याकडे कसं पाहता.**

शरद पवार : ज्यांना आपण शक्ती दिली, पुढं आणलं, संधी दिली त्यांनी हा निर्णय घेतला आहे. सहसा आपण एकत्र एका विचाराने काम करत आहोत. एखादं मिशन ठरवलं, तर ते मिशन पूर्ण करत असताना एका सदस्याने मिशनच्या अगदी विरुद्ध भूमिका घेतली तर आपण काय समजायचं? एक तर काही कारणं असायची शक्यता आहे. काही लोकांनी मला येऊन सांगितलं, की सध्याच्या केंद्र सरकारच्या ज्या एजन्सी आहेत त्या एजन्सींचा आम्हाला त्रास आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी तुम्ही मला मदत करा. मदत करा म्हणजे काय? तर आपण सगळे जण तिथे जाऊन बसूया. त्यांच्यात सामील होऊया म्हणजे आपले सगळे प्रश्न संपतील. त्याला मी नाही म्हटल्यानंतर त्यांनी अगदी डोळ्यात पाणी आणून सांगितलं, की आमच्या घरात सुद्धा चौकशी होईल. आमच्या संस्था, कारखाने या सगळ्याची चौकशी होईल. प्रफुल्ल पटेलांच्या घरी ईडीने वरळीतील एक मजला ताब्यात घेऊन एक ऑफिस थाटलं.

**प्रश्न : अमित शाह यांनी अजित पवारांवर दबाव टाकून तुम्ही सुनेत्रा पवारांना सुप्रिया सुळेंविरोधात निवडणुकीत लढवा असे सांगितल्याची दिल्लीतील राजकीय वर्तुळात चर्चा आहे.**

शरद पवार : असं दिल्लीत मी देखील ऐकलं.

**प्रश्न : शरद पवार विरूद्ध अमित शाह अशी देखील एक लढाई आहे.**

शरद पवार : ही गोष्ट खरी आहे, की त्यांची अपेक्षा जी होती की सगळ्यांनी मोदी-मोदी ही भूमिका घ्यावी. त्याच्याशी सुसंगत भूमिका जे घेत नाहीत त्या लोकांना त्रास होतो. अरविंद केजरीवालांचं काय झालं? त्यांच्या सहकाऱ्यांचं काय झालं? ममताच्या सहकाऱ्यांचं काय झालं? झारखंडच्या नेत्यांचं काय झालं? या सगळ्या गोष्टी यापूर्वी कधी घडल्या नव्हत्या. एखाद्याविषयी चौकशी झाली. पण निवडणुकीच्या तोंडावर हे सगळे मुद्दे काही राज्यात निर्माण करणं याचा अर्थ ही निवडणूक चांगल्या पद्धतीने होईल की नाही याबाबत शंका लोकांच्या मनात नक्की तयार होऊ शकते.

**प्रश्न : तुमच्या मनात ही शंका आहे का, की निवडणूक मुक्त आणि न्याय्य नाहीये?**

शरद पवार : माहिती नाही. सांगता येत नाही. अजून तरी महाराष्ट्रातील जी शासकीय यंत्रणा आहे त्यावर माझा विश्वास आहे. ते चुकीच्या गोष्टी सहसा होऊ देणार नाहीत.

**प्रश्न : २०१९ साली तुम्ही म्हणालेले, की मला बघायचंच आहे की, आम्हाला अमित शाह इथे सरकार कसं काय बनवू देत नाहीत ते. थेट चॅलेंज देण्यात आलं होतं. त्या बदल्यात जून २०२३ मध्ये ही घटना घडली असं वाटतं का?**

शरद पवार : माहीत नाही. पण जे आमच्या घरातील लोक

बाजूला गेले, त्यांचं अनेक वेळेला स्टेटमेंट माझ्या वाचनात आलं, की मी अमितभाईंशी बोलून आलोय, त्यांची मदत आहे. तुम्ही काही काळजी करू नका. आमच्या दृष्टीने अमितभाई कोण महाराष्ट्रात? एकेकाळी राजकारणात, समाजकारणात प्रचंड लोकमान्यता असलेले नेते आम्ही पाहिले आहेत. ही पार्श्वभूमी आम्ही अमितभाईंची कधी पाहिलेली नाही. सत्ता हातात आहे आणि मोदींचा आशीर्वाद आहे, त्याच्या आधारे काही गोष्टी घडवायच्या त्या मी घडवणार असं ते व्यक्तिमत्व आम्हाला दिसतं.

**प्रश्न : शरद पवारांनी भाजप आणि शिवसेनेची जी युती होती ती तोडली. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री केलं, तेव्हा विचार केला नाही का? मोदी-फडणवीसांच्या नावाने मतं त्यांना दिली. पण युती तोडली.**

शरद पवार : ते २५ वर्ष एकत्र होते. त्यावेळी काही ते मोदी आणि अमित शाह यांच्या नावाने निवडणूक लढवत नव्हते. बाळासाहेब ठाकरेंच्या नावाने निवडणूक लढवत होते. त्यांना ज्या जागा मिळत होत्या त्या बाळासाहेब ठाकरेंच्या नावाने मिळत होत्या. मला नाही वाटत, की नरेंद्र मोदींच्या नावाने जागा मिळत असू शकतील. देवेंद्रच्या नावाने मिळतात असंही वाटत नाही. पण मोदींमुळे विजय मिळाला ही गोष्ट मान्यच आहे. पण याचा अर्थ शिवसेना अशी काही तरी संघटना नव्हती, की तिला कोणी काही महत्त्व देऊ नये. शिवसेना ही प्रचंड कार्यकर्त्यांचा संच असलेल्या लोकांचं संघटन होतं. मी तर हेही सांगतो, की महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरेंनी जी संघटना निर्माण केली त्या संघटनेने समाजातील लहान-लहान घटकांना जो आत्मविश्वास दिला, किंबहुना मी सुद्धा तेवढा देऊ शकलो नाही. आता औरंगाबदला त्यांचे कोण उमेदवार आहेत, तर चंद्रकांत खैरे. खैरे कोणत्या समाजाचे आहेत, तर सुतार. सुतार समाजाची किती मतं असतील तिथे? जास्तीत जास्त तीन हजार, चार हजार. तर ते तीन वेळेला आमदार, चार वेळेला खासदार होऊ शकले. ज्याच्याकडे ३-४ हजार कौटुंबिक मतं नाहीत ती व्यक्ती इतक्या वेळा येऊ शकते याचा अर्थ बाळासाहेब ठाकरे त्यांच्या पाठिशी उभे होते आणि अशा लहान थरातील लोकांना सुद्धा बाळासाहेबांनी मोठं केलं. हे अमित शाह किंवा मोदींनी असं केलेलं नाही.

**प्रश्न : ज्यांना तुम्ही मोठं केलं, म्हणजे अजित पवार. तुम्हाला असं वाटतं का तुमच्या पाठीत खंजीर खुपसला आहे.**

शरद पवार : असं नाही. अजित पवारच नाही, तर जे लोकं माझ्या पक्षाचे, संघटनेचे लोक, ३०-४० आमदार किंवा इतर आमच्या संघटनेच्या, पक्षाच्या आणि नेतृत्वाच्या नावाने निवडून आले. ज्यांच्यासाठी मी कष्ट घेतले. आज ते सगळे या-ना त्या कारणाने निघून जातात याची मला अस्वस्थतता आहे. पण मला त्याची चिंता नाही.

**प्रश्न : सुनावणीच्या वेळी असा आरोप लावण्यात आला, की तुम्ही हुकूमशाहप्रमाणे काम करता. त्यामुळे त्यांना बंड करावं असं वाटलं.**

शरद पवार : मी पक्ष या लोकांच्या हातात जास्त दिला त्यामुळे हे घडलं. मी जर थोडं नियंत्रण ठेवलं असतं तर हे घडलं नसतं. या सगळ्यांना प्रोत्साहित करायचं, नवीन नेतृत्व तयार करायचं ही जी कल्पना होती त्याचे हे परिणाम आहेत.

**प्रश्न : बाहेरचे पवार आणि मूळ पवार ही सगळी कॅम्पेन कशी काय?**

शरद पवार : मी काही कॅम्पेन करा असं काही सांगितलं नाही.

**प्रश्न : या कॅम्पेनकडे तुम्ही कसं बघता. ओरिजिनल पवारांना मतदान करा.**

शरद पवार : असं आहे की, लहान लोकं आहेत विचाराच्या दृष्टीने. ते लोकं जी भूमिका मांडतात, काय भूमिका मांडतात? काय महाराष्ट्राच्या हिताचं मांडतात?

**प्रश्न : बारामतीत सुप्रिया सुळे वि सुनेत्रा पवार आणि महाराष्ट्रात ४८ जागा. तुम्हाला काय वाटतं महाविकास आघाडीला किती जागा मिळतील?**

शरद पवार : मागच्या निवडणुकीत आम्हा सगळ्यांना मिळून ६ जागा मिळाल्या होत्या. आम्हाला ५ आणि काँग्रेसला १ आणि १ अपक्ष. आज त्याच्यामध्ये तिप्पट तरी वाढ होईल. मला आश्चर्य वाटणार नाही, की आम्हाला ५० टक्के जागा मिळाल्या तर. मिळाल्याचं आश्चर्य वाटणार नाही. बारामती तर आहेच.

**प्रश्न : महाराष्ट्रातील लढाई कशाबद्दलची आहे?**

शरद पवार : मोदींच्या बद्दलची एक सरसकट नाराजी ही मला सगळीकडे दिसते. दुसरी गोष्ट अशी, की मोदींनीच आमच्यावर हल्ला चढवला, आरोप केले. त्या आरोपांमध्ये जे घटक होते त्यांनाच सोबत घेऊन आज ते आमच्याविरोधात निवडणूक लढवत आहेत. सामान्य मतदाराला निश्चित असं वाटतं, की मोदींनी एखाद्या व्यक्तीवर आरोप केले, त्यांना आम्हाला मत द्यायची इच्छा नाही. नव्हती. आज मोदी त्यांना घेऊन पुढे येत असतील तर मोदींच्या समर्थनार्थ उभे राहिलेल्या लोकांना आम्ही कितपत पाठिंबा द्यावा याचा विचार मतदार नक्की करतील.

**प्रश्न : या निवडणुकीनंतर पुन्हा एकत्र येण्याची शक्यता आहे का? मोहिते-पाटील भाजपसोबत गेले होते ते परत आले. लंके अजित पवारांसोबत गेले होते ते परत आले. हीच शक्यता अजित पवार, वळसे-पाटील आणि प्रफुल्ल पटेलांबाबत आहे का?**

शरद पवार : साधी गोष्ट आहे, की ज्यांना पक्षाने संधी दिली, प्रतिष्ठा दिली. ते लोकं पक्षाची विचारसरणी, हे सगळं सोडून गेले. भाजपसारख्या शक्तीशी ज्यांनी हातमिळवणी केली. अशांना आमच्याकडे जागा नाही.




# मोदींच्या रुपाने नवा 'पुतीन' नको

**शरद पवार**

देशाचे आजचे पंतप्रधान कुठेही गेल्यानंतर जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका करतात. संसदेमध्ये जेव्हा नरेंद्र मोदी जातात तेव्हा सत्ताधारी पक्षाचे खासदार मान खाली घालून बसतात. एकप्रकारची दहशत त्याठिकाणी दिसून येते. या देशात मोदींच्या रुपाने नवीन 'पुतीन' तयार होत आहे का, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मी अनेक नेत्यांना जवळून पाहिलं आहे, जवाहरलाल नेहरु यांच्यानंतर मी सगळे पंतप्रधान पाहिले. नेहरुंची भाषणं नवा भारत कसा निर्माण करायचा, यावर असायची. आताच्या पंतप्रधानांच्या भाषणात नेहरु आणि काँग्रेसवर टीका असते. त्यांच्यात दृष्टीकोनाचा अभाव दिसतो. आम्ही अनेक नेत्यांची भाषणे यापूर्वी ऐकली. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या भाषणातून केवळ काँग्रेसवर हल्ला करतात. आज काँग्रेस पक्ष सत्तेत नाही, तुम्ही सत्तेत आहात. त्यामुळे काँग्रेस पक्षाने किती जागा लढवल्या याची चिंता पंतप्रधान मोदी यांना करायची काय गरज आहे.

उत्तर प्रदेशमध्ये खासदार जाहीरपणे बोलतात की, संविधान बदलायचे असेल तर मोदींना मतदान करा. देशात ही जी हुकूमशाही आली आहे त्याला घालवण्यासाठी संविधान मजबूत केलं पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे हा देश सुरक्षित राहिला. त्याचे रक्षण करणे आमचे काम आहे. त्यादृष्टीने ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी– शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी लोकसभा निवडणूक प्रचाराच्या धामधुमीत एबीपी माझा या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत विविध विषयांवर भाष्य करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या टीकेला सडेतोड उत्तरे दिली. या मुलाखतीचा संक्षिप्त सारांश....**

भाजपसोबत जायचं नाही ही आपली भूमिका या आधीही होती, आणि यापुढेही राहील. जर कुणाला परत यायचं असेल तर इंडिया आघाडीत यावं. जे सहकारी सोडून गेलेत त्यांना परत यायचं असेल तर यावं, फक्त भाजप नको. या देशाची सत्ता पुन्हा भाजपकडे गेल्यास ती देशहिताची ठरणार नाही या निष्कर्षापर्यंत आम्ही आलो असून यावेळी लोक आम्हाला संधी देतील.

२०१४ साली भाजपला पाठिंबा द्यायचं जाहीर केलं, पण तो दिला नाही, तो स्ट्रॅटेजीचा भाग होता. मात्र २०१७ साली शिवसेनेला भाजपपासून दूर करून उद्धव ठाकरेंसोबत जायचा आमचा प्लॅन होता, आणि नंतर तो यशस्वी ठरला. आता जसं मी आणि उद्धव ठाकरे एकत्रित भूमिका मांडतो ते मला हवं होतं. भाजपसोबत जायचा माझा प्लॅन नव्हता, माझ्या सहकाऱ्यांचा तो निर्णय होता. पण मी कुठल्याही निर्णयापर्यंत पोहचलो नव्हतो. शेवटी पक्षाचा प्रमुख म्हणून माझा काही वैयक्तिक निर्णय आहेत की नाही? जेव्हा प्रत्यक्षात निर्णय घ्यायची वेळ आली तेव्हा मी भाजपसोबत न जाण्याचा निर्णय घेतला. अजित पवारांनी आपल्यावर आरोप केले, तो त्यांचा प्रश्न आहे, मी त्यांच्या आरोपांना उत्तर देण्यास बांधील नाही. जे लोक आता म्हणतात की त्यावेळी भाजपसोबत जायचं ठरलं होतं, त्यांना भाजपसोबत जायचं नव्हतं तर सत्तेसोबत जायचं होतं.



२०१९ साली भाजपसोबत जाण्यासाठी अजित पवारांना माझी मान्यता होती तर तीन दिवसांनी राजीनामा का दिला? मला त्यांची ती भूमिका आवडलेली नव्हती. अजित पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना भाजपसोबत जायचं नव्हतं, पण सत्तेत जायचं होतं. लोकशाहीमध्ये सर्वांना सत्तेत सहभागी होता येत नाही. अजित पवार हे २०१४ साली विरोधात होतेच ना? भाजप सोडून आमच्या सोबत कोण परत येणार असेल तर आम्हाला विचार करायला हरकत नाही, पण भाजपच्या सोबत कधीही जाणार नाही.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन पक्ष फोडून आले. देवेंद्र यांचा एक सोज्वळ चेहरा आमच्या अंतर्मनात होता. या सर्व प्रकारामुळे त्यांचा खरा चेहरा लोकांच्या समोर आला. त्यामुळे राज्यात बहुसंख्य जागा महाविकास आघाडीला मिळतील. मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरे यांचे नाव सुचवावे यासाठी ठाकरे यांनीच काही माणसे शरद पवार यांच्याकडे पाठवली असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. पण, त्यावेळी माझे मत असे होते की, हे राज्य चालवण्यासाठी ठाकरे यांना संधी दिली पाहिजे. सर्वात जास्त आमदार ठाकरे यांच्याकडे होते. मी स्वतः ठाकरे यांना आग्रह केला आणि त्यांना सांगितले तुम्हाला ही जबाबदारी घ्यावी लागेल. ते तयार नव्हते, बैठकीत मी त्यांचा हात धरला आणि वर केला आणि सांगितले हे तयार आहेत.

निवडणुकीमध्ये सून आपल्या विरोधात उभी राहिली, त्याचा काही त्रास नाही, लोकशाहीत तो प्रत्येकाचा अधिकार आहे. बारामतीत कोण निवडून येणार, याचा अंदाज बिंदाज मी सांगत नसतो, मी ॲक्शन घेत असतो. यशवंतराव चव्हाण याचं कार्य महान आहे. त्यांनी राज्यच नव्हे तर देशपातळीवर काम केलं आहे. त्यामुळे त्यांना विरोधकांनी त्यांच्या जाहीरनाम्यात भारतरत्नांची मागणी केली याचं मला समाधान आहे.

राज्यात महाविकास आघाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या लोकसभा निवडणुकीत आधी ५० टक्के जागा आम्हाला मिळतील असं वाटत होतं. पण सध्या त्यापेक्षा जास्त जागा मिळतील असा ट्रेन्ड दिसतोय. शेवटी लोक काय करतील यावर सगळं अवलंबून असेल. पाच वर्षांपूर्वी राष्ट्रवादीला चार जागा मिळाल्या होत्या, काँग्रेसला एक आणि एमआयएमला एक जागा मिळाली होती. आता तशी अवस्था नाही. यावेळी भाजपविरोधी वातावरण असल्याने लोक आम्हाला संधी देतील.

आम्ही पवार कुटुंबातील सगळे एकाच विचारानं राजकारण करत आलो आहोत. आतापर्यंत आम्ही भाजपच्या विरोधात निवडणूक लढलो. आता एका व्यक्तीने आमच्या विचारधारेच्या विरोधात भूमिका घेतली. बारामतीमध्ये सुप्रिया सुळे विरूद्ध सुनेत्रा पवार अशी निवडणूक झाली नसती तर आनंदच झाला असता, पण आता एकाने वेगळी भूमिका घेतली आहे. राजकारणात जर कुणी वेगळी भूमिका घेतली तर आम्ही त्यावर काय करू शकतो?

■■■

निवडणूक लोकशाहीमध्ये येत असते. यावेळी ची निवडणूक महत्त्वाची का? आधीच्या वक्त्यांनी बोलत असताना सांगितलं की लोकशाहीमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार हा तुमचा आहे आणि तो अधिकार टिकला पाहिजे. आज काहीतरी देशात वेगळं घडत आहे अशी एक शंका लोकांना यायला लागली आहे. वेगळं घडलं तर तुमच्या अधिकारांवर गदा येईल, संकटे येतील. ते होऊ द्यायचे नाही.

गेले दहा दिवस मी वाचत आहे. मोदी साहेब बोलताहेत, देवेंद्र फडणवीस बोलत आहेत. आणखी काही नेते बोलत आहेत. या देशाच्या घटनेचा अधिकार आम्ही जतन करणार, आमच्या विरोधात हा खोटा प्रचार आहे. आम्ही नाही प्रचार केला. केंद्र सरकारचे एक मंत्री आहेत, त्यांचे नाव अनंत हेगडे. त्यांनी एक भाषण केलं लोकांसमोर, की या देशाची घटना मोदी साहेबांना बदलायची आहे आणि ती बदलायची असेल तर आम्हाला जास्तीत जास्त खासदार निवडून द्या. हे मी म्हणत नाही, मोदी साहेबांचा मंत्री म्हणतोय. तो म्हणतोय की घटना बदलायची. आता घटना बदलायचा निकाल घेऊन कोणी राजकारण करत असेल तर प्रश्न भयंकर गंभीर होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहिली. या घटनेने सर्वांना सारखे अधिकार दिले. तुम्हाला जसे अधिकार आहे मलाही तसेच आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैशिष्ट्य हे आहे, की समान संधी, समान अधिकार. त्या समान अधिकारावर जे संकट यायला लागलं आहे, त्यावेळेला आपण सर्वांनी जागृत राहणं आणि जे आणतात त्यांना दूर ठेवणं हे काम आपल्याला करायचे आहे. ते सांगतात आम्ही हे केलं, ते केलं, ते केलं.

लोकशाहीवरचं संकट, घटनेवरचं संकट आणि सामान्य माणसाच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची भूमिका ही स्थिती जर या ठिकाणी असेल तर त्याला उत्तर द्यावे लागेल, आणि ते उत्तर द्यायचे असेल तर उद्याच्या निवडणुकीमध्ये भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांचा १०० टक्के पराभव करण्याचं काम तुम्ही मतदारांनी करावं.

आज कुठे शेतीचे प्रश्न आहेत, पाण्याचे प्रश्न आहेत, तरुणांना रोजगाराच्या संबंधित प्रश्न आहेत, उपेक्षित समाज महिला यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे प्रश्न आहेत. हे सगळं बदलायचं असेल तर एक भक्कम सरकार त्या ठिकाणी असलं पाहिजे. आज ज्यांच्या हातामध्ये सरकार आहे, त्यांना लोकांच्या प्रश्नांसंबंधी यत्किंचितही आस्था नाही. अनेक गोष्टी सांगता येतील. त्यांच्याबद्दल टीका सबंध देशामध्ये केली गेली. लोक त्यांच्याबद्दल चिंता व्यक्त करतात यांच्या हातात सत्ता गेली तर पुन्हा लोकशाही आणि संविधान हे शिल्लक राहणार की नाही? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत कष्टाने घटना आपल्याला दिली. त्यामुळे हा देश एकसंघ राहिला. भारताच्या आजूबाजूच्या देशांमध्ये अशी




**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी एप्रिल महिन्यामध्ये राज्यात ठिकठिकाणी केलेल्या भाषणातील महत्त्वाच्या मुद्द्यांचा घेतलेला मागोवा.....**

# देशाच्या घटनेचे अधिकार आम्ही जतन करणार

**शरद पवार**

घटना नव्हती, त्यामुळे अनेक संकटांना त्यांना तोंड द्यावं लागलं. पाकिस्तानचे उदाहरण घ्या, तिथे हुकूमशाही होती. बांगलादेशचे उदाहरण घ्या, तिथे हुकूमशाही होती. श्रीलंकेचे उदाहरण घ्या, तिथे हुकूमशाही होती. नेपाळचे उदाहरण घ्या, तिथे हुकूमशाही होती. भारतामध्ये कधी हुकूमशाही नव्हती, त्याचे महत्त्वाचे कारण बाबासाहेब आंबेडकरांनी अशी घटना आपल्याला दिली, की त्या घटनेच्या जोरावर हा देश एकसंघ राहिलेला आहे. पण चिंता ही आहे की त्या घटनेच्या संबंधी काहीतरी चुकीचा विचार हा राज्यकर्त्यांच्या डोक्यात येतो की काय अशी शंका आमच्या मनात आहे. यांनी पुन्हा सत्ता हातात घेतली तर सत्तेचा गैरवापर करतील. ते जर पुन्हा होऊ द्यायचं नसेल तर लंके यांना विजयी केलं पाहिजे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये भाजपाचा पराभव करणे तुमच्या माझ्या सर्वांची जबाबदारी आहे आणि म्हणून यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे.

## दहा वर्षे सत्ता यांची, पण हिशोब मला मागताहेत

अमित शाह नावाचे एक गृहस्थ आहेत, ते तडीपार होते. त्यांनी सोलापुरात येऊन भाषण केलं. दहा वर्षात शरद पवारांनी काय केलं? त्याचा हिशोब द्या. २०१४ ते २०२४ या कालावधीमध्ये राज्य कोणाचं होतं? मोदींचं. मंत्री कोण होते? हेच होते. त्या काळात मी सत्तेत नव्हतो. पण हिशोब मला मागत आहेत. सत्ता यांच्याकडे त्याची आठवण त्यांना नाही. अनेक गोष्टी सांगता येतील शेतीमालाच्या किमती. एक काळ असा होता की सगळ्यात जास्त उसाचे उत्पादन उत्तर प्रदेशमध्ये व्हायचे, यंदा महाराष्ट्रात आहे.





महाराष्ट्रामध्ये तुम्ही लोकांनी कष्ट केले, कारखाने ठीक चालले, दोन पैसे मिळाले आणि उसाचे पीक लोकांनी घेतले. साखर तयार केली, पिक घेतलं, पण तयार केलेल्या मालाला चांगली किंमत मिळायची असेल तर तो जगात पाठवायला पाहिजे. देशाची गरज भागवून माल शिल्लक आहे, निर्यात करण्याची क्षमता आहे, त्याला बंदी, त्याला परवानगी नाही. हा विषय मी स्वतः अनेकदा मांडला.

आपल्या देशात एक संस्था आहे तिचं नाव वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट. वसंतदादा पाटील यांच्या नावाने उसाचे संशोधन कारखान्यातल्या समस्या दूर करायला ती संस्था स्थापन केली. या देशाचा प्रत्येक ऊस उत्पादन करणारा शेतकरी एक रुपये किंवा दोन रुपये त्या संस्थेला देतो आणि त्या संस्थेचा अध्यक्ष मी आहे. आम्ही सगळे ज्या वेळेपासून दिवसेंदिवस ऊस वाढणार, उसाचे उत्पादन वाढणार नुसती साखर एके साखर करून चालणार नाही. त्याच्यापासून इथेनॉल म्हणजे पेट्रोलमध्ये मिक्स करून गाड्या आणि मोटरसायकली त्याच्यावर चालतील असे एक इंधन तयार करणे, त्याच्यापासून वीज तयार करणे आपल्या कारखान्यात त्या गोष्टी होतात. हे सगळं काम करून संशोधन करणारी ही संस्था त्या संस्थेचा अभ्यास हा सांगतो हे सगळं चाललंय. पण तयार झालेला माल जगाच्या बाजारपेठेत गेल्याशिवाय शेतकऱ्यांना दोन पैसे चांगले मिळणार नाहीत. हे तथ्य सर्व संशोधक सांगतात. पण सरकार परवानगी देत नाही.

## महागाई तर कमी झालीच नाही, उलट पाकिटमारी सुरु आहे

आज ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांनी गेली दहा वर्षे या देशातील जनतेची फसवणूक केली. महागाई असो, बेकारी असो, शेतकऱ्यांचे प्रश्न असो, महिलांवरील अत्याचार असो, अनेक गोष्टी आणि यासंदर्भात दिलेली आश्वासने आणि वस्तुस्थिती यांच्यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. साधी गोष्ट आहे, पेट्रोलच्या किंमती. मोदी साहेब २०१४ ला सत्तेवर आले. त्यावेळेला डॉ. मनमोहन सिंग किंवा मी किंवा आमच्या सहकाऱ्यांनी देशाची सत्ता सोडली. त्यावेळेला पेट्रोलचे भाव ७१ रुपये लिटर होते. मोदींनी आश्वासन दिलं, ५० दिवसांमध्ये मी पेट्रोलच्या किंमती कमी करतो. हे आश्वासन २०१४ मध्ये दिलं होतं. आज ३ हजार ६५० दिवस झाले. ५० टक्के दर कमी करतो म्हणाले पण आता दर झाला १०६ रुपये लिटर झाला. पहिले आश्वासन ७१ च्या ५० टक्के आणि वस्तुस्थिती १०६ रुपये लिटर आजचा भाव आहे.

मोदींनी सांगितलं की घरगुती गॅसचे दर ४१० रुपये एका सिलेंडरला आहे, तो मी कमी करणार. आज गॅस ४१० नव्हे तर १ हजार १६० झाला. म्हणजे ४१० वरून १ हजारावर गेला. मोदींनी तिसरं आश्वासन दिलं, की तरुण मुलांना मी रोजगार देणार आणि त्यासाठी माझा जो निर्णय आहे तो दरवर्षी २ कोटी मुलांना मी नोकऱ्या देणार. १० वर्षांमध्ये नोकऱ्या



जनतेच्या खिशातून पैसे काढणारी पाकिटमारी चालू आहे

कमी झाल्या. आज हिंदुस्थानामध्ये जेवढी तरुण मुलं आहेत त्याच्यातील ८६ टक्के मुलं ही बेकार आहेत, त्यांना नोकरी मिळत नाही. अशा अनेक गोष्टी सांगता येतील. पेट्रोल महाग केलं, डिझेल महाग केलं, ऑईल महाग केलं, साखर स्वस्त केली, दूध स्वस्त केलं. इथे आमच्या आया-बहिणी बसल्या आहेत त्यांनी सांगितलं होतं की गॅसच्या किंमती मी कमी करणार, त्या दुप्पट केल्या.

आज संसार चालवणं, हे भगिनींना अवघड झालं आणि त्याचे महत्त्वाचे कारण जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती या सगळ्या गोष्टींच्या संदर्भात या प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या सरकारनी काहीही पाऊले टाकलेली नाहीत. आपल्याला संकटामध्ये टाकण्याचं काम केलं. तुम्ही पिकवताय ते सर्व स्वस्त आणि दुसरे पिकवतात त्याला तुमच्या खिशातून पैसे द्या आणि सांगताना सांगतात सर्वांचे खिशात मी इतके इतके हजार रुपये घातले. घालायचे एका खिशात आणि खालच्या खिशातून काढून घ्यायचे, आणि ते डबल काढून घेतले. आता ही पाकिटमारी बंद करायची की नाही? ही पाकीट मारी बंद करायची असेल, तर हा पाकीटमार कोण असेल? निर्णय घेणारा, धोरण ठरवणारा, त्याचा शोध घ्यावा लागेल आणि त्यांना बाजूला करावं लागेल, त्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची आहे. याचा अर्थ हा आहे की शब्द द्यायचा, आश्वासनं द्यायची आणि कृती उलटी करायची, ही जर नीती मोदींची असेल तर त्यांच्या हातामध्ये सत्ता द्यायची नाही हा निकाल आपल्याला घ्यावा लागेल. लोकशाही उध्वस्त करण्याचं काम जर या ठिकाणी होत असेल तर तुमची माझी जबाबदारी आहे की, या निवडणुकीमध्ये मोदी साहेबांचा आणि त्यांच्या विचारांचा १०० टक्के पराभव करणे हेच काम उद्याच्याला आपण करायचे आहे. त्यासाठी आपण तयार राहा एवढीच विनंती या ठिकाणी करतो.

## आम्ही देणं-घेणं करून मत मागत नाही

लोकांनी खासदार म्हणून दिल्लीला पाठवल्यानंतर लोकांसाठी काम करायचं असतं, लोकांची आठवण ठेवायची असते, लोकांच्या दुखणं प्रश्नांच्या रूपाने भाषणात त्या ठिकाणी मांडायचं असतं आणि हे काम उत्तमरित्या करण्याचे काम आपल्या खासदारांकडून होत आहे. त्यामुळे साहजिकच आहे त्यांचा अधिकार मत मागायचा आहे आणि मग तुम्हाला द्यायचे आहे. ते मत या वेळेला आधीच सांगितलं, खूण बदललेली आहे. काही गोष्टी झाल्या, पूर्वीची खूण वेगळी होती, आता तो मामला कोर्टात गेला आहे. पण त्यांनी सांगितलं की घड्याळ तुम्ही घ्या आणि खाली लिहा कोर्टाच्या अखत्यारित आहे, ते तुम्ही कदाचित वाचलं असेल. पण ती खूण लक्षात ठेवायची आणि त्या पद्धतीने मतदान करायचं. या मतदानाला अनेक लोक आणखी काही काही सांगतात, त्याच्याकडे काही लक्ष द्यायचं नाही. आपल्याला वाद वाढवायचे नाही, आपल्याला संघर्ष वाढवायचा नाही, आपल्याला मनापासून काम करायचं




आहे. ते काम करायचं असेल तर तिथं बटण दाबा. तुतारीच्या समोरचं बटण दाबा. आता इथे सांगितलं कसं दाबा. मी काही सांगत नाही आणि सांगताना हेही सांगितलं काही कमी पडून देणार नाही. मी काही त्याच्या खोलात जाऊ इच्छित नाही. कारण देणं घेणं करून हे मत मागण्याची भूमिका आमची नाही. इथं काम करायचं, लोकांना शक्ती द्यायची, लोकांना सेवा करायची आणि मत मागायचं ही भूमिका आहे.

## लोकांच्या प्रश्नांवर बोलण्याऐवजी पंतप्रधानांची विरोधी पक्षांवर टीका

निवडणूक लोकसभेची! मला असं कळलं की देशाचे प्रधानमंत्री राज्यात आले होते. ते येतात, अनेक ठिकाणी जातात. अपेक्षा अशी असते की देशाचा प्रमुख एखाद्या राज्यात जेव्हा जातो, त्यावेळेला देशाच्यासाठी मी काय करणार? लोकांचे प्रश्न कसे सोडवणार? अडचणी काय आहेत? या संदर्भातील भूमिका मांडायची त्यांची जबाबदारी. पण ठिकठिकाणी ते जातात, लोकांच्या प्रश्नांवर कधी बोलत नाहीत, शेतकऱ्यांचे दुखणं काय आहे ते जाणून घेत नाहीत, नवीन पिढी बेकारीमध्ये संकटात कशी आली? याबद्दलचा विचार ते करत नाहीत. महागाईमुळे घर-संसार चालवणं हे कठीण कसं झालंय? त्यासंबंधीची भूमिका घेत नाहीत. मग

करतात काय? तर फक्त विरोधी पक्षांवर टीका करणे. शरद पवारांनी असं केलं, उद्धव ठाकरेंनी असं केलं, आणखी कोणीतरी असं केलं. याशिवाय ते काहीच भूमिका मांडत नाहीत. त्याचा परिणाम हा आहे की आज देशामध्ये अनेक संकटाला तोंड द्यायची स्थिती निर्माण झालेली आहे.

मोदींची भाषणे ऐकली, त्यांचे विचार समजून घेतले, तर एक गोष्ट स्पष्ट होते की हे सबंध देशाचे प्रधानमंत्री नाहीत तर भाजपचे प्रधानमंत्री आहेत. देशाचे नेतृत्व ही करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांनी राजकीय दृष्टिकोन ठेवावा लागतो. मतभिन्नता असू शकते, पण राजकीय दृष्टिकोन याची राष्ट्रीय गरज असते. आज मोदी कुठेही गेल्यानंतर आपण राष्ट्राचे प्रतिनिधी आहोत, राष्ट्रीय दृष्टिकोन ठेवला पाहिजे याचे विस्मरण त्यांना होते आणि ते सातत्याने कधी नेहरूंवर टीका करतात, कधी राहुल गांधी यांच्यावर टीका करतात, कधी माझ्यावर टीका करतात, कधी आघाडीवर टीका करतात. या निवडणुकीच्या निमित्ताने तुम्ही प्रधानमंत्री आहात, तुम्ही काय करणार? हे देशाला सांगा. जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये आयुष्यातील सर्वात जास्त वर्ष ज्यांनी इंग्रजांविरुद्ध लढायला घालवली, तुरुंगामध्ये गेले, स्वतःच्या घरादाराचा विचार केला नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हा देश संसदीय लोकशाही पद्धतीने चालला पाहिजे यासाठी प्रयत्न केले, विज्ञानाला प्रोत्साहित केले आणि जगातली महत्त्वाची सत्ता भारत व्हावी यासाठी त्यांनी अखंड प्रयत्न केले. अशा देशासाठी प्रचंड योगदान देणारे जवाहरलाल नेहरू यांच्यासारखे नेतृत्व, त्यांच्यावर व्यक्तिगत टीका करणे याचा अर्थ आज या देशाचे प्रधानमंत्री यांची मानसिकता काय आहे, हे यानिमित्ताने स्पष्ट होते.

## मोदी सरकार मस्तवाल

मध्यंतरी आम्ही पाहिलं, दिल्लीमध्ये पंजाब आणि हरियाणा इथले शेतकरी त्यांच्या मागण्यांसाठी रस्त्यांवर येऊन बसले. आंदोलन केलं. एक वर्षभर त्यांनी आंदोलन केलं. दिल्लीची थंडी कठीण थंडी असते, दिल्लीचा उन्हाळा आपल्यापेक्षा कठीण असतो आणि दिल्लीचा पावसाळा हा उद्‌ध्वस्त करतो आणि अशी स्थिती असताना एक वर्षभर शेतकरी रस्त्यावर येऊन बसले. त्यांच्या कुटुंबातल्या आया-बहिणी त्यांचा स्वयंपाक करण्यासाठी घरदार सोडून त्या ठिकाणी आले आणि अक्षरशः हजारोंच्या संख्येने हा शेतकरी वर्ग त्या ठिकाणी बसला होता. पण मोदींचे सरकार त्यांच्याकडे ढुंकून बघायला तयार नाही. काय याचा अर्थ समजायचा?



एवढेच नव्हे त्यांच्या सरकारमधले एक मंत्री आणि त्यांचे कुटुंबीय गाडी घेऊन जातात, जिथे शेतकरी आंदोलनाला बसतात, त्या ठिकाणी गाडी घालतात, त्यांना उद्‌ध्वस्त करायचा प्रयत्न करतात. इतकी मस्तवालपणाची भूमिका या देशात पूर्वी कोणी केली नव्हती आणि ती भूमिका आज मोदींचे सरकार करत आहे.




अनेकांचे अनेक प्रश्न आहेत. माझ्यासारख्याला चिंता एक असते की आजची तरुण पिढी आज संकटामध्ये राहते. जगामध्ये एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे तिचं नाव आयएलओ, म्हणजे इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायजेशन. ते जगाचा अभ्यास करतात, भवितव्याचा विचार करतात, तरुणांच्या बेकारीचा अभ्यास करतात. त्यांनी अभ्यास करून निष्कर्ष काढला, की आज संपूर्ण जगात सगळ्यात जास्त बेकारी तरुणांच्यात कुठे असेल, तर ती भारतामध्ये आहे. १०० तरुण घेतले तर त्यातील ८५ तरुण आज नोकरीसाठी वणवण हिंडतायंत. त्यांना कष्ट करायची तयारी आहे, पण कष्ट करण्याचा त्यांना अधिकार मिळत नाही, ही मोदींची नीती आहे. म्हणून आजचे हे सरकार हे बदललं पाहिजे. आता जे सांगितलं ती गोष्ट खरी आहे की सत्तेची मस्ती आजच्या सरकारला आहे. देशाचा प्रधानमंत्री या तरुणांच्या भविष्याचा विचार करत नसेल तर सत्तेवर बसण्याचा त्यांचा अधिकार किती आहे? हा जर एखाद्या तरुणाने प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर त्यांना द्यावे लागणार आहे.

केंद्र सरकारमध्ये मोदी साहेब पुन्हा पुन्हा सांगत होते, की उसापासून साखर तयार करता, तसं इथेनॉल करा आणि ते इथेनॉल त्यांना फायद्याचे आहे. पण, आज कारखान्यांमध्ये अक्षरशः लाखो लिटर इथेनॉल टाकीमध्ये पडलंय. केंद्र सरकार त्याला भाव देत नाही, शेतकऱ्यांचं नुकसान करतायंत. हे इथेनॉल विकलं तर माझी खात्री आहे की तुमच्या ऊसाला आणखी किंमत मिळू शकते. पण चांगल्या कामाला मदत करण्याच्या ऐवजी त्याला अडथळे निर्माण करणे, ही भूमिका आजच्या राज्यकर्त्यांनी केलेली आहे. याचा अर्थ एकच आहे, शेतकरी उद्‌ध्वस्त झाला तरी चालेल, तरुण बेकार राहिला तरी चालेल, आया बहिणीच्या सुरक्षेची स्थिती गंभीर झाली तरी चालेल, सामान्य माणूस संसार चालवायला महागाईने संकटात गेला तरी चालेल. पण आम्ही आमची भूमिका सोडणार नाही, ही मोदींची नीती आहे. ही मोदींची नीती घालवायची असेल तर उद्याच्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून देण्याची आवश्यकता आहे.

## देशाचं राजकारण योग्य रस्त्यावर न्यायचं आहे


या लोकसभा निवडणुकीत आपल्याला निकाल घ्यायचा आहे की या देशाचा कारभार कोणाच्या हातामध्ये द्यायचा? तो कारभार कशा पद्धतीने चालवायचा? देशासमोर जे महत्त्वाचे प्रश्न आहेत, त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची ताकद ही कोणामध्ये आहे, याचा विचार करून निर्णय घ्यायचा. तुम्ही, मी सगळेजण एका विचाराने काम करणारी लोक आहोत आणि म्हणून आपली जबाबदारी ही आहे की देशाचे राजकारण हे योग्य रस्त्यावर आणायचं असेल, तर आम्ही सगळ्यांनी बसून एक देश पातळीवर आघाडी केली, त्या आघाडीला साथ देण्यासाठी देशाच्या अनेक राज्यातील अनेक मंत्री, अनेक मुख्यमंत्री, अनेक खासदार, अनेक पक्षाचे नेते हे सगळे एकत्र आले आहेत आणि आज या निवडणुकीला सामोरे जात

आहेत. माझी खात्री आहे, की अनेक ठिकाणी मी पाहिलं, महाराष्ट्राच्या बाहेरची माहिती घेतली, लोकांना बदल पाहिजे आहे. लोक या आघाडीला पाठिंबा द्यायला मनापासून तयार आहेत. तुमची माझी जबाबदारी आहे की आपल्या उमेदवारांना मोठ्या मतांनी विजयी करायचं आणि देशाचं राजकारण योग्य रस्त्यावर न्यायचं.

लोकांचं भलं करायचं असेल तर विकासापासून दूर जाऊन चालणार नाही, त्यात राजकारण आणायचे नाही ही भूमिका मी सातत्याने घेतलेली आहे. मी अनेक शैक्षणिक संस्था चालवतो. साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेचा मी अध्यक्ष आहे. त्या संस्थेच्या आज ३०० शाखा आहेत व ७० कॉलेजेस आहेत. अनेक विद्यापीठ सुद्धा काढलेले आहेत आणि त्यात सुद्धा साडेतीन लाख विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात रयतेच्या मार्फत शिक्षण देतो. कोकणामध्ये आहे तशीच एक शाखा बारामतीमध्ये काढली. आज त्या संस्थेमध्ये ३५ हजार विद्यार्थी शिकतात. कोणतीही देणगी घेत नाही किंवा वशिला त्या ठिकाणी चालत नाही. अशा अनेक संस्था आम्ही लोक चालवतो आणि त्याच्या लाभ महाराष्ट्राला होत असतो.

## दुष्काळाच्या संकटाकडे सरकारचे दुर्लक्ष

आज शेतीची अवस्था काय आहे? आज मराठवाड्याची काय अवस्था आहे? आज मराठवाड्यामध्ये पाणी नाही, जनावरांना चारा नाही, दुष्काळाचे संकट आहे. ते इथं आहे, पश्चिम महाराष्ट्रात आहे. अनेक ठिकाणी आहे. जबाबदारी असते सरकारची की दुष्काळासारखे संकट आल्यानंतर त्या शेतकऱ्याला त्यातून बाहेर काढण्यासाठी कष्ट घ्यायचे. काही लोकांनी मला सांगितलं फळबागा केल्या, फळबागाची योजना आम्ही लोकांनी सुरू केली आणि त्या फळबागा केल्या आज त्या फळबागांना पाणी नाही आणि त्यामुळे ही फळबाग आज जळून जायला लागली आहेत आणि केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, देशाचे मुख्य प्रधानमंत्री या प्रश्नांकडे ढुंकूनही बघत नाहीत.




आज या भागात नाही पण तुमच्या भागात दुसरीकडे साखर कारखाने आहेत. साखरेला २ पैसे अधिक मिळतील अशी अपेक्षा आहे. पण साखर निर्यात करायची नाही हा निकाल मोदी सरकारने घेतला. काही भागामध्ये सोयबिनचे पिक घेतले जाते. आज सोयबिनच्या किमती खाली आलेल्या आहेत. म्हणजे शिवारात जे पिकवायचं त्याचा उत्पादनाचा हा खर्च काही कमी होत नाही. पण त्यांनी पिकवलं त्याची किंमत मात्र कमी होते, असे दुहेरी संकट आज मोदी सरकारने आपल्या सगळ्यांच्या समोर आणलंय.

मला आठवतंय, दुष्काळ पडला, त्यावेळी देशाचा शेती मंत्री होतो, औरंगाबादला आलो होतो. फुलंब्री आणि आजूबाजूला मोसंबीची पिकं जळत होती. आम्ही लोकांनी ३५ हजार रुपये हेक्टरी पाणी घालण्यासाठी दिले आणि बागा वाचवल्या. कष्टाने बाग केली आणि ती बाग पाणी नाही म्हणून जळून गेली, तेव्हा शेतकऱ्याचं जीवन उद्ध्वस्त होतं. त्या शेतकऱ्याला योग्य रस्त्यावर आणण्यासाठी आपल्या हातातली सत्ता ही वापरायची हे सूत्र राज्यकर्त्यांनी करायचं असतं, पण राज्यकर्त्यांना त्या संबंधित यतकिंचितही खात्री नाही, त्यांना

चिंता नाही आणि म्हणून शेतकरी असेल, बेकार तरुण असेल, महागाईचा प्रश्न असेल यांसारख्या प्रत्येक प्रश्नावर आजच्या राज्यकर्त्यांचे लक्ष नाही. मग सत्ता वापरतात कशासाठी? ते सत्ता वापरतात, त्याचा गैरवापर करण्यासाठी. आज हा देश स्वतंत्र देश आहे, माणसाला अधिकार आहेत, आज आम्ही बघतो की या अधिकारांवर गदा यायला लागली, मूलभूत अधिकार संकटात आले. याचा अर्थ, आज ना उद्या संसदीय लोकशाही संकटात येईल.

दुष्काळ आणि निवडणूक आज दोन्ही आपल्याला पहायला मिळत आहेत. आणि त्यासाठी मी ठरवलं, की महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यामध्ये जाऊन जिथे दुष्काळी स्थिती आहे त्याची माहिती घ्यावी आणि त्याबरोबर सबंध देशाची लोकसभेची निवडणूक सुरू आहे, त्या निवडणुकीच्या निमित्ताने लोकांशी संवाद साधावा. खरं म्हणलं तर आज सबंध राज्यामध्ये आणि देशामध्ये शेतीपाण्याची स्थिती वाईट आहे. पाण्याचं संकट आहे. पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मागवायची वेळ आली. थोड्या दिवसाने चारा छावण्या काढण्याचा कार्यक्रम करावा लागेल. आणि हा दुष्काळात सापडलेला जो घटक आहे त्याला बाहेर कसं काढायच याचा विचार हा करावा लागेल. दुर्देवाने ज्यांच्या हातामध्ये सत्ता आहे त्यांना या गोष्टीच्या संबंधीची आस्था नाही. एका बाजूने महागाई आहे आणि दुसऱ्या बाजूला शेतीमालाला किंमत नाही. आपण सगळे जिरायत भागातले लोक आहात. जिरायत भागातलं एक महत्वाचं पिक कांदा हे आहे. आता त्या कांद्याला दोन पैसे मिळत नाहीत. महाराष्ट्राच्या बाहेर कांद्याला किंमत मिळते, कांदा निर्यातीची मागणी केली, मोदी सरकारने कांदा निर्यातीवर बंदी घातली आणि त्या सगळ्या गोष्टीचा परिणाम कांद्याच्या किमती खाली आल्या. मोदी सरकार इथंच थांबलं नाही, परदेशातून कांदा मागवायचा हा निकाल त्यांनी घेतला आणि त्या सगळ्याची किंमत जिरायत भागात कांद्याचं पिक घेणारा जो शेतकरी आहे त्याला द्यावं लागत आहे.




## ज्यांना संधी दिली, त्यांच्याकडूनच टीका

माझ्या वाचनामध्ये आलं की आमच्या काही उमेदवारांच्याबद्दल एक प्रश्न उपस्थित केला की पार्लमेंटमध्ये कोणत्या भाषेत बोलाल. हा प्रश्न ज्यांनी उपस्थित केला ते पार्लमेंटचे सभासद होते. तुमच्या माहितीसाठी सांगतो, त्यांना हे समजायला हवं होतं, पार्लमेंटमध्ये कोणत्याही भाषेत बोलण्याचा अधिकार आहे. पार्लमेंटमध्ये मी स्वतः कधी इंग्रजीत बोललो, कधी हिंदीमध्ये बोललो, आणि कधी शुद्ध मराठी मध्ये सुद्धा बोललो. मराठीत बोलण्याचा अधिकार सुद्धा त्या ठिकाणी आहे, आणि तुमच्या भाषणाचं शब्दशः हिंदी आणि इंग्रजीमध्ये तिथे भाषांतर होतं.

टीका करणाऱ्या लोकांबद्दल मला आज काही जास्त बोलायचे नाही. ते माझ्यावरही टीका करतात. बाळासाहेबांवरही टीका करतात. मला हे आठवतं नाही की त्यांच्या सार्वजनिक जीवनामध्ये बाळासाहेब असो किंवा माझ्या जीवनामध्ये असो काही ना काहीतरी मदत त्यांना झालेली आहे. ज्या लोकांना त्यांची राजकारणातली, संसदेतली, त्याआधी जिल्हा परिषद, सहकारी संस्था हे होते. पण लोकसभेमध्ये जाण्याचा रस्ता, ज्यांनी खुला केला आज त्यांच्या कुटुंबावर टीकाटिपणी करायची त्याचा अर्थ काय? याचा अर्थ एकच आहे की माणुसकी नाही. अनेकांवर टीका केली जाते. आता या लोकांबद्दल काय सांगायचं, जे लोक किती पक्ष बदललेले आहेत. कधी शिवसेनेत होते, शिवसेना सोडली, काँग्रेसमध्ये आले विरोधी पक्षनेता झाले, विरोधी पक्षनेते पद उपभोगलं, ते सोडून दिलं भाजपमध्ये गेले आणि आता मंत्री म्हणून त्या ठिकाणी बसलेत आणि ते आज टीकाटिपणी करत असतात.

## लोकांची मन:स्थिती वेगळ्या दिशेने

या लोकसभा निवडणुकीत देशाची सत्ता ही कोणाच्या हातामध्ये द्यायची? हा निकाल आपल्याला घ्यायचा आहे. एका बाजूला ज्यांनी ज्या कुटुंबाने अनेक वर्षे स्वातंत्र्याआधी आणि नंतर देशाची सेवा केली असे गांधी, नेहरू या कुटुंबातील व्यक्तींच्या हातात सत्ता द्यायची आहे कि देशातल्या माणसा-माणसात, जाती-जातींमध्ये, धर्मा- धर्मामध्ये, भाषे-भाषेमध्ये एक प्रकारचा दुरावा आणि अंतर वाढवण्यासाठी सत्तेचा वापर ज्यांनी केला त्यांच्या हातात सत्ता द्यायची आहे. मी अनेक राज्यांमध्ये हिंडत असतो, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जात असतो. मी बघतोय की यावेळी लोकांशी मन:स्थिती ही एका वेगळ्या दिशेने आहे. लोकांना आता लक्षात आलं आहे की या देशाची सत्ता आता पुन्हा मोदींच्या हातात द्यायची नाही. मोदी हे देशाचे प्रधानमंत्री आहेत. त्यांनी बारामतीला एकदा येऊन भाषण केलं, त्यांनी भाषणात सांगितलं की शरद पवार यांचे बोट धरून मी राजकारणात आलो. मोठी गमतीची गोष्ट आहे, देशाचा प्रधानमंत्री माझे बोट धरून येतो, कसा विश्वास ठेवायचा? अनेक गोष्टी त्यांनी सांगितल्या, अनेक आश्वासने दिली. आज ते सांगतात ज्याचा उल्लेख एका वक्त्याने भाषणात केला की शेतकयांच्या खिशात ६ हजार रुपये मी टाकले. एका बाजूला ६ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खिशात टाकायचे, दुसऱ्या बाजूला खतांचे भाव वाढवायचे, तेलाचे भाव वाढवायचे, विजेचे दर वाढवायचे, दुसऱ्या बाजूला ती रक्कम काढून घ्यायची.

आज अनेक गोष्टी सांगता येतील. त्यांनी सांगितलं की या देशामध्ये काळा पैसा आणि नोटबंदी मी करणार. २०१६ रोजी ८ नोव्हेंबरला एका रात्री मोदींनी एक धोरण जाहीर केलं, ते धोरण काय होतं? नोटबंदी. ५०० रुपये आणि १ हजार रुपयांच्या नोटा रद्द झाल्या आणि सांगितलं की काळा पैसा संपेल. नुसता काळा पैसा संपणार नाही तर गरिबांच्या खिशात आम्ही त्या ठिकाणी १५ लाख रुपये जमा करणार. घडलं काय? १५ लाख सोडा, पण १५ रुपये सुद्धा गरीब माणसाच्या खिशामध्ये पडलेले नाही. आणखीन एक गोष्ट त्यांनी सांगितली की मला सत्ता द्या, मी भ्रष्टाचार संपवतो. आज देशामध्ये झालंय काय?



जे भ्रष्टाचारी आहेत त्यांना जवळ घेतात, मोदींच्या पक्षात घेतात आणि त्यांना स्वच्छ करतात. आज मोदींचे सरकार भ्रष्टाचार स्वच्छ करण्याचं क्लिनिंग मशीन झालंय. जसा सदरा क्लिनिंग मशीन मध्ये टाकतात मळका आणि तो बाहेर येतो तसं भ्रष्टाचारी, त्याला या क्लिनिंग मशीन मध्ये टाकला आणि बाहेर काढला आणि सांगितलं आता स्वच्छ झाला. भ्रष्टाचार नाही संपला मग केलं काय यांनी? आज राष्ट्रवादीमध्ये येणारे नेते जनतेची सेवा करण्यासाठी येतात, जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी येतात आणि त्यासाठी प्रसंगी स्वतःच्या खिशाला झळ द्यायची ही सुद्धा त्यांची तयारी आहे.

आम्ही लोकांनी निकाल घेतला आहे, आतापर्यंत आम्ही आणि त्याची सुरुवात उद्याच्या लोकसभेच्या निवडणुकीतून झाली पाहिजे.

## तुतारीचा आवाज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाईल

यावेळेला आपल्या पक्षाची खूण बदलली. ही खूण तुतारीची आहे. माझी खात्री आहे की हा तुतारीचा आवाज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये प्रत्येकाच्या कानात जाईल त्याच्यातून तो जागृत होईल, त्या जागृतीच्या जोरावर जे काही परिवर्तन करायचं आहे ते परिवर्तन तुमच्या पाठिंब्याने आपण नक्की करू एवढाच विश्वास या ठिकाणी बाळगतो.



लक्ष देत नव्हतो. मारामारी नको, मतभेद नको ही भूमिका होती. आता हे ठरवलंय की जसं बारामती असेल, महाराष्ट्राची अनेक मोठी गाव असतील तिथे अनेक कार्यक्रम आम्ही राबवले, अनेक धोरण राबवली, अनेक संस्था उभ्या केल्या. हल्लीच्या सरकारमध्ये राष्ट्रवादीच्या वतीने एका माणसाला तिकीट दिलं, त्याला निवडून आणलं, त्याला मंत्री केलं. अपेक्षा ही होती की सत्ता मिळाल्यानंतर त्या सत्तेचा वापर आपल्या तालुक्यातील गोरगरीब जनतेच्या आणि तरुणांच्या हितासाठी ते वापरतील, पण हे काम त्यांनी केले नाही. केंद्र सरकार असो, राज्य सरकार असो त्यांच्या योजना आणि त्यांचा लाभ हा व्यक्तीश: कसा घेता येईल? असा प्रयत्न या ठिकाणी केला गेला आणि याच्याबद्दलची नाराजी आज जनतेच्या मनात आहे. ते दुरुस्त करायचं असेल तर या लोकांना त्यांचे स्थान दाखवले पाहिजे

आजचं सरकार हे लोकांच्या प्रश्नांसंबंधी उदासीन असलेलं असं सरकार आहे. मोदी साहेब आणि आम्ही एकत्र काम केलं. मी देशाचा कृषी मंत्री होतो आणि ते गुजरातचे मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्र्यांना शेती आणि शेतकऱ्यांच्या संदर्भात सतत मदत करण्याची भूमिका ही माझी होती, त्या ठिकाणी पक्ष मी कधी बघितला नाही, ते मोदी साहेबांनी देखील जाहीर मनानं मान्य केलं. देशाची सत्ता हातात आल्यानंतर आणि १० वर्ष होऊन गेल्यानंतर सहाजिकच काय नक्की झालंय, कसं चाललंय? याचा आढावा हा घेण्याचा अधिकार हा तुम्हाला आणि मला सगळ्यांना आहे. ते सांगतात की आम्ही सगळे निकाल घेतले, दहा वर्षात आम्ही सगळं बदललं. पण, जनतेचे प्रश्न सोडविण्यात हे सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. आश्वासन खूप दिली पण कशाचीच त्यांनी पूर्तता केलेली नाही.

आज आपल्या भागामध्ये उसाचे पीक होते, साखर महाराष्ट्रात होती. १ नंबर उत्तर प्रदेश, २ नंबर महाराष्ट्र. अपेक्षा अशी होती, सबंध हिंदुस्थानाला पुरवून आम्ही जादा साखर तयार करतो. त्याला किंमत पाहिजे, बाजारपेठ पाहिजे, निर्यात पाहिजे. आज त्या ठिकाणी काय चित्र दिसतंय? या सरकारने साखरेची निर्यात करायला बंदी केली. इथे साखर जास्त आहे, ती बाहेर पाठवली पाहिजे, दोन पैसे अधिक मिळाले पाहिजे, उसाची किंमत वाढली पाहिजे. त्यासाठी हा निकाल घ्यायचा. पण तो निकाल घेतला नाही, त्याऐवजी निर्यात करायला बंदी करून टाकली.

दिवसेंदिवस महागाई वाढत आहे, बेरोजगारी वाढत आहे. महागाईच्या संकटामध्ये सामान्य माणसाला घर चालवणं अवघड झालं, ही स्थिती आज देशामध्ये केली.

## लोकांचे प्रश्न सोडविणे एवढे एकच माझे सूत्र

काही लोक आमच्या खासदारांवर टीका करताना म्हणतात, की जाऊन भाषण करून काय उपयोग आहे? मग लोकसभा कशासाठी असते? लोकसभा ही महाराष्ट्रातील लोकांचं दुखणं मांडण्यासाठी असते. ते मांडायचं असेल तर भाषण करावं लागतं, ते करण्याची भूमिका जर कोणी चांगली करत असेल तर त्याचे समर्थन करणे ही तुमची आणि माझी जबाबदारी आहे. आता मला स्वतःला महाराष्ट्राच्या विधानसभेत, लोकसभेमध्ये जाऊन ५६ वर्षे झाली. आता खूप वर्ष लोकांच्यात काम केलं आहे. आता नव्या पिढीला संधी देणं, त्यांना प्रोत्साहित करणे आणि लोकांचे प्रश्न जे अत्यंत अवघड आहेत ते सोडवण्यासाठी लक्ष घालणं एवढे एकच सूत्र मी माझ्या मनात ठेवलेले आहे.

काळ अडचणीचा आहे आणि त्याच काळात निवडणूक निघाली आहे. लोकशाहीमध्ये लोकांच्या मताचा अधिकार हा अत्यंत महत्वाचा आहे. आणि तो अधिकार आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे. त्या अधिकाराचा वापर करून या निवडणुकीमध्ये ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांचा कारभार योग्य नसेल तर योग्य कारभार आणण्याचा निकाल आपल्याला या निवडणुकीमध्ये घ्यावा लागेल. साधारणतः निवडणुकीच्या प्रत्येक काळात तुम्हा लोकांचा पाठिंबा हा आम्हा लोकांना मिळाला, ही गोष्ट सांगायची आवश्यकता नाही. यावेळच्या निवडणुकीत चित्र वेगळे आहे. या वेळेच्या निवडणुकीमध्ये एका बाजूने काँग्रेस पक्ष आणि त्याबरोबर माझ्या नेतृत्वाखालचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि दुसऱ्या बाजूने उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि आप आणि अनेक पक्ष हे सगळे एकत्र आलेले आहेत. आमचा संघर्ष भाजपाशी आहे. आमचा संघर्ष आमच्यातून जे बाहेर गेले, दुर्दैवाने त्यांच्याशी आहे. भाजप हा पक्ष समाजातल्या ठराविक लोकांच्या हिताचा विचार करणारा, शेतकऱ्यांच्या धोरणांच्या विरोधी नीती करणारा, महागाईला निमंत्रण देणारा आणि बेरोजगार तरुणांच्या नोकरीची समस्या न सोडविणारा असा भाजप पक्ष. आणि त्याच्यामध्ये काही लोक जाऊन बसले. आणि सांगितलं जातं आम्हाला मत द्या, आम्हीच खरे.



मोठी गमतीची गोष्ट आहे. आता हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणी स्थापन केला? या पक्षाची निर्मिती केली कुणी? आणि ही निर्मिती करून हा पक्ष राज्यात आणि देशात पोहचविण्याचा प्रयत्न आम्ही लोक करीत आहोत. पण काही लोकांनी वेगळी भूमिका मांडली. ती भूमिका किती योग्य आहे? त्याचा निकाल या निवडणुकीत घ्यायचा आहे. आणि त्याच कारण असं आहे की आज काही धोरणं सांगितली जातात, ती धोरणं समाजाच्या हिताची नाहीत. आणि ते करायचं असेल तर चौकट सोडून वेगळ्या रस्त्यावर जाणारे अनेक, या भाजपच्या बरोबर जायचं नाही हा निकाल घेतल्यानंतर सुध्दा त्यांच्या पंगतीला जे

बसतात ते खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी होऊ शकत नाहीत.

काही लोक सांगतात, आम्ही असं केलं, आम्ही तसं केलं, आम्ही तसं करणार आहोत, ते काय सांगायची गरज नाही. आणि त्यांनी काय केलंय आणि काय लक्ष देतात याचं उत्तम उदाहरण आज महाराष्ट्रात दुष्काळाचं संकट असूनही त्याच्याकडं लक्ष द्यायला राज्यकर्त्यांना वेळ नाही. आम्हा लोकांचं सरकार होतं, त्यावेळेला राज्यात ठिकठिकाणी चारा छावण्या केल्या होत्या की नाही? मी स्वतः आलो होतो की नाही? त्यावेळेला चारा छावण्या बघायला आणि काय चाललंय हे पाहायला मी स्वतः आलो होतो. केंद्र सरकारचा प्रतिनिधी म्हणून. आजचं केंद्र सरकार या सगळ्या प्रश्नात लक्ष घालत नाही. त्यांना शेती आणि शेतकरी याची आस्था नाही. आणि त्याचा परिणाम आज संबंध शेती अर्थव्यवस्था ही संकटात आहे, आणि त्यापासून सुटका करायची असेल तर चुकीचा रस्ता दाखविणारे आणि शेतकऱ्यांच्या हिताचे योग्य निर्णय घेणारे त्यांच्या विरुद्ध एक प्रकारचा निर्णय घ्यायची संधी उद्याच्या मतदानाच्या दिवशी तुम्हा सगळ्यांना आलेली आहे, आणि त्याचा लाभ हा तुम्ही सगळ्यांनी घेतला पाहिजे.

झालं होतं सगळं. माझी गाडी पोलिसांनी बाजूने काढली आणि त्याच्या एक बाजूला शाळेच्या मुलांची बस. ती बस ओलांडून मी चाललो, त्या पोरांनी माझी गाडी पाहिली आणि मला बघून असं असं केल. म्हणजे याचा अर्थ की तुतारी त्यांच्याही डोसक्यात शिरलेली आहे. अस दिसतंय आणि ही चांगली गोष्ट आहे. याचा अर्थ आज महाराष्ट्राचा खेडापाड्याचा माणूस असो सुशिक्षित असो, तरुण असो, वयस्कर असो या सगळ्यांच्या मनामध्ये तुतारी येते याचा अर्थ हा बदल करणं आवश्यक आहे या निष्कर्षाशी ते आले आहेत आणि त्याची नोंद ही आपण घेतोय आणि त्या दृष्टीने आज आपण याठिकाणी एकत्र आलेलो आहोत.

धोरणं अनेक आम्ही लोकांनी ठरविली, सत्तेत होतो, ती सत्ता तुमच्यासाठी वापरली. अनेक अधिकार अधिकाऱ्यांना दिले. शेतकऱ्याचं दुखणं कमी केलं, त्याच्या डोक्यावरचं कर्ज कमी केलं, मी मागेही सांगितलं तुम्हाला, की एक निर्णयाने ७०,००० कोटींच कर्ज शेतकऱ्यांचं माफ केलं, त्याच्या व्याजचे दर खाली आणले, जे वेळेवर देतात की नाही, आणि त्यांची जी पुढची पिढी आहे, तिला कुठे ना कुठे काम मिळायला कारखानदारी वाढविण्याचा प्रयत्न केला.




## आम्ही सत्ता लोकांसाठी वापरली

या निवडणुकीसाठी आम्ही ३-४ पक्ष एकत्र आलेलो आहोत आणि आमचा प्रयत्न आहे की कमीत कमी महाराष्ट्र तरी योग्य रस्त्यावर आपण आणू, आणि माझी खात्री आहे की ते आणतायेत. आज मी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरतो आहे. लोकांच्यात बदल आहे. मगाशी मी सांगत असताना सांगितल एका गावात २-४ दिवसाच्या पूर्वी मी मुंबईमधून पुण्याला येत होतो आणि हा जो लोणावळ्याला तिथ जो घाट आहे तिथ बऱ्याच गाड्या अडकल्या आणि त्यामुळ तिथं जाम

एकेकाळी पुण्यामध्ये पिंपरी-चिंचवडला कारखाने होते, आणि आम्हा लोकांच्या हातात तुम्ही सत्ता दिली. आम्ही निव्वळ पिंपरी-चिंचवड ठेवलं नाही, आणि पुन्हा आलो, जेजूरीला कारखाने काढले, सासवडला कारखाने काढले, त्याच्यानंतर बारामतीला एमआयडीसी काढली, इंदापूरला एमआयडीसी काढली, तुम्ही नगरच्या रस्त्यावर गेल्यानंतर रांजणगाव. त्या भागामध्ये एमआयडीसी काढली. पुण्याच्या जवळ हिंजवडीला आयटी पार्क काढून जवळपास १ लाख मुलांना काम मिळण्यासंबंधीचा ठाम उपाय केलेला आहे. आणि हे आताच्या सरकारने केलेले नाही ही आम्हा लोकांच्या हातात

सत्ता होती त्या काळात सरकारने केलं आणि हजारो मुलांना काम दिलं.

मला आठवतंय एक दिवशी मी अमेरिकेत गेलो. आणि अमेरिकेत गेल्यानंतर मला एक फोन आला. फोन आला एका मुलीचा. ती मुलगी होती निरावागजातील. धनगर समाजाची. मला आश्चर्य वाटलं. अमेरिकेतून आला फोन निरावागजची पोरगी तिला विचारलं काय करते. तिने सांगितलं इंजिनियर झाले. नवरा इंजिनियर आहे. आम्ही दोघेही अमेरिकेत नोकरी करतो. किती वर्ष झाली? ८ वर्ष झाली, आम्ही इथे आहोत. कसं चाललंय वगैरे विचारलं. चांगलं चाललंय म्हणाले. म्हणे आमची एक इच्छा आहे. मी म्हटलं काय इच्छा आहे? आमच्या घरी तुम्ही जेवायला या. मी म्हटलं तुम्ही कुठे राहता? त्यांनी त्यांच्या गावाचं नाव दिलं. त्याला म्हणतात कॅलिफोर्निया. कॅलिफोर्निया म्हणजे न्यूयॉर्क पासून ८ तासाचा रस्ता विमानाने. मी म्हटलं इतक्या लांब तुम्ही राहता. मी कसं यायचं? त्या मुलीने सांगितलं, आमचे एक लहान विमान आहे ते पाठवते. मी म्हटलं काय? ती म्हटली आमचं विमान आहे. इथे आमच्याकडे सायकल होती, नंतर मोटर सायकल आली. आता थोडी थोडी चार चाकं दिसायला लागली. आणि ही पोरगी आपल्या भागातली आमच्याकडे छोटे विमान आहे म्हणून सांगते. आणि तुम्हाला घरी जेवायला बोलवायला विमान पाठवते अस बोलते. हा जो बदल झाला, हा शिक्षणाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात जे काय आम्ही लोकांनी केलाय, हा त्याचा परिणाम आहे आणि तोच बदल आपल्याला पुढे न्यायचा आहे. आणि ते करायचं असेल तर आजच्या राज्यकर्त्यांकडून प्रश्न सुटणार नाहीत.

## सत्तेचा मोठ्या प्रमाणात गैरवापर




आज सत्तेचा गैरवापर होतोय. मोदी साहेबांच्या मनासारखं झालं तर ठीक, त्यांच्या मनासारखं नाही म्हटलं की सत्तेचा गैरवापर. मगाशी मी बोलताना सांगितलं एके काळी मोदी साहेब हे गुजरातचे मुख्यमंत्री होते. आणि मी केंद्राचा कृषी मंत्री होतो. कोणताही राजकीय संघर्ष आमचा नव्हता. धोरणं चुकीची होती त्याच्याबद्दलचा आमचा विचार होता. सत्तेचा गैर वापर सुरू झाला. त्यांच्या मनाविरुद्ध एखादं राज्य वागत असेल तर ते त्याच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करतात. झारखंड नावाचं राज्य आहे, आदिवासींच राज्य आहे. तिथे आदिवासी मुख्यमंत्री आहे. केंद्र सरकारचं धोरण चुकीचं आहे असं त्यांनी भाषण केलं. आज झारखंडचा मुख्यमंत्री तुरुंगात टाकलाय. राज्याचा मुख्यमंत्री त्याला जेलमध्ये टाकलाय. दिल्ली ही देशाची राजधानी. दिल्लीचा मुख्यमंत्री त्यांचं नाव अरविंद केजरीवाल आणि अरविंद केजरीवाल अतिशय चांगलं राज्य चालवतात. तिथल्या शाळा, हॉस्पिटल, दवाखाने हे बघायला देशाच्या बाहेरून लोक येत असतात. एक स्वच्छ काम करणारा नेता म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्यांनी केंद्र सरकारच्या विरुद्ध धोरण असं घेतलं, टिका केली. आज अरविंद केजरीवालला जेलमध्ये टाकलं, त्यांच्या खासदारांना जेलमध्ये टाकलं. त्यांच्या ४ मंत्र्यांना जेलमध्ये टाकलं. ही काही लोकशाही नाही, ही हुकुमशाही आहे. आणि आज त्या हुकुमशाहीच्या रस्त्याने भाजपचं सरकार चाललेलं आहे. या हुकुमशाही सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी आज तुमच्या पुढे राष्ट्रवादी काँग्रेस असेल, काँग्रेस पक्ष असेल, उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना असेल, इतर मित्र पक्ष असतील या सगळ्यांनी मिळून निवडणूक एकत्र लढवायचा निकाल घेतला. सगळ्या विषयात आमचं एकमत झालं. तुमच्या मनासारखी एक गोष्ट एखादी व्यक्ती किंवा एखादा पक्ष बोलत असेल, तर सत्तेचा गैरवापर करून तुमचा आवाज बंद करू ही भूमिका आज त्यांनी घेतली. लोकांचा आवाज कोणी



बंद करत असेल, लोकांना सामुदायिक शक्तीने आवाज बंद करणाऱ्याला त्यांची जागा दाखवायचं काम केलं पाहिजे, यासाठी ही निवडणूक आहे.

सगळ्यांचं आता तुतारीकडे लक्ष आलेलं आहे. या सगळ्यांच्या सामुदायिक पाठिंब्याने महाराष्ट्र राज्य हे आपण बदलू. नुसती केंद्राची निवडणूक नाही, मी तुम्हाला सांगतो ही निवडणूक तुम्ही करा, याच्यामध्ये तुतारी, काँग्रेस पक्ष, उद्धव ठाकरेंची शिवसेना या सगळ्यांना विजयी करा. मी महाराष्ट्रातलं चित्र बदलून दाखवीन. महाराष्ट्राचा बदल करून दाखवीन आणि ते व्हायला लोकांची अपेक्षा आहे. इतर काही

प्रश्न असतात, शेतीमालाच्या किमती, पाण्याचे प्रश्न आहेत. आणि या सगळ्या गोष्टीवर इथे आणखी काही करायची गरज आहे. निवडणूक झाल्यानंतर तुमचे खासदार, आमदार जे इथे बसलेत ते स्वत:, मी स्वत: आम्ही इथे येवू आणि हे पाण्याचं दुखणं कसं दूर करू हे आम्ही बघू. राजकारण लोकांसाठी केलेलं आहे.

मागे जे झालं ते झालं, पण आपल्याला टीका करायची नाही, मला दुरुस्त करायचं आहे. आणि ते दुरुस्त करायची हिंमत माझ्यामध्ये आहे. काल परवा भाषणामध्ये ऐकलं की या वयात सुद्धा तुम्ही हिंडताय. आणि हे असं म्हटलेलं मला पटत नाही. ते म्हणतात या वयात तुम्ही फिरता. मी काय म्हातारा झालोय? एकदा काम करायचं ठरवलं आणि जनतेचा पाठिंबा असला की त्या पाठिंब्याने यश खेचून आणू. एवढीच खात्री याठिकाणी देतो.

## सातत्यानं विकासाचे काम केले

माझ्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात १९६५ पासून झाली. नुकताच मी कॉलेजमधून बाहेर पडलो आणि भागामध्ये काम करावं अशा प्रकारची इच्छा होती. सुरुवात केली ती जिरायत भागापासून. ४-२ लोक दिसतायत मला इथं त्या काळातले. कुठेही गेलो तर एक गोष्ट ऐकायला मिळायची दुष्काळ! या सबंध जिरायत भागाचं आणि दुष्काळाचं काही नातं होतं. पाऊस ६-७ इंच पडायचा. तो पडल्यानंतर पाणी वाहून जायचं, शेतीवर परिणाम होत नव्हता. तेव्हा आम्ही असा विचार केला की पाणी थांबवलं तर काय होईल? पाणी साठवलं तर काय होईल? पाणी साठवलं तर आजूबाजूच्या विहिरीच्या पाण्याची पातळी वाढेल. काहीतरी मदत लोकांना होईल, ती कशी देता येईल याचा विचार केला पाहिजे.



त्यावेळेला बारामतीला एक ऑस्ट्रेलियन संस्था काम करत होती. त्या देशामध्ये गहू खूप तयार होतो आणि माझ्या वाचनामध्ये आलं की जिथं अडचण असेल त्याठिकाणी गहू द्यायचा त्यांचे धोरण आहे. ही गहू मंजूर करणारी संस्था दिल्लीमध्ये होती. मी दिल्लीमध्ये गेलो, त्यांच्याशी वाटाघाटी केल्या. त्यांनी मिशनचा आधार दिला आणि गहू द्यायला सुरुवात केली. तुम्हा लोकांना नव्या पिढीला माहीत नसेल, जुन्या लोकांना माहीत आहे. दुष्काळ पडल्यानंतर त्यावेळेला सरकार आपल्याला मिलो द्यायचं. आठवतंय का कुणाला? आमच्या जनतेने लाल भाकरी खाल्ली पर्याय नव्हता. गहू कसा आणता येईल, हा प्रयत्न आम्ही लोकांनी केला, त्याला मान्यता मिळाली आणि गावोगाव दुष्काळी काम करायला सुरुवात केली व ठिकठिकाणी बंधारे, पाझर तलाव यांची निर्मिती केली.

दुष्काळी भागामध्ये जवळपास ३०० तलाव तयार झाले, जे काही पाणी पडेल ते साठवलं गेलं. ते १०० टक्के बागायत झालं नाही. पण ४ आणि



३ बागायत झालं आणि लोकांना एक प्रकारे जगायचं साधन मिळालं.

नंतरच्या काळामध्ये मला स्वतःला तुम्ही महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये १९६७ साली पाठवलं. नंतर राज्यात स्थिती बदलली. कधी मंत्री झालो, कधी मुख्यमंत्री झालो, केंद्र सरकारमध्ये गेलो, देशाच्या संरक्षण खात्याचं काम झालं आणि मला आनंद झाला शेवटचे दहा वर्षे शेती मंत्री झालो. मला आठवतंय त्यावेळचे प्रधानमंत्री त्यांचे नाव मनमोहन सिंग. निवडणूक झाल्यानंतर ते माझ्याकडे आले आणि मला म्हटले तुम्ही मंत्री मंडळात यावं. कोणतं खातं पाहिजे? मी म्हटलं कोणतं देता? ते म्हटले गृह खातं, अर्थ खातं, परराष्ट्र खातं तुम्हाला काय हवंय ते घ्या. मी म्हटलं यातलं मला काही नको. म्हटले मग काय हवंय तुम्हाला? मी म्हटलं मला शेती पाहिजे, ते कुणी घेत नाही ते मी घेतो. दहा वर्षे शेतीचं काम माझ्याकडे आलं. तुम्हाला आश्चर्य वाटेल, शपथ घेतली घरी धान्य आणावं लागलं. पण ठरवलं की हे बंद केलं पाहिजे.

ज्या दिवशी २०१४ साली मी सरकारमधून थांबायचं ठरवलं, शेती खातं सोडलं त्या दिवशीची अवस्था काय होती? मंत्री झालो त्यावेळेला परदेशातून धान्य आणलं, मंत्री पद सोडलं त्यावेळेला जगातल्या १८ देशांना धान्य द्यायला लागलो. हे कोणी केलं? या देशातल्या शेतकऱ्यांनी केलं. का केलं? त्याला चांगली किंमत मिळाली, त्याचं जे काही कर्जाचं ओझं होतं ७१ हजार कोटींचे कर्ज एकमताने माफ केलं, व्याजाचे दर कमी केले, नवीन बी- बियाणे दिले या सर्व गोष्टींमुळे हा देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. याच्याइतका आनंद माझ्यासारख्याला दुसऱ्या कुठल्याही गोष्टीचा नाही, चित्र बदललं.

नंतरच्या काळामध्ये देशामध्ये सत्ता बदलली, लोकशाहीमध्ये सरकार येतात जातात. मी पार्लमेंटमध्ये होतो, तुम्ही लोकांनी मला निवडून दिलं. आमचा प्रयत्न हा होता




आलो आणि माझ्यापुढे पहिली फाईल आली की, देशामध्ये अन्नधान्याचे जे साठे आहे ते दिड महिना पुरेल इतकंच आहे आणि परिस्थिती गंभीर आहे, परदेशातून धान्य आणावं लागेल. माझी इच्छा नव्हती शेतीप्रधान देश म्हणायचा आणि परदेशातून धान्य आणायचं मला ते अजिबात पटत नव्हतं. मी काही सही केली नाही. मनमोहन सिंग यांनी दुसऱ्या दिवशी फोन करून सांगितलं की, पवार साहेब देशाच्या गोदामात माल किती आहे ते एकदा बघा मग तुम्हाला कळेल की सही कशी केली पाहिजे. ती माहिती घेतल्यानंतर नाईलाजाने परदेशातून की खेड्यापाड्यातील लोकांचा, बेरोजगार तरुण लोकांचा जीवन बदलायला सातत्याने जागृत रहायला पाहिजे. त्यासाठी नवनवीन संस्था या महाराष्ट्रात करायचा विचार केला. बारामतीला १९७१ साली कृषी विकास प्रतिष्ठान नावाची संस्था मी स्थापन केली. आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तिथे लोक येतात शिक्षणाला, ज्ञान संपादित करायला. सबंध हिंदुस्थानामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक केव्हीके आहे. सर्वांचा आढावा घेतला तर बारामतीचे कॉलेज पहिल्या दोनमध्ये आहे आज त्याचा उपयोग होतो. शिक्षणाचा विस्तार वाढवायचा

आहे, विद्या प्रतिष्ठान संस्था काढली देणगी नाही. जो पहिल्यांदा येईल त्याला प्रवेश. आज ३५ हजार मुलं - मुली ठिकठिकाणी विद्या प्रतिष्ठानमध्ये शिकतात. दुसरी महत्त्वाची संस्था काढली, अशा अनेक संस्था काढल्या, मुंबईला, साताऱ्याला काढल्या. आज साताऱ्याला तुम्हाला माहीत असेल रयत शिक्षण संस्था नावाची एक संस्था आहे, त्याचा अध्यक्ष मी गेली अनेक वर्षे आहे. किती विद्यार्थी असतील माहीत आहे तुम्हाला? आज तिथं सगळे मिळून ७५ कॉलेजेस आहेत, ३०० हायस्कुल आहेत आणि ४ लाख विद्यार्थी आहेत. या ४ लाख विद्यार्थ्यांपैकी ९० टक्के मुलं खेड्यातली आहेत. त्यांच्यासाठी हे ज्ञानदानाचं काम केलं, या सगळ्या कामाला प्रोत्साहन द्यायची भूमिका घेतली.

## आज केंद्रीत सत्ता झालीय

देशाचे प्रधानमंत्री आज वेगळी भूमिका घ्यायला लागले आहेत. व्यक्तीगत टिका, त्यांच्या राजकारणामध्ये वेगळ्या विचाराची कुणी भूमिका घेतली तर त्याच्यावर कारवाई आणि ती कारवाई किती करायची, कुणावर करायची. ही हुकूमशाही आवरली गेली नाही तर देशाचे चित्र बदलेल आणि सत्ता ही मूठभर लोकांच्या हातामध्ये जाईल, सत्ता ही अधिक लोकांच्या हातात जायला पाहिजे. सत्ता एखाद्या व्यक्तीच्या हातात जाते तर ती भ्रष्ट होते, चुकीच्या मार्गाला जाते. सत्ता अधिक लोकांच्या हातामध्ये असली तर ती चुकीच्या मार्गावर जाऊ शकत नाही. आज ही सत्ता केंद्रित झाली. मोदींच्या हातामध्ये आणि त्यामधून आपल्याला सुटका करायची आहे.

काही लोक सांगतात की, ही निवडणूक स्थानिक नाही. ही मोदी आणि राहुल गांधी यांच्यात आहे. आता बारामती लोकसभेला काय राहुल गांधी इथे येतात? त्यांनी मत मागायचे की मोदींनी मागायचे? काही लोक सांगतात मोदींना प्रधानमंत्री करण्यासाठी द्या. आता हे एक नवीन निघालं आहे. महाराष्ट्राचं सांगत नाहीत, महाराष्ट्रासाठी सत्ता पाहिजे त्यासाठी मत द्या हे सांगत नाही. ते सांगतात राहुल गांधी की मोदी? माझ्या दृष्टीने हा निवडणुकीचा प्रश्न स्थानिक आणि इथल्या स्थानिक जनतेच्या मताच्या सामुदायिक शक्तीच्या जोरावर देश पातळीवर योग्य काम कसं होईल? हे बघणाऱ्यांची ही लढत आहे.

गेल्या १०-२० वर्षांमध्ये मी स्थानिक राजकारणात लक्ष दिलं नाही. मी कधी असं म्हटलं नाही की पंचायत समितीला याला तिकीट द्या, माळेगाव कारखान्याला याला डायरेक्टर करा, नगरपालिकेमध्ये याला करा, नव्या पिढीच्या हातात घ्या, चांगलं काम करा, अडचण आली तर सल्ला घ्या आणि योग्य ते काम सर्वजण मिळून करूया यापेक्षा दुसरं काही नाही. पण काही लोकांनी टोकाची भूमिका घेतली. ज्यांनी टोकाची भूमिका घेतली ते कोणामुळे गेले? आज भाजप हा पक्ष सर्वसामान्य खेड्यापाड्यातील लोकांच्या हिताची जपणूक करणारा पक्ष नाही. हा मूठभर लोकांचा पक्ष आहे. त्यामुळे त्यांच्याबरोबर जाणं याच्यासाठी लोकांनी मतं दिली नव्हती. मागची निवडणूक इथे विधानसभेची झाली तुम्ही शंभर टक्के मतदान केलं इथे, ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नावाने केलं. आज आम्ही हे विसरतोय आणि भलतीकडे जातोय. माझ्या मते हा चुकीचा रस्ता आहे, तो थांबला पाहिजे व लोक योग्य रस्त्यावर आणले पाहिजे त्या दृष्टीने ही निवडणूक महत्त्वाची आहे. विकासाच्या कामात लक्ष घालायचे असते मी काही बघत नव्हतो. अधिक लोकांना संधी द्यायची हा माझा हेतू होता. पण याचा अर्थ या महाराष्ट्रासाठी काही ना काहीतरी केलं पाहिजे हा विचार डोक्यात होता.

आताच या ठिकाणी एमआयडीसीच्या कामगार प्रमुखांचं भाषण झालं. त्यांनी सांगितलं काही हजार लोक काम करतात. इथल्या एमआयडीसीमध्ये. १०० ते १२० कर्मचारी आहेत, त्यानंतर छोटे उद्योजक आहेत २० ते २५, आणखी इतर व्यापारी २० ते २५ आहेत. कधी उंडवडीत पाहिले होते उद्योजक? माझ्या काळात तर मी कधी पाहिले नाही. आज इथे उद्योजक तयार झाला, कारखान्यात काम करणारा कामगार झाला. राहणीमानात फरक आहे की नाही? आणखी काही गोष्टी आहेत मी स्वच्छ सांगतो मला माहित नव्हतं पण मी आता लक्ष घालीन आणि होत कसं नाही बघीन. खरं सांगायचं म्हणजे या कामामध्ये ज्यांच्यावर जबाबदारी आणि अधिकार दिला त्यांचं काम होतं त्यांच्याकडून झालं नाही म्हणून गप्प बसून चालणार नाही. त्याचं कारण, माणसं माझी आहेत. या लोकांनी जीवाभावाने मला प्रेम दिलं, साथ दिली आहे.

## शेवटच्या श्वासापर्यंत काम करत राहणार

आज एका गावचे काही लोक आले होते त्यांना मी सहज विचारलं चर्चा काय चालली आहे? काही नाही म्हटले तुतारी. विरोधकांनी काय सांगितलं? म्हटले यांचं वय आता ८२ झालं, ८४ झालं. आता काय त्यांच्यावर अवलंबून राहायचं. तुम्ही मगाशी कोणीतरी भाषणात सांगितलं ८४ वर्षांचा योद्धा. माझं तुम्हाला सांगणं आहे हे ८४, ८०, ८५ काढू नका तुम्ही काय बघितलंय मला? हा गडी थांबणार नाही. एकदा लोकांचं काम असेल आणि ज्या लोकांनी साथ दिली त्यांना असं सोडणार नाही. पूर्णपणाने श्वास चालू असेपर्यंत लोकांच्या हिताची जपणूक करणं याशिवाय दुसरं काही नाही. मला सगळं तुम्ही दिलं, काय नाही दिलं? आमदार केलं, मंत्री केलं, मुख्यमंत्री चारदा, संरक्षण मंत्री, शेती मंत्री. पार्लमेंटमध्ये किती वर्षे झाली माहीत आहे तुम्हाला? विधानसभा, लोकसभा आणि

राज्यसभा या तीन ठिकाणी सतत एक दिवसाची सुट्टी नाही ५६ वर्षे झाली. म्हणजे तुम्ही तुमच्या शेतात काम करणारी बैलं त्यांनाही पोळ्याच्या दिवशी सुट्टी देता. मला ५६ वर्षांत तुम्ही एकदाही सुट्टी दिली नाही. हे काय वागणं बरं आहे का? चेष्टेचा भाग सोडून द्या इतके वर्षे लोकांनी साथ दिली तर माझी नैतिक जबाबदारी आहे की शेवटपर्यंत यांच्यासाठी काम करत राहायचं.

निवडणुका येतात जातात, यावेळेसची निवडणूक ही वेगळी निवडणूक आहे. आम्हा सगळ्यांना काळजी आहे, ज्यांच्या हातामध्ये सत्ता आहे, जे आता तिचा वापर अशा पद्धतीने करत आहेत, निवडणुकीच्या प्रक्रियेवर त्यांचा विश्वास नाही. जिल्हा परिषद आहे का किती वर्ष नाही, नगरपरिषद आहे का, मुंबई महानगरपालिका आहे का? घटनेने, कायद्याने नियमित निवडणुका झाल्या पाहिजेत, त्याची तरतूद असताना या सगळ्या निवडणुका टाळायचं. कुठल्या एका व्यक्तीने सगळा अधिकार आपल्या हातात घ्यायचा, हे सूत्र मोदी साहेबांचं सूत्र आहे, ते आपण महाराष्ट्रामध्ये बघतो आहोत. ते सूत्र आज नगरपालिका, पंचायत समिती, महानगरपालिका इथपर्यंत आहे. ज्या दिवशी विधानसभा आणि लोकसभा इथपर्यंत ते येऊन पोहोचलं. या देशातील लोकशाही प्रचंड संकटात आली, हा निष्कर्ष काढावा लागेल.

मी मोदींबरोबर दुसऱ्या क्षेत्रात काम केले. मी केंद्रामध्ये मंत्री होतो. मोदी साहेब गुजरातचे मुख्यमंत्री होते, आणि मला इस्त्राइल जायचं होतं. केंद्र सरकारच्या कामासाठी इस्त्राइल हा शेतीच्या संबंधातला चांगला देश आहे. मोदी साहेबांना कळलं की मी इस्त्राइलला चाललो आहे. त्यांचा मला फोन आला. मलाही यायचं. तुमच्या शिष्टमंडळात माझा समावेश करा. म्हटलं ठीक आहे, या म्हणून सांगितलं. मी त्यांना घेऊन गेलो. दोन दिवस आम्ही शेती बघितली. त्यानंतरच्या दोन दिवसात ते मला म्हटले, मी मागे राहतो. म्हणलं, ठीक आहे. त्यांनी मागे राहून काय केले, याची चौकशी मी केली तर त्या देशांमध्ये लष्कराची जी शक्ती आहे, ती कशी वाढवायची यासंबंधीचं अभ्यास करणारं एक संघटन आहे, त्याची माहिती घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आम्ही गेलो होतो कशासाठी, शेती बघायला. यांनी बघायचं काय उद्योग सुरू केला त्याची चर्चा नको. सांगायचं तात्पर्य असं त्यांचा विश्वास या सर्व गोष्टीवर नाही. आज आपल्याला एकंदर अर्थव्यवस्था, देशातील बेकारी, महागाई यासंबंधीचं धोरण त्यातून स्पष्ट दिसते.

भाजप असल्या गोष्टीच्या संबंधित शेतकऱ्यांचा विचार करत नाही. मी शेतीमंत्री असताना दिल्लीमध्ये कांद्याचे भाव वाढले आणि ते भाजपाचे खासदार कांद्याच्या माळा घालून सभागृहात आले स्पीकरने मला विचारलं, ये क्या है? म्हटलं माहिती नाही. त्यांना विचारलं, तुम्ही कांद्याच्या माळ्या का घातल्या? म्हणले कांदा फार महाग झाला. जोपर्यंत दर कमी होत नाही, तोपर्यंत आम्ही माळा काढणार नाही. मला अध्यक्षांनी सांगितलं, उत्तर द्या. मी उत्तर दिलं, की कांदा जिरायत शेतकऱ्यांचं पीक आहे. कधी नाही ते दोन पैसे मिळाले आणि ते मिळत असताना हे लोक कांद्याच्या माळा घालून शेतकरी आणि कांदा उत्पादकाची टिंगल करत आहेत. मी मंत्री आहे, तोपर्यंत कांद्याच्या भावावर कसलंही बंधन आणणार




नाही. तुम्ही कांद्याच्या माळ्या घाला, नाहीतर कवड्याच्या माळा घाला. तुमचं स्वागत आम्ही त्या पद्धतीने करू.

## विरोधकांना पक्ष फोडल्याचं कौतुक

ही निवडणूक थोडी वेगळी आहे. ती वेगळी केली काही लोकांनी. मी अनेक ठिकाणी विचारले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा कोणी स्थापन केला, तर मी केला. आज त्या पक्षाची अवस्था काय, म्हणजे माणसाची चोरी होते, पक्षाची चोरी कधी पाहिली नाही. अख्खा पक्ष चोरला. खूणेसकट चोरला, आणि आज लोक आता काही लोक सांगतात की महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की दोन पक्ष मी फोडले. काय कौतुक? काय केले, तर पक्ष फोडले. एखादा म्हणेल दुष्काळ आल्यानंतर तिथले प्रश्न सोडवले. एखादा म्हणेल पाण्याचा प्रश्न सोडवला. हे म्हणतात आम्ही पक्ष फोडले. याचा पक्ष फोडणे याचा अर्थ हा आहे की पक्षीय राजकारण आणि लोकशाहीचं पक्षीय स्थान हे उध्वस्त करायचं हे सूत्र घेऊन जे काम करतात त्यांच्या हातात सत्ता जाऊन द्यायची नाही. हे काम तुम्हाला सगळ्यांना करायचं आणि त्यासाठी ही निवडणूक फार महत्त्वाची आहे. मी काळजी करत

होतो, की आपल्या पक्षाची नवी खूण आहे, लोकांच्या पर्यंत कशी पोहोचवायची. असं दिसतंय, फार थोड्या दिवसात ती पोहोचली. मी अलीकडच्या काळात काही निर्णय घेतले की नव्या लोकांना संधी द्यायची. पण त्याचा उपयोग समाजासाठी होईल अशी अपेक्षा होती पण एका वेगळ्या रस्त्यावर मला नेण्याचं काम आमच्या काही सहकाऱ्यांनी केलं.

मागील विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेससह मिळून आम्ही सरकार बनवलं. वर्ष- दोन वर्षामध्ये वेगळी स्थिती काही लोकांनी घेतली. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा या देशात एक मोठं संकट आलं, त्याचं नाव कोरोना, तुम्हाला आठवत असेल. पण त्या संकटावर मात करून सुद्धा आपण बाहेर पडलो. हे काम करत असताना काही लोक बाजूला गेले आणि सरकार घालवलं. राष्ट्रवादीच्यासुद्धा निवडून आलेल्या लोकांपैकी काही लोकांनी चुकीचा रस्ता घेतला आणि आज ते सत्तेवर जाऊन बसले आहेत. मत मागितलं एका नावाने आणि मत घेऊन निवडून आल्यानंतर दुसऱ्या दिवशी चोरी केली, हे चित्र काही चांगलं नाही. त्याचं कारण असं की ज्यांच्या हातात सत्ता तुम्ही दिली त्यांना प्रश्नांसंबंधी आस्था नाही.

आज मी कुठेही गेलो जिरायत भागात गेलो लोक सांगतात पाणी नाही, टँकर मागवा, चाऱ्याची व्यवस्था करा, आणखी काही मागण्या करतात. या मागण्यासंबंधी काही केलं जात नाही. मला आठवतंय २००९ ते २०१४ या काळात असाच दुष्काळ पडला होता, मी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरत होतो. माझ्याकडे शेती खात्याचं काम होतं. पाहिजे तेवढे राज्यांना पैसे दिले, चारा छावण्या काढल्या, शेतीला टँकर दिले व लोकांना बाहेर काढलं. आज या कामाकडे सरकारचं लक्षच नाही. एका बाजूने ही अवस्था आहे आणि दुसऱ्या बाजूने शेती मालाच्या किंमती घसरल्या. इथला शेतकरी उध्वस्त व्हावा हे त्यांचं धोरण आहे. शेतकरीविरोधी निर्णय जे घेतात अशांच्या हातात सत्ता देण्यात अर्थ नाही. एका बाजूने महागाईचे संकट, दुसऱ्या बाजूने दुष्काळाचे संकट, तिसऱ्या बाजूने बेरोजगारीचे संकट त्यामुळे नवी पीढी संकटात आहे.



## सत्तेचा उपयोग जनतेसाठी हवा

सत्ता ही तुमच्यासाठी वापरायची असते, त्याचा उपयोग जनतेसाठी करायचा असतो हेच काम नेमकं आम्ही लोक करत आहोत. त्या कामाला आज प्रोत्साहन द्यायचं असेल तर पुढच्या काळात योग्य लोकांच्या हातात ही सत्ता दिली पाहिजे. आज आमचं सांगणं एकच आहे, ही लोकसभेची निवडणूक आहे तिथं कुणाला पाठवायचं? जी व्यक्ती तिथं गेल्यानंतर तिथं हजर राहील, तुमचे प्रश्न मांडेल आणि चिकाटीने तुमच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी काळजी घेईल अशी व्यक्ती त्या ठिकाणी पाठवली पाहिजे. लोकांचा पाठिंबा जो पर्यंत आहे आणि श्वास जो पर्यंत आहे तो पर्यंत आम्ही लोकांसाठी लढणार, महाराष्ट्राचे राजकारण बदलणार व ते योग्य रस्त्यावर न्यायचे असेल तर पाऊले टाकावी लागतील.


## लबाडा घरचं आवतान जेवल्याशिवाय खरं नाही

लोकसभेची निवडणूक आली, या निवडणूकीच्या निमित्ताने सबंध देशामध्ये निर्णय घेण्यासाठी ठिकठिकाणी सभा होत आहेत. ही संधी असते. या सभा निव्वळ टिकाटिप्पणीसाठी नसतात तर उद्या देश कसा चालवायचा, देशाच्या विविध घटकांचे प्रश्न कसे सोडवायचे, सामान्य माणसाच्या अडचणी कमी कशा करायच्या आणि जगातील एक बलवान देश कसा होईल, यासंबंधीची आमची नीती काय हे सांगण्याची संधी या सभांमधून येते. गेले १० वर्ष देशाची सत्ता भाजपच्या हाती आहे आणि नेतृत्व मोदीसाहेब करतायंत. मोदींनी अनेक आश्वासने दिली होती. पण, एकही पूर्ण केले नाही.

तेच मोदी ठिकठिकाणी जाऊन काँग्रेस पक्षाला शिव्या

देतात, उद्धव ठाकरेंच्या पक्षाला शिव्या देतात. आम्हा लोकांना शिव्या देतात. तुम्ही शिव्या द्या, पण १० वर्षात तुम्ही केलं काय तर नोटाबंदी? नोटाबंदी ज्यावेळी केली तेव्हा बँकेच्या दारात हजारो लोक दोनदोन – तीनतीन दिवस राहीले. त्यामध्ये एकट्या महाराष्ट्रात ७०० लोक मृत्यूमुखी पडले. हे आपण चित्र महाराष्ट्रात पाहिले. याचा अर्थ एकच आहे, की महागाई





असो की अन्य प्रश्न असो यासंबंधी दिलेली आश्वासने पाळली नाहीत.

दहा वर्षात तुम्ही काय केलं? राज्य तुमच्याकडे, आम्ही विरोधी पक्षात आणि जबाब आम्हाला मागतात. याचा अर्थ एकच आहे, की मोदी दिलेला शब्द पाळत नाहीत. आता अनेक गोष्टी सांगतात मी हे करणार ते करणार आहे. आपल्याकडे एक म्हण आहे की 'लबाडा घरचं आवतान जेवल्याशिवाय खरं नाही,' ही स्थिती मोदी साहेबांनी देशात केलीये. आम्ही सतत सांगतो की मोदींच्या राजवटीत सामान्य माणसाचा जो अधिकार आहे, त्या अधिकारावर संकट यायची शक्यता आहे.

इंग्रजांच्या काळात ज्यापद्धतीने धरपकड होत होती, लोकांना संघर्ष करायला लागत होता. आज ती अवस्था मोदी साहेबांनी देशात केलीये. म्हणून त्यांचे सर्व कामकाज हुकूमशाहीच्या दिशेने सुरु आहे. कुठेही भाषण करताना जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्यावर टिका करतात. यातील एकही व्यक्ती हयात नाही. त्यांनी देशासाठी काम केलं. स्वातंत्र्याआधी महात्मा गांधींचा विचार स्विकारून जवाहरलाल नेहरूंनी आयुष्याची १०-११ वर्षे इंग्रजांच्या तुरुंगात घालवली. त्यानंतर १५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळवून दिलं. त्यानंतर हा देश लोकशाहीच्या दिशेने चालण्याची पद्धत या देशात आली ही गोष्ट आपण कधी विसरू शकत नाही. त्याच जवाहरलाल नेहरुंना आजचे प्रधानमंत्री टिकाटिप्पणी करतात. या देशात मी अनेक प्रधानमंत्री पाहिले. यापूर्वीच्या सर्व प्रधानमंत्र्यांनी देशाचा विचार केला. पण हा पहिला प्रधानमंत्री आहे जो देशाचा विचार करत नाही. लोकांमध्ये संघर्ष कसा वाढेल याची काळजी ते घेतात.

## धार्मिक संघर्षाला बळ दिले जातेय

मागील दोन दिवसात त्यांनी भाषणात अल्पसंख्याकांवर टिका केली. हा देश हिंदूंचा जसा आहे तसा मुस्लिमांचा, ख्रिश्चन, शीख लोकांचाही आहे. या सगळ्यांना घेऊन हा शक्तीशाली देश करण्याचे स्वप्न आपल्या सगळ्यांचे होत. आणि कोणीही प्रधानमंत्री असला तरी त्याची जबाबदारी असते की या सगळ्यांना एकत्रित ठेवायच. त्यांचे दुःख दूर करायचं त्यासाठी सत्तेचा वापर करायचा. आज त्याची खऱ्या अर्थाने गरज आहे पण ही गरज त्यांना पटत नाही.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये जी काही देशाची आजची स्थिती आहे, त्याला उत्तर शोधावं, लोकांना संबोधित करावं, लोकांना एकत्रित करावं, आणि देशामध्ये परिवर्तन कसं होईल, याची काळजी आम्ही सगळेजण एका विचाराने करतो आहोत. शिवछत्रपती हे एक वेगळे राजे होते. या देशाच्या इतिहासामध्ये अनेक राजे होऊन गेले. पण साडे ३०० वर्षे झाल्यानंतरसुध्दा सामान्य माणसाच्या अंतःकरणामध्ये एका राजाचं नाव ठसलेलं आहे. तो कोणता राजा हा प्रश्न विचारला तर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वांचं उत्तर एकच येईल आणि ते म्हणजे शिवछत्रपती. शिवछत्रपतींनी राज्य केलं ते

एका जाती, जमातीचं, धर्माचं राज्य नव्हतं. त्यांचं राज्य जे होतं त्यांनी कधी असं म्हंटलं नाही की, हे भोसल्यांचं राज्य आहे. पण त्यांचं राज्य करण्याच्या पध्दतीमध्ये हिंदू, मुस्लिम, दलित, आदिवासी होते, असे अनेक घटक होते. त्यामुळे त्यांच्या राज्याला भोसल्यांचं राज्य म्हणून कुणी संबोधत नव्हतं. ते रयतेचं राज्य होतं, समाजातल्या सगळ्या थरातल्या लोकांचं होतं. आणि म्हणून त्यांनी ते राज्य उभं करून जगाच्या देशाच्या समोर एक आदर्श निर्माण केला.

निवडणूक आली आहे. अनेक निवडणुका आपण पाहिल्या. पण यावेळेची निवडणूक एक आगळीवेगळी आहे. आज देशाच्या समोर अनेक प्रश्न आहेत. ज्यांच्या हातामध्ये सत्ता आहे त्यांनी अनेक गोष्टी लोकांसमोर सांगितल्या. पण प्रत्यक्षात लोकांची फसगत करण्याचा प्रयत्न केला. या देशामध्ये आधीच्या वक्त्यांनी सांगितलं, अनेक प्रश्न आहेत. रावणाला १० तोंडं होती असं म्हणतात. आज या देशात मोदींच्या राजवटीत कोणते प्रश्न आहे, असे जर विचारल्यास रावणाच्या त्या १० तोंडांसारखं आहे. अनेक प्रश्न याठिकाणी आहेत. महागाई, बेकारी आणि मोदींची गॅरंटी काय, तर मोदींची गॅरंटी ही आहे.

राज्य चालवणाऱ्या राज्यकर्त्यांची जबाबदारी एक विश्वास लोकांना द्यायचा. तो कोणत्याही धर्माचा असो, तो कोणत्याही भाषेचा असो, तो कोणत्याही जातीचा असो, तो भारतीय आहे ही भावना त्याच्या मनात निर्माण करायची आणि देश एकसंघ ठेवायचा. आज काय दिसतंय, कालचं त्यांचं भाषण लाज वाटावी अशा प्रकारचं आहे. या देशाचे प्रधानमंत्री ज्यांनी सगळ्यांचं नेतृत्व करायचं, सगळ्यांची हिताची जपणूक करायची त्यांनी एका धर्माच्या लोकांच्या संबंधी गलिच्छ अशाप्रकारचा उल्लेख करायचा, त्यांच्या मुलाबाळांचा उल्लेख करायचा आणि काय असेल नसेल मिळालेली संपत्ती ती तुम्ही एका समाजाच्या मुलांसाठी खर्च करणार का ? अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित करायचा, याच्या इतकं दुर्दैवी चित्र या देशामध्ये कुणी कधी केलेलं नव्हतं आणि म्हणून या पध्दतीने त्यांचं वागणं हे देशाच्या हिताचं नाही. त्याच्यामध्ये बदल करण्याचा निकाल घेतल्याशिवाय आपल्या सगळ्यांच्या समोर पर्याय नाही.

लोक नेहमी सांगत असतात मोदी साहेब सांगत असतात, प्रत्यक्षपणाने सांगत असतात. काही समाजाच्या काही धर्माच्या लोकांच्या संबधी एकप्रकारचा विद्रेष वाढेल याप्रकारची खबरदारी घेत असतात. हिंदू, मुस्लीम, ईसाई, बौध्द, पारसी या सगळ्यांनी वसलेला देश हा भारत म्हणून ओळखला जातो. अनेक जाती जमातीचे लोक याठिकाणी आहेत. आपण एकसंघ राहिलो तर हा देश खऱ्या अर्थाने पुढं जाणार आहे. आणि ते करायचं असेल तर देशाची लोकशाही टिकवली पाहिजे. आज या देशामध्ये सुदैवाने लष्कर कधी आपल्या शेजारील देशांच्या रस्त्याने जाणार नाही. या देशाच्या लष्कराचा, संरक्षण खात्याचा मी मंत्री होतो. या देशाच्या आर्मीने, नेव्हीने, एअरफोर्सने माझ्याबरोबर काम केलेलं आहे. त्यामुळे मला या सगळ्यांची मानसिकता माहित आहे. सुदैवाने या देशाच्या लष्कराच्या मनामध्ये लोकशाहीची चौकट मोडून कुठे जावं असा कधी विचार येत नाही आणि त्यामुळे हा देश एकसंघ राहिलेला आहे आणि असं असताना आज जे मोदी करत आहेत, पलीकडचा आपला एक मित्र देश आहे. त्याचं नाव रशिया. अलीकडच्या काळामध्ये त्या रशियाच्या नेतृत्वाने ज्यांचं नाव पुतिन आहे. त्यांनी सबंध देश मुठ्ठीमध्ये ठेवला आणि तिथली लोकशाही तिथली संसदीय पध्दत ही पूर्णपणानं आज उध्वस्त केलेली आहे. आज या देशातल्या लोकांना आणि देशाबाहेरच्या लोकांना सुध्दा हिंदुस्थानची चिंता वाटते आणि ती वाटत असताना त्यांना एकच वाटतं की मोदींच्या रुपानं या देशात पुन्हा पुतीन तयार होतो की काय ? आणि तो जर झाला तर हा देश योग्य रस्त्यावर राहणार नाही. हा अखंड देश जतन करायचा असेल तर पुतीनची परंपरा याठिकाणी आणण्याच्या संबंधी कुणीही प्रयत्न करत असेल तर आपल्या सगळ्यांना एकसंघ होण्याच्या संबंधीची भूमिका घ्यावी लागेल.

## मोदींना संसदीय पद्धतीवर विश्वासच नाही

काहीही झालं तरी, हिंदू-मुस्लीम, ईसाई-मुस्लीम, ईसाई-हिंदू, शीख आणि मुस्लीम, शीख आणि हिंदू याप्रकारचं एक अंतर हे वाढवण्याचा प्रयत्न करतात. मी अनेकवेळेला बघितलं. मला आता विधानसभेत, लोकसभेत आणि राज्यसभेत जाऊन ५६ वर्ष झाली. ५६ वर्षांपूर्वी पहिल्यांदा मी निवडून आलो त्या दिवसापासून ते आजपर्यंत लोकांनी मला बाजूला ठेवलं नाही. सातत्याने मला काम करायची संधी दिली. आणि त्याचा परिणाम म्हणून अनेक प्रधानमंत्र्यांबरोबर काम करण्याची, त्यांच्या कामाची पध्दती बघण्याची आम्हा लोकांना संधी मिळाली. मी जवळून बघितलं, इंदिरा गांधींना बघितलं. राजीव गांधी आणि आम्ही एका पार्लमेंटमध्ये होतो. नंतरच्या काळामध्ये नरसिंहराव आले. त्यांच्याबरोबर आम्ही लोकांनी काम केलं. मधल्या काळामध्ये देवेगौडा असतील, गुजराल असतील या सगळ्यांबरोबर आम्ही लोकांनी काम केलं. अलीकडच्या काळामध्ये डॉ. मनमोहन सिंहसारख्या एका सज्जन माणसाच्या मंत्रीमंडळामध्ये काम करण्याची संधी मला मिळाली. ह्या सगळ्यांचा कारभार बघितला आणि मोदींचा कारभार बघितला तर जमीन आस्मानाचा फरक आहे.

मोदी कधी पार्लमेंटच्या पध्दतीवर विश्वास ठेवणारी व्यक्ती आहे, असं कधी वाटतच नाही. ते कधी पार्लमेंटला गंभीरपणाने घेत नाही. आमचं राज्यसभेचं मागचं अधिवेशन २५-३० दिवसाचं झालं. त्या २५-३० दिवसांत सभागृहामध्ये मोदी एकदा आले आणि एकदा येऊन ते पंधरा मिनिटं बसले आणि गेले. त्यांना या सबंध संसदीय पध्दतीच्या संबंधीची आस्था आणि विश्वास हे कितपत आहे हे ह्याच्यावरून याठिकाणी दिसतं. आणि म्हणून ज्या माणसाला ज्या व्यक्तीला संसदीय पध्दतीवरच विश्वास नाही. समाजातल्या सगळ्या लोकांना एकत्र ठेवण्याच्या संबंधीची दृष्टी नाही. तर त्याच्या हातामध्ये हिंदुस्थानची सूत्र, भारताची सूत्र ही ठेवणं हे आपल्या हिताचं नाही.

मी विरोधी पक्षाचा नेता होतो. विरोधी पक्षाचा नेता म्हणून नुसती चिंता करून लोकांना चालणार नाही. निकाल घ्यावे लागतील आणि तो निकाल घ्यायचा तर उद्याच्या निवडणुकीच्या दिवशी तुम्ही मतदान केंद्रावर जाल.

पहिल्यांदा मतदानाची टक्केवारी वाढवा. तुम्हाला आश्चर्य वाटेल आत्ता निवडणुका झाल्या. पहिला टप्पा. आणि पहिल्या टप्प्यात महाराष्ट्राची दुसरी राजधानी नागपूर, त्याठिकाणी ५० टक्क्यापेक्षा कमी मतदान झालं आणि दुसऱ्या बाजूला गडचिरोलीसारखा आदिवासींचा जिल्हा, तिथे ७० टक्के मतदान झालं. म्हणजे आदिवासी, गरीब लोकांची संख्या जिथे जास्त आहेत, तिथे ७० टक्के मतदान होतं आणि जे राज्याची दुसरी राजधानी आहे, विविध लोकांचं शहर आहे तिथे ५० टक्क्यांच्या खाली मतदान होतं. हे चित्र काही चांगलं




म्हणून त्या काळामध्ये अटल बिहारी वाजपेयी प्रधानमंत्री होते. गिते तेव्हा मंत्रिमंडळात सुध्दा होते. त्या सगळ्या काळामध्ये आम्ही बघितलं. विरोधी पक्षाचा नेता, प्रधानमंत्री, संरक्षण मंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री या लोकांनी एकत्र बसून काही निकाल घ्यायची पध्दत असते लोकशाहीमध्ये. मला आठवतंय की, त्या काळामध्ये अनेक वेळेला काही राजकीय प्रश्नांसाठी अटल बिहारी वाजपेयी हे मोठ्या नेत्यांशी बोलत असत. सिनीअर मंत्र्यांना बोलत असत, विरोधी पक्ष नेता म्हणून मलाही बोलत असत. त्याठिकाणी वैचारिकदृष्ट्या आमच्यामध्ये अंतर होतं. पण देशहिताचा प्रश्न, देशाच्या ऐक्याचा प्रश्न  हा जर पुढे आला तर वाजपेयी सुध्दा हे विरोधक आहेत त्यांचं मत मी स्विकारणार नाही. अशी अशी भूमिका कधी घेत नव्हते. हा आदर्श हल्लीच्या प्रधानमंत्र्यांनी जर ठेवला असता तर आजचे दिवस आले नसते आणि त्यामुळे आजचे प्रधानमंत्री हे देशाच्या एकतेच्या दृष्टीने, मुलभूत प्रश्नाला गती देण्याच्या दृष्टीने किती आग्रही राहतील याची चिंता आज लोकांना पडलेली आहे. नाही आणि म्हणून त्यातून काहीतरी आपण धडा घेऊया. आणि मतदानाच्या दिवशी आपलं मतदान ८० टक्के, ९० टक्के कसं होईल याची काळजी घेऊ आणि त्याची काळजी घेत असताना आज देशामध्ये राज्यामध्ये परिवर्तन करायचं आहे, हे लक्षात ठेवूया.

## तुमच्याकडे मोदी असतील, पण आमच्याकडं कोट्यवधी जनता

महाराष्ट्रात आज कुठल्याही भागामध्ये गेल्यानंतर एकच चित्र दिसतंय ते म्हणजे लोकांना बदल हवा आहे. लोकांना मोदी नकोय. आणि मोदी नको असेल तर पर्याय हाच की, ही जी आघाडी आहे, जी सगळ्यांनी बसून केली ती इंडिया आघाडी. काही लोक असं म्हणतात की, आघाडी तुम्ही केली. त्यांच्याकडे मोदी आहेत. तुमच्याकडे कुणाचं नाव आहे ? आम्ही त्याचा विचारच करत नाही. मला आठवतंय की, १९७७ साली मी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळामध्ये होतो आणि

त्यावेळी एक वेगळी स्थिती देशामध्ये निर्माण झाली. लोक अस्वस्थ होते. जयप्रकाश नारायणांनी एक आवाहन केलं, कुठलाही एक पक्ष नव्हता. जयप्रकाश यांच्या आवाहनाला लोकांनी प्रतिसाद दिला आणि सबंध देशाचं राज्य आणि राज्यकर्ते बदलले. त्यावेळेला एक पक्ष नव्हता. कुठल्या एक विशिष्ट पक्षाचं सरकार बनण्याची स्थिती आहे का नाही याची चिंता होती. पण या देशातल्या जनतेने लोकांना निवडून दिलं. निवडणूक झाल्यावर ज्यांचा पक्ष झाला आणि निवडणूक झाल्यावर ज्यांचं नाव कधी निवडणुकीमध्ये पुढं नव्हतं, मोरारजी देसाई देशाचे प्रधानमंत्री झाले. आणि देशाचा कारभार त्यांनी चालवला. सांगायचं तात्पर्य एवढंच की आज कुणी सांगत असेल की, तुमच्याकडे कुणी नाही आणि आमच्याकडे मोदी आहेत. ठीक आहे, तुमच्याकडे मोदी आहेत. आमच्याकडे या देशातली कोट्यावधी जनता आहे. या जनतेच्या साथीच्या जोरावर या देशात परिवर्तन करण्याची आज ही आवश्यकता आहे, ती आम्ही पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.



या निवडणुकीमध्ये जो काही निकाल घ्यायचा आहे, तो निकाल घेण्याच्या संबंधीची भूमिका आपण जाणकार पद्धतीने घेतली नाही तर त्याची जबरदस्त किंमत आपल्याला आणि पुढच्या पिढ्यांना द्यावी लागेल. आज विश्वासानं देशातल्या जनतेनं ज्यांच्या हातामध्ये देशाचा कारभार सोपवला त्या गृहस्थांनी सत्ता हातात आल्यानंतर त्यांच्या भूमिकेपेक्षा त्यांच्या विचारांच्यापेक्षा वेगळ्या मतांची मांडणी कुणी केली तर त्यांना जेलची हवा दाखवण्याच्या संबंधीचं काम केलं.

आज देशाची एकूण सत्ता ही मोदी साहेबांच्या हातामध्ये आहे. गेले १० वर्ष आपण बघतोय, अनेक ठिकाणची त्यांची भाषणं ऐकतो. काहीही सांगतात ते हल्ली. जवाहरलाल नेहरूंचं योगदान हे या देशाच्या इतिहासात कुणीही पुसू शकत नाही आणि तेच आजचे प्रधानमंत्री हे त्यांच्यावर टीका टिप्पणी करतात, त्यांच्याबद्दलच्या चुकीच्या गोष्टी सांगतात. कुठेही गेले तरी बघा, १० वर्षात मी काय केलं हे सांगण्याऐवजी आम्हा लोकांना विचारतात तुम्ही गेल्या १० वर्षात काय केलं. अरे २०१४ ते २०२४ तुम्ही आहात, तुमच्या हातात सत्ता आहे त्या सत्तेचा वापर कसा केला आणि देशाचं चित्र बदलायला तुम्ही काय केलं हे सांगण्याऐवजी अन्य लोकांच्या टीका टिप्पणी करायची, हे सूत्र ज्या व्यक्तीच्या मनात आहे त्याचा अर्थ स्पष्ट हा आहे की, व्यापक दृष्टिकोन राज्यकर्त्यांचा असला पाहिजे, त्या दृष्टिकोनाचा अभाव आजच्या नेतृत्वामध्ये आहे आणि म्हणून अशांच्या हातातून सत्ता काढून घेण्याचं काम हे करायला लागेल. त्यासाठी दुसरा कुठला पर्याय नाही.

त्यांची कामाची पद्धत बघितल्यानंतर आज आम्ही सातत्याने सांगतोय की, पार्लमेंटमध्ये आम्ही बसतो, खासदार लोकांशी गप्पा गोष्टी करतो. पार्लमेंटमध्ये एक सेंट्रल हॉल आहे तिथे तुम्हाला माहीत असेल आणि ती जागा अशी आहे, राज्यसभा असो की लोकसभा असो, त्याचे सदस्य वेळ असला की त्याठिकाणी एकत्र भेटतात. तो कुठल्याही पक्षाचा असो, बोलतात, गप्पा मारतात काही प्रश्न असतील ते मांडतात. तिथे कधी पक्षीय अंतर कुणी आणत नाही. पण आम्ही अलीकडे पाहतो की, मोदी साहेब तिथे जातात म्हटल्यानंतर सत्ताधारी पक्षाचे खासदार खाली मान घालतात, त्यांना दिसता कामा नये विरोधकांशी आम्ही बोलतोय म्हणून. एकप्रकारची दहशत त्यांच्यावर सुद्धा त्याठिकाणी आहे आणि ही दहशत निर्माण करण्याचं काम त्याठिकाणी होतंय. अशा दहशत असणाऱ्या पक्षाच्या सदस्यांच्या हातात पुन्हा सत्ता द्यायची का? सत्ताधारी पक्षाचे खासदार हळूच कानात आम्हाला सांगत असतात की, दर मंगळवारी तिथे पक्षाची बैठक असते. आणि त्या बैठकीमध्ये चर्चा नाही, लोकांना आपलं मत मांडता येत नाही, मोदी साहेब बोलणार, ते विचार मांडणार, ते ऐकायचं, आणि सगळ्यांनी जायचं. दुसरं कुणालाही त्याठिकाणी एक शब्द बोलण्याचा अधिकार नाही. आम्ही अलीकडच्या काळामध्ये रशियाच्या एका राज्यकर्त्याचं वर्णन वाचतो. रशियाचं प्रशासन, रशियाची शासन यंत्रणा आणि त्या व्यक्तीचं नाव पुतीन. आज या देशामध्ये मोदींच्या रुपानं नवीन पुतीन तयार होतोय का काय ही चिंता या देशाच्या जनतेला आहे. देशात अशी वेळ येऊन द्यायची नसेल, तर संविधानाला आज या राजवटीकडून एक संकट येण्याची शक्यता आहे. याची नोंद घेऊन आपण त्या प्रवृत्तीला खड्यासारखं बाजूला ठेवणं हे काम उद्याच्या निवडणुकीत करायचंय आणि ते करण्यासाठी एकत्र येण्याचं काम केलं.

## आम्ही सर्व एकाच विचारधारेचे

काही लोक मला विचारतात, तुम्ही सगळे एकत्र? तुम्ही या पूर्वी एकमेकांच्या विरुद्ध लढला? म्हटलं हो..! काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एका विचारांना अनेक वर्षापासून काम करतोय. आम्हा सगळ्यांची विचारधारा ही गांधी नेहरूंची विचारधारा आहे आणि त्या विचारधारेनं आम्ही काम करतो. लोक विचारतात शिवसेनेचं काय? शिवसेनेचं वैशिष्ट्य हे, की या देशामध्ये कुठलीही समस्या निर्माण झाली तर या शिवसेनेच्या नेतृत्वानं पहिल्यांदा देशाचा विचार केला. मला आठवतंय १९७७ साली देशामध्ये सगळे राजकीय पक्ष काँग्रेस पक्षावर टीका टिप्पणी करत होते. इंदिरा गांधीच्यांवर हल्ले करत होते, एकच नेता त्यावेळी उभा राहिला, आणि त्या नेत्याचं नाव बाळासाहेब ठाकरे! बाळासाहेब ठाकरेंनी त्याच्या सोडवणुकीसाठी तुमचा शिवसैनिक त्याठिकाणी असतो आणि त्यामुळे एक जबरदस्त बाळासाहेबांचे विचार घेऊन तरूणांची संघटना तुम्ही उभी केली. ती सगळी संघटना आज देशावर जे संकट येऊ पाहतंय, त्या संकटांच्या विरुद्ध लढण्यासाठी एक जबरदस्त ताकद त्यांच्यामार्फत मिळेल आणि हे संकट येऊ शकणार नाही, ही स्थिती तयार होईल याचा मला पूर्ण विश्वास आहे, आणि त्यासाठी तुम्हाला अंतःकरणापासून धन्यवाद देऊ इच्छितो. आपण इथून पुढं या सगळ्या कामांमध्ये सहभागी होत आहोत. निवडणुका आल्या आहेत, आणि या निवडणुकीमधून राज्यांमध्ये आम्ही लोकांनी स्थापन केलेली ठिकठिकाणी ही जी आघाडी आहे, त्यांचे जे प्रतिनिधी आहेत त्यांचे जे उमेदवार आहेत, त्यांना मोठ्या मतांनी विजयी करायचं आहे. त्यांना शक्ती द्यायची आहे आणि



सांगितलं की, हा देश पुढे न्यायचा असेल, या देशामध्ये प्रगती करायची असेल आणि या देशातील समस्या कमी करायच्या असतील तर इंदिरा गांधी या करू शकतात आणि इंदिरा गांधींना जाहीरपणाने समर्थन देण्याचं काम त्या काळामध्ये बाळासाहेब ठाकरेंनी केलं. आज तीच अवस्था आहे आणि मला आनंद आहे की, आम्हा दोघांच्या बरोबर काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या बरोबर खांद्याला खांदा लावून आज उद्धवजी आणि त्यांचा सैनिक ठीक ठिकाणी उभा राहिला आहे.

मी एक गोष्ट सांगतो, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कुठेही गेलं आणि प्रश्न महत्त्वाचा लोकांचा असेल तर धावून जाणारा ही जबरदस्त शक्ती महाराष्ट्राच्या संसदेमध्ये आपण पाठवू.

यंदाच्या निवडणुकीला आम्ही अतिशय महत्त्व देतोय कारण आम्हाला चिंता आहे की ही निवडणूक शेवटची निवडणूक ठरू नये. ज्यांच्या हाती देशाची सत्ता आहे त्यांचा एकंदर संसदीय पद्धत आणि निवडणुकीकडे बघण्याचा जो दृष्टीकोन आहे, त्यात यश मिळालं तर तुम्हा सर्वांचा मूलभूत लोकशाहीचा अधिकार संकटात आल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्यांच्या पिकांच्या किंमतीचा प्रश्न असो किंवा इतर प्रचंड आश्वासने मोदी आणि त्यांच्या सरकारने दिली पण यातील एकाही गोष्टीची पूर्तता झाली नाही. याउलट बांग्लादेशचे मार्केट

असेल किंवा अन्य मार्केटमध्ये तिथे दोन पैसे शेतकऱ्यांना अधिक मिळण्यासाठी तिथले सरकार लक्ष घालतं, पण आमचे सरकार याकडे फक्त बघ्याची भूमिका घेते. याचा परिणाम संत्री, डाळींब, गहू, धानाचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांवर होतो. अनेक वेळा सांगितले की उत्पादन खर्चाचा विचार करून आम्ही किंमत दिली. त्यासाठी एक कमिशन नेमण्यात आले. ते कमिशन माझ्या काळात होतं. त्याचा रिपोर्ट आला, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मोदी सरकारची होती पण गेल्या दहा वर्षात त्या अहवालाकडे त्यांनी ढुंकून बघितलं नाही आणि त्यातील एकाही गोष्टीची पूर्तता त्यांनी केली नाही. आणि तेच लोक सत्ता त्यांच्याकडे असताना आढावा आमच्याकडे मागतात. याचा अर्थ हाच आहे की सत्ता हाती असताना आपल्यावर असलेली जबाबदारी पार पाडण्याकडे



ढुंकूनही बघायची नीति आजच्या प्रधानमंत्र्यांची आहे.

देशात भगिनींच्यावर अत्याचार होत आहेत. आमच्या काळात मुलींवर अत्याचार झाले नाहीत. पण यांच्या कालखंडात ज्या भारतकन्येने देशाला आंतरराष्ट्रीय सूवर्ण पदक मिळवून दिले त्यात साक्षी मलिक, विनेश फोगाट, बजरंग पुनिया या सगळ्यांकडे ज्या पद्धतीने बघितले गेलं. त्यांच्यावर आंदोलन करण्याची वेळ आली. यातून ज्यांच्या हाती सत्ता दिली त्यांच्याकडून काम होत नाहीत हे समजतं. मणिपूर येथे आम्ही काही खासदारांचे शिष्टमंडळ पाठवले. त्या शिष्टमंडळाचा अहवालानुसार या भागात ३०-३५ टक्के भगिनी उद्ध्वस्त झाल्या. घरावर हल्ले झाले काहींवर अत्याचार केले हे होताना देशाचे प्रधानमंत्री बघ्याची भूमिका घेत होते. त्या माऊलींच्या रक्षणासाठी आपण त्याठिकाणी जावं हा विचार मोदींच्या मनात आला नाही. हे फक्त मणिपुरमध्येच नाही तर उत्तरप्रदेश येथील हाथरस, उन्नाव या गावातही भगिनींवर अत्याचार झाले पण सरकारने त्याकडे बघितलं नाही.

या देशात कोरोनाचे संकट आलं तेव्हा हजारोंच्या संख्येने लोक शहराकडून गावाकडे गेले. त्यांना उपचार देणे, त्यांना न्याय देण्याचे काम झाले नाही. सध्याच्या राज्यकर्त्यांनी प्रत्येक व्यक्तीला संकटात टाकलंय. कापूस, सोयाबीन, तूर, कांदा उत्पादक संकटात आहे. या गोष्टी पाहिल्यानंतर निष्कर्षाकडे येताना यात बदल हवाय. हा बदल हवा असेल तर उद्याच्या मतदानाच्या दिवशी तुम्हाला निकाल घ्यावा लागेल.

## खोट्या केसेस टाकल्या जातायंत

महाराष्ट्रामध्ये आजच माझ्या कानावर एक गोष्ट आली. मुंबईच्या कृषी बाजार समितीमध्ये निवडून आलेल्या कमिटीच्या लोकांना कुठे काहीतरी आरोप झाले, तर त्याचा एक मुख्य माणूस संजय पानसरे त्याचं नाव, त्यांना आज अटक करून टाकले. त्या मार्केटमध्ये कामगारांचा प्रतिनिधी म्हणून काम करणारे शशिकांत शिंदे नावाचे माजी आमदार आज साताऱ्यामधून लोकसभेचे उमेदवार आहेत, ते आणि त्यांच्या सहकाऱ्यांना नोटिसा दिल्या. निवडणूक चालू असताना लोकप्रतिनिधी असलेल्या व्यक्तीला आज नोटिसा देतात, त्यांना अटक करण्याची दमदाटी देतात. त्याचा अर्थ स्वच्छ आहे, सत्तेचा गैरवापर करणे हे एक कलमी काम देशाचे प्रधानमंत्री आज करत आहेत. ते चित्र जर बदलायचे असेल तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मतांनी विजयी करणे हे तुमचं आणि माझं कर्तव्य आहे.

सरकार सत्तेचा गैरवापर करत आहे. खोट्या केसेस करतात, अनेकांवर केसेस केल्या. माझ्यावर केस केली होती. कशासाठी माझ्यावर केस केली? तर राज्य सहकारी बँकेमध्ये काही झालं, त्याच्यात माझ्यावर केस केली. मी राज्य सहकारी बँकेचा सभासद नाही, राज्य सहकारी बँकेतून मी कर्ज कधी आयुष्यात काढले नाही. त्या बँकेत कधी गेलो नाही. माझ्यावरही केस केली. आणि नोटीस आली, या ईडीच्या ऑफिसमध्ये. मी येतो म्हटलं, निघालो यायला. सर्व अधिकारी आले, हात जोडले, येऊ नका येऊ नका, आमच्याकडून चुकून नोटीस आली. मी बोललो, आता आल्याशिवाय राहत नाही, शेवटी ती नोटीस थांबली. त्या

ठिकाणी. पण मोदी साहेबांनी त्यांच्या विचारांच्या विरुद्ध जो वागतो त्यांना तुरुंगात टाकण्यासाठी या ईडीचा गैरफायदा हा ठिकठिकाणी घ्यायला सुरुवात केली. मला आठवतंय की, जनावराला चारा नव्हता. जनावराचा चारा म्हणजे फक्त ऊसाचं वाढं, ऊसाचं वाढं जनावरांना घालून त्यांच्या तोंडामध्ये त्रास व्हायला लागला होता. जनावरं हा चारा खात नव्हते. शेवटी आम्ही लोकांनी गुजरातमधून अमूल नावाची कृषी संस्था आहे, त्या संस्थेच्या प्रमुख लोकांना आम्ही निमंत्रण दिलं. इथली स्थिती दाखवली आणि त्यांच्याकडून गुजरातमधून इथं आम्ही चारा आणला. जनावरांच्या कॅम्पमध्ये या चाऱ्याची व्यवस्था केली. आणि त्याचवेळेला गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी होते. मी त्याची आठवण यासाठी करून देतो, गुजरातची दुधाची संस्था महाराष्ट्राच्या दुष्काळग्रस्त लोकांना त्यांच्या जनावरांना चारा देण्यासाठी आम्हाला मदत त्यांनी केली. आम्ही त्यांचे आभारी होतो. आणि महाराष्ट्रात तुम्ही का मदत केली म्हणून त्या अमूल संस्थेचे जे अध्यक्ष होते, त्यांच्यावर मोदींच्या राजवटीमध्ये खटला भरला गेला. काय गुन्हा केला त्यांनी? इथल्या दुष्काळग्रस्त लोकांच्या जनावरांना चारा द्यायचं काम त्यांनी केलं. आणि ते करणाऱ्यांवर खटला भरणारे त्यावेळचे मुख्यमंत्री हे आजचे प्रधानमंत्री आहेत. शेतकऱ्यांच्या हिताच्या ज्या गोष्टी असतील, त्या आम्ही करू देणार नाही हेच त्यांनी दाखवली.

## शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर आधारित किंमत द्यायला हवी

जिरायत भागामध्ये अनेक पिकं आहेत. कांदा एक अत्यंत महत्वाचे पीक आहे. तुम्ही आजच्या वर्तमानपत्रातली माहिती वाचा, ज्या कांद्याला दोन पैसे बाहेर मिळत होते, परदेशात कांदा निर्यात करत होते, त्याला बंदी घातली आणि दोन पैसे कांदा उत्पादकांना जे मिळत होते, ते थांबवण्याचे पाप मोदीच्या सरकारने या ठिकाणी केले. लोकांनी अनेकांनी याबद्दलच्या तक्रारी केल्या टीका टिप्पणी केली, काही ठिकाणी मोर्चे काढले आणि काल त्यांनी नवीन निकाल घेतला. काय निकाल घेतला? कांदा निर्यात करायला परवानगी आहे, पण जो लाल कांदा आहे, त्याला नाही. फक्त पांढऱ्या कांद्याला घेतली आहे. तुम्ही सगळेजण शेतीच्या धंद्यातले लोक आहात, शंभरातले किती टक्के लोक पांढऱ्या कांद्याचे पीक घेतात? १० टक्के लोकसुद्धा पांढऱ्या कांद्याचे पीक घेत नाहीत. आपल्या सगळ्या भागांमध्ये तांबडा कांदा हा पिकवला जातो, त्या तांबड्या कांद्याची निर्यात आधी थांबवली आणि फक्त जो कांदा गुजरातमध्ये पिकतो, त्याची निर्यात करण्याबद्दलची संमती दिली.



आज शेतीमालाच्या किंमती हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. एकच गोष्ट सांगतो की, उत्पादन खर्चाचा विचार करून जी काही किंमत शेतकऱ्याला द्यायला हवी. ती देण्याचा निकाल त्या ठिकाणी घेतला पाहिजे. पण तो घेतला जात नाही. त्याचा परिणाम आज कर्जबाजारीपणा हा शेतकऱ्यांच्या दृष्टीनं दुखणं झालंय.

माझ्याकडे शेती खात्याचं काम होतं. शेती खात्याचं काम हातामध्ये घेतलं आणि वर्तमानपत्रात बातमी आली की, यवतमाळ जिल्ह्यामध्ये एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. मनमोहन सिंह प्रधानमंत्री होते. ती बातमी वाचली. मी अस्वस्थ झालो. मनमोहन सिंहांना सांगितलं की, बळीराजा या देशातला आत्महत्या करायला लागला, तर कुठंतरी आपलं चुकतंय, कुठंतरी धोरणात बदल केला पाहिजे. त्यांना विनंती केली की, ज्यांनी आत्महत्या केली त्यांच्या घरी आपण जाऊया. प्रधानमंत्री येतो म्हणाले. दिल्लीवरून आम्ही स्पेशल विमानाने नागपूरला आलो आणि तिथून यवतमाळला गेलो. आणि ज्यांनी आत्महत्या केली, त्यांच्या घरी गेलो. माऊली होती, दोन लहान मुलं होती, एक लग्न ठरलेली मुलगी होती. त्या माऊलीला विचारलं. तुझ्या मालकाने आत्महत्या का केली ? तिने सांगितलं, बँकेचं कर्ज होतं. जो नियमित व्याज देतो, कर्ज फेडतो त्याचा व्याजाचा दर त्यावेळी १२ टक्क्यावरून ६ टक्क्यांवर आणला. आणि शेतकऱ्याला मदत करण्याचा निकाल हा त्याठिकाणी घेतला होता. पण आजच्या

प्रधानमंत्र्यांना त्यासंबंधीची आस्था नाही. ते टिका टिपण्णी करतात, अनेक चुकीच्या गोष्टी करतात.

## पदाची प्रतिष्ठा ठेवली पाहिजे

ही निवडणूक एक वेगळी निवडणूक आहे. या निवडणुकीचा प्रश्न आहे की, हा देश कोणत्या पद्धतीने चालवायचा. आज मोदी साहेब आणि त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने देश चालवतात. ते बघितल्यानंतर चिंता वाढते. देश चालवणं याचा अर्थ लोकशाहीच्या मार्गाने लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्या संमतीने देशाचा कारभार करणं, ही महत्त्वाची गरज आहे. आज स्थानिक पातळीवर लोकशाही दिसते? आज पंचायत समितीच्या निवडणुका झाल्यात, जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्यात? इथल्या नगरपालिकेच्या निवडणुका झाल्यात? किती दिवसांपासून या निवडणुका आणि संस्था मोकळ्या आहेत. दोन वर्ष झाली. आता २ वर्ष तुम्ही निवडणुकाच घेणार नसाल आणि इथून सुरुवात करणार असाल तर आणखी काही दिवसांनी कदाचित विधानसभा आणि लोकसभा याच्या निवडणुका न घेण्याची दुर्बुद्धी ही राज्यकर्त्यांना सुचण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि ते चित्र दिसतंय.

आजकाल मोदीसाहेब ठिकठिकाणी सांगतात की ४०० के पार. खरं म्हणजे या देशातील लोकसभेच्या ज्या एकंदर जागा आहेत त्याच त्यांना मिळाल्या असत्या तर खऱ्या अर्थाने आनंद झाला असता. कशासाठी ४०० के पार ? ४०० के पार याचा अर्थ असा आहे की, त्यांना हव्या त्या पद्धतीने या देशात कायदे करून ते करण्यासाठी लागणाऱ्या खासदारांची संख्या त्यांना हवी आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला दिलेल्या घटनेत त्यांना परिवर्तन करायचं आहे. जेव्हा टिका झाली त्यावेळेस ते सांगतात की, संविधानाच्या परिवर्तनाचा विचार आमच्या मनात नाही. परंतु त्यांचे खासदार आपल्या भाषणातून संविधान बदलण्याबद्दल सांगतात. मोदी साहेब ठिकठिकाणी सांगतात. महाराष्ट्रात आल्यानंतर आम्हा लोकांची आठवण ठेवतात. टिकाटिप्पणी करतात. किती गंमतीची गोष्ट आहे. म्हणजे त्यांनी एक दिवस दिल्लीत भाषण केलं की, या देशामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये क्रांती घडवण्याचं ऐतिहासिक काम पवार साहब ने किया: हे त्यांनी भाषण केलं. आणखीन काही गोष्टी सांगितल्या. त्यांनी भाषण केलं. बारामतीमध्ये येऊन सांगितलं की, शरद पवारांचं बोट हातात धरून मी राजकारणात पावलं टाकली. आणि त्यानंतर ८ महिन्यांनी निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीला ते आले आणि म्हणाले की यांना सत्तेपासून दूर ठेवण्याच्यासाठी जे जे काही करता येईल ते करा. लोकशाहीत टीका करण्याचा त्यांचा अधिकार आहे. तो काही मी नाही म्हणत नाही. पण भूमिकेमध्ये, विचारामध्ये सातत्य पाहिजे. दिल्लीत एक, मुंबईत दोन, बारामतीत तीन: याचा अर्थ काय समजायचा. प्रधानमंत्री हे देशातील सर्वात महत्वाचं पद आहे. आणि त्या पदाची इज्जत ठेवणं ही तुमची माझी सर्वांची जबाबदारी आहे. ती आपण ठेऊयात.. पण त्याबरोबर त्या पदावर जे बसलेत त्यांनी सुध्दा त्या पदाची किंमत, प्रतिष्ठा ठेवली पाहिजे. पण आज ते त्यांच्याकडून ठेवण्याचं काम होतं नाही.

अनेक गोष्टी सांगता येतील त्यांच्याबद्दल. बांग्लादेशसारखा देश सुध्दा विकासाच्या बाबतीत भारताच्या पुढे आहे. याचा अर्थ काय समजायचा? याचा अर्थ हाच की, विकासाच्या संदर्भातील गोष्टी ते सांगतात त्यात फार तथ्य नाही. दुसरा मुद्दा भ्रष्टाचाराचा. ज्यांनी भ्रष्टाचार केला त्या लोकांना बरोबर घेतात. भाषणात एक सांगायचं: भाषणात सांगायचं की, या देशात भ्रष्टाचार करणाऱ्यांमध्ये कुणी अशोक नावाचा महाराष्ट्राचा घटक हा अग्रभागी होता. दोन महिन्यानंतर त्यांच्या पक्षामध्ये अशोक चव्हाणांची नियुक्ती केली. भोपाळमध्ये त्यांनी भाषण केलं, महाराष्ट्राच्या सहकारी बँकेमध्ये ज्यांनी घोटाळा केला, पाण्याच्या योजनेमध्ये, इरिगेशनमध्ये घोटाळे केले. पण ज्यांच्यावर आरोप केले ते आज कुणासोबत आहेत.

सत्ता ही लोकांसाठी वापरली जाते. लोकशाहीत लोकांचा प्रतिनिधी त्याचा सन्मान करायचा असतो. त्यांनी झारखंड व दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकलं. याचा अर्थ, हे हुकूमशाहीच्या रस्त्याने निघालेत, हे देशाची लोकशाही उध्वस्त करायला निघालेत. त्यामुळे सामान्य माणसाचे अधिकार जातील. त्यापासून या देशाला या व्यवस्थेला वाचवायचं असेल तर आज आम्ही लोकांनी एकत्र बसून मग उद्धव ठाकरे असतील, काँग्रेस पक्षाचे नेते असतील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते असतील,



अन्य पक्षाचे नेते असतील आम्ही सर्वांनी ठरवलंय की, एक राहूया आणि या हुकूमशाहीला निमंत्रण देणाऱ्या प्रवृत्तीला खड्यासारखं बाजूला ठेवूया.

## चव्हाण साहेबांच्या योगदानाची नोंद इतिहासात कायम असेल

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्याचा अर्थ सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन रुजवण्यासाठी ज्यांनी कष्ट केले, १९४७ नंतरच्या काळात त्यामध्ये पुन्हा सातारा जिल्ह्याचा उल्लेख करावा लागतो, आणि त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे या जिल्ह्याच्या जुन्या सातारचा एक सुपुत्र यशवंतराव चव्हाण यांनी स्वातंत्र्याचा अर्थ लोकांच्या जीवनामध्ये कसं परिवर्तन करण्यासाठी घेणं शक्य आहे, या संबंधीचा इतिहास घडवला. कुणीतरी सांगितलं पाहिजे की, या निवडणुकीमध्ये आम्ही काय करणार ? त्याच्यामध्ये मागणी केली की चव्हाण साहेबांना भारतरत्न द्या. आनंद आहे, तुम्हाला मला प्रत्येकाला आनंद आहे की ही मागणी करणारे आतापर्यंत चव्हाण साहेबांच्या विचाराचा जोर आम्ही कधी पाहिलेला नाही.

अनेकांनी त्यांच्यासारख्या गोष्टी केल्या. पी.डी.पाटलांनी कराडमध्ये स्मृतीस्थळ निर्माण केलं आणि महाराष्ट्रासहीत महाराष्ट्राच्या बाहेरचे लोक सुद्धा चव्हाण साहेबांच्या संबंधी संगमावर श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी येत असतात. आम्ही लोकांनी महाराष्ट्रात असो दिल्लीमध्ये असो चव्हाण सरांचं नाव कसं राहिल या सर्वांविषयी अनेक उपक्रम हातामध्ये घेतले. मुंबईमध्ये ज्या अनेक उत्तम संस्था आहेत, त्याच्यामध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ही संस्था आहे आणि त्या संस्थेमध्ये महाराष्ट्रातच नाही तर देशासमोरच्या महत्त्वाच्या प्रश्नांचा विचारविनिमय सगळ्या पक्षाच्या लोकांना घेऊन केला जातो. आणि एक उत्तम स्मारक आज मुंबईमध्ये मंत्रालयाच्या समोर चव्हाण साहेबांचं झालेलं आहे. अनेकांना माहीत नसेल, देशाच्या पार्लमेंटमध्ये आज गेल्यानंतर सभागृहात जर पाऊल टाकायचं असेल तर पहिल्यांदा तिथं आम्ही चव्हाण साहेबांचा पुतळा उभा केला आहे, त्याला नमस्कार करूनच लोकांना आत जावं लागतं. या देशाचे संरक्षण मंत्री म्हणून चव्हाण साहेबांनी कामं केलं, त्या खात्यामध्ये मी काम केलं, त्या खात्यामध्ये पृथ्वीराज यांनी काम केलं आणि संरक्षण खात्याचं जे कार्यालय आहे, त्या कार्यालयाच्या दारामध्ये एक कर्तबगार संरक्षण मंत्री म्हणून चव्हाण साहेबांचा पुतळा आम्ही तिथेही उभा केलेला आहे. देशाच्या रक्षणासाठी ज्यांच्या खांद्यावर जबाबदारी आहे, ते घटक ज्यावेळेला आपल्या कार्यालयामध्ये जातात. त्यांच्यासमोर प्रथम चव्हाण साहेबांचं दर्शन होतं, अशा अनेक गोष्टी चव्हाण साहेबांच्या योगदानाच्या संबंधीची कायमची नोंद व्हावी म्हणून सगळ्यांनी मिळून केलेलं आहे. आणि त्यामुळं हा विषय आम्ही कधी निवडणुकीचा केला नाही. हा विषय आम्ही कधी मतं मागण्याच्यासाठी केला नाही. तेव्हा आज मी पहिल्यांदाच इतर ठिकाणी त्यासंदर्भात काय केलं, याचा उल्लेख याठिकाणी करत आहोत. निवडणुकीच्या दृष्टीने आपली धोरणं आपला कार्यक्रम हा त्याठिकाणी मांडण्याची जबाबदारी आहे.

टिका टिपण्णी हा प्रधानमंत्र्यांचा स्वभाव आहे.



स्वतः काय केलं हे सांगायचं नाही. त्यांची भाषणं आम्ही अनेकठिकाणी ऐकलीत. टिका कुणावर करतातः टिका राहुल गांधींच्यावरः शहाजादा म्हणून त्यांचा उल्लेख करतात. ज्या तरूणानं या देशाच्या एकंदर स्थितीचा अभ्यास करण्यासाठी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पदयात्रा काढली. कोट्यवधी लोकांशी सुसंवाद केला. त्यांचं दुखणं समजून घेतलं आणि देशाच्या भल्यासाठी काही ठोसपणानं पावलं टाकली. त्याची आवश्यकता आहे, त्याची मांडणी ते करतायेत. त्याचं कौतुक करायचं सोडा, कमीत कमी वाईट तरी बोलू नका! स्वातंत्र्याच्या




**१० वर्षांच्या मोदी कारकिर्दीने देशाचं वाटोळं केलं**

आंदोलनामध्ये जवाहरलाल नेहरूंनी घरादाराचा विचार ज्या कुटुंबाने केला नाही. आयुष्याची १३ वर्ष इंग्रजांच्या तुरुंगामध्ये घालवली. आणि १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाचा कारभार संसदीय लोकशाही पध्दतीने चालेल यासाठी त्यांनी रचना उभी केली. या जगामध्ये या व्यक्तीमत्वाला एक प्रतिष्ठा होती. त्या जवाहरलाल नेहरूंवर टिका टिपण्णी, अनेकांच्यावर यापध्दतीने टिंगल टवाळी. आणि कोण करतंय तर देशाचे प्रधानमंत्री करतायेत. प्रधानमंत्री पद ही एक संस्था आहे तिची इज्जत ठेवली पाहिजे. ती आम्ही ठेवतो. संसदेत सभागृहातही ठेवतो. पण तुम्ही ती न ठेवता यापद्धतीची वक्तव्य केली तर प्रधानमंत्री पदाची गरिमा राहू शकत नाही. त्यामुळे आपल्याला विचार करायचा आहे. देश यांच्या हातात ठेवायचा की नाही, देशाचे प्रश्न सोडवायचे की नाही. देशाचा शेतकरी, कामगार, कष्टकरी, महिला, आदिवासी असेल या सगळ्यांच्या हिताची जपणूक हे एक वेळ सूत्र घेऊन आपल्याला पुढं जायचं आहे. आणि या रस्त्याने जायचं असेल तर मोदींचा कालखंड, मोदींची विचारधारा ही हिताची नाही. आणि त्यासाठी परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे.

देश चालवायचा तो त्यांच्या एका विशिष्ट विचारसरणीचा आग्रह धरणाऱ्या लोकांसाठी चालवायचा हे सूत्र घेऊन आज ते देशाचे काम करत आहेत. त्यामुळे देशावर संकटाची स्थिती आहे. लोकशाहीवर त्यांचा किती विश्वास आहे, याबद्दल लोकांच्या मनात शंका येते.सत्ता तुमच्या हाती आहे, तुमच्याविरोधी कोणी काही बोलतो त्याला तुरुंगात टाकण्यासाठी सत्ता घेता. मग रशियाचा पुतिन आणि तुमच्यामध्ये फरक काय? आज रशियात असलेली हुकुमशाही भारतात आणण्याचा तुमचा प्रयत्न आहे, अशी शंका लोकांना आली तर त्याबद्दल लोकांना दोष देऊन चालणार नाही. याचा अर्थ आपण जागरुक राहिलो नाही, परिवर्तन केलं नाही, हुकूमशाहीच्या पद्धतीने देशाचा कारभार करणाऱ्या ज्या ज्या प्रवृत्ती आहेत त्या प्रवृत्ती देशातील मूलभूत लोकशाहीचा अधिकार उद्धवस्त केल्याशिवाय राहणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरु आणि इतर नेत्यांनी जो मूलभूत अधिकार आपल्याला दिला त्या अधिकारावर आज संकटाचे ढग दिसतायंत. त्यासाठी आपण सर्वांनी जागरुक राहिलं पाहिजे. म्हणून ही निवडणूक महत्त्वाची आहे.

■■■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाकडून २५ एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा हा शपथनामा म्हणून प्रकाशित करण्यात आला. या जाहीरनाम्यात काही प्रमुख मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये गॅस-सिलेंडरच्या दरांपासून महिलांसाठीच्या आरक्षणापर्यंतच्या मुद्द्यांबाबत भाष्य करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि खासदार वंदना चव्हाण यांचे मांडलेले विचार...

# पंतप्रधान मोदी यांचा दृष्टिकोन देशाच्या ऐक्याला धक्का देणारा

## शरद पवार



आम्ही मर्यादित जागा लढवत आहोत. पण, आमचे सर्व खासदार निवडून येतील. त्यादृष्टीनेच आम्ही शपथनाम्यामध्ये विविध प्रश्नांसंबंधी मांडणी केलेली आहे. त्याबाबत आमचे लोक संसदेत आवाज उठवतील. मागील दहा वर्षात शेतीसंबंधीचे प्रश्न वाढले आहेत. हा कालखंड अमित शहा यांच्या पक्षाकडे होता. या कालावधीत त्यांनी काय केलं ते सांगावं. अमित शहा यांचे शेतीसंबंधीचे ज्ञान मर्यादित आहे, त्यावर जास्त काय बोलायचे? त्यांनी दहा वर्षात काय केलं ते सांगावं.

मी कृषिमंत्री असताना तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग अमरावतीत आले होते. त्यांना तेथील शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी प्रत्यक्षात दाखवून देण्यात आल्या. त्यानंतर कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला. गेल्या १० वर्षांत अमरावती, यवतमाळ आणि इतर जिल्ह्यांतील शेतकरी





आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. काँग्रेसच्या काळापेक्षा आता दीडपट अधिक शेतकरी आत्महत्या होत आहेत. परंतु अमित शहा त्यावर काही बोलत नाहीत. वीस वर्षांआधी काय झाले, चाळीस वर्षांआधी काय झाले हे विचारण्यापेक्षा गेल्या १० वर्षांत मोदी सरकारने शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी काय केले ते सांगावे.

काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर पंतप्रधान मोदी स्फोटक टीका करत आहेत. काँग्रेस मुसलमानांना संपत्ती देणार अशा प्रकारची टीका केली जात आहे. पण, त्यांचा दृष्टिकोन पाहिला तर ते एका देशाचे प्रधानमंत्री आहेत की एका राज्याचे आहेत यासंबंधीचा प्रश्न पडतो. प्रधानमंत्री असं कसं बोलू शकतात. एकंदरीत त्यांचा यासंबंधीचा दृष्टिकोन चिंताजनक आहे. तो देशाच्या ऐक्याला धक्का देणारा आहे. त्याला विरोध केला पाहिजे. त्यासंबंधीची जागृती समाजामध्ये केली पाहिजे. ही आमची भूमिका राहणार आहे. या सर्वाचा परिणाम देशाबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवरही होत आहे.

या देशातला सगळ्यात मोठा भ्रष्टाचार इलेक्टोरल बॉण्डच्या माध्यमातून झाला आहे. यावरून भाजप अडचणीत आला आहे आणि या प्रश्नाचं गांभीर्य तुम्ही सगळ्यांनी लक्षात घेणं गरजेचं आहे.



राज्यपालांची नियुक्ती मुख्यमंत्र्यांच्या सजेशननी व्हावी असे म्हटले, कारण, राज्याचा कारभार हा राज्याच्या जनतेनं निवडून दिलेल्या लोकांच्या विचारानं चालतो. प्रशासनाचे काम चालते. अनेक राज्यांमध्ये राज्यपाल आणि तेथील सरकार यांचं नातं योग्य नाहीये. त्यामुळे विकासकामांमध्ये अडथळे येत असल्याची उदाहरणं आहेत. त्यामुळेच राज्य कारभाराला योग्य वळणावर घेऊन जायचे असेल तर त्याच विचारांच्या राज्यपालाची नेमणूक होणं गरजेचं आहे असं मला वाटतं. यातून मुख्यमंत्री आणि राज्यपाल एकत्रितपणे निर्णय घेऊ शकतील. पहिल्या टप्प्यात जनमत भाजपविरोधात गेले आहे. त्यामुळे भाजप अस्वस्थ आहे. म्हणून जात-धर्म, हिंदू-मुस्लिम मुद्दे घेतले जात आहेत. त्यांचा हा प्रयत्न आधीही होत होता आणि आता मोदी साहेबांच्या काळात मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे.

# राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पार्टीचा जाहीरनामा प्रकाशन

## देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचं काम करू

**जयंत पाटील**



शपथनाम्यामध्ये सांगितलेल्या मुद्यांचा आमचे सर्व खासदार देशाच्या संसदेमध्ये आग्रह करतील. देशातील पद दलितांना, महिलांना, कष्टकऱ्यांना, कामगारांना, लहान उद्योजकांना, व्यापाऱ्यांना आणि देशातल्या सर्वात मोठ्या घटक असलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवतील. हा आवाज उठवत असताना आमची भूमिका, आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची काय असेल, हे आम्ही शपथनाम्याच्या रूपानं आज आम्ही सर्वांच्यासमोर सादर करतोय. या कार्यक्रमासाठी काल तुळजापूरला सभा झाली असतानाही खास यासाठी पवार साहेब आज इथे आले आहेत. त्यांचं स्वागत करतो. खासदार वंदना चव्हाणांनी बरेच कष्ट शपथनामा तयार करताना घेतलेले आहेत. त्यांच्या टीममध्ये युवक अध्यक्ष मेहबूब शेख, महिला अध्यक्ष रोहिणीताई खडसे, विद्यार्थी अध्यक्ष सुनील गव्हाणे, सरचिटणीस बसवराज पाटील, ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुधीर भोंगळे आणि इतर सेलचे अध्यक्ष यांचा समावेश होता. या सर्वांनीच बरेच कष्ट करून बऱ्याच विचाराअंती हा शपथनामा सादर केलेला आहे. मला विश्वास आहे, की हा शपथनामा लोकांना आवडेल.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शपथनाम्यामध्ये, गेल्या दहा वर्षात जी फसवणूक झालेली आहे, प्रचंड महागाई या देशात वाढलेली आहे, ४५ वर्षात सगळ्यात जास्त बेरोजगारी आज या देशात आहे. शेतकऱ्यांची दुरावस्था झालेली आहे. कार्पोरेटसाठी पक्षपाती धोरणं अवलंबून आणि त्या माध्यमातून इलेक्टोरल बाँण्डस्च्या माध्यमातून प्रचंड देणग्या घेण्याचे आणि सरकारी यंत्रणांचा गैरवापर करण्याचे अनुभव आपण घेतले आहेत. सर्वच गोष्टींचं खासगीकरण करण्याचं काम या सरकारकडून होत आहे. महिला सुरक्षित नाहीयेत. पर्यावरणाची हानी करणारा विकास, कायद्याची मोडतोड करून करण्याचा जो प्रयत्न झाला आहे, या सगळ्या गोष्टींवर आम्ही आमची भूमिका जाहीरनाम्यातून मांडली आहे व समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. जीएसटीच्या नावाखाली सरकार लोकांकडून खूप काही ओरबाडून घेत आहे. त्यामुळे जीएसटीसाठी एक कौन्सिल केले जाईल व त्यांना पूर्ण अधिकार दिले जातील व केंद्राला मर्यादित अधिकार राहतील. शेती आणि शैक्षणिक वस्तूंवर शून्य जीएसटी असेल. स्वयंपाक घरातील गॅसच्या किंमती कमी करू. ५०० रूपयांवर घरगुती गॅसच्या किंमती आणू आणि गरज पडल्यास केंद्र सरकारकडून त्याला सबसिडी देण्याचा प्रयत्न करू. पेट्रोल आणि डिझेलवरील करांची पुनर्रचना करू. देशातील महागाई वाढण्याचं सर्वात मोठं कारण हे पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ आहे. त्याला मर्यादित करण्याचं काम आम्ही करू.

देशात काही लाख शासकीय नोकऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. आम्ही जर सत्तेत आलो तर त्या रिक्त जागा भरण्याचा आग्रह धरू व देशातील जनतेला सरकारच्या माध्यमातून चांगली सेवा देऊ. शासकीय नोकऱ्यांमध्ये महिलांचे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचा आम्ही आग्रह धरू. शासकीय क्षेत्रात कंत्राटी कामगारांना पायबंद घालण्याचे काम करू. कंत्राटी पद्धतीने नोकरी देण्याचे आम्ही बंद करू. डिग्री आणि डिप्लोमा पासआऊट झालेल्या विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी दर महिना ८ हजार ५०० रूपये

स्टायपेंड मिळेल ही भूमिका आम्ही ठेवली आहे. देशातील स्पर्धा परीक्षांसाठी केंद्र व राज्य सरकारकडून आकारले जाणारे शुल्क आमचे सरकार आल्यावर माफ केले जाईल. खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी एस.सी., एस.टी., ओबीसी आरक्षण ठेवण्याचं काम आम्ही करू. महिला आणि मुलींसाठी शिक्षणात असलेल्या अडचणी दूर करण्याचे काम आम्ही करू. ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सवर महिलांची सुरक्षा करण्यासाठी कडक कायदे आणले जातील. शाळा आणि महाविद्यालयांसाठी सेफ्टी ऑडिट राबवले जाईल. महिलांना संसद आणि राज्य विधीमंडळामध्ये आरक्षण देण्याचा जो आदरणीय पवार साहेबांचा आग्रह आहे, त्याची अंमलबजावणी करण्याचे काम आम्ही करू. अंगणवाडी सेविकांची संख्या वाढवू. त्यांचे केंद्रीय अनुदान वाढवू. महालक्ष्मी योजना म्हणून प्रत्येक कुटुंबातील महिलेला आम्ही दरवर्षी १ लाख रूपयांचे अर्थसहाय्य देऊ.




शेतकऱ्यांना किमान आधारभूत दर, आयात-निर्यात धोरण, कर्जमाफी यावर काम करण्यासाठी एक स्वतंत्र आयोग निर्माण करण्यात येईल, ज्यामध्ये केंद्र सरकारचा हस्तक्षेप राहणार नाही. नवीन शेती तंत्रज्ञानाला जास्त बळकटी देण्याचे काम आम्ही करू. दुर्बल घटकांसाठी जातनिहाय जनगणना करण्यासाठी आग्रह करू. आरक्षणाची ५० टक्के मर्यादा दूर करण्यासाठी विशेष कायदा करू. अल्पसंख्याकांसाठीची सच्चर आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करणार. मौलाना आझाद शिष्यवृत्ती पुन्हा सुरू करण्याचे काम करणार. गरीबांना मोफत रेशन मिळावे यासाठी पात्रतेमध्ये आम्ही सुधारणा करू. ज्येष्ठ नागरिकांसाठी राज्यस्तरावर आयोगाची निर्मिती करू. २०२८-२९पर्यंत आरोग्यासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद ४ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी प्रयत्न करणार. सर्व सार्वजनिक आरोग्य केंद्रे, दवाखाने आणि रूग्णालयांमध्ये आरोग्य सेवा मोफत करण्याची मागणी करणार. त्याचबरोबर शिक्षणाचीही अर्थसंकल्पीय तरतूद आम्ही ६ टक्क्यांपर्यंत वाढवू. अनेक वेगळ्या सुधारणा, सूचना आम्ही त्यात केल्या आहेत. खासगीकरणाच्या धोरणाचा आढावा घेऊ. पर्यावरणासंबंधी काम करू. अग्निवीर योजना रद्द करू. देशातल्या तरूणांचा यासंबंधीचा आग्रह आहे. सायबर सिक्युरिटीसंदर्भात आम्ही काही मुद्दे मांडलेत. परराष्ट्र धोरणात चीनच्या घुसखोरीसारख्या मुद्यांवर आमचे खासदार संसदेत आवाज उठवतील. लोकशाही मूल्यांचं संरक्षण केले जाईल. लोकांचा निवडणुकीवरील विश्वास वाढवण्याचं काम केलं जाईल. त्यानंतर वन नेशन वन इलेक्शनसंबंधी निर्णय घेतला जाईल. न्याय यंत्रणेसंबंधी काम करू. कामगारांचं किमान वेतन ४०० रूपये प्रतिदिन असले पाहिजे याची व्यवस्था करू. सार्वजनिक धान्य वितरणाचा विस्तार करताना कडधान्यांचा समावेश करू.

काल अमित शहा अमरावती जिल्ह्यात होते. त्यांनी पवार साहेबांवर काही आरोप केले. मात्र, २००१ ते २०१३ साली अमरावती जिल्ह्यात आत्महत्येचं प्रमाण दरवर्षी १६८ होतं. आता २०१४-२२ या कालखंडात अमरावती जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येचं प्रमाण दरवर्षी ३२२ इतकं झालं आहे. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या कार्यकाळात हा शेतकरी आत्महत्येचा दर वाढला. अकोल्यात शेतकरी आत्महत्येचा दर १०९ होतो, तो १७१ इतका झाला. यवतमाळ जिल्ह्यात २१४ होता, तो ३२४ झाला. बुलढाण्यात ११७चा २८९ झाला. वाशिममध्ये ८१चे १०१ झाले. अमित शहा यांच्याकडे याबाबत काय उत्तर आहे?

पवार साहेब ज्यावेळी या देशाचे कृषी मंत्री होते, तेव्हा त्यांनी पंतप्रधान मनमोहनसिंग यांना यवतमाळ जिल्ह्यात आणले होते. तिथे त्यांनी शेतकरी परिषद घेतली आणि दुष्काळाचा सामना करण्यासाठी उपाययोजना केल्या. गेल्या दहा वर्षात त्यांनी सिंचनाचा अनुशेषही भरून काढलेला नाही. २ वर्षे ज्यावेळी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार होते, त्यावेळी आम्ही विदर्भातील अनुशेष भरून काढण्यासाठी विविध उपाययोजना केल्या, मोठ्या प्रमाणात निधी दिला.

शेतीला हमीभाव आणि स्वतंत्र आयोगामध्ये केंद्राचा हस्तक्षेप नसेल, तो यादृष्टीनं की आता केंद्र सरकारनं कांद्याची निर्यात अचानकपणे बंद केली. त्याचा परिणाम

असा झाला, की शेतकऱ्यांना कवडीमोलानं कांदे विकावे लागले. त्याचबरोबर ज्यावेळी मोठ्या प्रमाणात सोयाबीनचं उत्पादन होतं किंवा मर्यादित होतं, त्यावेळी त्याच्या आयात–निर्यातीचे धोरण ठरवणे यासारखे सर्व मुद्दे शेतकऱ्यांना सुरक्षित ठेऊ, कारण शेतकरी तगला तर देश तगणार आहे, त्यासाठी शेतकऱ्याला तोटा होणार नाही याची काळजी घेण्याचं काम हे आयोग करेल. परिस्थितीनुसार कर्जमाफीचा निर्णय राजकीय पातळीवर घेण्यापेक्षा आयोगाने घेणे सोयीस्कर ठरू शकते.

भारतरत्न देण्याबाबत आपल्याला मागणी करता येते. तो काही जाहीरनाम्याचा विषय नाही. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांना भारतरत्न मिळावा ही संपूर्ण महाराष्ट्राचीच भूमिका आहे. चांगल्या गोष्टी झाल्या पाहिजेत. पण, प्रॉब्लेम असा आहे, की अजित पवारांच्या राष्ट्रवादीला दिल्लीत कोणी ऐकत नाही.

देशात सध्या असलेल्या सरकारने २१० लाख कोटींच्या जवळपास कर्ज घेतलं आहे. इंटरनॅशनल मॉनिटरिंग फंडनेदेखील भारताला सूचना केली आहे, की आता कर्ज घेणे कमी करा, नाहीतर श्रीलंकेसारखी तुमची परिस्थिती होईल. भाजप पुन्हा सत्तेवर आले तर १८ टक्क्यांचा जीएसटी आणखी वाढवला जाईल. कारण, सरकारला हे कर्ज फेडायचे आहे. सर्वधर्मसमावेशक अशी आपल्या भारताची ओळख आहे. ही ओळख जर आपण टिकवून ठेवली, तर आपल्या देशात गुंतवणूक वाढेल. गुंतवणूक वाढली तर रोजगार वाढेल आणि रोजगार वाढले तर आर्थिक अडचणीचे चक्र आपल्याला तोडता येईल. आपल्या देशात सर्वधर्मसमावेशकता इथल्या पुरोगामी विचार मानणाऱ्या लोकांनी टिकवून ठेवली, म्हणून आजपर्यंत गुंतवणूकदार इथे आले. इंडिया आघाडीचे सरकार आले, तर आम्ही हे वाढवू आणि नक्कीच आपल्याला या आर्थिक संकटावर मात करण्याचा मार्ग सापडेल.

भुजबळ पुन्हा आमच्याकडे येणार यासंबंधीची कोणतीही चर्चा आमची नाही. पण, महायुतीमध्ये त्यांची प्रचंड अवहेलना होत आहे असं आम्हाला वाटतंय आणि त्याबद्दल आम्हालाही खेद वाटतोय. नाशिकमध्ये ते उभे राहणार अशी चर्चा झाली, दिल्लीतून त्यांना सूचना करण्यात आली आणि परत माघार घ्यावी लागली. पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही एकत्रितपणे काम केलंय, त्यामुळं आम्हाला त्याचा खेद आहे. एकनाथ खडसे यांनी भाजपमध्ये जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे आणि ते तिकडे गेले आहेत असं आम्ही समजतो.

२०१४पासून तीनवेळा पवार साहेबांनी भाजपसोबत जाण्याचा प्रयत्न केल्याचं सांगितलं जात असलं, तरी माझ्या माहितीप्रमाणं काही लोकं त्यांना सतत सांगत होते, की या देशात भारतीय जनता पक्षाचा पराभव होणं अवघड आहे. तेच सत्तेत येणार आहेत. त्यामुळं आपण तिकडं जाणं आवश्यक आहे आणि त्यांची खासगीतलं काही कारणं होतं, त्याच्यावर मी बोलू इच्छित नाही. त्यांचा हा सतत प्रयत्न होता. पवार साहेबच ठाम राहिले आणि प्रत्येक वेळेला जवळचेच सहकारी अशी भूमिका सतत मांडत असतील, तर बऱ्याच सहकाऱ्यांना बोलावून आपल्याला तिकडं जायचं नाही असं सांगितलं. नकार दिला. पवार साहेबांनी असा निर्णय कधीच घेतला नाही. पवार साहेब नेहमीच शाहू–फुले–आंबेडकर विचारांशी कटिबद्धता ठेऊन आहेत. पवार साहेबांनी ठामपणानं स्वाभिमान जपण्याचं काम केलं.

■■■





# शपथनाम्यात सर्व घटकांबरोबर विविध क्षेत्रांत सुधारणांवर भर

**वंदना चव्हाण**

आपल्याला सगळ्यांनाच माहिती आहे, की आदरणीय साहेब हे व्हिजनरी, दूरदृष्टीचे नेते आहेत. त्यांच्याकडून आम्हाला जे सातत्याने इनपूटस मिळतात, सातत्यानं आम्हाला जे मार्गदर्शन मिळतं, एखाद्या क्षेत्रासाठी आपण कुठली भूमिका घेतली पाहिजे या पद्धतीचं त्यांचं जे आम्हाला सांगणं असतं, त्याच पद्धतीनं आदरणीय जयंत पाटील साहेबांसारखे अतिशय अनुभवी नेते, ज्यांच्याकडनंसुद्धा आम्हाला अनेक इनपुटस मिळालेले आहेत. त्यानुसार आम्ही सगळ्या सभासदांनी मिळून हा जाहीरनामा तयार केलेला आहे. मला आवर्जुन यासंबंधीच्या कमिटीतल्या सगळ्या सदस्यांची नावं घ्यायची आहेत. यामध्ये अनुभवी मंडळी आणि वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणारी मंडळी आहेत हे लक्षात येईल. आदरणीय माजी मंत्री राजेश टोपे साहेब, आमदार सुनील भुसारा साहेब, ॲड. जयदेवरावजी गायकवाड, ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर, बसवराज पाटीलजी, सुधीर भोंगळेजी, विद्याताई चव्हाण, राखीताई जाधव, क्लाईड क्रॅस्टो, विकास लवांडेजी, नीरज महांकाळ, ॲड. संजय काळबांडे, दिलीप शिरसाटजी, डॉ. सुनील जगताप, सक्षणा सलगर, जावेद हबीबजी, प्रिया पाटील, रवींद्र पवार साहेब या सगळ्या मंडळींकडनं आम्हाला त्यांचे इनपुटस मिळालेले आहेत. एवढंच नव्हे तर प्रत्येक आघाडीच्या प्रमुखांनीसुद्धा त्या सेलमध्ये त्या मंडळींची मिटिंग घेऊन आपण काय मांडणी केली पाहिजे यापद्धतीनं आम्ही इनपुटस घेऊन हा जाहीरनामा तयार केलेला आहे.

एवढंच नव्हे, पण लोकांमधूनसुद्धा काही, जे वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रस्थापित मंडळी आहेत, त्यांच्याकडनं पण काही इनपुटस घेऊन आम्ही या शपथनाम्यामध्ये समावेश केलेला आहे. आत्ता आदरणीय साहेबांनी जे सांगितलं ते बरोबर आहे, की दहा खासदार असले, म्हणजे शंभर टक्के आपण विजय गृहित धरूया, दहा खासदार असले तरी हे तुम्ही कसे करणार असा प्रश्न येऊ शकतो. पण जे काही या शपथनाम्यामध्ये मांडलेले आहे, मला खात्री आहे, की पाच वर्षे पण आमचे जे खासदार निवडून जातील, त्यांना हे विषय मांडायला कमी पडतील. पण, आमचे खासदार कुठेच कमी पडत नाहीत. त्यामुळे सगळ्या विषयांवर त्याठिकाणी मांडणी होईल आणि सरकारसमोरसुद्धा आपली भूमिका मांडली जाईल.

अनेक गोष्टी आहेत याच्यामध्ये लिहिलेल्या, त्याच्यामध्ये ऑर्डनरी राईट डिस्कनेक्टसारखे एक प्रायव्हेट बिल जे सुप्रियाताई सुळेंनी मांडलेलं होतं, जे अतिशय नाविन्यपूर्ण होतं, त्याचासुद्धा अंतर्भाव आम्ही यामध्ये केलेला आहे. असे विविध विषय यामध्ये आहेत. यामध्ये कुठल्या कुठल्या घटकांचा विचार केलेला आहे हे सांगते. जाहीरनामा म्हटलं, की अनेकांकडून विविध सूचना येत असतात. पण, सगळ्यांचा अंतर्भाव करता येत नाही. छोटा, पण चांगला जाहीरनामा असला पाहिजे यादृष्टीनं प्रयत्न केलेला आहे. यापुढच्या काळातही अशा प्रकारचे काही इनपुटस आले तर ते मांडण्यासाठी आमचे खासदार आग्रही असणार आहेत. शपथनाम्यामध्ये युवक, महिला आणि मुली, शेतकरी, कामगार, उपेक्षित घटक, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, अल्पसंख्याक, पेन्शनर्स या घटकांचा विचार करण्यात आला आहे. त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य, क्रीडा, पायाभूत सुविधा, उद्योग क्षेत्र, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि करप्रणाली, नागरी विकास, पर्यावरण, पर्यटन, कला आणि संस्कृती, राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण आणि लोकशाही मूल्यांचं जतन याबद्दलची शीर्षकं या शपथनाम्यामध्ये आहेत.

■■■

# लोकसभा निवडणुकीत

**व्यंकटेश केसरी**

लोकसभा निवडणुकीच्या धुमश्चक्रीत महाराष्ट्र काय करणार. याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत आणि उत्तर प्रदेशच्या (८० जागा )खालोखाल सर्वाधिक जागा असलेले हे एकमेव राज्य आहे म्हणून देशाचे या राज्याकडे लक्ष आहे असे नाही तर याचा इतिहास, स्वतंत्र बाणा, लढाऊ वृत्ती, प्रागतिक विचारसरणी, उद्यमशीलता नरेंद्र मोदी यांच्यासमोर समर्पित होईल काय? याबद्दल देशाला औत्सुक्य आहे. सत्ता येते आणि जाते पण चारित्र्य निर्माण करण्यासाठी,ते जपण्यासाठी किंमत मोजावी लागते, त्यात अनेक पिढ्या गारद होतात. देशात आपले चारित्र्य,वैशिष्ट्य टिकविणाऱ्या राज्यात पंजाब,पश्चिम बंगाल, तामिळनाडू आदींचा समावेश आहे आणि यात महाराष्ट्राचे स्थान अग्रभागी आहे हे दिल्लीचे सत्ताधारी जाणतात.

महाराष्ट्र काबीज करण्यासाठी दिल्लीच्या सत्ताधाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शिवसेना तोडली, त्यांचे चिन्ह पळविले,सत्तेत जाण्यासाठी अधीर झालेल्यांना औट घटिकेसाठी सत्तेत बसून गुलाम केले. पण त्याने ना शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस संपली ना उद्धव ठाकरेंची शिवसेना. उलट हे दोन्ही पक्ष आणि काँग्रेस हे शड्डू ठोकून पंतप्रधान नरेंद्र मोदी. त्यांचे उजवे हात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपला निवडणुकीच्या आखाड्यातआव्हान देत आहेत याने भले भले आश्चर्यचकित झाले आहेत. शरद पवार,उद्धव ठाकरे आणि काँग्रेस पक्ष आज भाजपला तुल्यबळ प्रतिस्पर्धी म्हणून मैदानात उभा आहे. अशी जिद्द, अशी तडफ देशाला दुसऱ्या राज्यात दिसत नाही.

उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान,छत्तीसगड,गुजरात या राज्यात लोकांचा कौल कसा असेल याबद्दल राजधानी दिल्लीत फारसे बोलले जात नाही. पश्चिम बंगाल मध्ये ममता बॅनर्जींची तृणमूल काँग्रेस, बिहार मध्ये राष्ट्रीय जनता दल. दिल्लीत आम आदमी पार्टी नरेंद्र मोदी–



भाजपशी झुंजत आहेत. दक्षिणेत भाजपचा एकछत्री अंमल नाही. पण महाराष्ट्रात २०१९ पासून घुसळण चालू आहे. ती केवळ सत्तेसाठी नाही तर वर्चस्वासाठी आहे. नरेंद्र मोदींच्या फोटोवर तुम्ही जिंकलात. अशी दमदाटीची भाषा भाजप उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेशी करत आहे. याचा अर्थ होतो बाळासाहेब ठाकरे यांना विसरा, नरेंद्र मोदींना तारणहार माना. शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जन्माला घातला, तो वाढवला, सत्तेत आणला. नवीन पिढी राजकारणात आणली आणि आता त्यांचाच पक्ष भाजपने फोडला. भाजपची साथ नसती तर शिवसेना, राष्ट्रवादीतले फुटीर बंड करू शकले असते काय? मोदी यांना महाराष्ट्र आपल्या टाचेखाली आणायचा आहे आणि त्याला महाराष्ट्रातून कडवा विरोध होत आहे म्हंणून सारा देश या संघर्षाकडे वेगळ्या नजरेतून पाहताना दिसतो.

भाजपने नरेंद्र मोदी यांना 'विश्वगुरू' केले. अमित शहा यांना 'चाणक्य'. केले पण या दोघांनाही महाराष्ट्रात मान्यता नाही. या दोघांनी ज्या फुटीरांना सत्तेत बसविले त्यांना राजकीय पत नाही हे देश समजून चुकला आहे. महाराष्ट्र, बंगाल, बिहार मध्ये प्रादेशिक पक्षांनी नरेंद्र मोदींना रोखले आहे. तामिळनाडू,केरळ मध्ये नरेंद्र मोदी आणि त्यांचा भाजप अजूनही 'उपरा' आहे. पण आंध्र,कर्नाटकातील काही प्रादेशिक पक्षांनी शरणागती पत्करली आहे .

नरेंद्र मोदी हे छत्रपती शिवाजी महाराज, बाळ गंगाधर टिळक, विनायक दामोदर सावरकर, बाळासाहेब ठाकरे यांच्यापेक्षा कडवे धर्मनिष्ट, महात्मा जोतिबा फुले,शाहू महाराज यांच्यासारखे समाज सुधारक आहेत अशी प्रतिमा भाजप आणि त्याच्या राजकीय परिवारातर्फे त्यांना 'विश्वगुरू' म्हणून निर्माण केली जात आहे. त्यावर जनतेला आता कौल द्यावा लागेल. शरद पवारांनी त्यांच्या आयुष्यात दुय्यम भूमिका घेऊन कधी राजकारण केले नाही. त्यांची राजकीय ताकत कितीही असली तरी त्यांनी आपल्या टर्म वर राजकारण केले,कोणाचे मांडलिक



# महाराष्ट्राकडे सर्वांचे लक्ष

झाले नाहीत. शिवसेनेची ताकत भाजपच्या तुलनेत कितीही कमी असली तरी बाळासाहेब ठाकरे कधी दिल्ली दरबारी आले नाहीत. अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण आडवाणी यांना बाळासाहेबांना सन्मान द्यावाच लागला.


महाराष्ट्राने सत्तेच्या लढाया लढल्या आहेत. पाहिल्या आहेत पण बाजारबुणग्यांना कधी नेते केले नाही. तो चमत्कार भाजपने केला, आयाराम –गयाराम संस्कृतीला प्रतिष्ठा दिली, राजमान्यता दिली आणि राजकीय दृष्ट्या महाराष्ट्राला हरियाणाच्या पंगतीत नेऊन बसविले याबद्दल राष्ट्रीय स्तरावर कोणी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांची वाहवा करत नाही. महाराष्ट्राची जनता या निवडणुकीत याचा कसा जबाब देते याकडे देशाच्या राजकीय वर्तुळात कमालीची उत्सुकता आहे.

कुशल संघटक, रणनीतीकार, प्रशासनावर पकड असलेला, पक्षाच्या बाहेर चाहतावर्ग असलेला नेता अशी शरद पवारांची राष्ट्रीय पातळीवर ओळख आहे. त्यांच्यावर केल्या जाणाऱ्या प्रत्येक हल्ल्याने त्यांना लोकांची सहानुभूती मिळत आहे याची भाजपला जाणीव दिसत नाही. त्यांचे निवडणूक दौरे, प्रचार सभा लाईव्ह आहेत. तसेच चित्र उद्धव ठाकरे यांच्याबाबत आहे. म्हणून निवडणूकपूर्व मतदारांचा कौल विरोधी आघाडीच्या विरोधात नाही .आणि आता तर ही लढाई समसमान होत आहे. नरेंद्र मोदी यांच्या जेवढ्या सभा होतील तेवढ्या प्रमाणात विरोधी आघाडीला बळ मिळणार आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे मोदी आणि शहा हे महाराष्ट्राच्या विकासाच्या विरोधात आहेत हे लोकांना पटू लागले आहे.

शिवाजी महाराजांनी दिल्लीच्या सत्ताधीशांना महाराष्ट्रात रोखले आणि इतिहास घडविला.त्याची पुनरावृत्ती होईल काय? त्याचे उत्तर या निवडणुकीत मिळेल. महाराष्ट्राच्या प्रश्नावर, हितासाठी नरेंद्र मोदी यांच्या डोळ्याला डोळा लावून बोलण्याची हिम्मत ना मुख्यमंत्र्यांच्यात आहे ना त्यांच्या दोन उपमुख्यमंत्र्यात. कारण ते जनसामर्थ्यावर नाही तर मोदी कृपेने सत्तेत आहेत मग बोलणार कसे? संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानंतर पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या चारित्र्याचा कस या निवडणुकीत लागणार आहे..

■■■






# नरेंद्र मोदी,डाव निसटू लागला, त्रिशंकू लोकसभेकडे वाटचाल

**व्यंकटेश केसरी**

लोकसभा निवडणुकीच्या दोन टप्प्यातील मतदानानंतर भाजपच्या ताबूत चिंतेचे वातावरण पसरले आहे. राजधानी दिल्लीत आता त्रिशंकू लोकसभेच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी २६० च्या आत गुंडाळली जाईल काय. यावर आडाखे बांधले जात आहेत. बिहार,झारखंड,राजस्थान, छत्तीसगढ,हरियाणा, दिल्ली या हिंदी भाषिक राज्यात भाजपच्या जागा घटतील. उत्तर प्रदेशात माहौल कुणाचा याबद्दल कोणीही छातीठोकपणे काही बोलत नाही. भाजपचा ब्राम्हण, राजपूत, बनिया हा मतदार या राजवटीत समाधानी आहे काय. आणि नसतील तर त्यांचे मतदान कसे राहील. मतदानाचा टक्का का घटत आहे. यावरून राज्यात राम लहर नाही असा निष्कर्ष निघत आहे. दक्षिणेतील कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा,तामिळनाडू आणि केरळ यात भाजपचा अपेक्षाभंग होईल, पंजाब मध्ये फार हाती लागणार नाही, महाराष्ट्रात दणका बसेल ---असे अंदाज १८९ जागांवर झालेल्या मतदानानंतर व्यक्त होऊ लागले आहेत.

म्हणजे दक्षिण दिग्विजयाची भाषा करणाऱ्या भाजपला हिंदी भाषिक प्रदेशात होणाऱ्या जनमताच्या बदलाचा अंदाज आला नाही. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड विधानसभेच्या निवडणूका जिंकल्यानंतर, बिहार मध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जनता दलाने पुन्हा एकदा पलटी मारून भाजपशी घरोबा केल्यानंतर, उत्तर प्रदेशात मायावती (बसपा) आणि अखिलेश यादव (समाजवादी पार्टी) कमजोर पडल्यानंतर संपूर्ण उत्तर भारत आपल्या खिशात आहे, पश्चिमेतील गुजरात आपलेच आहे, महाराष्ट्रात सगळेच 'चरणदास'. झाल्याने नरेंद्र मोदी यांनी दक्षिणेची मोहीम हाती घेतली. त्यांनी त्यांचे विश्वासू, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हाती पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र सोपविला आणि अब की बार, चारसो पार असा नारा लगावला. त्यांच्या सुरात सूर मिसळून महाराष्ट्र भाजपवाल्यांनी ४८ पैकी ४५ लोकसभेच्या जागा जिंकणार म्हणून शिंग फुंकले. पण आता नरेंद मोदी यांच्यासकट सगळ्या भाजपचीच बोलती बंद झाली आहे.

नरेंद मोदी पुन्हा एकदा मूळ पदावर आले आहेत. अयोध्येतील राम मंदिर, विकसित भारत,महान भारत, लाभार्थींना वाटलेली खिरापत, ईडी,सीबीआय,इन्कम टॅक्स यांचा विरोधी नेत्यांवर केलेला वापर, हे सारे कामाला येत नाही हे लक्षात येताच त्यांनी पुन्हा हिंदू –मुस्लिम कार्ड खेळून विभाजनाचा डाव टाकला आहे. त्याच्या सोबत घराणेशाही वगैरे हे त्यांचे आवडीचे विषय आहेत. पण हे डावपेच आता बत्थड झाले आहेत. २०१४,२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ते चालले .पण शिळ्या कढीला कितीदा ऊत आणणार. या निवडणुकीचे विषय आहेत महागाई, बेरोजगारी, पाणी टंचाई, महाग होत जाणारे शिक्षण, ओस पडणारी खेडी आणि बकाल होत जाणारी शहरे,महिलांची सुरक्षा. पण त्यावर भाजपची बोलतीच बंद आहे. या प्रश्नावर गेल्या दहा वर्षात काय केले, काय दिवे लावले याबद्दल दिल्ली पासून ते गल्ली पर्यंत भाजपचा कोणताच नेता बोलत नाही कारण यावर त्यांच्याकडे सांगण्यासारखे काही नाही. आणि आता भ्रष्टाचारांना पक्षात घेऊन, आघाडीत घेऊन, त्यांना क्लीन चिट देऊन भाजपची अवस्था 'गाढव गेले आणि ब्रह्मचर्यही गेले' अशी झाली आहे.




नरेंद मोदी यांच्या प्रचार सभांतील भाषणाचा स्तर घसरत चालला आहे पण याने भाजपचा फायदा होण्यापेक्षा विरोधी पक्षांना सहानुभूती मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या जेवढ्या सभा होतील तेवढ्या प्रमाणात विरोधी पक्षांना लाभ मिळेल. सुरत आणि इंदोर लोकसभेच्या विरोधी पक्षांच्या उमेदवारांना ज्या पद्धतीने (साम, दाम, दंड, भेद वापरून) भाजपने 'म्यानेज' केले, त्यापूर्वी चंदीगड महापौरांच्या निवडणुकीत बहुमत नसताना प्रशासनचा बेकायदेशीर वापर, म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ दिल्ली मध्ये बहुमत नसताना 'आप' चे नगरसेवक फोडण्याचा जो प्रयत्न भाजप करत आहे त्यावरून सत्तेसाठी हा पक्ष, यांचे नेते कोणत्या स्तराला जातील हे देशातल्या जनतेला, प्रशासनाला कळले आहे. लोकसभेच्या निवडणुकांचे निकाल लागण्यापूर्वी करण्यात आलेली ही रंगीत तालीम आहे. महाराष्ट्रात चालू असलेला राजकीय तमाशा सारा देश पाहत आहे. नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्या भाषणातून भ्रष्टाचार हा शब्द गायब झाला आहे तर बेरोजगारी, महागाई याबद्दल बोलण्याची हिम्मत त्यांच्यात नाही.

"चारसो पार''चे पाशवी बहुमत कशासाठी तर ते भारताची घटना बदलण्यासाठी, हा मेसेज या निवडणुकीत देशात गेला.. आपण मोदीजींच्या नावाने, त्यांच्या कामाने तसेही निवडणूक जिंकणार आहोतच, मग या गर्मीत घाम कशाला काढा. या सुज्ञ विचाराने भाजपचे केडर ढिले पडले. गेल्या दहा वर्षात पक्षातल्या अनेकांना दाबून, दुखावून आपला एकछत्री अम्मल प्रस्थापित केल्याने अनेकांना मोदी आणि शहा यांची सद्दी संपावी असे वाटते. आपल्याला पंतप्रधानपदाचे फक्त दोन टर्म पाहिजे असे म्हणणारे नरेंद्र मोदी तिसऱ्या टर्म साठी आखाड्यात उतरले आहेत. ही सत्तेची लालसा कशासाठी? २००१ पासून २०१४ पर्यंत गुजरातचे मुख्यमंत्री, दहा वर्षे पंतप्रधान आणि आता पुन्हा पाच वर्षे पाहिजेत. आणि त्यासाठी कोणत्याही स्तराला जाण्याची तयारी. दिल्ली आणि झारखंडच्या मुख्यमंत्र्यांना तुरुंगांत टाकणे,. काँग्रेस मुक्त भारत. म्हणताना. विरोधी पक्ष मुक्त संसद. करण्याच्या तयारीला लागणे, प्रादेशिक पक्षांच्या मुळावर उठणे या साऱ्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. मोदींचा चेहरा थकलेला,ओढलेला दिसतोय.




अमित शहा कार्यकर्त्यात जोश आण्यासाठी आवेशात भाषणे देऊ लागले आहेत. या दोघांशिवाय भाजपकडे देशपातळीवर प्रचार करण्यासाठी तिसरा चेहरा मैदानात नाही.

भाजपची प्रचारातील भाषा संसदीय नाही तर दमदाटीची आहे. आम्हाला मतदान केले नाही तर तुमची विकासाची कामे होणार नाहीत, त्याला निधी मिळणार नाही या भाषेवर निवडणूक आयोगही काही बोलत नाही.

"आम्ही तुम्हाला मतदान केले, निवडून आणले. पण तुम्ही पक्ष बदलताना, बंड करताना आम्हाला विचारले होते काय. तुमच्यावर का विश्वास ठेवावा. " असे प्रश्न सोशल मीडियावर विचारले जात आहेत. राजकारणाचा स्तर खाली आणण्यात, गुंडगिरीच्या भाषेला प्रतिष्ठित करण्यात सध्याच्या भाजप नेत्यांचा वाटा मोठा आहे. विरोधी पक्षांची सरकार असलेल्या राज्यात राज्यपालांना मुख्यमंत्र्यांच्या विरोधात उघडपणे उचकविण्यात येते.सरकारी यंत्रणांचा वापर करून राज्य सरकारे पाडली जातात. त्याचा परिणाम म्हणून मतदारांत मतदान करण्याबद्दल अनास्था आहे, निरुत्साह आहे. बनवाबनवी करून सत्तेत आलेल्यांना सरकार चालविता येत नाही हा इतिहास फार जुना नाही. १९७०च्या दशकात गुजरात,बिहार मध्ये झालेली आंदोलने पहा. पोलिसांच्या बळावर आंदोलने दडपता येत नाहीत हाच त्याचा निष्कर्ष आहे.

जगात सर्वात मोठा पक्ष असल्याचा दावा करणारा भाजप स्वतःच्या ताकतीवर पूर्ण देशात निवडणूक लढू शकत नाही. महाराष्ट्र, बिहार, पंजाब, तामिळनाडू,आंध्र प्रदेश, कर्नाटक,केरळ या राज्यात त्याला घटक पक्षांचा टेकू लागतो, आघाड्या कराव्या लागतात. नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षाच्या राजवटीत संविधानिक संस्था निर्जीव झाल्या, पत्रकारितेची पत गेली, 'कॅग' चे नावही ऐकायला येत नाही. हे सारे लोक पाहत आहेत म्हणून चालू लोकसभा निवडणुकीचा अंदाज भल्याभल्यांना लागत नाही. भारतीय राजकारणात दर २०-२५ वर्षानंतर अशी वेळ येते ज्यावेळी नैसर्गिक परिवर्तन होत असते आणि ते राजकीय पक्ष करत नाहीत तर लोकांच्या योग्य निर्णयातून असे बदल होत असतात. त्याची चुणूक पहिल्या दोन टप्प्याच्या मतदानातून दिसली.

■■■

**१) राजकारणामध्ये महिलांना त्यांच्या नवऱ्याच्या तालावर नाचावं लागतं त्यासाठी काय?**

शरद पवार : मला असं वाटतं कर्तृत्व हे फक्त पुरुषांतच असतं असं नव्हे. कर्तृत्व दाखवायची संधी जर दिली तर मुलीसुद्धा पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कोणत्याही क्षेत्रामध्ये आपलं कर्तृत्व दाखवू शकतात. समाजामध्ये जरी मुलींना प्रोत्साहित करण्याबद्दलचा विचार सफल झाला नसला तरी नव्या पिढीने ही मानसिकता बदलली पाहिजे, बदलायचा आग्रह केला पाहिजे आणि मुलींनासुद्धा संधी मिळाली पाहिजे.

मी एक उदाहरण सांगतो मी देशाचा संरक्षण मंत्री होतो. एक दिवशी मला अमेरिकेत जावं लागलं. अमेरिकेला गेल्यानंतर एक पद्धत अशी आहे, की संरक्षण मंत्री कोणत्याही देशात जातो, त्याचं विमान उतरलं की त्याला मानवंदना दिली जाते. त्याच्यासमोर एक परेड असते. अमेरिकेत आणि मलेशियाला या दोन देशांत तुम्ही पाहिलं की मी विमानातून उतरल्यानंतर मला जो सलाम दिला तो महिला अधिकाऱ्यांनी दिला. ते झाल्यानंतर मी परत आल्यावर आमच्या आर्मी, नेव्ही, एअर फोर्स या तिघांच्या प्रमुखांची बैठक बोलावली. त्यांना मी म्हटलं की जगामध्ये मुली सैन्य दलात आहेत, हवाई दलात आहेत, आर्मीमध्ये आहेत. आपल्या देशामध्ये का नाही? तिघांनी सांगितलं, की हे शक्य नाही, मुलींना झेपणार नाही. पुन्हा एकदा बैठक बोलावली त्यांचं तिघांचं उत्तर हेच



होतं. पुन्हा एकदा एका महिन्याने मी बैठक बोलावली तरी त्यांचं उत्तर तेच होतं. ती बैठक संपताना मी त्यांना सांगितलं, की लोकांनी मला संरक्षण मंत्री म्हणून माझ्यावर जबाबदारी टाकली. मी तुमचं म्हणणं ऐकलं. या खात्याचा मंत्री म्हणून माझा निर्णय मी तुम्हाला सांगतो, की इथून पुढे आर्मी, नेव्ही, एअर फोर्समध्ये १० टक्के तरी मुली असतील आणि ते प्रमाण हळूहळू वाढवायचं. आज तुम्ही १५ ऑगस्टला बघितलं तर भारताची जी परेड असते त्या परेडचं नेतृत्व मुली करतात. एवढंच नव्हे, या देशाच्या सीमेवर रक्षण करण्यासाठी जी लढाऊ विमानं आहेत ती विमानं चालवायचे कामसुद्धा आपल्या मुली करतात. याचा अर्थ कर्तृत्व हे त्याठिकाणी आहे, संधी दिली पाहिजे व मानसिकता बदलली पाहिजे.

**२) बॉम्बे हायकोर्टचा बेंच जर पुण्यात झाला तर नवीन वकिलांना न्याय मिळेल, तसं होऊ शकतं का?**

शरद पवार : हे बेंच जर पुण्यामध्ये आलं तर अधिक लोकांना निश्चित संधी मिळेल. त्यामुळे ही पुणेकरांची आणि विशेषत: वकील लोकांची जी मागणी आहे, त्याचा पाठपुरावा आपण केला पाहिजे.

**३) लोकसभेच्या निवडणुका एप्रिलमध्ये होणार असं माहीत असतानाही एमपीएससीने २८ एप्रिल ही तारीख दिलीच कशी? एमपीएससी कोणाच्या दबावाखाली कामं करत आहे, हे समजायला मार्ग नाही.**




राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी ६ एप्रिल रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राज्यातील शिंदे सरकारसह मोदी सरकारवर टीका केली आहे. बेरोजगारी, एमपीएसची-यूपीएससीच्या तारखा, बार्टी, सारथी आणि कंत्राटी नोकर भरती आदी मुद्यांवरून पवार यांनी सरकारवर हल्ला चढविला. या कार्यक्रमात त्यांनी तरूणाईशी साधलेला संवाद....

# बेरोजगारी, पेपरफुटी, नोकर भरतीबरोबरच स्पर्धा परीक्षेसंदर्भात सरकारशी संघर्ष करु

**शरद पवार**

शरद पवार : निवडणुकीच्या तारखा निवडणूक आयोग ठरवतं. ते ठरवत असताना अपेक्षा अशी आहे की त्यांनी सगळ्या प्रश्नांचा विचार केला पाहिजे. आज विशेषतः नवी पिढी वर्ष दोन वर्षे कष्ट व अभ्यास करून स्वतःची तयारी करतात. त्यांना पुणे शहर असो, दिल्ली असो अशा काही महत्त्वाच्या शहरांमध्ये क्लासेस आणि बाकीची सुविधा असल्यामुळे जावं लागतं, ते खर्चिक असतं. घरच्यांवर ते आर्थिक ओझं असतं. पण आपला मुलगा पुढे कुठेतरी यशस्वी होईल म्हणून पालक त्रास सहन करूनसुद्धा त्याच्यासाठी हे खर्च करायची तयारी ठेवतात. अशी तयारी करून मुलं याठिकाणी आली आणि अमुक महिन्यामध्ये त्या परीक्षा येतील व त्यानंतर त्यांची सुटका होईल हा जो त्यांच्या मनात विचार असतो, नेमका



चुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाकडून ठरवला गेल्यानंतर त्या सबंधी मुलांचं जे कष्ट करून सामना करण्याची तयारी त्यांची असते ती वाया जाते असं म्हणत नाही, पण त्यांचे खर्च वाढतात, त्यांच्यामध्ये एक प्रकारचं नैराश्य येतं आणि त्यामुळे शहाणपणाने असे कार्यक्रम आखण्याची गरज आहे. आधीच अस्वस्थ असलेल्या या तरुणांना आणखी वेगळ्या दिशेला नेण्याचं काम या यंत्रणेनं करू नये, याबद्दलचा आग्रह तुमचा, माझा व सगळ्यांचा असणं आवश्यक आहे.

**४) एमपीएससी मुलींची जी शारीरिक चाचणी घेते त्याचा क्रायटेरीया अत्यंत जाचक आहे, त्याच्या तयारीसाठी वेळ वाढवून द्यावा, त्यासाठी आम्ही अनेक निवेदने दिली आहेत.**

शरद पवार : तुमची मागणी शंभर टक्के बरोबर आहे, वेळ वाढवून दिला पाहिजे. मी मगाशी आल्यापासून तुमच्या सर्वांचं ऐकतोय. याआधीसुद्धा एकदा पुण्यामध्ये काही तुमच्यापैकी मुलांनी आंदोलन केलं होतं आणि मी सहजच तिथून जात होतो, मला कळलं आणि रात्री ११ वाजता मी तिथे थांबलो. त्यानंतर राज्य सरकारशी काही वाटाघाटी केल्या, काही बैठका केल्या, काही प्रश्न सुटले. पण अजुनही तुमची परिस्थिती पाहिल्यानंतर एक गोष्ट अतिशय गंभीर मला दिसते. अतिशय कष्ट करून पालक तुम्हाला उद्याच्या भवितव्यासाठी इथं पाठवतात, तुम्ही इथं राहता व कष्ट करता, तयारी करता आणि या सगळ्या गोष्टींसाठी जी यंत्रणा आहे तिचा दृष्टीकोन शहाणपणाचा नाही. उदाहरणार्थ वाचायला असं मिळतं पेपर फुटले. पेपर फुटणं ही काय गंमत आहे? या मुलांनी स्वतःची तयारी केली आणि त्यांचे पेपर कष्टाने त्यांनी लिहिले व त्यामध्ये काही गडबड झाल्याने ती परीक्षा रद्द होते. त्यामुळे परीक्षा पुन्हा घ्यावी लागते हा सगळा उद्योग जो काही चालला आहे तो अतिशय चुकीचा आहे. म्हणून मला स्वतःला असं वाटतं की आम्ही जेव्हा अनेक क्षेत्रात काम करतो ते आता केवळ हे जे तुमच्यासारखे विद्यार्थी आहेत आणि ते अस्वस्थ आहेत त्यांच्या प्रश्नांत लक्ष घालण्यासाठी एखादी स्वतंत्र यंत्रणा, ज्याला मुलांचा साथ आहे ती आपण निर्माण करण्याची आवश्यकता आहे, इथं राजकारण आणायचं नाही. फक्त ज्या मुलांची निवडीसंदर्भात सरकारकडून चुकीच्या गोष्टी केल्या गेल्या त्याविरुद्ध आवाज उठवणं, त्या मुलांची त्यातून सुटका करून घेणं यासाठी एक व्यवस्था करावी लागेल. माझा स्वतःचा हा आग्रह राहील की या निवडणुका संपूद्या. त्यानंतर या कामासाठी आपण स्वतंत्र बसू, यंत्रणा करू आणि कायमचं यातून कशी तुमची सुटका होईल, याची काळजी घेऊ.

आता आचारसंहिता असल्यामुळे राज्य सरकार काही करणार नाही, पण राज्यपाल करू शकतात. हा जो तुम्ही वेळ वाढवण्यासंबंधी तुमचं जे मागणं आहे हे लेखी जर तुम्ही दिलं तर त्याची प्रत मी स्वतः राज्यपालांकडे पाठवतो.

**५) सरकारने ३१ डिसेंबरपर्यंत भरती करण्याचं सांगितलं होतं. सर्वांना संधी मिळेल असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं होतं. आम्हाला फक्त तुमच्याकडून अपेक्षा आहे, आम्ही आईला काय सांगायचं?**

शरद पवार : हा प्रश्न नव्या पिढीमध्ये अतिशय अस्वस्थता, नैराश्य निर्माण करणारा आहे. तरुण पिढी निराश असेल तर ते देशाचं आणि समाजाचं नुकसान आहे. म्हणून नैराश्येतून तरुण पिढी बाहेर काढायची असेल तर भवितव्याचा विचार करण्यासाठी जे तरुण कष्ट करतात त्यांच्या रस्त्यातील हे अडथळे दूर केले पाहिजेत. ते करण्यासाठी राज्य किंवा केंद्र सरकार काही समंजसपणाची भूमिका घेत नसेल तर लोकशाहीच्या मार्गाने प्रश्न सोडवून घेण्यासाठी जे काही पर्याय

आहेत ते पर्याय घेऊन वेळप्रसंगी आपल्याला संघर्षाला उतरावं लागेल, त्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

**६) वय बसत नाही म्हणून दीड लाख विद्यार्थी भरतीपासून वंचित आहेत. देवेंद्र फडणवीस यांना याबद्दल अनेकदा पत्र दिले आहेत.**

शरद पवार : गंमत अशी आहे की, राजस्थान सरकारने वयासंबंधी एक वेगळा विचार घेतला. राजस्थान सरकार जर वय वाढवून देऊ शकतं तर महाराष्ट्र सरकार का देऊ शकत नाही? त्यासाठी तो आग्रह आपल्याला करावा लागेल. निवडणुकीची प्रक्रिया संपल्यानंतर या कामासाठी तुमच्याबरोबर एकत्र बसण्याची माझी तयारी आहे. सगळे प्रश्न सुटतील असं मी म्हणत नाही पण आपण प्रयत्न करू . जिथं अन्याय होतो तिथं





आपला आग्रह सरकारच्यापुढं मांडू आणि आपली सुटका करून घेऊ.

**७) सरळ सेवा परीक्षांचे पेपर फुटले आहेत व फडणवीस साहेब म्हणतात आम्हाला पुरावे द्या. तुम्ही तिकडे का बसले आहात? जमत नसेल तर राजीनामा द्या. सर्व परीक्षा या एमपीएससीकडे गेल्या पाहिजेत.**

शरद पवार : इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायजेशन नावाची एक जागतिक संघटना आहे, भारत त्याचा सभासद आहे. त्यांचा २०२४ चा अहवाल प्रसिद्ध झाला. त्या अहवालात त्यांनी असं सांगितलं की भारत हा असा देश आहे की इथे जे बेकार आहेत त्यांच्यामध्ये ८३ टक्के बेकार हे युवक व तरुण आहेत. केंद्र सरकारने विशेषत: नरेंद्र मोदींनी एक आश्वासन दिलं होतं की आम्ही दरवर्षी २ कोटी नोकऱ्या तयार करू. पण गेल्या दहा वर्षांमध्ये किती नोकऱ्या तयार केल्या? याचे आकडे आम्ही पार्लमेंटमधून मागवले तर केंद्र सरकारने आश्वासन दिल्यानुसार २ कोटीनुसार १० वर्षांत म्हणजे वीस कोटी नोकऱ्या तयार व्हायला हव्या होत्या. पण गेल्या ९ वर्षांमध्ये प्रत्यक्ष नोकऱ्या तयार किती झाल्या? ७ लक्ष २२ हजार लोकांना रोजगार मिळाला. याचा अर्थ २० कोटींच्या ऐवजी ७ लक्ष मुलांना हा रोजगार मिळाला. याचा अर्थ रोजगार निर्मितीच्या कामामध्ये दिलेलं आश्वासन केंद्र सरकारने पाळलेलं नाही, यासाठी आपल्याला जागृत राहावं लागेल. त्यासाठी तुमचे काही प्रश्न जे आहेत त्याचा विचार हा करावा लागेल.

एक तर असं आहे की ही भरती कशी करायची, यामध्ये शासकीय नोकरभरती ही एमपीएससीच्या मार्फत झालीच पाहिजे, याची अतिशय गरज आहे. त्यानंतर जुन्या अभ्यासानुसार लाखो विद्यार्थ्यांची शेवटची परीक्षा असल्यामुळे राज्यसेवा २०२४ च्या परीक्षेसाठी किमान २ हजार पदापर्यंत जागा वाढवल्या पाहिजेत. शासकीय नोकर भरतीमध्ये होणारा भ्रष्टाचार आणि पेपरफुटी याच्यावर नवीन कडक कायदा करावा व ते करून यावर नियंत्रण करण्याची गरज आहे. नोकर भरतीसाठी जी फी आकारली जाते ती कमी करण्याची आवश्यकता आहे. कंत्राटी पद्धतीने पद भरण्याची पद्धत बंद केली पाहिजे व कायमस्वरूपी तत्वावर शासनाने ही सगळी पदे भरली पाहिजे. रखडलेल्या शासकीय पदभरतीची जी प्रक्रिया आहे तिला गती द्यायची गरज आहे. ज्या संस्था आपण काढल्या. उदाहरणार्थ सारथी, बार्टी, महाज्योती, अमृत या सगळ्या संस्थांना शक्तीशाली केलं पाहिजे, त्याला हजारो कोटी रुपये सरकारने पुरवले पाहिजेत. त्यामार्फत विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली पाहिजे.

बेरोजगार तरुण खूप वेळेला बँकेचे कर्ज काढतात. त्या कर्जावर जो व्याज आहे, कमीत कमी ती व्याजमाफी तरी केंद्र सरकारने केली पाहिजे. त्याशिवाय जेवढ्या सरकारच्या नियुक्त्या बऱ्याच दिवसांपासून पेंडिंग आहेत त्या तातडीने भरल्या पाहिजेत. महाराष्ट्रामध्ये उद्योग वाढवले पाहिजेत. नोकरी ही फक्त सरकार देतं, पण तेवढं पुरेसं नाही. उद्योग वाढवले पाहिजेत, कारखानदारी वाढवली पाहिजे. एकेकाळी पुणे शहर हे उद्योगाच्या बाबतीत महत्त्वाचं शहर होतं, त्यामुळे इन्फ्रास्ट्रक्चर देऊन आयटी उभारणी करण्याचे काम करण्याची आवश्यकता आहे. ही जी अस्वस्थ असलेली तरुण पिढी आहे, त्यांची अस्वस्थता जाईल यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. या प्रश्नांवर आपण सामुदायिकपणाने एकत्र राहून पाऊल टाकू. मी तुमच्याबरोबर आहे.



# भारतीय अर्थव्यवस्थेचे भले, बुरे आणि वस्तुस्थिती

## मोदींचे अर्थकारण काही निवडकांचेच भले करणारे


-निखील इनामदार
बीबीसी, बिझनेस प्रतिनिधी, भारत



''इंग्लंडला मागे सारून भारतीय अर्थव्यवस्था आज साऱ्या जगात पाचव्या क्रमांकावर पोहोचली आहे. येत्या तीन वर्षांत ती तिसऱ्या नंबरवर झेप घेईल तर २०४७ पर्यंत म्हणजे जेमतेम सव्वादोन दशकांत आपण विकसीत देशांच्या मांडीला मांडी लावून बसू'' ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सत्ताधारी भाजपप्रणीत आघाडीची घोषणा आहे. पण यात सत्य किती, स्वप्न किती अन् तथ्य किती?

दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीमध्ये लाल किल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण ऐकायला हजारो लोकांनी गर्दी केली होती. त्यांचा संदेश होता, ''विकसीत भारत २०४७. भारताला २०४७ सालपर्यंत जगातील विकसीत देशांच्या रांगेत नेऊन ठेवण्याचे आश्वासन चटपटीत मथळे आणि घोषणा यांच्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या या माणसाकडून केली गेलेली आणखीन एक ताजी चटपटीत घोषणा!

खरं तर 'विकसीत भारत' ही शपथ तशी अस्पष्ट आहे, एक संदिग्ध व्याख्या. दहा वर्षांपूर्वी सत्ता हस्तगत केल्यापासून मोदी अर्थव्यवस्थेच्या उड्डाणासाठी पायाभरणी करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांच्या हाती आलेली अर्थव्यवस्था आर्थिक संकटाच्या खाईच्या तोंडावर होती. विकास मंदावला होता तर गुंतवणूकदारांचा विश्वासही उतरला होता. डझनावार अब्जाधीशांची दिवाळखोरी निघाल्यामुळे बँकांवर वसुली न होणाऱ्या कर्जांचे प्रचंड बोझे वाढून कर्ज देण्याच्या त्यांच्या क्षमतांना खिळ बसली होती.

आज दहा वर्षांनंतर भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या वेगाने इतर महत्त्वाच्या सर्व देशांना मागे टाकले आहे. बँका सुदृढ झाल्या आहेत तर जागतिक महामारीच्या दुष्ट चक्राला तोंड देऊनही सरकारचे उत्पन्न स्थिरावले आहे. गेल्या वर्षी इंग्लंडला (यु.के.) मागे सारून भारताने जगातल्या पाचव्या सर्वाधिक मोठ्या अर्थव्यवस्थेचा बहुमान पटकावला आहे तर 'मॉर्गन स्टॅन्ली'च्या तज्ज्ञांच्या विश्लेषणानुसार २०२७ सालापर्यंत जपान आणि जर्मनीला मागे टाकून भारत जगातल्या तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल.


देशात आज निश्चितपणे आशावादाची हवा आहे. जी-२० च्या परिषदेचे यशस्वी आयोजन, चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ चंद्रयानांचे सर्वप्रथम अवतरण आणि काही डझन नवोन्मेषी कल्पक उत्पादकांना (युनिकॉर्न) जन्म हेही देशाने घडवून आणले आहे.

देशाचे शेअर बाजार तेजीत आहेत आणि त्याचा (अप्रत्यक्ष) परिणाम मध्यमवर्गीयांच्या संपत्तीत वाढ झालेली दिसण्यामध्येही झाला आहे. वरवर सकृतदर्शनी पाहता 'मोदीनॉमिक्स' म्हणजेच (मोदी आणि) सत्तारुढ भारतीय जनता पक्षाच्या आर्थिक दृष्टीकोनाचा योग्य परिणाम होत असल्यासारखे वाटते (तरी) आहे.


**पण जरा खोलवर जाऊन पाहा आणि मग प्रत्यक्षातले चित्र बरेच गुंतागुंतीचे असल्याचेच लक्षात येईल. खरोखर पाहता सध्या जगण्याच्या जेमतेम काठावरच वावरत असलेल्या या देशाच्या १४० कोटी लोकांसाठी तरी ही आर्थिक भरभराटीची वेळ अजून तरी येऊन ठेपलेली नाही. मग या 'मोदीनॉमिक्स'चे विजेते कोण आणि हरणारे तरी कोण कोण आहेत?**

**(आलेख १) : भारत व इंग्लंड (यु.के.) यांचे देशांतर्गत ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न)**

सर्व आकडे अमेरिकन डॉलर्समध्ये (अब्ज)



**आलेख २ : जागतिक अंकिय अदायगीच्या (डिजिटल पेमेंट) विकासात भारत अग्रस्थानी**




## ‘डिजिटल क्रांती’!

मोदींकडून चालना देण्यात आलेल्या ‘अंकीय प्रशासन’ म्हणजेच डिजिटल गव्हर्नन्स’मुळे देशातील तळागाळातल्यापैकी काही जनतेच्या आयुष्यात बदल घडायला सुरुवात झाली आहे. आज देशाच्या अगदी दुर्गम कोपऱ्यात नागरिकही त्यांच्या फोनवरून क्युआर कोड वापरून आणि रोख पैसे न देता वीस रुपयांइतक्या कमी रकमेपासून (ब्रेडचे एक पॅकेट) अनेक गोष्टी खरेदी करू शकतात.

या अंकीय क्रांतीच्या पाठीमागे एक त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली आहे, ज्यामध्ये, सार्वत्रिक ओळखपत्रे (युनिव्हर्सल आयडेंटी कार्डस्) बटन दाबून पैसे हस्तांतरित करण्याची अदायगी व्यवस्था आणि कर विवरण पत्रांसारख्या महत्त्वाच्या वैय्यक्तिक दस्तावेजात प्रवेश करणारा आकडेवारीचा स्तंभ आहे. या अंकीय रचनेला (डेटा स्टॅक्ट) कोट्यावधी बँक खात्यांची जोडणी केल्यामुळे लालफित आणि भ्रष्टाचार यांना आळा बसला आहे. काही अंदाजांनुसार २०२१ मार्च पर्यंत या अंकीय प्रशासनामुळे देशाच्या ढोबळ देशांतर्गत उत्पन्नाच्या १.१ टक्के इतकी बचत झाली की ज्यामुळे सरकारला मोठ्या अर्थसंकल्पीय तुटीचा अवलंब न करताही अनेक सामाजिक सवलती तसेच रोख मदती देता आल्या आणि पायाभूत सोयीसुविधांच्या उभारणीवरही खर्च करता आला.



## बघाल तिथे क्रेन आणि बांधकाम यंत्रे !

आज भारतात तुम्ही जिथे जिथे जाल तिथे मोठमोठ्या क्रेनस् आणि अवजड बांधकाम यंत्रे धडधडताना आणि देशाच्या (आधीच्या) सार्वजनिक पायाभूत सोयीसुविधांना आधुनिक झळाझते रूप देताना दिसतील. अगदी पूर्व भारतातील कलकत्त्याच्या देशातील पहिल्या नदीखालून बांधलेल्या सफाईदार मेट्रो लाईनकडेच बघा ना! या देशाचा चेहरामोहरा सुधारतो आहे, हे नक्की!




कलकत्ता शहरातील नदीखालची मेट्रो

नवे रस्ते, विमानतळ, बंदरे आणि मेट्रो रेल्वे बांधणे हा तर मोदी यांच्या आर्थिक धोरणांचा आधारस्तंभ आहे. गेली तीन वर्षे पायाभूत सोयीसुविधांच्या बांधणीसाठी त्यांनी दरवर्षी ८ हजार कोटी रुपयांहून अधिक भांडवली खर्च केला आहे.

२०१४ ते २०२४ च्या दरम्यान, त्या आधीच्या दशकाच्या दुप्पट म्हणजे जवळजवळ ५४ हजार किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग बांधले गेले. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला गेली अनेक दशके मारक ठरणारी नोकरशाहीसुद्धा सरकारने बऱ्याच प्रमाणात सुलभ केली आहे. पण मोदींच्या धोरणांचा फायदा काही सर्वांनाच झाला नाही!


## आर्थिक धोरणांचा फायदा सर्वांना नाही!

जागतिक महामारीच्या (कोविड-१९) काळात कठोरपणे लादलेला 'लॉकडाऊन', २०१६ सालच्या 'नोटबंदी'च्या निर्णयाचे अजुनही जाणवणारे चटके आणि देशाच्या भरमसाठ अप्रत्यक्ष करांच्या सुलभीकरणासाठी फार पूर्वीपासून आवश्यक असलेल्या नव्या 'वस्तु व सेवा करां'ची (गुडस् अॅन्ड सर्व्हिसेस टॅक्स : जीएसटी) चुकीची हाताळणी या सगळ्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या रचनेवरच दूरगामी दुष्परिणाम झाले आहेत.



**(आलेख ३ : केंद्र सरकारचा भांडवली खर्च)**

सर्व आकडे डॉलर्समध्ये (संदर्भ : भारताचे अर्थसंकल्प)



(कोविड -१९ लॉकडाऊनमध्ये सर्वात वाईट हाल झाले ते स्थलांतरित कामगारांचे!) सरकारच्या या निर्णयाचा फटका देशातील प्रचंड असंघटित वर्ग आणि अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या लघु व छोट्या उद्योगांना बसला, ज्याचे परिणाम ते आजही सहन करत आहेत.


## मोठ्या खाजगी गुंतवणूकी नाहीत!

आज खाजगी क्षेत्राचा कल मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याकडे अजिबात नाही. २००७-०८ साली ढोबळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या २७.५ टक्के इतक्या मोठ्या प्रमाणात असलेल्या खाजगी क्षेत्रातील गुंतवणूकीचे प्रमाण २०२०-२१ मध्ये जेमतेम १९.६ टक्के इतके पार खाली घसरले आहे.

## रोजगारांची कर्मकहाणी !

रोजगारनिर्मिती आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या हालअपेष्टा, त्यांना सोसाव्या लागणाऱ्या कळा आणि त्यांच्या कुटुंबियांची दारूण अवस्था यांची कहाणी मात्र अत्यंत करूण आहे. इस्त्राईलमधील बांधकाम क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधीसाठी ऐन जानेवारी महिन्यामध्ये हजारो कामगार आशा-अपेक्षेने हाडांना बोचणाऱ्या थंडीतही रांगा लावून उभे होते.

**(आलेख ४ : भारतीय कामगार सहभागाचे प्रमाण)**






उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथील इस्त्राईलच्या रोजगार केंद्रावर हजारोंची गर्दी उसळली होती. या कामगारांच्या चेहऱ्यांवर उमटलेले आतूरता, नैराश्य आणि अगतिकतेचे भावच या गोष्टीची खात्री पटवून देत होते की, भारतामध्ये खरंच रोजगारीची समस्या बिकट आहे. अगदी खरीखुरी कहाणी.

देशात सगळीकडेच ही परिस्थिती आहे. मिरज शहरातल्या सकिया बेपारी या २३ वर्षीय तरुणीची करुण कहाणी प्रातिनिधीक आहे. 'मास्टर्स' ही पदव्युत्तर पदवी घेतलेली ती आमच्या कुटुंबातील पहिलीच. सकीया म्हणते, ''पण आमच्या इथे उद्योग-कारखानदारी नाही, त्यामुळे मला तरिही नोकरी नाहीच. मग मी शिकवण्या घेते. पण त्यात फार

उत्पन्न मिळत नाही.' सकीया काय आणि तिचा भाऊ काय कुणालाच गेली दोन वर्षे पूर्ण वेळ अशी नोकरीच नाही आणि हे काही देशातले एकमेव उदाहरण नाही! आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आय.एल.ओ.) ताज्या आकडेवारीनुसार सर्व बेरोजगारांमधली सुशिक्षीत बेरोजगारांची टक्केवारी २००० सालच्या ५४.२ टक्क्यांपासून २०२२ मध्ये ६५.७ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. विकास अर्थशास्त्रज्ञ जीनड्रेझ यांनी गोळ्या केलेल्या आकडेवारीनुसार भारतामध्ये २०१४ पासून म्हणजे गेली १० वर्षे वास्तव रोजगारामध्येही वाढ झालेली नाही.

## लोकसंख्या विशेषाचे फायदे जाणार?

''भारतामध्ये तरुणांची संख्या जास्त आहे. रोजगारक्षम वयातील लोकसंख्येचे ज्यादा प्रमाण या लोकसंख्या विशेषाचे फायदे गमावण्याचा मोठा धोखा भारतासमोर असल्याचे'' जागतिक बँकेतील अर्थतज्ज्ञांचे मत आहे. रोजगारनिर्मितीची समस्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सोडवता आलेली नाही.

## 'मेक इन इंडिया' - धूसरच!

२०१४ मध्ये सत्तेवर आल्यावर लगेचच पंतप्रधान मोदी यांनी त्यांची महत्त्वाकांक्षी मोहिम 'मेक इन इंडिया' ही जी घेतली; हेतू होता भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्याचा! त्यासाठी २०२० मध्ये त्यांच्या सरकारने भारताच्या उत्पादनक्षमतेचा विकास करण्याकरिता सेमी-कंडक्टर के मोबाईल-इलेक्ट्रॉनिक्सपर्यंत सर्वच क्षेत्रातील कंपन्यांसाठी जवळजवळ २००० अब्ज रुपयांपर्यंत सवलतींची बरसातही केली.


## पण यशाने मात्र पाठ फिरवली!

एक गोष्ट खरी, की ॲपलसाठी 'आयफोन बनवणाऱ्या फॉक्सकॉनसारख्या कंपन्या त्यांच्या चीन अधिक एक (चायना + 1) या धोरणांतर्गत उत्पादनाच्या विस्तृतीकरणासाठी त्याच्या पुरवठा-साखळ्या भारतात आणत आहेत. इतर 'मायक्रॉन' आणि 'सॅमसंग' सारख्या जागतिक महाकाय कंपन्या गुंतवणूकीमध्ये उत्सुकता दाखवत आहेत पण त्याला आकड्यांची जोड अद्याप मिळालेली नाही.




(आलेख ५ : भारताची उत्पादन व निर्यात वाढ!)

सर्व मूल्ये अमेरिकन डॉलर्समध्ये (निळा-काँग्रेस आघाडी, भगवा-भाजपा आघाडी)



एवढे सगळे प्रयत्न करूनही गेली दहा वर्षे उत्पादनक्षेत्राचे राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नातील प्रमाण काही वाढलेले नाही!

## उत्पादन : चीनला गाठणे अवघड !

निर्यातवाढीचा वेग मोदी सरकारपेक्षा आधिच्या मनमोहनसिंगच्या काळातच जास्त होता. 'ग्रेट लेक्स इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट'च्या प्राध्यापक विद्या महांबरे यांच्या म्हणण्यानुसार ''जरी २०५० पर्यंत भारताचे उत्पादन वर्षाला ८ टक्क्यांनी वाढले आणि चीनचे २०२२ च्याच पातळीवर कुंठीत राहिले तरीही भारताचे २०५० मधील उत्पादन चीनच्या २०२२ मधील उत्पादनाच्या पातळीला गाठू शकणार नाही.''

मोठ्या प्रमाणातील उद्योगांचा अभाव म्हणजेच भारतातील निम्म्या लोकसंख्येच्या लोकांना शेतीवर अवलंबून राहावे लागते आणि शेती तर वाढत्या प्रमाणात नुकसानीत जाते आहे.


## गृहखर्चाला कात्री - दुहेरी पेच !

या परिस्थितीचा एक थेट परिणाम म्हणजे गृहखर्चाला लागणारी कात्री आणि देशातील वैयक्तिक कुटुंबांच्या अर्थसंकल्पात होणारी काटछाट.

लोक वस्तु खरेदीवर करणारा खर्च म्हणजेच देशातील समग्र वैय्यक्तिक वापरातील खर्च हा जेमतेम ३ टक्के वेगाने वाढतो आहे. ही वाढ गेल्या २० वर्षांमध्ये सर्वात कमी आहे.

**(आलेख ६ : ब्रिक्स देशांचे दरडोई राष्ट्रीय उत्पन्न)**

सर्व आकडे अमेरिकन डॉलर्समध्ये (संदर्भ : जागतिक बँक)




एका नव्या संशोधनानुसार घरगुती कर्जाचे प्रमाण आत्यापर्यंत सर्वाधिक वाढले आहे तर त्याच वेळी आर्थिक बचतीची पातळी सगळ्यात खाली गेली आहे.

## धनवान अधिक श्रीमंत, गरीब गरीबच!

अनेक अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे की, महामारीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास हा इंग्रजी 'K' या अक्षराप्रमाणे म्हणजे असंतुलित राहिला आहे. म्हणजेच देशातील श्रीमंत वर्गाची श्रीमंती आणखी वाढली आहे तर गरीब आणखी गरीब होत आहे. एकूण उत्पनाचा विचार करता भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा देश असेलही परंतु वैय्यक्तिक पातळीवर दरडोई उत्पन्नाचा विचार केला तर भारत पार तळाला म्हणजे १४० क्रमांकावर खिळून आहे.

जागतिक विषमता आकडेवारीप्रमाणे –

भारतामधील ही (आर्थिक) विषमता गेल्या १०० वर्षांमधील सर्वात जास्त इतकी वाढते आहे. त्यामुळेच सध्याच्या निवडणूक प्रचार व आश्वासनांमधील रणधुमाळी ही संपत्तीचे फेरवाटप आणि वारसा हक्क करांच्या भोवतीच माजून राहिली आहे.

भारतीय अब्जाधीश मुकेश अंबानी यांच्या मुलीच्या विवाहपूर्व सोहळ्यामधील धमाल देशाच्या नव्या सुवर्णगटाची कल्पना देते. उपस्थितांमध्ये होते, मार्क झुकरबर्ग, बिल गेटस् आणि इव्हेन्का ट्रम्प. बॉलिवुडमधील सर्वात विख्यात हिंदी



चित्रपटसृष्टीतील कलाकारांबरोबर रेहानाच्या नृत्याचे आकर्षण होते तर मुघल सम्राटांना लाजवेल अशा दागदागिन्यांमध्ये अंबानी खानदानातील स्त्रिया वावरत होत्या.

गोल्डमन झॅक्स इथे भारतातील कंन्झुमर ब्रँडचा अभ्यास करणारे संशोधक अर्णब मित्रा यांच्या अभ्यासानुसार भारतातील मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी उत्पादने तयार करणाऱ्या कंपन्यांपेक्षाही आलिशान कार, मूल्यवान घड्याळे आणि उंची मद्ये बनविणाऱ्या कंपन्यांच्या वाढी अधिक वेगवान आहेत.

न्युयॉर्क विद्यापीठाचे प्राध्यापक विरल आचार्य यांच्या अभ्यासाप्रमाणे छोट्या छोट्या कंपन्यांचा घात करून काही थोड्या महा-कंपन्या आणखीनच मोठ्या झाल्या आहेत. मोठ्या कर कपातीचा फायदा महा-श्रीमंतांना झाला आहे. तर 'राष्ट्रीय पटू' निर्माण करण्याच्या जाणीवपूर्वक धोरणामध्ये थोड्या निवडलेल्या कंपन्यांना बंदरे आणि विमानतळांसारखी महत्वपूर्ण सार्वजनिक मालमत्ता बांधायला किंवा चालवायला दिली आहे. न्यायालयात नुकत्याच उघड झालेल्या बाबींनुसार त्यांच्यापैकी बऱ्याच सत्तारूढ भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक मोठ्या राजकीय देणग्या देणाऱ्यांपैकी आहेत !

## भारताचे दशक?

या सर्व बाबींचा विचार करता भारतीय अर्थव्यवस्थेचे सातत्यहीन उभे राहते. मॉर्गन स्टॅन्लेच्या विश्लेषकांनी प्रसिद्ध केलेल्या बहुचर्चित लेखाप्रमाणे हे प्रश्न अजूनही भारत उड्डाणासाठी रनवेवर तयार असून पुढचे दशक हे चीनच्या २००७ ते २०१२ या कालावधीतील (अतिविकासाच्या) सारखेच असू शकते.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणे तरुण लोकसंख्या, चीनमधून (धोक्यामुळे) बाहेर पडण्याचे जागतिक राजकारण, बांधकाम क्षेत्राचे सुलभीकरण असे अनेक फायदे भारतामध्ये आहेत. तसेच डिजिटायझेशन, स्वच्छ उर्जेकडे प्रवास, जागतिक ऑफ शोअरिंग यामुळेही भावी विकासाला गती मिळेल. मुलभूत सुविधांवर दिलेला भर दीर्घकालीन फायदा देईल. 'क्रिसिल'चे भारत विषयक सल्लागार डी. के. जोशी यांच्या म्हणण्याप्रमाणे रस्ते, वीज पुरवठा व बंदरातील वेळ वाचवणे यामध्ये गुंतवणूक करून भारत शेवटी उत्पादन वाढेल असे वातावरण निर्माण करत आहे.



## मानवी भांडवल हवे - डॉ. राजन !

परंतु रिझर्व्ह बँकेचे माजी गर्व्हनर डॉ. रघुराम राजन एक धोक्याचा इशारा देतात. ते म्हणतात, ''भांडवली मालमत्ता



निर्मितीवर लक्ष केंद्रित करतानाच मोदी यांनी 'मानवी भांडवल' (ह्युमन कॅपिटल) तयार करण्यावरही लक्ष द्यायला हवे. कृत्रिम बुद्धीमत्तेचे आव्हान स्विकारण्यासाठी आवश्यक ते भारतीय मुलांना शिकवले जात नाही. 'प्रथम फाऊंडेशन' च्या वृत्तांतानुसार १४ ते १८ वयोगटांपैकी एक चतुर्थांश मुलांना साधा मजकूरही न अडखळता वाचता येत नाही. कोविड-१९ महामारीने मुलांचे फार मोठे नुकसान केले. ती जवळजवळ दोन वर्षे शाळेत जाऊ शकली नाहीत. पण सरकार शिक्षण आणि आरोग्यासाठी कमी पैसे देणे चालूच ठेवते आहे.

'मोदीनॉमिक्स'ने (मोदींचे अर्थकारण) पहिल्या दशकामध्ये काही निवडकांचे भले केल्याचे दिसते आहे. पण बऱ्याचजणांच्या मते हा पेला अजून 'अर्धाच भरलेला' वाटतो आहे. शेवटी डॉ. राजन यांच्या म्हणण्याप्रमाणे ''जर विकास हा अधिक वेगाने आणि अधिक समानतेने झाला नाही तर, आपण श्रीमंत होण्याआधी म्हातारे नक्कीच होऊ.''

■■■

# जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानाने निर्मित भारतीय केळीच्या लोकप्रिय जाती आता आपल्या करीता उपलब्ध



- वेगवेगळ्या टप्प्यावर व्हायरस इंडेक्सींग करून अस्सल, रोगमुक्त व दर्जेदार रोपे निर्मित करणारी जैन टिश्यूकल्चर ही एकमेव कंपनी आहे.
- जैन टिश्यूकल्चर केळींच्या रोपांची निर्मिती रोगमुक्त, उत्कृष्ट, उच्चतम गुणवत्ता व निवडक मातृवृक्षापासून केली जाते.
- वातावरण नियंत्रित ग्रीनहाऊस व पॉलीहाऊस मध्ये शास्त्रोक्त पद्धतीने हार्डनिंग करणारी एकमेव कंपनी.
- जैन टिश्यूकल्चरच्या रोपांची वाढ पोषक तत्वांनीयुक्त असणाऱ्या, निर्जंतुक व विशेषरित्या आयात केलेल्या मातीविरहीत मिडीयामध्ये होते. अशा रितीने वाढ झालेल्या रोपांमध्ये मातीतून पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव होत नाही व रोपे रोगमुक्त असण्याची खात्री असते.
- जैन टिश्यूकल्चर रोपांचा पुरवठा रूट ट्रेनर ट्रे मधून केला जातो, त्यामुळे मुळांचा विकास व वाढ योग्यरित्या होते व हाताळणी करतांना मुळांना नुकसान होत नाही.
- जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानानेच शेतामध्ये रोपांची झिरो-डे सेटींगची खात्री.
- जैन टिश्यूकल्चर केळीची रोपे म्हणजे विक्रमी उत्पादनाची हमी.
- जैन टिश्यूकल्चर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार एकात्मिक पॅकेज प्रदान करून त्यांना हायटेक लागवड पद्धती, अत्याधुनिक सुक्ष्म सिंचन, त्यातून खते देण्याच्या तंत्रज्ञानाचे वैज्ञानिकदृष्ट्या मार्गदर्शन करते.

- जैन टिश्यूकल्चर ग्रँडनैन जातीच्या केळीची रोपे निर्मित करणारी जगातील नंबर १ ची कंपनी आहे.
- जैन टिश्यूकल्चरच्या केळी रोपांना १९९४ पासून शेतकऱ्यांची पहिली पसंती.
- या वर्षी जैन टिश्यूकल्चर ग्रँडनैन जातीच्या ९.५ कोटी केळी रोपांची लागवड करून शेतकऱ्यांनी उच्चांकी उत्पादन घेतले आहे.
- शेतकऱ्यांच्या वाढत्या मागणीनुसार आता पूवन, इलाकी, रेड बनाना, नेन्द्रन, सुपर नेन्द्रन व बन्थल या लोकप्रिय भारतीय जातींचे जैन टिश्यूकल्चर केळी रोपे उपलब्ध.
- सदैव वाढणाऱ्या जैन टिश्यूकल्चर कुटुंबात त्वरित सामील होऊन फायदा घ्या.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| **जैन टिश्यूकल्चर - इलाकी रूपये २०/रोप** | **जैन टिश्यूकल्चर - पूवन रूपये १६/रोप** | **जैन टिश्यूकल्चर - बन्थल/ मोन्थन रूपये २०/रोप** | **जैन टिश्यूकल्चर - नेन्द्रन रूपये १८/रोप** | **जैन टिश्यूकल्चर - रेड बनाना रूपये २०/रोप** |

**त्वरित बुकिंग करा व निराशा टाळा**

जैन टिश्यूकल्चर
अधिक उत्पादन – अधिकाधिक नफा.

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
*कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®*

जैन हाईटेक प्लॅन्ट फॅक्टरी
अधिक उत्पादन – अधिक नफा.

**वाहतूक खर्च वेगळा लागेल.**

**# बुकिंगसाठी संपर्क: (महाराष्ट्र) अकलूज:** ९४२२७७४९३७; **चोपडा:** ९४२२७७3394, **जळगाव:** ९४२२७७६७१८, ९४२२७७६७४८, ९४०४९५५३१७,९४२२७७३७६८ **अंजनगाव सुर्जी:** ९४२२७७५९२८; **मालेगाव:** ९४०३०८०१३८; **नांदेड:** ९४०३६९५८९३, ९४०३६९५८४६; **नंदुरबार:** ९४२२७७४३७५; **मुक्ताईनगर:** ९४०३६९५९०८; **पुणे:** ९४२२७७४९३३; **रावेर:** ९४२२७७४९३१; **टेंभूर्णी:** ९४२२७७४९३२; **सांगली:** ९४०३०८०१७२, **कोकण व गोवा:** ९४२२७७४९३१, ९८७०९९०७५४, ९४२२७७४९३३; ९४२२७७३७६८,

**टिप - जैन टिश्यूकल्चर केळी रोप रोगमुक्त असली तरी शेतात लागवड केल्यानंतर त्यावर रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे रोगांच्या प्रादुर्भावाची व त्यानंतर येणाऱ्या उत्पादनाची हमी कंपनी घेऊ शकत नाही.**



# औरंगजेबाप्रमाणे महाराष्ट्रात मोदी, शहा यांच्या स्वाऱ्या

**संजय राऊत**

**काही भटके-वखवखते आत्मे महाराष्ट्राचे लचके तोडण्यासाठी किंवा महाराष्ट्राला कमजोर करण्यासाठी महाराष्ट्राच्या आभाळात फडफडत आहेत महाराष्ट्राच्या हक्काचे अधिकाराचे लचके तोडत आहेत. महाराष्ट्र लुटला जात आहे. महाराष्ट्राच्या जनतेला कमजोर केलं जात आहे. नामर्द करण्याची योजना आहे. पण, लढवय्या महाराष्ट्राला आणि शिवसेना जोपर्यंत इकडे ठामपणे उभे आहे तोपर्यंत यांना ते शक्य नाही.**

भारतीय जनता पक्ष हा चोर आणि लफंग्यांचा पक्ष आहे आणि नरेंद्र मोदी हे त्या चोरांचे सरदार आहेत. मला खात्री आहे, क ी महाराष्ट्रावरती ज्यांनी अन्याय, अत्याचार केलांय, त्याचा बदला घेण्याची वेळ ही आता आपल्यावरती आलेली आहे. दिल्लीवरून मोदी आणि शहा यांच्या स्वाऱ्या औरंगजेबाप्रमाणे महाराष्ट्रात होत आहेत. त्यांच्यापासून महाराष्ट्राचं रक्षण करण्याची जबाबदारी ती पुन्हा एकदा आपल्या सर्वांवर पडलेली आहे. महाराष्ट्र हा दिल्ली पुढे कधीच झुकला नाही हा इतिहास आहे.

नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी महाराष्ट्र कमजोर करण्याचा, तोडण्याचा किती प्रयत्न केला तरी त्याआधी त्यांनी संभाजीनगरमधील औरंगजेबाची कबर पाहून यावी. १०७ हुतात्म्यांचं स्मारक जे फोर्टला आहे हे सुद्धा पाहून यावं. महाराष्ट्रावर चाल करून येणाऱ्यांची काय अवस्था होते याची ती दोन्ही प्रतीक आहेत.




काही भटके-वखवखते आत्मे महाराष्ट्राचे लचके तोडण्यासाठी किंवा महाराष्ट्राला कमजोर करण्यासाठी महाराष्ट्राच्या आभाळात फडफडत आहेत महाराष्ट्राच्या हक्काचे अधिकाराचे लचके तोडत आहेत. महाराष्ट्र लुटला जात आहे. महाराष्ट्राच्या जनतेला कमजोर केलं जात आहे. नामर्द करण्याची योजना आहे. पण, लढवय्या महाराष्ट्राला आणि शिवसेना जोपर्यंत इकडे ठामपणे उभे आहे तोपर्यंत यांना ते शक्य नाही. या लोकांनी शिवसेना तोडली. शरद पवार यांचा पक्ष तोडून त्यांना कमजोर करण्याचा प्रयत्न केला. पण या वेळेला काँग्रेस असेल, शिवसेना असेल, राष्ट्रवादी असेल, हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी ठामपणे उभे आणि लढत

राहतील.

सध्याच्या राज्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या चाव्या दिल्लीच्या चरणी ठेवल्या आहेत. त्याला थैलीचे राजकारण म्हणतात. मुंबईचा लुटीचा माल दिल्लीच्या चरणी व्हायचा आणि महाराष्ट्रात सत्ता विभागायची हे सध्याच्या राजकर्त्यांचे धोरण आहे. भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्राचं कधीच घेणं देणं नव्हतं. महाराष्ट्राच्या कोणत्याही स्वाभिमानाच्या लढ्यात भारतीय जनता पक्षाने पुढाकार घेतला असेल तर ते त्यांनी दाखवावे. ना स्वातंत्र्याच्या लढ्यात, ना देशाच्या, ना महाराष्ट्राच्या लढ्यात. हे लोक कधीच खरे नव्हते त्यामुळे त्यांना महाराष्ट्राविषयी स्वाभिमान प्रेम असण्याचं कारण नाही.

बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली ती शिवसेना सातत्याने महाराष्ट्रात २१ , २२ जागा लढत आलेली आहे. तो आमचा आकडा कायम आहे. ते आपण पाहिलं असेल. तीन पक्षांच्या जागा वाटपात सुद्धा अत्यंत सन्मानाने जागा वाटप झालं. त्यात आम्ही २१ जागा लढत आहोत. २२ वी जागा होती उत्तर मुंबईची, ती आम्ही शेवटच्या क्षणी काँग्रेसला लढण्यासाठी दिली. आता हा जो शिवसेना फडणवीस गट आहे. ते १२-१३ जागा लढत आहेत, म्हणजे त्यांनी स्वतःच्या जागा कमी करून घेतल्या आहे. याला लोटांगण घालणे असे बोलतात.

अजित पवार यांनी दैवत बदलले आहे आणि २०२४ ला सरकार बदलेल, मोदी नसतील आणि परत त्यांना ईडीची नोटीस येईल, तेव्हा त्यांनी परत दैवत बदलले असेल. तुम्ही तुमच्या जागा कायम ठेवू शकले नाही आणि अनेक ठिकाणी जे उमेदवार भारतीय जनता पक्षाने ठरविले. त्यामुळे शिंदे गट आणि अजित पवार गटाकडे स्वाभिमानाची गोष्ट नाही.

## निवडणूक आयोग अदृश्य शक्तीच्या दबावाखाली

मतदानानंतर तब्बल अकरा दिवसांनी मतदानाची टक्केवारी निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आली. यामध्ये मतदानात ७ टक्के वाढ झाल्याचे सांगण्यात आले असून निवडणूक आयोग अदृष्य शक्तीच्या दबावाखाली काम करत असल्याचे स्पष्ट होत आहे. मतदान झालेल्या दिवशीच मतदानाची टक्केवारी जाहीर होत असते. मात्र, यावेळी आयोगाकडून पहिल्या टप्प्यानंतर तब्बल अकरा दिवसांनी आणि दुसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर तीन दिवसांनी मतदानाची टक्केवारी जाहीर करताना यामध्ये सहा ते सात टक्के अचानक वाढ झाली आहे. हा प्रकारच धक्कादायक असून नांदेडमध्ये ५२ टक्के मतदान झाले होते. त्यात अर्धा किंवा एक टक्का वाढ होऊ शकते. मात्र, आता ६२ टक्के कसे होऊ शकते?

वाढीव मतदान कोणाला झाले असा यामुळे प्रश्न निर्माण होत असून आयोगाच्या कामकाजावर विश्वास कसा ठेवायचा हा गंभीर विषय आहे. डिजीटल इंडिया असे एकीकडे जाहीर

**महाराष्ट्र लुटण्याचा नामी धंदा आपण केलात त्याबद्दल लाभार्थी आणि मलिदा गँग आपली मनःपूर्वक आभारी आहे!**







आर्टिफिशिअल इंटलिजन्सने तयार केलेले चित्र– नोटबंदीमुळे अनेकंचे संसार उध्वस्त होऊन माणसे रस्त्यावर आली.

केले जात असताना हा गोंधळ कुणाच्या सांगण्यावरून होतो हे कळायला हवे. भारताचा निवडणूक आयोग भारताचा राहिला नसून तो मोदी शहा यांचे बाहुले ठरला आहे. यामुळे आयोगाने माती खाल्ली आहे हे स्पष्ट होते.

## दुसऱ्यांच्या मंगळसूत्राची उठाठेव मोदींनी करू नये

काँग्रेस नेते सॅम पित्रोदा यांनी जे वक्तव्य केलंय त्याबाबत काँग्रेसने त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. काँग्रेसने सांगितलं आहे की ते सॅम पित्रोदा यांचं व्यक्तिगत मत आहे. त्यांच्या भूमिकेशी काँग्रेसचा कसलाही संबंध नाही. तसंच जर असेल तर नरेंद्र मोदी आता आपल्या देशातील बायकांच्या मंगळसूत्रांना हात घालू लागले आहेत, पाकीटमारी करू लागले आहेत ती भाजपाची भूमिका आहे का? खरं म्हणजे काँग्रेसच्या राज्यात नव्हे तर मोदींच्या राज्यात बायकांची मंगळसूत्रं गहाण पडू लागली आहेत, मंगळसूत्रं लुटली जात आहेत. हा माणूस आता मंगळसूत्राच्या गोष्टी करतोय. जो माणूस स्वतःच्या घरातल्या मंगळसूत्राला प्रतीष्ठा देऊ शकला नाही त्याने दुसऱ्यांच्या मंगळसूत्रांची उठाठेव करू नये.

नरेंद्र मोदींमुळे या देशातल्या कित्येक महिलांची मंगळसूत्रं लुटली गेली आहेत. मोदींनी नोटबंदी आणल्यामुळे लाखो महिलांना आपली मंगळसूत्रं गहाण ठेवून घर चालवावं लागलं.

नरेंद्र मोदींनी जो लॉकडाऊन लावला त्या लॉकडाऊनच्या काळात हजारो लोकांचे रोजगार गेले, त्या काळात आपलं घर चालवण्यासाठी अनेक महिलांनी मंगळसूत्रं विकली. या देशातल्या बेरोजगार तरुणांच्या मातांना आपलं घर चालवण्यासाठी मंगळसूत्रं गहाण ठेवावी लागली आहेत, अशी किती उदाहरणं द्यावी.



काश्मिरी पंडीतांचे पुनर्वसनासाठी आंदोलन

जम्मू काश्मीरमधील काश्मिरी पंडितांच्या पत्नींची मंगळसूत्रं देखील मोदींमुळेच गेली. मोदीपुरस्कृत, भाजपा पुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मिरी पंडितांचे जीव घेतले. त्यामुळे त्या महिलांची मंगळसूत्रं गेली. मणिपूरमधील कित्येक महिलांनी आपली मंगळसूत्रं गमावली. या सगळ्याला जबाबदार कोणी असेल तर ते नरेंद्र मोदी आहेत. आतापर्यंत किती मंगळसूत्रांची प्रतिष्ठा मोदींनी ठेवली आहे ते मला सांगा. या देशात मंगळसूत्रांवर गंडांतर आलं असेल तर ते केवळ मोदींमुळे आलं आहे.

## अतृप्त आत्मे भटकतायंत

महाराष्ट्रात अतृप्त आत्मे भटकत असले तरीही त्यांना घाबरत नाही. महाराष्ट्रात ढोंग, अंधश्रद्धा, फेकाफेकी चालत नाही. महाराष्ट्र हा पवित्र आत्म्यांचा प्रदेश आहे. छत्रपती शिवरायांपासून बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सुपुत्र जन्माला आले. मोदीजी पुण्यात होते त्यांनी डॉक्टर आंबेडकरांचा उल्लेख तरी केला का? कारण त्यांना डॉक्टर आंबेडकरांवर राग आहे. संविधान बदलायचे आहे म्हणून हे आत्मे भटकत आहेत. मोदी काय म्हणत आहेत त्याकडे लक्ष देऊ नका. १०५ आत्मे ज्यांनी महाराष्ट्रासाठी बलिदान केलं ते मोदींना शाप देणार आहेत. मोदींनी महाराष्ट्र आणि मराठी माणसाचं जितकं नुकसान केलं तेवढं कुणी केलं नसेल. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत या अतृप्त आत्म्यांना त्यांच्या राज्यातच बसविण्याचा निर्णय घ्या आणि त्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना बहुमताने निवडून द्या.

## निष्ठावंतांची ताकद दाखवूया

महाराष्ट्रात सर्वात मोठी घटना जळगाव जिल्ह्यात झाली. एका पानटपरीवाल्याला बाळासाहेब ठाकरेंनी आमदार आणि मंत्री केले. पण खोके घेऊन तो उलटला. गद्दार झाला. आता त्याला परत पानटपरीवर बसायला पाठवूया आणि निष्ठावंतांची ताकद काय असते, ते जनतेला दाखवून देऊया. जळगाव रावेरच्या जनतेने या गद्दार नेत्यांना आणि महायुतीच्या उमेदवारांना तडीपार करायचे ठरविले आहे. यावेळी भाजप ४०० पारची घोषणा देतो आहे पण ते ४०० पार सोडा तर ते तडीपार होणार आहे. भाजपने शिवसेना आणि राष्ट्रवादी हे पक्ष का फोडले? कारण त्यांना महाराष्ट्र लुटायचा होता. पण आम्ही त्याला विरोध केला आणि शेवटपर्यंत विरोध करीतच राहू.

# वखवखलेला आत्मा महाराष्ट्रात फिरतोय

## उद्धव ठाकरे



ज्या महाराष्ट्रासाठी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता बलिदान करून आपल्याला मुंबई मिळवून दिली, महाराष्ट्र मिळवून दिला, ते हुतात्मे आपल्याकडे बघतायंत, महाराष्ट्राची लूट होतेय, महाराष्ट्राची अस्मिता पायदळी तुडवली जातेय, आणि हुतात्मे आपल्याकडे बघतायंत, की मी कोणासाठी बलिदान केलं आणि मी आपल्या सगळ्यांच्यावतीने शपथ घेऊन त्यांना सांगू इच्छितो, की तुम्ही ज्याप्रमाणं एखाद्या मर्दासारखं गोळ्यांना सामोरं गेलात, आम्ही आता हा हुकुमशाह महाराष्ट्रामध्ये फिरतोय, त्याच्या कचाट्यात तुम्ही आम्हाला मिळवून दिलेला महाराष्ट्र, काही झालं, प्राण गेला तरी बेहत्तर, पण आम्ही महाराष्ट्र त्याच्या कचाट्यात जाऊ देणार नाही.

काल पुण्यामध्ये सभा झाली. ठिकाण योग्य होतं. रेसकोर्स. कारण, त्यांना झोपेमध्येसुद्धा घोडेबाजारच दिसतो. पण, त्यांना कोणीतरी सांगायला पाहिजे होतं, की हे घोडे वेगळे आहेत आणि तुम्ही ज्यांना घोडे म्हणून घेतलंत, पण ते घोडे नाहीयेत, ती खेचरं आहेत. गाढवं आहेत ओझी वाहणारी. खरे घोडे हे अश्वमेधाचे असतात, रथाचे असतात. टरबुजाला घोडा नाही लागत. हातगाडी लागते. पण, एकूणच ही

जी निवडणूक आहे, मला खरंच कीव येते भाजपाची आणि मोदीजींची. कारण, मोदीजींबरोबर माझ्याही सभा झाल्यात. पण, मला नाही आठवत तेव्हा इतक्या वेळा मोदीजींना महाराष्ट्रात यावं लागलं होतं. मला आठवतंय, की त्या सभांमध्ये माझाही उल्लेख त्यांनी माझे लहान भाऊ म्हणून केला होता. अरे, मग लहान भाऊ होतो तर मग नातं का तोडलंत? बरं कोणत्या भाषेत तुम्ही बोलतांय? तुम्ही दहा वर्षे काय केलं हे सांगा. अजूनही यांच्या मानगुटीवरती जे काँग्रेसचं भूत बसलंय तेच उतरत नाहीये.

दहा वर्षे झाली, मोदीजी तुम्ही पंतप्रधान आहात, जनतेला महागाईचे चिमटे काढताय, त्याच्यापेक्षा स्वत:ला चिमटे काढून बघा, की तुम्ही खरंच पंतप्रधान झाला होतात, कारण, आता तुमची खुर्ची जातेय. यांची भाषा एवढी खाली आलीय, की काल ते काय म्हणाले? मला वाटतं, कारण आज अजित पवार म्हणालेत, की पुढच्या सभेत मी त्यांना विचारीन, की भटकती आत्मा ते कोणाला बोलले? भटकती आत्मा तुम्ही कोणाला बोललात, पवार साहेबांना बोललात ना. पण जशी भटकती आत्मा असते ना, तसा एक वखवखलेला आत्मासुद्धा असतो. बुभूक्षित आत्मा असतो. आणि हा वखवखलेला आत्मा कसा असतो माहित आहे का? सगळीकडे जातो. म्हणजे पवार साहेब त्यांच्या मुलीसाठी लढतायंत. मी माझ्या मुलाला मुख्यमंत्री करण्यासाठी लढतोय आणि हे स्वत:साठी लढतायंत. मी, माझं, माझ्यासाठी आणि सगळी कामं मित्रांसाठी. आम्ही आमच्या मुलांसाठी लढतो आहोत, त्यांना मुख्यमंत्री करायचं की नाही हे जनता ठरवेल. कारण, मुख्यमंत्री बनायला लोकांची मतं लागतात. ते एका फोनवर जसं तुम्ही बीसीसीआयचा अध्यक्ष केलं स्वत:च्या मुलाला, हे काय मुख्यमंत्रीपद नाहीये?

हा वखवखलेला आत्मा सगळीकडे फिरतोय महाराष्ट्रामध्ये. पंधरा, वीस, पंचवीस किती सभा झाल्यात? या वखवखलेल्या आत्म्याला जरा जरी

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी एप्रिल महिन्यामध्ये राज्यात ठिकठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी केलेल्या भाषणातील महत्त्वाच्या मुद्द्यांचा घेतलेला मागोवा...**



# हुकूमशाहीच्या कचाट्यात महाराष्ट्र जाऊ देणार नाही



**वारजे येथे झालेल्या सभेत शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले व बाळासाहेब थोरात यांना एका हारात गुंफून त्यांचे स्वागत करण्यात आले.**

संवेदना असतील, तर जिथे जिथे फिरतायंत तिथे तुमच्या नादानपणामुळे ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यांच्या आत्म्याकडे बघा, त्यांच्या घराकडे बघा, त्यांच्या घरातल्या तुटलेल्या मंगळसूत्राकडे बघा. शेतकऱ्याचं उत्पन्न तुम्ही दुप्पट करणार होता. उत्पन्न दुप्पट तर झालंच नाही पण त्याच्या उत्पादनाचा खर्च वाढला. तो दुप्पट झाला. तिप्पट झाला. आज तुम्हाला जी महाराष्ट्रामध्ये ठाण मांडून बसण्याची ही जी वेळ आलेली आहे, महाराष्ट्र साधा आहे, भोळा आहे, दिलदार आहे. पण, महाराष्ट्र कृतघ्न नाहीये. अजिबात नाहीये आणि महाराष्ट्र गद्दार नाहीये. महाराष्ट्राची परंपरा ही शूरांना वंदन करणारी आहे. आज भाजपचं जे काय चाललेलं आहे, ते चोरा मी वंदिले असं चाललेलं आहे. सगळ्या चोरांना ते वंदन करतायंत.

कदाचित मोदीजींना माहिती असेल किंवा नसेल, पण, असाच एक वखवखलेला आत्मा तीनशे, साडेतीनशे वर्षांपूर्वी गुजरातमध्ये जन्मलेला, तो व्हाया आग्रामार्गे महाराष्ट्रावरती चालून आला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेलं हिंदवी स्वराज्य चिरडून टाकण्यासाठी तो आला होता. महाराष्ट्र गिळायला आला होता. अहो, २७ वर्षे औरंगजेब आग्रा सोडून महाराष्ट्रात आला, त्यानी परत कधी आग्रा बघितलाच नाही, त्याचासुद्धा आत्मा इकडे कुठंतरी अजूनही भटकत असेल. ही अशी वखवख एवढी बरी नाही. महाराष्ट्राबाबतचा आकस हा महाराष्ट्र स्थापनेवेळी दिसला. मोरारजी देसाई यांनी मराठी माणसांना मारण्याचा आदेश दिला होता. आताही सुरतेचे ते दोनजण महाराष्ट्र लुटत आहेत. मात्र, त्यांचा सुफडासाफ केल्याशिवाय शांत बसणार नाही.

ज्या लोकांनी तुमच्यावरती विश्वास टाकला, ते म्हणतात, की पवार साहेबांनी काय केलं? पवार साहेबांनी केंद्रीय कृषि मंत्री असताना पहिल्या प्रथम शेतकऱ्यांना कर्ज माफ केलं होतं आणि त्याच्यानंतर मी मुख्यमंत्री झालो, माझ्यासोबत त्यावेळी महाविकास आघाडीचे सर्व नेते होते, आणि कोणीही न मागता महाविकास आघाडीच्या सरकारने शेतकऱ्यांची दोन लाखापर्यंतची पीक कर्जाची जी रक्कम होती, त्यातून आम्ही तुम्हाला मुक्त केलं होतं. तेव्हा कापसाचे भाव काय होते? सोयाबीनचे भाव काय होते? हे सगळ्यांना महिती आहे. आम्ही तुमच्यासारखं खोटं नाही बोललो कधी. आम्ही जे बोलतो, ते करून दाखवतो आणि जे करून दाखवतो तेच आम्ही बोलतो. पण, यांची वृत्ती एवढी वाईट आहे, नॅशनल करप्ट पार्टीनं क्लिन चीट कुणाला दिली? मग ७० हजार कोटींचा घोटाळा कोणी केला होता? बँकेचा घोटाळा कोणी केला होता?

बरं ते सोडून द्या. काल-परवा मोदीजी माझ्या शिवसेनेला, होय माझ्या वडिलोपार्जित शिवसेनेला नकली सेना म्हणाले. कारण, त्यांच्याबरोबर आहे गद्दारांची टोळी. गाढवांची टोळी. त्यांना ते शिवसेना मानतायंत.

सर्वोच्च न्यायालयाने अद्याप शिवसेनेबाबत कोणताही निर्णय दिला नाही. फक्त जे घडले ते कसे चुकीचे आहे, हे सांगितले. आता पंतप्रधान पदावर बसलेली व्यक्ती




पुणे शहरातील महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर हे उद्धव ठाकरे यांना नमस्कार करताना शेजारी सुप्रिया सुळे

माझ्या पक्षाला नकली शिवसेना म्हणतात. याचा अर्थ हे न्यायालयावर दबाव आणत आहेत. पण यांना वेळीच आवर घातला पाहिजे. हे दबाव आणण्याचे राजकारण करत आहेत. बाकी कोणी विकले गेलेले असतील, पण सर्वोच्च न्यायालय विकले गेलेले नाही. तुम्ही तुमच्या मर्जीप्रमाणे पक्ष कोणाचा हे ठरवायला लागला आहात.

मग मोदीजी मला सांगा, हा जर का न्याय लावलात, तर तुम्ही जे बोलला होतात, नॅशनल करप्ट पार्टी, आता आमचंही चिन्ह गद्दारांना दिलंय आणि पवार साहेबांचं पण गद्दारांना दिलेलं आहे. मग नॅशनल करप्ट पार्टी इकडं आहे, की तुमच्यासोबत आहे. ही कशी चालते तुम्हाला नॅशनल करप्ट पार्टी? एका बाजूला आमच्यावर टीका करायची, की नकली सेना. पण, आख्खी भ्रष्टाचाराची फौज, म्हणजे एक अकेला सब पे भारी, सोबत सगळे भ्रष्टाचारी. यांची नीती अशी आहे, की ज्या शिवसेनेनं तुम्हाला कठीण काळात मदत केली म्हणून तुम्ही पंतप्रधान झालात. ही शिवसेना तुम्ही संपवायला निघालात. ज्या शिवसेनाप्रमुखांनी अत्यंत कठीण आणि प्रतिकूल काळामध्ये सुद्धा मोदींना जेव्हा वाजपेयी काढायला निघाले होते, तेव्हा मोदींची बाजू घेतली होती, त्या बाळासाहेबांच्या शिवसेनेला तुम्ही संपवायला निघालात.

## संयुक्त महाराष्ट्र लढ्यापासूनच भाजपचा महाराष्ट्रद्वेष सुरु आहे आणि मग कोणाचा तुम्ही प्रचार करताय?

घरी गेल्यावर रविश कुमार म्हणून पत्रकार आहेत. त्यांनी व्हिडीओ पोस्ट केला आहे. प्रज्ज्वल रेवण्णांचा उल्लेख आहे. त्याचे पॉर्न व्हिडीओ बाहेर आले आहेत. मोदी स्टेजवरुन सांगत आहेत त्याला मत दिलं की माझे हात बळकट होतील. असे लोक तुम्हाला पाहिजेत? कळकट हात बळकट करतील? अटलजींचा आत्मा रडत असेल की कुठल्या नाकर्त्यांच्या हाती आपण पक्ष देऊन टाकला. ही घराणेशाही त्यांना चालते. सेक्स स्कँडल करणाऱ्यांची घराणेशाही चालते पण शिवसेना प्रमुखांची घराणेशाही चालत नाही. आमची घराणेशाही जनता ठरवेल. मला माझ्या आई वडिलांचा अभिमान आहे. मी माझ्या सात पिढ्यांचा इतिहास मांडतो तुम्ही तुमच्या सात पिढ्यांचा इतिहास सांगा जनतेला ठरवू देत कुठली घराणेशाही हवी.

ही यांची नीती आणि वरपासून खालपर्यंत म्हणून मी यांना भेकड, भाकड जनता पार्टी म्हणतो. हे मी उगाच बोलत नाही. मुद्दामहून बोलतोय. मी भाकड एवढ्यासाठी म्हणतो, कारण यांनी कधी कोणता विचार दिलेला नाही. कोणताही आदर्श निर्माण केलेला नाही, अशोकरावांचा सोडला तर. ना नेता दिला, ना विचार दिला आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात तर ते कधीच नव्हते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातसुद्धा तेव्हाचा जनसंघ सहभागी झाला नव्हता. माझे आजोबा त्यावेळी अग्रणी होते. त्यावेळी शिवसेना नव्हती, पण माझे वडील बाळासाहेब, काका श्रीकांत ठाकरे हेसुद्धा माझ्या आजोबांच्या खांद्याला खांदा लाऊन लढत होते. हा इतिहास ३००-४०० वर्षापूर्वीचा नाहीये, हा आत्ता ६०-६५ वर्षापूर्वीचा आहे. जनसंघ त्यावेळच्या संयुक्त महाराष्ट्र समितीत सामील झाला होता. पण कशासाठी? तर




घुसायचं आणि काय मिळेल ते घेऊन बाहेर यायचं. संयुक्त महाराष्ट्र समितीत तो सामील झाला आणि जेव्हा निवडणूक लढवण्याची वेळ आली, तेव्हासुद्धा आत्तासारखाच जागावाटपावरून घोळ करून, पहिली जर संयुक्त महाराष्ट्र समिती कोणी फोडली असेल, ते पाप कोणी केलं असेल तर या भाजपच्या तत्कालिन बापाने म्हणजे जनसंघाने केलेलं आहे. म्हणजे यांचा महाराष्ट्र द्वेष हा तेव्हापासूनचा आहे.

मोदीजींना माझं जाहीर आव्हान आहे, की शिवसेनेचं जे मशाल गीत आहे, त्या मशाल गीतामध्ये तुम्ही ज्या घोषणा देता ती घोषणा आहे, की जय शिवाजी, जय भवानी. हे मोदीजींचे जे घरगडी आहेत निवडणूक आयोग, त्यांनी त्यातल्या जय भवानी या शब्दाला आक्षेप घेतला. तो काढायला सांगितला. म्हटलं, कसं काढा? तो जर काढला तर यांची जी बिनआत्म्याची शरीरं फिरतायंत, तशी आमची झालेली नाहीत. आमच्या शरीरात आजही आत्मा आहे. जय शिवाजी, जय भवानी आमचा आत्मा आहे. ही बिना आत्म्याची जी शरीरं भटकतायंत, त्यांना जय शिवाजी, जय भवानीचं महत्त्व नाही कळणार. मोदीजी जी नाटकं करतायंत, समुद्राच्या बुडाशी जाऊन आले, जय श्रीराम. आम्ही पण जय श्रीराम म्हणतो. बजरंग बली की जय आम्ही पण म्हणतो. पण, तुम्हाला जय भवानीबद्दल एवढा मत्सर का? तुम्ही समुद्राच्या बुडाशी जाऊन आलात, पण धाराशिवला जाऊनही तुळजाभवानीच्या दर्शनाला अजून तुम्ही गेला नाहीत. तुमचा महाराष्ट्रद्वेष हा इथपर्यंत भिनलाय.

आणि तुम्हाला जे पाशवी बहुमत पाहिजे, ते घटना बदलण्यासाठी हे आता उघड झालेलं आहे. २०१४ आणि २०१९ला यांचं कसं होतं, तर मोदी बोले आणि जग हले. आता जग तिकडेच आहे, पण आता मोदीच हलतायंत. हे जे बोलतायंत, ते ते फसतंय. आधी चार सो पारचा नारा दिल्यानंतर जनता म्हणते, तडीपार. त्याच्यानंतर मग ते मुलांवरती आले, आता मोदींनी काय काढलं, भटकती आत्मा. अजून कोण मास खातं, कोण मटण खातं. नरेंद्र मोदी गाईवर बोलतात. गाईवर बोलतात तसे जरा महागाईवरही बोला. चाय पे चर्चा केली तशी मुद्यांवर चर्चा करा. चार सो




पार म्हणतायंत म्हटल्यानंतर लोकांच्या लक्षात आलं, की यांना पाशवी बहुमत का पाहिजे. तर देशाची घटना बदलायला पाहिजे. देशाची घटना का बदलायची? तर पुन्हा तिकडे महाराष्ट्राचा द्वेष आहे. कारण, ज्या महाराष्ट्राच्या सुपुत्राने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एक साधा, गरीब कुटुंबात जन्मलेला माणूस, त्यांनी देशाची घटना लिहिली. अरे, हा दलित कुटुंबात जन्मलेला माणूस एवढा बुद्धीमान कसा? आणि त्यानी लिहिलेली घटना आम्ही मानायची कशी? यांचे हे जे बुरसटलेल्या विचारसरणीचे आहेत ना, गोमूत्रधारी हिंदुत्ववादी, त्यांच्या पोटात मुरडा आला. या बुद्धीच्या श्रीमंतीला तुमची ईडी, बिडी काय करू शकत नाही. ही श्रीमंती वेगळी आहे, त्याचं मोजमाप तुमच्याकडून कधीच होणार नाही. मग या गरीब दलित कुटुंबात जन्मलेल्या माणसाची घटना बदलून टाका, ती मोडून टाका. पण याद राखा भाजपवाल्यांनो, आज मी तुम्हाला जाहीर इशारा देतोय, तुम्ही परत तर सत्तेवरती नाहीच येत, पण जर घटनेला बदलण्यासाठी हात लावाल तर संपूर्ण देश पेटल्याशिवाय राहणार नाही, एवढं लक्षात ठेवा.

## निवडणूक रोखे हा जगातला सगळ्यात मोठा घोटाळा

आरक्षण रद्द करणं हे म्हणे आम्हाला मंजूर नाहीये. मग दहा वर्षे दिलं का नाही आरक्षण? जसं दिल्लीमधील केजरीवाल सरकारचे अधिकार, कोर्टानं त्यांच्या बाजूनं निकाल दिला, पण यांनी तत्काळ लोकसभेमध्ये एक बिल आणलं आणि पाशवी बहुमताच्या जोरावरती कोर्टाचा निर्णय फिरवला. मग माझ्या धनगर समाजाचा, मराठा समाजाचा, आम्ही सांगत होतो, की तुम्ही घ्या तिकडं अधिवेशन, मी पाठिंबा देतो. का त्यांना आरक्षण नाही दिलं? पण, आपण काय केलं हे सांगायचं नाही. शेतीमालाला दुप्पट भाव कधी मिळणार हे माहिती नाहीये. वन नेशन, वन इलेक्शन, वन नेशन वन टॅक्स, मी म्हटलं ना, की मी, माझं, माझ्यासाठी. सगळं एकट्यासाठी. जो जीएसटी आणलेला आहे, त्याच्या माध्यमातून किती छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांची पिळवणूक होते हे तुम्ही जाऊन विचारा. म्हणजे जे मोदींचे अंध भक्त असतील त्यांनासुद्धा मी सांगतोय. का रे, तुम्ही घरामध्ये जेवण जेवत नाही का? का तुमच्याकडं मोदी कार्ड आहे, जे दाखवलं, की गॅस सिलिंडर फुकटात मिळतो? तुम्ही कार्ड दाखवलं, की पेट्रोल फुकट मिळतं? आणि मग काही वर्षांपूर्वी, मोदींच्या सभेमधला एक व्हिडिओ फिरतोय, की भाई और बहनों, मुझे बताओ, की पेट्रोल, डिझेल, गॅस निचे गया, या उपर गया. बोलले होते ना? पण आत्ता मला कळलं, की गॅस, डिझेल, पेट्रोलचे भाव वाढले.

पंधरा लाख रूपये आले, पण तुमच्या खात्यात नाही आले. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून भाजपच्या खात्यात



हजारो करोडो रूपये आले. हा जगातला सगळ्यात मोठा घोटाळा आहे, हे मी नाही बोलत. मोदीची तुमच्याच मंत्रिमंडळात ज्या अर्थमंत्री होत्या, निर्मला सीतारामन, त्यांचे पती बोलले आहेत. अजून तुरूंगात गेलेले नाहीत हे नशीब. कदाचित त्या निर्मलाबाईंचा वशिला असेल. या घोटाळ्याला प्रभाकर यांनी नाव दिलंय, मोदीगेट. बरं त्यानंतरही निर्मलाबाई म्हणतायंत, की आम्ही परत निवडणूक रोख्यांची योजना आणणार. तुम्हाला कदाचित हे माहिती नसेल, की कोर्टाचा निर्णय येण्याच्या आधी जवळपास दहा हजार रोखे हे छापून तयार केले होते मोदी सरकारने पुन्हा देश लुटायला. मग मला सांगा, मोदीजी म्हणतात, की ७० वर्षांत काँग्रेसने काय केले नाही. मला हे पटतंय, कारण, काँग्रेसने




७० वर्षांमध्ये, काँग्रेसच्या खात्यात किती पैसे आहेत? काही शेकडा आणि भाजपच्या खात्यात दहा हजार कोटी. म्हणजे ७० वर्षे काँग्रेसनं काय केलं नाही, ते अडीच वर्षात मोदींनी करून दाखवलं की नाही. देश कोणी लुटला? काँग्रेसनी की भाजपनी. अशा या देशाच्या लुटारूंना महाराष्ट्र साथ देईल? तुम्हाला महाराष्ट्र लुटणारा पाहिजे की महाराष्ट्र जपणारा पाहिजे? तुम्हाला महाराष्ट्राची अस्मिता जपणारा पाहिजे की महाराष्ट्राची अस्मिता पायदळी तुडवणारा पाहिजे? भाजपा म्हणजे काही ब्रह्मदेव नाही. भाजपा म्हणेल तेच हिंदुत्व, भाजपा म्हणेल तोच देशप्रेमी आणि भाजपाच्या विरोधात बोलणारा देशद्रोही असं नाही.

अजूनही जर कोणाला खोटं वाटत असेल, तर मी आत्मविश्वासानं सांगतो, या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपा तडीपार होणार म्हणजे होणारच. इंडिया आघाडीचे तीनशेच्यावर खासदार निवडून येणार म्हणजे येणारच. कोणाचा विश्वास नसेल, पण तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगतो, काही वर्षांपूर्वी भाजपचे संपूर्ण देशात दोन खासदार होते. तेव्हा जर कोणी म्हटलं असतं, की बघा तुम्ही भाजपचे तीनशेच्यावर खासदार निवडून येतील. तर वेड्यात काढलं असतं. आज मी सांगतोय, की जे तीनशे खासदार आहेत, ते दोन खासदार झाल्याशिवाय राहणार नाही. पण, हे दोन कोण निवडून आलं पाहिजे तुम्हाला माहिती आहे. हे दोनच आले पाहिजेत, कारण, त्यांना दिसलं पाहिजे, की संपूर्ण सभागृहात सगळे खासदार इंडिया आघाडीचे बसलेले आहेत.

हा बदल तुम्ही करू शकता. एका बोटाच्या ताकदीवरती या हुकुमशाहीला तुम्ही गाडू शकता.

यांची घर फोडण्याची वृत्ती आहे. खरं म्हणजे यांना कुणी लग्नाला बोलवूच नये. कारण हे लग्नाला जातील, श्रीखंड पुरी, पुरणपोळी किती खाता बरे. तुम्ही वीस, मी पंचवीस. खातील-पितील, ढेकर देतील आणि नवरा-बायकोमध्ये भांडणं लाऊन पुन्हा दुसऱ्या लग्नात जेवायला जातील. त्याच्यामुळे हे पुन्हा निवडून येता कामा नयेत. ज्यांनी बोटाला धरून चालायला शिकवलं, चालायला लागला म्हणून काय लाथा मारणार आहेस? जर बोट मध्ये सोडलं असतं तर एक पाऊल पुढं जाऊ शकला नसतास. यापुढेही आता एक पाऊल पुढं जाऊ शकणार नाहीयेस. कारण, जसं मी शिवसेनेच्या बाबतीत सांगतोय, की मोठी केलेली माणसं गेली, पण मोठी करणारी माणसं आजसुद्धा माझ्यासोबत आहेत आणि ती माझ्यासोबत बसलेली आहेत. ज्यांना तुम्ही मोठं केलंत त्यांच्या डोक्यात हवा भरली असेल, ते गॅसचे फुगे जाऊद्यात, सोडून द्या, गॅस संपला की ते खाली येतील. पण, तुम्हाला महाराष्ट्राचा स्वाभिमान विकता येणार नाही. तुम्हाला तुमच्या मताची किंमत ठरवता येणार नाही. ती कोणी ठरवता कामा नये. म्हणून तशी एक वज्रमूठ मला आवळून दाखवा. हे व्यापारी मंडळ कितीही महाराष्ट्र फिरलं, कितीही ठाण मांडलं, तरी जिथं मशाल असेल, तिथं मशाल, जिथं हात असेल तिथं हात, जिथं तुतारी फुंकणारा मावळा असेल, तिथं तुतारी फुंकणारा मावळा, बस् दुसरं कोणतंही चिन्ह नाही.




## मोदी सरकार हे गजनी सरकार

मोदीजी आम्ही तुम्हाला सांगत आहोत, तुमच्या गप्पा झाल्या असतील तर बास आता. खरे तर हे मोदी सरकार नाही, तर हे गजनी सरकार आहे. कारण त्यांना काल काय बोलले ते आठवत नाही. २०१४ साली काय बोलले ते २०१९ ला आठवत नाही. २०१९ ला काय बोलले हे २०२४ ला आठवत नाही. आता यांना उद्या लोक विसरणार आहेत. नरेंद्र मोदी हे राजकारणात वाईड बॉल टाकतात, नो बॉल टाकतात. वापरा आणि फेकून द्या ही यांची नीती आहे. २०१४ मध्ये देशात पंतप्रधान झाले ऑक्टोबरमध्ये युती तोडून टाकली. त्यामागचं कारण काय होतं? २०१९ मध्येही पंतप्रधानपदी बसले तेव्हाही अमित शाह यांनी वचन दिले होतं. त्यांनी शब्द मोडला. वापरा आणि फेका ही भाजपाची नीती आहे.

आज मुंबईचे महत्व दोन धोकेबाज कमी करायला निघाले आहेत. महाराष्ट्रामध्ये येणारे सर्व उद्योग गुजरातमध्ये घेऊन जात आहेत. वेदांता-फॉक्सकॉन, मेडिकल डिव्हाईस पार्क, टाटा-एयरबस प्रोजेक्ट असे सर्वच गुजरातमध्ये घेऊन गेले आहेत. आता टेस्लाचा आणखी एक उद्योग आपल्याकडे येत आहे. मात्र लोकसभा निवडणूक होईपर्यंत ते थांबले आहेत. त्यांनाही माहित झाले आहे की लोकसभा निवडणुकीनंतर भाजपचे सरकार जाणार आणि इंडिया आघाडीचे सरकार येणार. अन्यथा त्यांनाही गुजरातला घेऊन गेले असते. कारण मुंबईचा हिरे व्यापार हा गुजरातला घेऊन गेले. मुंबईमध्ये होणारे वित्तीय केंद्र गुजरातमध्ये नेले. एलॉन मस्क हुशार आहेत. त्यांना गुजरातला जायचं नाही. कारण त्यांनाही कळले असेल की, देशातील सरकार बदलत आहे. या दळभद्र्यांचं सरकार महाराष्ट्रातच नाही तर देशात पुन्हा येणार नाही. देशात इंडिया आघाडीचे सरकार येणार. नवे सरकार आले की आम्ही उद्योजकांना चांगल्या सुविधा पुरवू. जीएसटीच्या दहशतवादातून उद्योगाला मुक्त

केले जाईल. उद्योगाची परिपूर्ण वाढ होण्यासाठी नवे सरकार कटीबद्ध असेल. या देशात आणि राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत. मोदींचे सरकार आणि मिंधे सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. याच शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम आमचे सरकार निश्चितपणे करून दाखवेल. शिवसेनेने भाजपला खांद्यावर घेवून महाराष्ट्र दाखविला. अन्यथा त्यांना खांदा द्यायला कोणी मिळाले नसते. गेल्या विधान सभा निवडणूकीत भाजपने पाडापाडीचे राजकारण केले. त्याचा सूड घेण्यासाठी मी आलो आहे. संघर्ष करीत मुंबई घेतली. पण भाजप मुंबईचे महत्व कमी करीत आहेत. सर्व उद्योग व गद्दारही गुजरातला गेले. एकिकडे शेतक-ऱ्यांवर प्रेम असल्याचा आव आणला जातो, आणी दुसरीकडे शेतक-यांच्या विरोधात काळे कायदे का आणले होते.






याविरोधातील आंदोलनात अनेक शेतक-यांचा बळी गेला. भटकती आत्मा शोधण्यापेक्षा त्या शेतक-यांच्या आत्म्यांना काय वाटत असेल, याचा विचार करावा.

## टरबुजाचं चिराट झालंय

तुम्ही कुणाबद्दल बोललात? टरबूज? म्हणजे कोण? मी ज्यांना मागे फडतूस म्हणालो होतो ते का? आता मी बोलत नाही. मी फडतूस म्हटलं होतं आता म्हणत नाही. मी त्यांना कलंक बोललो होतो पण आता बोलत नाही. कारण त्यांना फार वाईट वाटतं. त्यांनीच परवा रायगडमध्ये एक विनोद केला. बाकीची कामं सोडून द्या मोदींची, म्हणजेच मोदींनी कामं केली नाही हे त्यांनी मान्य केलं. पण ते म्हणाले निदान मोदींनी आपल्याला करोना काळात लस दिली म्हणून आपण जिवंत राहिलो. जे काही संशोधक आहेत ते काय गवत उपटत होते का? मोदींनी लस बनवली असेल तर ते काय करत होते? लस पुण्यात तयार झाली आहे. मोदींनी लस हवेत सोडली नाही.

टरबुजाचं काय करायचं? तुम्हाला चांगलंच माहीत आहे. टरबुजाचं काय करायचं तुम्हाला माहीत आहे. टरबूज उन्हाळ्यात कामी तरी येतं. हे म्हणजे दुष्काळात तेरावा महिना आहे. हे टरबूज नाहीच दिवाळीत चिरडता ते चिराट झालेत. आले तेव्हा टरबूज होते आता पाव उपमुख्यमंत्री झालेत म्हणजेच चिराट झाले आहेत. होता केवढा झाला केवढा? असं सगळं थापेबाजीचं राजकारण सुरु आहे.

महाराष्ट्राच्या सरकारी यंत्रणेने गावागावात जाऊन लस पोहोचवली. त्यावेळी देशात १ नंबरचा मुख्यमंत्री म्हणून माझा गौरव झाला. पण तो तुमचा गौरव होता. मी जे सांगितलं ते तुम्ही ऐकलंत. मोदीजींची लस नंतर आली. लस मिळवण्यासाठी सरकारला केंद्राकडे खूप विनवण्या कराव्या लागल्या. पण केंद्र म्हणायचं आधी इकडे-तिकडे देऊद्या. यांनी कोरोना काळात पीएम फंडचा घोटाळा केला.

## कोपराला गूळ लावण्याचं काम

अटलजी पवार साहेबांचे कौतुक करत होते. गुजरातमध्ये भूकंप आला होता तेव्हा पवार साहेब धावून गेले आणि गुजरातला मदत केली होती. अटलजी पंतप्रधान असताना त्या आपत्ती व्यवस्थापनाचा अध्यक्ष पद पवार साहेबांकडे होते. आणि आता हे जे बोलताहेत यावरून हेच वखवखता आत्मा आहे. कोणी तरी शिवाजी महाराजांशी तुलना केली, अशी तुलना मोदींवरून होऊ शकत नाही. मोदींची तुलना महाराजांसोबत होऊ शकत नाही. महाराष्ट्राच्या दैवताच्या वाटेला जाऊ नका, नाही तर महाराष्ट्र सहन करणार नाही. जो महाराष्ट्राच्या मुळावरती आलेला आहे त्याचा सुपडासाफ आम्ही केल्याशिवाय राहणार नाही. तुम्हाला राजकारणामध्ये मुलं होत नाहीत म्हणून आमच्यातले गद्दार चोरून तुम्हाला उभे करावे लागतात, आमची काही पोरं तुम्ही चोरले, कोणी काही गद्दार चोरले. पवार साहेबांचे सुद्धा चोरले. पण महाराष्ट्रातील करोडो लोक सोबत उभे राहिले.

हल्ली कुणाला मित्र म्हणायचं म्हणजे पाठ सांभाळावी लागते. कारण हल्लीचे मित्र हे पाठीवर वार करणारे आहेत. आजच तुमच्याकडे भाकड जनता पक्षाचे नेते येऊन गेले. शिवसेना प्रमुख त्यांना कमळाबाई म्हणायचे. कमळाबाईचे नेते नरेंद्र मोदी येऊन गेले. सध्या ते महाराष्ट्रभर आणि देशभर फिरत आहेत. लोकांच्या कोपराला गुळ लावण्याचं काम जोरात सुरु आहे. कोपराला गूळ लागला की धड चाटताही येत नाही आणि काढताही येत नाही.



## मशालीच्या धगीत कमळ कोमेजणार

आज या मशाली पेटल्या आहेत. कालपर्यंत आमचं प्रेम अनुभवलं आता मशालीची धग काय ते बघा. मशालीच्या धगीमध्ये तुमचं कमळ कसं कोमेजतं ते बघा. तुम्ही कोण आम्हाला प्रमाणपत्र देणारे? शिवसेनेचा जन्म झाला तेव्हा तुम्ही कुठे होतात? तुम्ही कुठेतरी हिमालयात किंवा कुठेतरी रेल्वे स्टेशनवर असाल. शिवसेनाप्रमुखांनी कठीण काळात तुम्हाला सांभाळलं. अटलजींनी केराच्या टोपलीत गेला असतात तर दहा वर्षे भोगायला मिळाली नसती. ४८ पैकी ४२ खासदार दिले होते. शिवसेना बरोबर होती त्यामुळे त्या तख्तावर बसला होतात आता त्या तख्तापर्यंत आम्ही तुम्हाला पोहचू देणार नाही. तुमच्या भाजपाचा भाकड आणि भेकड जनता पक्ष झाला आहे. पैसे देऊन माणसं आणावी लागत आहेत. माझ्या सभेत कुणी पैसे घेऊन आलेलं नाही. याला प्रेम म्हणतात. देशातले सगळे प्रश्न संपले आहेत आणि फक्त महाराष्ट्रात शिवसेनाच शत्रू आहे असं तुम्हाला वाटतं.

काही जण प्रश्न विचारतात की शिवसेनेची मत काँग्रेसला, राष्ट्रवादीला ट्रान्सफर होणार का? होणार की नाही? कारण काँग्रेसच्या हातामध्ये मशाल आहे, काँग्रेसच्या हातात मशाल घेऊन चार जूनला आपल्याला विजयाची तुतारी फुंकायची आहे. जनतेच्या न्यायालयात न्याय मागण्यासाठी मी आलो आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवारांना लोकसभेत पाठवा आणि हुकूमशहांचे सरकार गाडून टाका.

# महाराष्ट्राचे बेजबाबदार शिंदे सरकार



जतिन देसाई

विनोद लक्ष्मण कोल... डहाणू तालुक्यातला हा आदिवासी. मासे पकडण्याच्या कामासाठी २०२२ मध्ये तो गुजरातच्या सौराष्ट्र येथे जातो. समुद्रात त्यांची मच्छिमारी बोट पाकिस्तानच्या पाण्यात आली असल्याचा आरोप करून पाकिस्तानच्या मेरिटाईम सिक्युरिटी एजन्सीने (एमएसए) त्याची व इतरांची धरपकड केली आणि बोट ताब्यात घेतली. १७ मार्चला विनोद यांचा पाकिस्तानच्या कराची येथील हॉस्पिटलात मृत्यू झालां. एक मे ला त्याचा मृतदेह त्याच्या अस्वाली गावी आणण्यात आला. त्याच्या घरातील लोक आणि जमलेले इतर वारली आदिवासी स्त्री-पुरुषांच्या दुःखांचा बांध फुटला. त्याची पत्नी सखू व मुलांना, सहाजिकच, दु:ख अनावर झालं. विनोद यांचा पार्थिव घेऊन गुजरात राज्याची रुग्णवाहिका आली तेव्हा डहाणूचे तहसीलदार, मत्स्य विभागाचे अधिकारी इत्यादी उपस्थित होते. गुजरातने गावापर्यंत मृतदेह पोचवण्याची व्यवस्था केली. प्रश्न पडतो तो हा की या दरम्यान महाराष्ट्र सरकार काय करत होतं. महाराष्ट्राचे आदिवासी गुजरातच्या बोटीवर मासे पकडायला अनेक वर्षापासून जातात. पण त्यांच्या बाबतीत महाराष्ट्र सरकार काय करतं? त्यांना समुद्रात पाकिस्तानच्या एमएसएच्या लोकांनी पकडलं तर राज्य सरकारकडून त्यांना लवकरात लवकर परत आणण्यासाठी काही पावलं उचलली पाहिजे, ही सर्वसामान्य लोकांची अपेक्षा असते. मात्र महाराष्ट्र सरकारसाठी हा मुद्दा महत्त्वाचा नाही. राज्य सरकारला त्यांच्याशी काही देणंघेणं नाही, असं एकूण चित्र आहे. आदिवासी, मच्छिमारांबद्दल सरकारात सहानुभूती, संवेदनशीलतेचा अभाव जाणवतो.

रोजगार हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. आदिवासी आणि मच्छिमार समाज राहतात त्या ठिकाणी तर बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात आहे. जगण्यासाठी आदिवासी इतर भागात जातात. ते मच्छिमार नसून गुजरातच्या बोटीत मासे पकडण्याच्या कामासाठी जातात. गुजरातच्या पोरबंदर, मांगरोळ, ओखा इत्यादी शहरातून या बोटी समुद्रात जातात. गुजरातच्या जवळ समुद्रात प्रदूषणामुळे मासे मिळत नसल्याने आंतरराष्ट्रीय सागरी सरहद रेषेपर्यंत (आयएमबीएल) ते जातात. कधी चुकून किंवा कधी अधिक मासे मिळण्याच्या आशेने ते पाकिस्तानच्या पाण्यात जातात आणि काही वेळा पकडले जातात. पकडले गेल्यानंतर साधारण दोन वर्ष पाकिस्तानच्या कराची तुरुंगात त्यांना राहाव लागतं. तुरुंगात अपूर्ण जेवण आणि इतर योग्य व्यवस्था नसल्याने अनेकदा मच्छिमार आजारी पडतात. व्यवस्थित औषध मिळत नसल्याने काही मच्छीमारांचा मृत्यू पण होतो. गेल्या वर्षी चार भारतीय मच्छिमारांच पाकिस्तानच्या तुरुंगात मृत्यू झालेलं. यावर्षी विनोद लक्ष्मण यांचा मृत्यू झाला अनुभव अशा आहे की मृत्यू झाल्यानंतर मृतदेह त्यांच्या गावी पोहोचायला किमान एक महिन्याचा वेळ लागतो. मृतदेह एका आठवड्याच्या आत भारतात येईल यासाठी भारत सरकारने अधिक सक्रिय प्रयत्न केले पाहिजे. पण हा समाज गरीब व मोठ्या प्रमाणात अशिक्षित किंवा अल्पशिक्षित आहे. त्यांचा राजकीय आवाज देखील नसल्याने त्यांच्या प्रश्नाकडे गंभीरतेने पाहिले जात नाही. तामिळनाडूच्या मच्छिमारांना अनेकदा श्रीलंकेचं नौदल पकडतं तेव्हा तामिळनाडूचे महत्त्वाचे पक्ष द्रमुक आणि अण्णद्रमुक आपसातले मतभेद बाजूला ठेवून भारत सरकारवर दबाव आणतात. महाराष्ट्राच्या मच्छिमारांना पाकिस्तानने पकडले तरी त्याबद्दल एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार एक शब्द देखील बोलत नाही किंबहुना त्यांना या प्रश्नाची जाण आहे की काय हाच मोठा प्रश्न आहे.

गुजरातच्या मच्छिमारांना पाकिस्तान पकडतं तेव्हा पहिल्यांदा पकडल्या गेलेल्या मच्छिमाराच्या कुटुंबाला तो जेवढे दिवस पाकिस्तानच्या तुरुंगात असेल तेवढे दिवस रोजच्या ३०० रुपये प्रमाणे त्याच्या कुटुंबाला सरकार आर्थिक मदत करते. ही रक्कम फारशी नसली तरी त्या कुटुंबाला काही प्रमाणात त्याची

मदत होते. मात्र गुजरातच्या मच्छिमार बोटीवरील महाराष्ट्र किंवा इतर राज्याच्या खलाशीला पाकिस्तानने पकडलं तर त्यांना ही आर्थिक मदत दिली जात नाही. यासंदर्भात मी अनेकदा प्रयत्न केला पण त्याला यश मिळालं नाही. शेवटी महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्याच्या पकडल्या गेलेल्या मच्छिमारांच्या बाबतीत गुजरात सारखाच निर्णय घेतला. गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात या संदर्भात शासन निर्णय झाला. शिंदे सरकारचा हा निर्णय पाहिल्यास कोणालाही वाटेल की वर्तमान सरकार पाकिस्तानने पकडलेल्या आपल्या राज्यातील लोकांबाबत संवेदनशील आहे. लोकांना दाखविण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला परंतु लोकांना मदत मिळणार नाही अशा स्वरूपाने तो तयार करण्यात आला. शासन निर्णय अशा स्वरूपांने लिहिला आहे की सरकारला मत्स्य व्यवसायाबद्दल काही माहितीच नाही, असं लोकांना वाटणं साहजिकच आहे. सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की या व्यवसायावर कोट्यावधी लोक जगतात. सरकारचे डोकं ठिकाणावर ठिकाण आहे का? हा प्रश्न कोणालाही पडावा.

२ ऑगस्ट २०२३ च्या शासन निर्णय क्रमांक: मत्स्यवि/प्र.क्र. ९५/ पदुम १४ ची सुरुवात अशी आहे "महाराष्ट्र राज्यातील मासेमारी नौका काही वेळेस पाकिस्तान देशाच्या सागरी हद्दीत नजरचुकीने प्रवेश करतात." वस्तुस्थिती ही आहे की, महाराष्ट्राच्या मासेमारी नौका पाकिस्तानच्या सागरी हद्दीच्या दिशेने मासे पकडायला जात नाही. सौराष्ट्रच्या मच्छिमार बोटी पाकिस्तानच्या दिशेने मासे पकडण्यासाठी जातात आणि काही वेळा नजरचुकीने पाकिस्तानच्या सागरी हद्दीत प्रवेश करतात. दुसरी मोठी चुक म्हणजे "संबंधित मच्छिमार/ खलाशी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. तसेच त्याच्याकडे महाराष्ट्र राज्याचा मासेमारी परवाना असावा." या अटींची पूर्तता करणाऱ्या खलाशी/ मच्छीमारांच्या कुटुंबांना उदरनिर्वाहासाठी प्रतिदिन ३०० रुपये याप्रमाणे आर्थिक मदत/ सहाय्य देण्यात येईल, असे म्हटले आहे. वस्तुस्थिती ही आहे की अशा स्वरूपाचा परवाना खलाशी /मच्छीमारांना नसतो, अशा स्वरूपाचा परवाना मच्छिमार बोटीला असतो. एवढी सरळ व सोपी माहिती देखील सरकारला नाही, याचं आश्चर्य वाटलं पाहिजे. लोकांना पैसे मिळू नये पण आपण काहीतरी करतो हे दाखवण्यासाठी हा निर्णय घेतला गेला की काय असा प्रश्न पडतो. मी या संदर्भात गेल्या वर्षी ९ ऑक्टोबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. १६ ऑक्टोबरला मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून 'आपला "ई-मेल" मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाला असून तो पुढील कार्यवाहीसाठी पशुसंवर्धन दुग्धविकास यांना पाठविण्यात आला आहे,' एवढं उत्तर आलं. "पुढील कार्यवाही" काय झाली याची अजूनही माहिती देण्यात आलेली नाही. वस्तुस्थिती ही आहे की पाकिस्तानने पकडलेल्या महाराष्ट्र राज्याच्या एकही मच्छिमार, आदिवासींच्या कुटुंबाला राज्य सरकारने प्रतिदिन ३०० रुपये प्रमाणे रक्कम दिलेली नाही.

जेव्हा कधी पाकिस्तान भारतीय मच्छिमारांना सोडतात तेव्हा अनेकदा त्यात महाराष्ट्राचे पण मच्छीमार, आदिवासी असतात. वाघा-अट्टारी सीमेवरून गुजरातच्या मत्स्य विभागाचे अधिकारी सुटलेल्या सगळ्या मच्छिमारांना सौराष्ट्राच्या वेरावळ येथे आधी घेऊन जातात. त्याठिकाणी पोलिस व इतर एजन्सी त्यांच्याशी आधी बोलतात आणि नंतर त्यांना त्यांच्या कुटुंबाला देतात. महाराष्ट्रच्या लोकांना बोटीचे मालक नंतर त्यांच्या गावी पोहोचविण्याची व्यवस्था करतात. साधारण भारतात प्रवेश केल्यानंतर महाराष्ट्राचे आदिवासी ६-७ दिवसानंतर आपापल्या गावी पोहोचतात. सुटून आलेले आदिवासी आपल्या घरी जाण्यासाठी उत्सुक असतात. त्यांचे नातेवाईक त्यांची वाट पाहत असतात. मी यापूर्वीही सांगितलं आहे की महाराष्ट्र सरकारने परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क करून वाघा-अट्टारी सीमेवरून आपल्या राज्यातील सुटून आलेल्यांना सरळ महाराष्ट्रात आणण्याची व्यवस्था केली पाहिजे. डहाणू किंवा तलासरी येथे पोलीस व इतर एजन्सीचे अधिकारी सुटून आलेल्यांशी बोलू शकतील अशी व्यवस्था सहज करता येईल. २९ एप्रिलला पाकिस्तान भारताच्या ३५ मच्छिमारांना सोडणार होतं. त्यात महाराष्ट्राच्या पाच आदिवासींचा समावेश होता. त्या सगळ्यांना आणण्यासाठी गुजरातच्या मत्स्य.विभागाचे अधिकारी अट्टारी येथे गेले होते. पण पाकिस्तानने आधी जाहीर करून देखील ३५ मच्छिमारांना सोडले नाही. महाराष्ट्राच्या आदिवासींना अट्टारीहून सरळ महाराष्ट्रात आणण्यासाठी राज्य सरकारने अधिकाऱ्यांना अमृतसरला पाठवले पाहिजे. त्या स्वरूपाची व्यवस्था महाराष्ट्र सरकारने केली पाहिजे. ही महाराष्ट्र सरकारची जबाबदारी आहे आणि ती पूर्ण केली पाहिजे.

सरकारने जर गंभीरतेने काही पावले उचलली तर या आदिवासींच्या यातना कमी करता येतील. पण महाराष्ट्र सरकारला आपल्याच आदिवासींची काळजी नाही. पाकिस्तानच्या तुरुंगात डहाणू, तलासरीचे सुमारे २० आदिवासी आहेत. त्यांच्या कुटुंबाची अतिशय वाईट अवस्था आहे. त्यांच्यासाठी जगणे कठीण झाले आहे. त्यांना सरकारकडून काही मदत मिळत नाही आणि रोजगाराची शक्यता नाही. मला असे आदिवासी तरुण माहीत आहे की ज्यांना आधी पाकिस्तानने पकडलेलं. पाकिस्तानच्या तुरुंगात दोनेक वर्ष ते होते. सुटून आल्यानंतर अन्य काही पर्याय नसल्यामुळे परत मासे पकडण्यासाठी ते गुजरातला गेले. त्याला एकमेव कारण म्हणजे डहाणू, तलासरी परिसरात रोजगाराची नसलेली संधी. परत आपली धरपकड होऊ शकते याची जाणीव असताना देखील ते मासे पकडायला जातात ही गोष्ट "पुरोगामी" महाराष्ट्रासाठी चांगली नाही. महात्मा गांधी "अंत्योदय" सांगत. शेवटच्या माणसाला आर्थिक व इतर धोरणात केंद्रात ठेवला पाहिजे. आताच्या सरकारच्या धोरणात शेवटच्या माणसाला स्थान नाही. आता आदिवासी, मच्छिमार समाजाने पुढाकार घेऊन सरकारला लोक विरोधी धोरण बदलण्यास भाग पाडले पाहिजे.

घंटाकर्ण






## केलं एक झालं भलतंच !

भारतीय राजकारणात दोन महिलांचा उदय होताना दिसत आहे. सुनीता केजरीवाल आणि कल्पना सोरेन अशी त्यांची नावे आहेत. महत्वाचे म्हणजे त्यांना सामान्यजनांकडून तुफान प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

सुनीता या दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी आहेत.

कल्पना या झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या पत्नी आहेत.

दोघींचे पति म्हणजेच अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन हे तुरुंगात आहेत. केंद्र सरकारच्या ईडी आणि तत्सम यंत्रणांनी या नेत्यांना तुरुंगात डांबले आहे. या यंत्रणा स्वतंत्र नाहीत. त्या केंद्र सरकारचा एक भाग आहेत. त्यामुळेच या यंत्रणा कुणाच्या हुकमाची अंमलबजावणी करीत आहेत किंवा कुणाच्या तालावर नाचत आहेत हे आता वेगळे सांगण्याची गरज नाही. या यंत्रणा अद्याप या मुख्यमंत्र्यांविरुध्द आरोपपत्र दाखल करु शकलेल्या नाहीत. परंतु मनी लाँडरिंग कायद्यानुसार या यंत्रणांना बेमुदत काळासाठी आरोपींना डांबण्याचा अधिकार वर्तमान सरकारने दिलेला आहे. त्यामुळेच हे नेते तुरुंगात आहेत.

ऐन निवडणुकीच्या काळात मुख्यमंत्र्यासारख्या राज्याचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीस खुनशीपणे आणि सूडबुध्दीने तुरुंगात टाकणे हे कोणत्याही लोकशाहीच्या सभ्यता, सुसंस्कृतपणा, शालीनता व शिष्टाचारात बसणारे नाही. परंतु या कोणत्याच गोष्टींशी वर्तमान राज्यकर्त्यांचा दूरदूरचा संबंध नसल्याने ते रानटीपणाने वागणेच अपेक्षित आहे. ते तसे वागतही आहेत.

अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिलेला नाही. परंतु त्यांचा पक्ष आम आदमी पार्टी उर्फ आप ला ते तुरुंगात असल्याचे निमित्त करुन सुरुंग लावण्याचा प्रयत्न भाजपने सुरु केला आहे. त्यांच्या नेत्यांची फोडाफोडी त्यांनी सुरु केली आहे. परंतु अरविंद केजरीवाल यांनी चतुराई दाखवून पत्नी सुनीता यांना आप साठी प्रचारात उतरण्यास सांगितले. आम आदमी पार्टीच्या प्रचाराची सर्व सूत्रे आता त्यांच्याकडे देण्यात आली आहेत. ही खेळी यशस्वी ठरली.

सुनीता केजरीवाल यांनी दिल्लीत पक्षाच्या प्रचारासाठी रोड शो केला आणि तो प्रचंड हिट झाला. त्यांना मिळालेल्या प्रचंड प्रतिसाद व सहानुभूतीमुळे भाजपचे नेतृत्व चिंतातूर झाले आहे.

आता ताज्या माहितीनुसार त्यांच्यासाठी दिल्ली विधानसभेच्या सुरक्षित मतदारसंघाचा शोध सुरु असून त्या लवकरच विधानसभा निवडणूकही लढवतील असा अंदाज आहे.

केवळ दिल्लीतच नव्हे तर दिल्लीबाहेर देखील त्या प्रचाराला जातील असे सांगण्यात येते.

तिकडे झारखंडमध्ये कल्पना सोरेन यांनी विधानसभा निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे.

जानेवारी महिन्यात रिकाम्या झालेल्या एका मतदारसंघात पोटनिवडणूक होत असून त्या तेथून



निवडणूक लढवतील असे सांगण्यात येते. कल्पना सोरेन यांना त्यांच्या झारखंड मुक्ति मोर्चा पक्षानेही स्वीकारले आहे. या पोटनिवडणुकीत त्या जिंकल्या तर त्यांना मुख्यमंत्री केले जाऊ शकते.

असे झाले तर तो एक इतिहास होईल. झारखंड हे आदिवासी बहुसंख्य राज्य आहे. आणि तेथे महिला मुख्यमंत्री झाल्यास भाजपचे बारा वाजतील असे भाकित वर्तविले जात आहे.

सध्या त्या जेथे जेथे प्रचाराला जातात तेथे त्यांना प्रचंड प्रतिसाद




आणि महिलांचा विशेषत्वाने प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

भाजपच्या सर्वोच्च नेतृत्वाने गेल्या दहा वर्षात सूडबुध्दीचे खुनशी राजकारण केले. ते काही प्रमाणात यशस्वी झाले असे म्हटता येईल. परंतु अति तेथे माति या नियमाप्रमाणे अशा राजकारणालाही कधी ना कधी दणका मिळतो.

आता भाजपला त्यांच्या या गलिच्छ राजकारणाला या दोन महिला नेत्यांच्या उदयामुळे चांगलेच प्रत्युत्तर व चपराक मिळाली आहे. त्यांना वाटले केजरीवाल व सोरेन या दोन मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकून त्यांचे राज्य बळकावता येईल. पण, झाले उलटेच.

भाजपलाच आणखी मार पडण्याची स्थिती निर्माण झाली आहे.

## भाजपची भेदभाव नीती उघड

भाजप हा मूलतः हिंदी भाषक प्रदेशातला पक्ष आहे. हिंदी, हिंदू, हिंदुस्तान ही त्यांची घोषणा आजही प्रचलित आहे. काऊ बेल्ट किंवा गोप्रदेश म्हणून उत्तर भारतातील राज्यांचे वर्णन केले जाते.

प्रामुख्याने हिंदी भाषक राज्यांचा यात समावेश होतो. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, छत्तीसगढ, बिहार, दिल्ली अशा हिंदी भाषक राज्यांचा यात मुख्यत्वे समावेश होतो. भाजपचा मूळ अवतार असलेला भारतीय जनसंघ हा पक्षही मुख्यतः या हिंदी भाषक पट्ट्यातच वाढला आणि तेथेच त्याने मूळ धरले. भाजपने दक्षिणेतील राज्यांना कधीच आपलेसे मानले नाही. किंबहुना भाजपनेत्यांना दक्षिणेतील राज्यांचे फार महत्वही कधी वाटले नाही आणि त्यांच्या नेत्यांकडून या दक्षिण भारताची उपेक्षाच झाली.

दक्षिणेपैकी कर्नाटक या दक्षिणेचा दरवाजा मानल्या गेलेल्या राज्यात जनसंघाने पाय रोवण्याचे प्रयत्न केले परंतु ते फारसे यशस्वी झाले नव्हते. मात्र जनता पक्षाच्या उदयानंतर तेथे भाजपला शिरकाव करण्यास वाव मिळाला. रा.स्व.संघाने देखील कर्नाटकात



भाजपचे पाय रोवण्यास मदत केली.

परंतु अविभाजित आंध्र प्रदेश (आता तेलंगणा व आंध्र), तमीळनाडू, केरळ या राज्यांमध्ये भाजपला फारसा शिरकाव करणे शक्य झाले नाही.

मोदी व शहा यांच्या जोडगोळीला दक्षिणेचेही वेध लागलेले दिसतात.

कर्नाटकात बीएस येद्युरप्पा यांनी लिंगायत समाजाच्या आधाराने भाजपला प्रथमच दक्षिणेतील राज्यात सत्ता प्राप्त करुन दिली. मात्र त्यांना ती टिकवता आली नाही. दक्षिणी राज्यांनी आपल्याला नाकारल्याने भाजपच्या नेतृत्वात या राज्यांबद्दल आकस निर्माण






झालेला आहे. भाजपच्याच गलिच्छ राजकारणापायी त्यांना कर्नाटकही गमवावा लागला आणि आता पुन्हा एकदा दक्षिणेतील कर्नाटक, तेलंगणा, आंध्र, तमीळनाडू व केरळ या राज्यातून भाजपची पीछेहाट झाली.

केंद्रात मोदी व शहा जोडगोळी सत्तेत असल्याने त्यांनी या राज्यांना कोंडीत पकडण्याचे राजकारण सुरु केले.

भाजपला स्वीकारत नाही तर मग तुम्हाला आर्थिक मदतही करणार नाही आणि राज्यपालांच्या मदतीने तुम्हाला राज्यकारभारही धडपणे करु देणार नाही असा खुनशीपणा भाजपनेतृत्वाने म्हणजेच दिल्लीश्वरांनी सुरु केला आहे.

त्यानुसार या राज्यांना त्यांच्या हक्काचा आपत्ती निवारणासाठी असलेला निधीच अडवून ठेवायचा, केंद्रीय महसुलातील त्यांच्या वाट्याचा निधीच अडवून ठेवायचा आणि त्यांची आर्थिक कोंडी करायची असले घाणेरडे उपदव्याप मोदी शहा जोडगोळीने सुरु केले आहेत.

केरळचे महामहिम राज्यपाल तर इतके महान की त्यांनी केरळ सरकारने राज्यासाठी संमत केलेल्या कायद्यांवर सही करण्यासच नकार दिला. ते कायदे अडवून ठेवले जेणेकरुन राज्य सरकारला कारभार करणेच अशक्य व्हावे.

मोदी व शहा यांच्या सरकारला वारंवार सांगूनही केंद्राकडून मिळणारा हक्काचा निधि मिळेना तेव्हा केरळ, कर्नाटक व तमीळनाडू या तीन राज्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

सर्वोच्च न्यायालयाने या राज्यांना न्याय दिला आणि दिलासाही दिला.

तमीळनाडू व कर्नाटक या दोन राज्यांना त्यांच्या हक्काचा निधि तत्काळ देण्याचे आदेश न्यायालयाने केंद्र सरकारला म्हणजेच मोदी सरकारला दिले. तसेच केरळच्या राज्यपालांना देखील राज्य सरकारने संमत केलेल्या कायद्यांवर सही करण्याचे आदेश दिले. त्यानंतर राज्यपालांनी पाच कायद्यांवर सही केली. भाजपला एखाद्या राज्याने स्वीकारले नाही आणि तेथे बिगर भाजपच्या सरकारला लोकांनी पसंती दिली तर भाजपच्या वर्तमान खुनशी नेतृत्वाला ते पचनी पडत नाही.

अशा बिगर भाजप सरकारला ते धडपणे, सुरळीत राज्य कारभार करु देत नाहीत. एकतर त्यांनी भाजपशी हातमिळवणी करावी असा प्रयत्न करतात. ते झाले नाही तर ते सरकार पाडण्याचे प्रयत्न सुरु केले जातात. त्या पक्षात फाटाफूट करुन तेथे भाजपचे बाहुले सरकार स्थापन करण्याच्या कारवाया सुरु केल्या जातात. या भाजपच्या गलिच्छ राजकारणाचे महाराष्ट्र हे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यामुळे राज्यघटनेने पुरस्कृत केलेल्या संघराज्य व्यवस्थेच्या जिवावरच भाजपचे नेतृत्व उठलेले दिसते.

त्यांना या निवडणुकीत चारशेच्या वर संख्याबळ हवे आहे ते राज्यघटना बदलण्यासाठी हवे आहे आणि ते ही व्यवस्थाच बदलण्याच्या तयारीत आहेत हे त्यांच्या या आतापर्यंतच्या राजकारणावरुन स्पष्ट दिसून येते.

२०२६ मध्ये लोकसभा मतदारसंघांची फेररचना होणे अपेक्षित आहे. यामध्ये उत्तर भारतातील राज्यांच्या लोकसभेच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत कारण तेथे लोकसंख्या नियंत्रणाचे काम प्रभावीपणे झालेले नाही.

दक्षिणेतील राज्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार



असल्याने तेथे लोकसंख्या नियंत्रण यशस्वी झाले आहे आणि या फेररचनेत त्यांच्या जागा कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे संसदेत किंवा राष्ट्रीय साधनसंपत्तीमधील त्यांचा वाटा देखील कमी होण्याची शक्यता आहे.

हा मुद्दा अत्यंत गंभीर आहे आणि यावरुन दक्षिणेतील राज्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे.

भाजपची ही पक्षपाती मनोवृत्ती देशाच्या एकात्मतेला घातक ठरेल. त्यामुळेच भाजपला आवर घालण्याची वेळ आली आहे.

## मलाही कुणी सहानुभूती देता का ?

आपल्या खुनशी आणि सूडबुध्दीच्या राजकारणामुळे भाजपनेतृत्वाने सर्वसाधारण जनमानसातील सहानुभूती गमावण्याची पाळी स्वतःवर आणली आहे.

अरविंद केजरीवाल व हेमंत सोरेन या दोन मुख्यमंत्र्यांना तुरुंगात धाडून भाजपने आपला सूड पूर्ण केला. पण परिणामी त्यांना सहानुभूती मिळाली. त्या दोघांच्या पत्नी जेथे जातात तेथे त्यांना जनतेकडून सहानुभूती मिळताना पाहून भाजपचे धाबे आता दणाणू लागले आहे. केले एक आणि त्याचा परिणाम झाला भलताच अशी त्यांची अवस्था आहे. अशा प्रकारची सहानुभूती आपल्यालाही मिळावी अशी इच्छा होणे स्वाभाविक आहे.

विशेषतः इतरांच्या चांगल्या गोष्टींवर जळणारे, मत्सराने पेटणारे असे जे लोक असतात त्यांना त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर अशी स्पर्धा किंवा बरोबरी करण्याची विलक्षण खुमखुमी असते. त्यांना सहानुभूती मिळते तर मला का नाही अशा ईर्षेने ते पेटतात आणि मग वेडगळपणा करु लागतात.

पंतप्रधानांनीही त्यांच्या प्रचारातून आता स्वतःबद्दल सहानुभूती निर्माण करण्यासाठी धडपड सुरु केली आहे. परंतु त्यांच्या हावभाव व बोलण्याच्या पध्दतीत इतका नाटकीपणा असतो की त्यावर विश्वास बसण्याऐवजी ते हास्यास्पद दिसू लागतात.

प्रचाराला कोणता मुद्दा नसल्याने आता त्यांनी त्यांच्याविरुध्द देशात कट केला जात आहे. त्यांना संपविण्याचा हा डाव आहे. या कटात केवळ देशातीलच नव्हे तर परदेशातील शक्तीही सामील आहेत असे सांगून ते छाती बडवतात आणि ते कुणाला घाबरत नाहीत असे सांगून स्वतःबद्दल सहानुभूती निर्माण करताना दिसत आहेत.

जगातले अनेक बडे बडे लोक या कटात गुंतल्याचेही ते नाटकी हावभाव व अभिनय करुन सांगताना दिसतात.




हे किती हास्यास्पद आहे ?

एकीकडे ते स्वतःला विश्वप्रिय, विश्वगुरु म्हणवून घेतात. त्यांची भक्तमंडळी तर त्यांना जगातले सर्वाधिक लोकप्रिय नेते म्हणून सर्वत्र प्रचार करीत असतात. काही भक्त मंडळी तर जगात कुठे युध्द होत असेल तर ते थांबविण्याची क्षमता मोदींनी दाखविल्याचा दावा करतात. (बहुधा मोदींची ही जादू गाझा आणि युक्रेनमध्ये चाललेली नसावी).

मोदींचीच पडछाया असलेले त्यांचे डावेउजवे हात असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तर एका सभेत सांगितले होते की जागतिक राजकारणात कोणताही निर्णय मोदींच्या संमतीखेरीज केला जात नाही.

आता सांगा, असा महाशक्तिशाली नेता असेल तर त्याला कुणाचे भय असेल किंवा असावे ?

एकीकडे ५६ इंची बडेजाव व फुशारक्या आणि दुसरीकडे अरे कुणी मला सहानुभूती देता का रे ? म्हणत काहीतरी कपोलकल्पित गोष्टी सांगायच्या हे किती हास्यास्पद आहे ?

पण इतरांबाबत घडलेली चांगली गोष्ट आपल्यालाही मिळाली पाहिजे अशी लालची, हव्यासी मनोवृत्ती असलेले लोक त्यासाठी हास्यास्पद पातळीवर उतरतात. त्याचाच हा एक नमूना मानावा लागेल.

## ३७० खतम केल्यानंतरही हिंमत नाही ???

जम्मू काश्मीरला विशेष दर्जा देणारी राज्यघटनेतली कलमे ३७० आणि ३५ (अ) ही रद्द करण्याची फार मोठी फुशारकी भाजप संघ परिवाराने मारली. यामुळे काश्मीर आता मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील झाल्याचे दावेही पक्षाने केले. आता भारताच्या इतर भागातील लोकांना देखील काश्मीरमध्ये जाऊन राहणे, जागा घेणे शक्य होईल अशा बाताही भाजप संघ परिवाराने मारण्यास सुरुवात केली. ही कलमे रद्द करुन पाच वर्षे होत आली आहेत. (ऑगस्टमध्ये होतील).

गेल्या पाच वर्षात काश्मीर खोऱ्यात कोणत्या सुधारणा झाल्या याची किंचितशी देखील माहिती मोदी सरकार देऊ शकलेले नाही.

याठिकाणी किती उद्योग निर्माण झाले, किती बाहेरचे लोक जाऊन राहू लागले याबद्दल जणू मोदी व शहांचा आवाजच बसलेला दिसतो.

त्यामुळे स्थिती ही आहे की काश्मीर खोऱ्यातली स्थिती आजही जैसे थे आहे. कलमे वगैरे रद्द करुन तेथील परिस्थितीत कोणताही गुणात्मक बदल किंवा सुधारणा झालेली नाही. आता लोकसभेच्या निवडणुका सुरु झाल्या आहेत. जम्मू काश्मीर व लडाख मिळून लोकसभेच्या सहा जागा आहेत. भाजप जम्मूतील दोन व लडाखमधील एक अशा तीन जागांवर लढत आहे.

काश्मीर खोऱ्यातील तीन जागांवर भाजपने न लढण्याचा निर्णय केला आहे.

अरेच्चा, एवढा सर्व आटापिटा केल्यानंतर आणि काश्मीर आता राष्ट्रीय प्रवाहात आल्याचा दावा असताना भाजप संघ परिवाराला तेथे निवडणुकीच्या रिंगणात उतरायची हिंमत न होण्याचे कारण काय ???




खरे तर भाजपने तर सर्वच्यासर्व जागा लढवून आणि जिंकून दाखवून द्यायला हवे होते की त्यांनी काश्मीरचा विशेष दर्जा खतम केल्यानंतर भाजपला कसा जोरदार पाठिंबा काश्मिरी जनता देत आहे. प्रत्यक्षात भाजप संघपरिवाराने तर चक्क काश्मीरमधून पळ काढलेला दिसतो. पण म्हणतात ना, पडलो तरी नाक वर, तसे भाजपतर्फे असे सांगितले जात आहे की काश्मीर खोऱ्यात ते देशभक्त, राष्ट्रवादी, शक्तींना पाठिंबा देतील. काश्मीर खोऱ्यात पीपल्स कॉन्फरन्स या पक्षाचे सज्जाद लोण बारामुल्ला येथून निवडणूक लढवीत आहेत. ते भाजपचे हस्तक मानले जातात. भाजपने त्यांना मुख्यमंत्री करण्याची देखील तयारी केली होती पण ते शक्य झाले नव्हते.

भाजपने पीडीपी (मेहबुबा मुफ्ती यांचा पक्ष), नॅशनल कॉन्फरन्स ( फारुक व उमर या अब्दुल्ला पितापुत्रांचा पक्ष) आणि काँग्रेस या तीन पक्षांना मते देऊ नका असे आवाहन मतदारांना केले आहे. आता देशभक्त कोण उरले असा प्रश्न निर्माण होतो.

काँग्रेसमधून बाहेर गेलेले आणि भाजपचे नवप्रेमी नेते गुलाम नबी आजाद हे अनंतनाग येथून निवडणूक लढविणार होते पण त्यांनीही आयत्यावेळी माघार घेतली. त्यामुळे आता भाजपला अनुकूल असे कोणते राजकीय पक्ष किंवा नेते काश्मीर खोऱ्यात आहेत हा एक शोधाचा विषय झालेला आहे.

आता असे सांगितले जाते की लोकसभेपेक्षा भाजपला विधानसभा निवडणुकीत अधिक रस आहे. त्यांना काश्मीरमध्ये भाजपचा झेंडा रोवायचा आहे आणि हिंदू मुख्यमंत्री करुन दाखवायचा आहे. कलमे रद्द करुन लोकांची मने बदलता येत नाही हा धडा भाजपला मिळायचा आहे.

## मुरली मनोहर जोशींची कानटोचणी की उपदेश

मुरली मनोहर जोशी हे भाजपचे आणि संघ परिवाराचे एक अतिशय ज्येष्ठ नेते आहेत. २०१४ नंतर त्यांची रवानगी मार्गदर्शक मंडळात करुन त्यांना सक्तीने निवृत्त करण्यात आले.

जोशी हे त्यांच्या सूचक, सांकेतिक शैलीबद्दल प्रसिध्द आहेत. ते थेट कुणाचे नाव घेऊन टीका करतील असा त्यांचा स्वभाव नाही. किंवा टिप्पणी करताना देखील ते थेट न करता एखादा दाखला किंवा उदाहरण देऊन करतात. त्यावरुन त्यांचा रोख कुणीकडे आहे हे लक्षात येते.

सध्या लोकसभा निवडणुकीची

धामधूम चालू आहे. या धामधुमीतच जोशी यांचा एक लेख समाजमाध्यमांवर गाजत आहे. प्रिन्सिपल्स ऑफ गव्हर्नन्स इन एन्शंट इंडिया या शीर्षकाचा हा लेख आहे. त्यामध्ये राज्यकारभाराची आधारभूत तत्वे कोणती असली पाहिजेत याचे वर्णन आहे. यासाठी त्यांनी रामायण, महाभारत आणि कौटिल्य अर्थशास्त्र या तीन प्राचीन ग्रंथांचा आधार घेतला आहे. या लेखातील त्यांची निरीक्षणे मात्र फारच सूचक आहेत आणि त्यांचा रोख कुणीकडे आहे हे लक्षात आल्याखेरीज रहात नाही. या लेखात त्यांनी राजधर्म म्हणजे काय आणि राज्यप्रमुखाची कर्तव्ये काय याची चर्चा या तीन ग्रंथांच्या आधारे केलेली आहे. त्यातील मुख्य भाग म्हणजे त्यांनी धर्म ही संज्ञा व्यापक अर्थाने वापरण्याचा सल्ला दिलेला आहे. धर्म म्हणजे सध्या प्रचलित असलेली संज्ञा नाही. तसेच रिलिजन या इंग्रजी शब्दाचा अर्थ धर्म लावणेही चुकीचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा दिसतो की दैवत्व, दैवी श्रध्दा, भक्ति यावर आधारित भावनांना धर्म ही संज्ञा देण्याचे प्रकार केले जातात. परंतु प्रत्यक्षात धर्म ही संज्ञा व्यापक आहे आणि तिचा प्रमुख आधार हा मनुष्याची जीवनशैली व नीतीतत्व हा आहे.



त्यामुळेच राजधर्म किंवा राज्यकारभार आणि श्रध्देवर आधारित धर्मकल्पना या परस्परांपासून विभक्त व वेगळ्या असल्या पाहिजेत असा निष्कर्ष त्यांनी या लेखात मांडला आहे.

गेल्या दहा वर्षात राज्यकारभार किंवा राजकारण आणि श्रध्देवर आधारित धर्मकल्पना यांच्या सरमिसळीमुळे किती मोठ्या प्रमाणात सामाजिक तणाव निर्माण करण्यात आले आहेत, त्यांचे रुपांतर हिंसेतही कसे झाले आहे हे लक्षात घेता जोशी यांच्या या लेखाचे महत्व लक्षात यावे.

याच मालिकेत त्यांनी इतर श्रध्दांना कमी लेखणे किंवा त्याच्याबद्दल अनुदारपणा, पक्षपात दाखविणे ही स्वविनाशाची सुरुवात असते असे नमूद केले आहे. राज्यप्रमुखाने एकतंत्री कारभार न करता व्यापक सल्लामसलतीच्या व विचारविनिमयाच्या आधारे राज्यकारभार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी रामायण व कौटिल्य अर्थशास्त्रातील दाखले देऊन नमूद केले आहे. मुरली मनोहर जोशी हे विद्वान आहेत आणि विज्ञानात त्यांनी डॉक्टरेट मिळविलेली आहे. ते अलाहाबाद विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यांनी अत्यंत विद्वत्ताप्रचुर असा हा लेख लिहिलेला आहे हे निर्विवाद आहे.

परंतु ज्याप्रमाणे दान हे सत्पात्री करावे असे म्हटले जाते तसेच उपदेश देखील सत्पात्री करावा. जे सुशिक्षितच नाहीत, ज्यांच्या शिक्षणाबद्दलच शंका आहेत त्यांच्याकडून हे विद्वत्तापूर्ण विवेचन समजून घेतले जाण्याची अपेक्षा करणे ही महान चूक आहे.

## ससेमिरा शिथिल झाल्याची लक्षणे

असे सांगितले जाते की अरविंद केजरीवाल यांच्या अटकेनंतर त्याची झालेली प्रतिक्रिया पाहता केंद्र सरकारने म्हणजेच मोदी व शहा सरकारने केंद्रीय तपास यंत्रणांच्या ससेमिऱ्यावर थोडासा लगाम लावलेला दिसतो.

किमान निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विरोधी पक्षांना सहानुभूती मिळेल अशी कोणतीही कारवाई



करायची नाही असा पवित्रा मोदी शहा सरकारने घेतलेला दिसतो.

तरीही स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना दमबाजी करण्याचे प्रकार सुरु आहेतच आणि महाराष्ट्रात विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निमित्ताने हे स्पष्ट झाले आहे. परंतु हेमंत सोरेन व अरविंद केजरीवाल यांच्या अटकेनंतर त्या दोघांच्या पत्नींना जी सहानुभूती मिळाली ती पाहून बहुधा भाजपचे डोळे उघडले असावेत.

अर्थात या नव्या रणनीतीनुसार विरोधी पक्षांचे जे प्रमुख नेते आहेत त्यांच्याविरुध्दच्या कारवायांची गति मंद करण्यात आली आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचे भाचे व उत्तराधिकारी अभिषेक बॅनर्जी यांच्याविरुध्द कारवाई सध्या स्थगित आहे. रोहित पवार यांच्याविरुध्दही कारवाई करण्याचा केंद्राचा इरादा होता. परंतु बदलती राजकीय हवा पाहून बहुधा मोदी शहा सरकारने आपला मनसुबा बदलला असावा. सत्तापक्षाला या निवडणुकीतील बदलत्या हवेची जाणीव झालेली आहे. त्यामुळेच तूर्तास कोणत्याही कारवाईची घाई न करण्याचा त्यांचा विचार दिसतो. न जाणो, निकाल वेगळेच लागले तर पंचाईत नको या विचाराने त्यांनी त्यांच्या तपासयंत्रणांना आस्तेकदम जाण्याच्या सूचना दिल्याचे कळते.

■■■

जाता जाता फिरस्ता


# ही घबराहट कशासाठी?

लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाच्या काही फेऱ्या पार पडल्या आहेत. या निमित्ताने काही गोष्टी समोर आलेल्या आहेत ज्या चिंता उत्पन्न करणाऱ्या आहेत. सर्वात महत्वाची बाब निवडणुकीत झालेल्या मतदानाबद्दल आहे. त्याचबरोबर सत्तापक्षाकडून सुरु झालेल्या उघडउघड निवडणूक आचारसंहितेच्या भंगाची बाबही तेवढीच चिंताजनक आहे. सत्तापक्षाने प्रचाराची पातळी किती खालच्या पातळीची गाठली आहे याची उदाहरणे रोजच समोर येत आहेत.. या अत्यंत हलक्या, सवंग आणि निम्नस्तरीय प्रचाराचे नेतृत्व देशाचे पंतप्रधान करीत आहेत हे या देशाचे दुर्दैव आहे. उघडउघड धार्मिक प्रतीकांचा वापर करुन मते मागण्याचा सपाटा भाजपच्या सर्वोच्च नेतृत्व जोडगोळीने लावला आहे आणि निवडणूक आयोगाने सोयीस्करपणे मुके, बहिरे आणि अंध असल्याचे सोंग घेतले आहे. निवडणूक आयोगाच्या या बोटचेप्या, पक्षपाती भूमिकेमुळेच निवडणुकांच्या निःपक्षतेबद्दल शंका निर्माण होणार आहेत. निवडणूक आयोगाने गेल्या दहा वर्षात पक्षपातीपणाचा जो कळस केला की अखेर सर्वोच्च न्यायालयास त्यांना चार खडे बोल सुनावण्याची पाळी आली. निवडणूक आयोगाची घटनात्मक स्वायत्तता टिकविण्यासाठी निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीच्या प्रक्रियेतील सरकारी वरचष्मा कमी झाला पाहिजे अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयाने घेऊन या प्रक्रियेत पंतप्रधानांबरोबर देशाच्या सरन्यायाधीशांनाही त्या प्रक्रियेत स्थान देण्याची सूचना केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेला कायद्याचे स्वरुप प्राप्त असते आणि त्यामुळे हा प्रकार टाळण्यासाठी मोदी-शहा सरकारने तत्काळ संसदेद्वारे कायदा संमत करविण्याची घाई केली आणि निवडणूक आयुक्तांच्या नेमणूक प्रक्रियेतून सरन्यायाधीशांना वगळले. या कायद्यावर राष्ट्रपतींनी अतितातडीने स्वाक्षरी करुन त्यावर शिक्कामोर्तब केले. जर सत्तापक्षाला









खुल्या, निःपक्ष आणि निकोप पध्दतीने निवडणुका घ्यायच्या असत्या तर त्यांनी असा प्रकार केला नसता. परंतु ज्यांच्या मनात खोट आहे, काळेबेरे आहे ती मंडळी असल्या कारवाया करतात. एकीकडे पंतप्रधान ज्या प्रायोजित मुलाखती देत आहेत. त्यात ते राज्यघटना बदलली जाणार नसल्याची ग्वाही देतात आणि दुसरीकडे निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेला स्वतःची बटीक बनविण्याचे उद्योग करतात हे कोणत्या राजकीय संस्कृतीत किंवा राजकीय नैतिकतेत बसते हे त्यांनी आणि संघ परिवाराने स्पष्ट करण्याची वेळ आली आहे. मतदारांनीच त्यांच्याकडे यासाठी जाब मागण्याची पाळी आली आहे.




केलेला आढळतो. आता एखाद्या नेत्याने निवडणूक आचारसंहितेचा भंग केल्याचे आढळल्यास आयोगातर्फे त्या नेत्यास थेट नोटिस पाठवली जात नाही. तर तो ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करतो त्या पक्षाच्या अध्यक्षाला नोटिस पाठविण्यात येऊन खुलाश्याची मागणी केली जाते. पंतप्रधानसाहेबांनी त्यांच्या प्रचारसभांमध्ये धार्मिकतेबरोबरच अल्पसंख्यक समाजाबद्दलही काही तारे तोडलेले आहेत. त्याबाबत तक्रारी झाल्यानंतर






गेल्या निवडणुकीपर्यंत आयोगातर्फे आधीपासून प्रचलित असलेल्या गोष्टींनुसार कामकाज चालविले जात असे. वर्तमान आयोगाने दोन महत्वपूर्ण बदल केलेले आढळतात. ते का आणि कुणाच्या अधिकारात केले याचा खुलासा झालेला नाही. परंतु दोन बदल हे सूचक आणि महत्वाचे आहेत आणि आयोगाच्या निःपक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहेत. ज्या उमेदवाराकडून निवडणूक आचारसंहितेचा भंग झाला असेल त्याला थेट नोटिस बजावण्याची पध्दती आतापर्यंत रूढ होती. या निवडणुकीच्या निमित्ताने आयोगाने स्वतःच्या अधिकारात त्यात बदल




आयोगाने पंतप्रधानांच्या पक्षाचे म्हणजे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांना नोटिस पाठविलेली आहे. राहूल गांधी यांच्याविरुध्दच्या तक्रारींबाबत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना नोटिस पाठविण्यात आली आहे. हा बदल का करण्यात आला, कुणाच्या सांगण्यावरुन करण्यात आला आणि त्याआधी निवडणूक आयोगाने कुणाबरोबर सल्लामसलत केली होती काय असे प्रश्न यानिमित्ताने निर्माण झालेले आहेत. कारण निवडणूक आचारसंहितेचा संबंध

थेट राजकीय पक्षांशी आहे आणि ही आचारसंहिता सर्व राजकीय पक्षांच्या सर्वसंमतीनेच तयार करण्यात आलेली असताना आयोगाने त्यात परस्पर बदल कसे केले किंवा त्या बदलासाठी राजकीय पक्षांची परवानगी तरी घेतली होती काय असे विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. पंतप्रधान असोत किंवा राहूल गांधी असोत, ते त्यांच्या पक्षाचे उमेदवारही आहेत आणि निवडणूकही लढत आहेत. त्यांनी आचारसंहितेचा भंग केल्याचे आढळून आल्यास त्याचा परिणाम त्यांच्या उमेदवारीवरही होणार आहे. अशा स्थितीत वाटेल तसा अनुचित आणि अयोग्य प्रचार करण्यासाठी उमेदवारांना मोकळे रान देण्याची आणि उमेदवारांना अशा अनुचित प्रचाराबद्दल जबाबदार धरण्याऐवजी त्यांच्या पक्षाच्या अध्यक्षाला त्यात गोवायचे हा कोणता प्रकार निवडणूक आयोगाने अमलात आणलेला आहे हे एक कोडे आहे. म्हणजेच पंतप्रधानांसारख्या उच्चपद:स्थाने कसाही घाणेरडा प्रचार केला तरी त्याला मोकाट प्रचार करु देणे आणि त्यांच्या पक्षाच्या अध्यक्षाला त्यात अडकवून ठेवायचे हा निवडणूक आयोगाच्या कारभाराचा अजब आणि अनाकलनीय नमूना मानावा लागेल. परंतु वेडेपणातही एक सूत्र किंवा पध्दती (मेथड इन मॅडनेस) असते. त्यामुळे निवडणूक आयोगाने आचारसंहितेत केलेली ही ढवळाढवळ जाणूनबुजून आणि हेतुपूर्वक केलेली आहे. असला निवडणूक आयोग विश्वासपात्र कसा मानता येईल असा प्रश्न आहे.

निवडणूक आयोगाचा आणखी एक अनाकलनीय निर्णय चक्रावून टाकणारा आहे. मतदान झाल्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी निवडणूक आयोगातर्फे मतदानाची टक्केवारी सांगण्याची पध्दत चालू होती. सर्वसाधारणपणे मतदानाची वेळ सायंकाळी सहा पर्यंतची असल्याचे गृहीत धरुन निवडणूक आयोगातर्फे दिवसभरात झालेल्या मतदानाची टक्केवारी त्याच दिवशी सायंकाळी सातनंतर जाहीर केली जाण्याची पध्दत आयोगाच्या स्थापनेपासून चालत आलेली आहे. जेव्हा यांत्रिकीकरण किंवा संगणकीकरण झालेले नव्हते तेव्हापासून ही पध्दत प्रचलित होती आणि त्यात कोणतेही फारमोठे फेरबदल होत नसत. आता या निवडणुकीपासून निवडणूक आय़ोगाने मतदान झाल्यानंतर लगेचच त्याच दिवशी सायंकाळी मतदानाची टक्केवारी देण्याची पध्दतच बंद करुन टाकली आहे. पंतप्रधानांच्या भाषेत सांगायचे झाल्यास आता आपण डिजिटल युगात आहोत. मतदान यंत्रांच्या द्वारे होते आणि त्याची मोजणीही आपोआप स्वयंचलित पध्दतीने होते. असे असतानाही निवडणूक आयोगाला मतदानाची टक्करेवारी देण्यात कसली अडचण येऊ लागली आहे असा प्रश्न सामान्य मतदारहाला पडल्याखेरीज राहणार नाही. निवडणूक आयोगाने परस्पर ही पध्दत बंद केलीच आहे परंतु वर हेही सांगितले आहे




की मतदानाची निश्चित टक्केवारी देण्यासाठी अकरा दिवसांचा अवधी लागेल. हे गूढ आणि अनाकलनीय आहे. एकविसाव्या शतकात आणि संगणकीय युगात निवडणूक आय़ोग मध्ययुगीन आणि यंत्र-तंत्रहीन असल्यासारखे निर्णय करु पहात असेल तर त्या निवडणूक आयोगावर विश्वास ठेवता येणार नाही. याचा अर्थ काहीतरी काळेबेरे कऱण्याचे काम सुरु झालेले आहे.

नागालँडमधील यासंबंधीचे उदाहरण पुरेसे बोलके आहे. विशेष म्हणजे माध्यमांनी देखील त्यासंबंधी बातम्या दिलेल्या आहेत. नागालँडमध्ये लोकसभेची एकच जागा आहे. या जागेसाठी दुसऱ्या टप्प्यात मतदान झाले. परंतु ईस्टर्न नागा पीपल्स ऑर्गनायझेशन या संघटनेने पूर्व नागालँडला स्वायत्तता मिळावी यासाठी आंदोलन सुरु केलेले आहे आणि केंद्र सरकार तसेच राज्य सरकार त्यांच्या मागणीबाबत कोणतीच पावले उचलत नसल्याने त्यांनी सर्व निवडणुकांच्या मतदानांवर बहिष्काराचे धोरण अमलात आणलेले आहे. या पूर्व नागालँडमध्ये सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. नागालँडमधील लोकसंख्येपैकी एक-तृतीयांश लोक या भागात राहतात. लोकसभेच्या मतदानाच्या वेळीही या सहा जिल्ह्यांनी मतदानावरील बहिष्कार कायम ठेवला होता. म्हणजेच तीस टक्के लोकांनी मतदान केले नसल्याचे तेथील निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. उर्वरित सत्तर टक्के भागातही यावेळी मतदान



फारसे झालेले नाही कारण मणिपूरमधील हिंसाचाराने प्रभावी असा हा भाग आहे. एवढे होऊनही निवडणूक आयोगाने या राज्यात ५६ टक्के मतदान झाल्याचे सांगितले आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत नागालँडमध्ये ८४ टक्के मतदान नोंदले गेले होते. म्हणजे निवडणूक आयोगाने गेल्या मतदानाच्या आधारे बरोब्बर एक-तृतीयांश कमी करुन यावेळी ५६ टक्के मतदान झाल्याचे जाहीर कसे केले हा प्रश्न आहे. जेव्हा या सहा जिल्ह्यांमधून शून्य टक्के मतदान झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या तेव्हा मतदानाची टक्केवारी देण्यासाठी अकरा दिवसांचा अवधी लावणाऱ्या निवडणूक आयोगाने नागालँडमबाबत मात्र तत्परता दाखवीत तेथे ५६ टक्के मतदान झाल्याचे जाहीर केले. २०१९च्या ८४ टक्के मतदानातून एक-तृतीयांश म्हणजे २८ टक्के वजा केल्यास ५६ ही संख्या येते. आता हे उदाहरण समोर असताना निवडणूक आयोग हा विश्वासपात्र मानायचा का असा प्रश्न निर्माण झाल्याखेरीज रहात नाही. यावर्षी असाधारण उन्हाळा आहे. हवामान विभागाने तीव्र उन्हाळा आणि उष्मतेच्या लाटांचे इशारे दिले आहेत. महाराष्ट्रातही नेमक्या या उष्णतेच्या लाटांच्या काळातच आणि तेही विदर्भासारख्या उष्म्याच्या प्रदेशात मतदान झाले. दुपारी चार पर्यंत मतदानाची टक्केवारी तीस ते पस्तीस टक्के असल्याचे सांगितले जात होते. परंतु मागाहून काय जादू झाली हे माहिती नाही परंतु ही टक्केवारी साठ ते ६३ ते ६६ टक्क्यांच्या जवळपास जाऊन थांबली. या मतदारसंघांमधूनही मतदानाच्या टक्केवारीचे आकडे फुगवलेले असल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत. यासंदर्भात काही अनुभवी व्यक्तींनी असे सांगितले की जेथे सत्तापक्षाच्या उमेदवाराच्या हमखास पराभवाची खात्री असेल तेथे मतदानाची टक्केवारी फुगवली जाते आणि त्या नकली फुगवट्याच्या आधारे संबंधित उमेदवाराला विजयी घोषित केले जाते. एकीकडे असा आव आणायचा की आम्ही अधिकाधिक नागरिकांनी मतदानात सहभाग घ्यावा म्हणून प्रयत्न करीत आहोत आणि दुसरीकडे या अशा कारवाया करायच्या याला खुल्या निवडणुका म्हणता येणार नाही. मुळात तंत्रज्ञान एवढे आधुनिक झालेले असताना भारतात सातसात फेऱ्यांमध्ये निवडणूक विभागण्याचे कारण काय हे समजावून घ्यावे लागेल. कारण मोदींच्याच भाषेत भारत हा अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेला देश आहे आणि त्यांच्या नेतृत्वाखाली तर देशाने तंत्रज्ञान क्रांति केलेली असताना निवडणुकांच्या वेळी मात्र लोकांना मतदानाच्या मोजक्या फेऱ्या ठेवून मोकळे करण्याऐवजी सातसात फेऱ्यांमध्ये गुंतविण्याचे रहस्य किंवा गुपित काय आहे याचा खुलासा त्यांनी करावा. अनेक तंत्रज्ञान तज्ञांनी देशभरातील ही निवडणूक केवळ दोन किंवा फारतर तीन फेऱ्यांमध्ये घेणे शक्य आहे असे मत व्यक्त केले आहे. त्यामुळेच निवडणूक आयोगाने तीव उन्हाळ्याबाबत हवामान विभागाने इशारे दिलेले असतानाही निवडणूक प्रक्रिया पूर्ण दोन महिने चालविण्यामागील हेतु काय हे स्पष्ट व्हावे लागेल. निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करताना निवडणूक आयोगाला हवामान विभागाशी देखील सल्लामसलत करावी लागते आणि ती केली जाते. यावेळी तशी सल्लामसलत केली गेली होती काय आणि तशी सल्लामसलत झाली असेल तर निवडणूक आय़ोगाने तीव्र उन्हाळ्यात दोन महिन्यांची दीर्घ अशी निवडणूक प्रक्रिया अमलात आणण्याचे कारण काय या प्रश्न नव्हे तर शंकांचे निरसन करण्याची आवश्यकता आहे.

निवडणूक आचारसंहितेच्या भंगाबद्दलही निवडणूबक आयोग सोयीस्करपणे भूमिका घेताना दिसत आहे. नारायण राणे यांच्यासाठीच्या प्रचारसभेत केंद्रीय गृहमंत्र्यांनी जय श्रीरामच्या घोषणा देत राणे यांच्यासाठी मते मागितली. प्रभु रामचंद्र, अयोध्येतील राम मंदिर, अल्संख्यक समाजाबद्दलच्या विद्वेषपूर्ण अशा टिप्पण्या यांच्या आधारे बिनधास्त, बेलगाम आणि बेगुमान प्रचार केला जात आहे. मोदी-शहा जोडगोळी या कोडग्या प्रचाराचे नेतृत्व करीत आहेत. धर्म, जाति, संप्रदाय, धार्मिक प्रतीके, धार्मिक श्रध्दा यांच्या आधारे मते मागणे निवडणूक आचारसंहितेनुसार वर्ज्य आहे. परंतु मोदी-शहा जोडगोळीकडून त्याचा सर्रास भंग केला जात आहे. या प्रकाराची दखल घेणे दूरच परंतु निवडणूक आयोग मुके, बहिरे आणि अंध असल्याची भूमिका घेत आहे. राजस्थानातील सभेत देशाचे पंतप्रधान अल्पसंख्यक समाजाची थेट

देशाचे उपपंतप्रधानही होते. आपण किती लोकप्रिय आहोत हे दाखविण्यासाठी त्यांनी हरयाणा, पश्चिम उत्तर प्रदेश आणि राजस्थान या तीन राज्यातील तीन मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. ते जाट होते आणि या तिन्ही मतदारसंघात जाट बहुसंख्यक मतदार होते. खुद्द पंतप्रधानांनीही वडोदरा आणि वाराणसी या दोन्ही ठिकाणाहून निवडणूक लढवली होती. तेव्हा कुणी त्यांची चेष्टा केली नव्हती. परंतु राहूल गांधी यांनी असे काही केले की त्यांची चेष्टा आणि मोदींनी केले की ते महान असला अत्यंत तद्दन भंपकपणा भाजपने आणि मोदींनी राजकारणात आणलेला आहे. निवडणूक ही रंगतदार असावी परंतु त्यामध्ये गांभीर्य आणि पोक्तपणा असणेही तितकेच आवश्यक मानले जाते. एकमेकांवर टीकाटिप्पण्या केल्या जातात. परंतु कमरेखाली वार करण्याचे टाळले जाते. परंतु मोदी-शहांनी प्रचाराची पातळी रसातळाला नेली आहे.




पाकिस्तानी असल्याची गणना करतात आणि त्याबद्दल तक्रार करुनही निवडणूक आयोगाकडून कोणतीही तातडी दाखवली जात नाही हे अतर्क्य आहे. परंतु असाच प्रकार एखाद्या विरोधी पक्षनेत्याने केला तर निवडणूक आयोगाच्या तत्परतेला व कार्यक्षमतेला विलक्षण गति प्राप्त होते. त्यामुळेच आयोगाच्या निःपक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते.

काँग्रेस नेते राहूल गांधी यांनी रायबरेली मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला आहे. याआधी त्यांनी केरळमधील वायनाड मधूनही उमेदवारी अर्ज भरला होता. ते दोन मतदारसंघातून निवडणूक लढवीत आहेत. हा अधिकार सर्वांना आहे. चौधरी देवीलाल हे मोठे किसान नेते होते. ते

आपल्या प्रतिस्पर्ध्यांबाबत खोट्यानाट्या गोष्टी सांगून मतदारांना भ्रमित करणे किंवा त्यांची दिशाभूल करणे हे प्रकारही सर्रासपणे या जोडगोळीकडून चालू आहेत. यासंदर्भात मोदी काँग्रेसच्या जाहीरनाम्याबाबत ज्या खोट्यानाट्या अफवा पसरवीत आहेत ती बाब आक्षेपार्ह आहे. काँग्रेस सत्तेत आल्यास सर्वांची संपत्ती, बँकांमधील ठेवी जप्त करतील, तुमचा पैसा काढून घेतील आणि ते पैसे ज्यांना जास्त मुले होतात आणि असतात त्यांना वाटणार असल्याचा घाणेरडा व खोटा प्रचार ते करीत आहेत. त्यांचा हा खोटेपणा आता लोकांच्याही लक्षात येऊ लागला आहे. कारण स्वातंत्र्यानंतर दीर्घकाळ या पक्षाने देशावर राज्य केले होते आणि त्या काळात

कधीही त्यांनी सामान्यजनांचे पैसे जप्त करण्यासारखा प्रकार केलेला नव्हता. आणीबाणीच्या काळात एक प्रकार घडला होता. ग्रामीण भागात गहाण पडलेल्या आणि त्यापोटी जबरी व्याज व पैसे वसून करणाऱ्या सावकारांना धडा शिकविण्यात आला होता आणि कर्जवसुलीनंतरही गरीबांना फसविणाऱ्या व पैसे उकळणाऱ्या सावकारांना शिक्षा करण्यात आली होती. त्यामुळेच इंदिरा गांधी यांनी गरीब जनतेच्या मनावर अधिराज्य गाजविले होते आणि गरीब व पीडित जनता त्यांना नेत्या मानत होती. राहूल गांधींनी संपत्तीच्या समान वाटपाचा सिध्दांत मांडताना जनसामान्यांच्या पैशावर डल्ला मारण्याची भाषा केलेली नाही. उलट देशाची जी संपत्ती मूठभरांच्या हातात केंद्रित आहे तिचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रस्ताव केला आहे. त्याचप्रमाणे गरीब कुटुंबांची संख्या निश्चित करुन त्या कुटुंबातील एका महिलेच्या खात्या वर्षाला एक लाख रुपये भरण्याच्या



योजनेचा प्रस्तावही त्यांनी केला आहे. प्रतिस्पर्ध्यांच्या जाहीरनाम्याचा, त्यातील आश्वासनांचा तसेच प्रतिस्पर्धी नेत्यांच्या वक्तव्यांचा विपर्यास करण्याची कला मोदी-शहा जोडगोळीने अवगत केली आहे. विरोधी पक्षांबद्दल वाटेल ते खोटेनाटे बोलण्याचे कौशल्यही त्यांनी आत्मसात केले आहे. यामुळे मतदारांना भ्रमित करणे सोपे जाईल असा त्यांचा एकूण खाक्या आहे. परंतु आता मतदार अडाणी किंवा ते म्हणतील त्यावर विश्वास ठेवण्याइतके भोळे राहिलेले नाहीत. दहा वर्षे जनतेने या जोडगोळीला सहन केले आहे. त्यांच्या युक्त्या, चलाख्या आणि महागाई-बेकारीसारख्या मुख्य मुद्यांना बगल देण्याच्या सवयी याची मतदारांना चांगलीच जाण झाली आहे व ते आता सहजासहजी या जोडगोळीच्या अपप्रचाराला बधणार नाहीत याची जाणीव भाजपला झालेली आहे आणि त्यातून अस्वस्थता निर्माण होताना दिसत आहे.

जोडगोळीच्या प्रचाराला पूर्वीसारखा प्रतिसाद मिळेनासा झाला आहे आणि मतदानाचे प्रमाणही सरासरी तीन ते सहा टक्क्यांनी कमी होत असल्याचे आतापर्यंतच्या मतदान फेऱ्यांवरुन आढळून येत आहे. तिसऱ्यांदा निवडणूक लढवताना विक्रमी मतांसाठी बाजी लावलेल्यांना मतदारांच्या उदासीनतेमुळे पोटा गोळा आला आहे आणि ते धास्तावले आहेत. या पार्श्वभूमीवर आतापर्यंत झालेल्या मतदानाच्या फेऱ्यांच्या संभाव्य फलिताबाबत अंदाज लावले जाऊ लागले आहेत. काही नोकरशहा तसेच पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हालचाली पाहता भाजपला आता निवडणूक निकालांबद्दल चिंता वाटू लागली आहे. गोरखपूर येथे काम केलेल्या आणि गोरखपूरचे शहेनशहा व किंवा सर्वेसर्वा असलेले मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची मर्जी असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार उत्तर प्रदेशात भाजप जास्तीतजास्त ४० जागा मिळविण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशात लोकसभेच्या ८० जागा आहेत आणि भाजपने गेल्या निवडणुकीत मित्रपक्षांसह ७४ जागांवर कब्जा केलेला होता. परंतु आताच्या या निवडणुकीत भाजपला तेवढे संख्याबळ प्राप्त होईल अशी शक्यता नाही असे या अधिकाऱ्याचे म्हणणे पडले. यात किती तथ्य आहे हे ४ जूनला निकाल लागतील तेव्हा स्पष्ट होईल. परंतु याचा एक अर्थ लक्षात घ्यावा लागेल की उत्तर प्रदेशात भाजपच्या जागा कमी होऊ शकतात.

महाराष्ट्रातील स्थितीही रंजक असेल अशी चिन्हे आहेत. विदर्भात दहापैकी भाजपला जेमतेम दोन ते तीन जागा मिळतील असे जाणकारांचे मत आहे. चंद्रपूर मतदारसंघात राज्यातील मंत्री सुधीर मुनगंटीवार हे पराभूत होऊ शकतील अशी परिस्थिती असल्याचे जाणकार सांगतात. हिंगोली, वाशिम, वर्धा, अमरावती या जागा भाजप गमावण्याच्या स्थितीत असल्याचे सांगितले जाते. काहीजणांनी तर थोडे पुढे जाऊन असेही सांगितले की विदर्भातून भाजपला फक्त दोन जागा (दहांपैकी) मिळू शकतील. मराठवाड्यात महाविकास आघाडीची स्थिती मजबूत असल्याचीही जाणकारांची माहिती आहे. नांदेड, लातूर येथे भाजप्रणित महायुतीचे उमेदवार




धोक्यात असल्याची माहिती आहे. पश्चिम महाराष्ट्रातही महायुतीमधील सुंदोपसुंदी कमी होण्याऐवजी वाढताना दिसते. महाआघाडीला नावे ठेवता ठेवता भाजपप्रणित महायुतीत असंतोष मोठ्या प्रमाणात आहे. त्याला कारणेही आहेत. महायुतीमध्ये भाजप हा प्रमुख पक्ष आहे. त्यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या फुटीर गटांबरोबर आघाडी केलेली आहे. हे गट राज्यापुरते मर्यादित व प्रादेशिक स्वरुपाचे आहेत. त्यांचा खरा रस हा लोकसभेपेक्षा आगामी विधानसभेच्या निवडणुकीत अधिक आहे. ते लोकसभेच्या किती जागा जिंकतात त्यावर त्यांना विधानसभा निवडणुकीसाठी किती जागा मिळतील याचे गणित बसवले जाणार आहे. त्यासाठी त्यांचा आटापिटा सुरु झालेला आहे. लोकसभेच्या जेवढ्या जागा ते जिंकतील त्या प्रमाणात त्यांना विधानसभेच्या जागांसाठी दावा करता येईल. परंतु भाजप हा राष्ट्रीय पक्ष आहे. त्यांना लोकसभेत तर रस आहेच परंतु महाराष्ट्रासारखे राज्य देखील त्यांना त्यांच्या हताता हवे आहे. परंतु त्यासाठी त्यांना आघाडी राजकारण फारसे लाभकारक ठरणार नाही. त्यासाठी त्यांना स्वबळाच्या सत्तेची इच्छा आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत या फुटीर गटाला जास्त जागी विजय मिळू नये  की जेणेकरुन त्यांना विधानसभा निवडणुकीसाठी जास्त जागांवर दावा करण्याची संधी मिळू नये यासाठी त्यांच्या लोकसभेच्या जागा पाडण्याची तयारी भाजपने सुरु केलेली आहे. या दोन फुटीर गटांना लोकसभेच्या निवडणुकीत जागा जिंकण्यात फारसे यश न मिळणे ही भाजपच्या फायद्याची गोष्ट आहे आणि त्यामुळे यासाठी भाजपने सर्व तयारी केली आहे. लोकसभा असो किंवा विधानसभा असो भाजपला त्यांचे वर्चस्व अबाधित राखायचे आहे आणि यासाठी त्यांना लवकरात लवकर या दोन्ही फुटीर गटांना संपवायचे आहे. यामध्ये पहिला नंबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा लागण्याची शक्यता दाट आहे. त्यांचा गट १३-१४ जागा लढवीत आहे. त्यात त्यांना दोनतीनच जागी विजय मिळाल्यास एकनाथ शिंदे यांना विधानसभेसाठी जास्त जागांची मागणी करता येणार नाही. थोडक्यात त्यांचे बारा वाजतील. त्यांच्यानंतर दुसरा क्रमांक अजित पवार यांचा राहील. अजित पवार त्यांची क्षमता ओळखून लोकसभेच्या अवाजवी जागांची मागणी न करता मिळाल्या तेवढ्यावर समाधान मानलेले दिसते. परंतु विधानसभा निवडणुकीच्या वेळी ते अदिक जागांची मागणी करणार हेच त्यांच्या आताच्या गप्प राहण्यावरुन लक्षात येते. या फुटीर गटांची विधानसभेसाठीची बार्गेनिंगची क्षमता नष्ट करण्यासाठी भाजपची मंडळी त्यांना लोकसभेत जिंकू देणार नाही हे वास्तव आहे आणि त्यामुळेच भाजप केवळ स्वतःच्या जागा जिंकून आणण्यावर भर ठेवणार आहे हे स्पष्ट आहे. भाजपच्या या वर्चस्ववादी भूमिकेमुळेच महाआघाडीपेक्षा महायुतीमधील असंतोष व बंडखोरी जास्त प्रमाणात आढळून येत आहे आणि त्याचा फटका महायुतीला बसल्याखेरीज राहणार नाही. भाजपची महाराष्ट्रातील पीछेहाट म्हणजे त्यांची राष्ट्रीय पीछेहाट असेल हे येथे लक्षात घेण्याची गरज आहे. राज्यघटनेची मोडतोड करण्यासाठी निघालेल्या आणि देशात हुकुमशाही आणून विरोधी पक्षांना नेस्तनाबूत करणाऱ्या या शक्तीला महाराष्ट्रातच लगाम लागेल अशी अपेक्षा आहे.

■■■

# आता जनतेचं राज्य आणूया

(पान ३ वरून) बेकारी, देशात अन्यायी पद्धतीने सगळ्या एजन्सी वापरण्याची व्यवस्था, देशातल्या सामान्य माणसाकडून जीएसटीच्या माध्यमातून कर घेण्यात आलेली व्यवस्था हे सगळं बदलायचं असेल तर आपल्याला पुन्हा एकदा लोकांचं राज्य आणावं लागेल.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व १० उमेदवार विजयी होतील असा मला विश्वास आहे. सत्तारूढ पक्षाबद्दलचा राग लोक मतपेटीतून व्यक्त करतील. त्यामुळे महाविकास आघाडीच्या चांगल्या जागा निवडून येतील. भारतीय जनता पक्षाविरोधात जे जनमत तयार झाले आहे, त्याचा उपयोग करून आपल्याला निवडणुकांना सामोरं जायचं आहे. मुस्लिम बांधवांनी भारतीय जनता पक्षाचा पराभव करण्यासाठी आम्हाला पाठिंबा दर्शविला आहे. भारतीय जनता पक्षात अनेक जिल्ह्यांमध्ये नाराजी आहे. निकालातून ते समोर येईल. त्यामुळे महाविकास आघाडीच्या ३२ ते ३३ जागा आत्ताच निवडून आल्या आहेत, अशी परिस्थिती आहे. महाराष्ट्रातली जनता असा प्रताप करून दाखवेल, एवढ्या मोठ्या प्रमाणात महाविकास आघाडी निवडून आणेल, की महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या पक्षात तोडफोड करणं, पक्षफोडी करणं, भ्रष्टाचारी लोकांना स्वत:च्या पक्षात घेणे, त्यांचा पाठिंबा घेणे याला महाराष्ट्रातली जनता कंटाळली आहे. लोक मतदानाच्या दिवसाची वाट पाहत आहेत.

कितीही संकटं, वादळं आली तरी शरद पवार साहेबांचं जहाज हे कधी बुडालं नाही. ते जहाज महाराष्ट्राने नेहमी तारलं. महाविकास आघाडीला महाराष्ट्रातली जनता उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत आहे. मागील दहा वर्षांत केंद्र सरकारने आपल्यावर कसा अन्याय केला, हे लोकांना आज कळायला लागले आहे. त्यामुळे या देशात न भूतो न भविष्यती अशा प्रकारचे मतदान होईल.

डिग्री झालेल्या युवकाला पहिल्या वर्षी एक लाख रूपये देण्याची व्यवस्था इंडिया आघाडीचे सरकार आल्यावर आम्ही करू. शेतकऱ्यांना आधारभूत किंमती देण्यासाठी एक वेगळी





व्यवस्था आम्ही करू. दहा वर्षांत ज्या प्रश्नांना देशातली जनता वंचित राहिली, त्यांना दिलासा देण्याचं काम इंडिया आघाडी करेल. आपल्याला पुन्हा एकदा शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा महाराष्ट्र घडवायचा आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात या निवडणुकीने मोठा बदल घडणार आहे यात शंका नाही.

पंतप्रधानांनी पुढच्या विकासाबद्दल बोलावं. मागचा विकास झाला आहे, त्यामुळे तर महाराष्ट्रातील जनता या दुष्काळी भागात टिकून आहे. पुढच्या बोलण्याऐवजी मागच्या ५० वर्षांचं काढायचं हे या देशातील जनतेला कधीच मान्य होणार नाही. एकदा ऐकलं, दोनदा ऐकलं, आता तिसऱ्यांदा ऐकलं. जमत नाही म्हणून देशातल्या जनतेला आज पूर्ण ताकदीने महाविकास आघाडीच्या मागे उभे राहण्याची बुद्धी झाली आहे. मोदी साहेबांनी भाषणामध्ये सांगितलं, की काँग्रेस ही महाराष्ट्रामध्ये विकासाच्या विरोधातील भिंत होती. मग त्या भिंतीतल्या विटा काढून तुम्ही स्टेजवर का घ्यायला लागले आहात? घाबरून सगळ्यांना पक्षात घेतलं.

महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागात मोठ्या प्रमाणात फिरून आल्यानंतर मला असं दिसतंय, की महाराष्ट्रातील जनता महाविकास आघाडीचे जिथे जिथे उमेदवार दिसतील तिथे तिथे प्रचंड गर्दी करून त्यांना विजयी करण्याच्या प्रयत्नात आहेत. लोकसभेच्या या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे ३२ ते ३५ खासदार निवडून आले तरी आश्चर्य वाटणार नाही, असे वातावरण महाराष्ट्रात आहे. आदरणीय पवार साहेब, उद्धवजी आणि राहुल गांधी यांची महाराष्ट्रात जी लाट आहे, ती शाहू-फुले-आंबेडकर यांचे विचार टिकवण्यासाठी आहे. संविधान वाचवण्यासाठी आहे. या देशातील महागाई व बेकारी पूर्णपणे संपवण्यासाठी आहे.

२०१९ साली जेव्हा लोकसभेच्या निवडणुका झाल्या, त्यावेळी भाजप वगळून सर्व पक्षांच्या मतांची बेरीज ही ६७ टक्के इतकी होती. फक्त ३७ टक्के मतदान हे भाजपला होते. कमी प्रमाणात मतदान होऊनदेखील भाजप सत्तेत आला. कारण, इतर सर्व पक्ष एकमेकांच्या विरोधात लढले. आता यावेळी फरक असा आहे, की सर्व पक्ष एकत्र येऊन लढत आहेत. आज जवळपास सर्वच ठिकाणी आघाडी विरूद्ध युती असे उमेदवार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिवसेना हे महाराष्ट्रातले दोन महत्त्वाचे पक्ष भाजपने फोडले. त्यातून त्यांना ७-८ टक्क्यांचा फायदा झाला असेल. पण, हे करत असताना भाजपचे नाव प्रचंड खराब झाले. इतके की ३७ टक्के असणारा




भाजप ३४ टक्क्यांवर खाली आला.

या देशात आणि राज्यात ज्यांनी भ्रष्टाचार केला, त्या लोकांना भाजपने सोबत घेतले. त्यामुळे आता आपण जाहीर करू शकतो, की भारतातला सर्वात स्वच्छ पक्ष हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्ष आहे. आपल्या पक्षात ज्यांच्यावर आरोप होते ते सगळे भाजपसोबत गेले. आघाडीत आपण जास्त नाही, दहा जागा लढवत आहोत आणि त्या दहाही जागा जिंकणाऱ्या लढवत आहोत. माझा असा अंदाज आहे, की ईव्हीएममध्ये काही घोटाळा नसेल तर आपल्या ७-८ जागा निवडून येऊ शकतात.

देशात या ४५ वर्षात सर्वाधिक बेरोजगारी वाढली आहे. त्याचे कारण म्हणजे कमी गुंतवणूक. देश एका विशिष्ट बाजूने चालला तर गुंतवणूकदार पाठ फिरवतात. भारत हा असा देश आहे, की जो सर्वधर्मसमभाव विचार मानतो. म्हणून लोक भारताकडे सकारात्मकतेने पाहतात. पण, मागच्या कालखंडात लोकांच्या धार्मिक भावना उत्तेजित करण्याचे काम झाले. त्याचा परिणाम देशात गुंतवणूक कमी झाली. पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या काळात लोकांवर प्रचंड कमी कर्ज होते. पण, या सरकारच्या काळात २१० लाख कोटी रूपयांच्यावर कर्ज गेले आहे. हे कर्ज भरून काढण्यासाठी सरकार प्रत्येक गोष्टीवर जीएसटी लावत आहे. परिणामी महागाई वाढत आहे. आज पेट्रोलचे दर काय आहेत? गॅसचे दर काय आहेत? गॅसचा दर आघाडीच्या काळात ४०० रूपये होता आणि गॅसचे दर टप्प्याटप्प्याने वाढत गेले. आज गॅससाठी १२०० रूपये मोजावे लागत आहेत. २०२२मध्ये प्रत्येकाच्या डोक्यावर छत असेल अशी घोषणा भाजपने २०१९ साली जाहीरनाम्यात केली होती. भाजप कोणत्याही आश्वासनावर खरी उतरली नाही. पारदर्शक सरकार आहे, भ्रष्टाचार होऊ देणार नाही असे म्हणत होते. मात्र,




इलेक्टोरल बॉण्डस्च्या माध्यमातून दहा हजार कोटीपेक्षा जास्त पैसे भाजपने जमवले. कंपन्यांना ईडी आणि कारवायांचा धाक दाखवून हे पैसे जमा केले.

**पोरं शाळा सोडून गेली तरी शाळा बंद पडत नाही...**

सर्वांनी अनेक शाळा पाहिल्या आहेत. पोरं शाळा सोडून गेली तरी शाळा कधी बंद पडत नाही. पुन्हा नव्यानं पोरं घडवण्याचं काम शाळेचा हेडमास्तर करतच असतो. आमचा हेडमास्तर लई खमक्या आहे. शरद पवार साहेब म्हणजे मतांचा विषय नाही. तुमच्या आमच्या काळजातला विषय आहे. हे मी महाराष्ट्रातील गावागावात गेल्यावर पाहतो आहे.

मी संपूर्ण महाराष्ट्रात प्रचारासाठी फिरत आहे. मोदी सरकारबद्दल सामान्य माणूस, शेतकरी, युवक, महिलांच्यासह समाजाच्या सर्व घटकात प्रचंड चीड आहे. राज्यात व देशात महाविकास आघाडीस जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. काही मंडळी आपला पक्ष सोडून गेल्याने आपली पार्टीही देशातील सर्वात स्वच्छ पार्टी झाली आहे.

आपल्या पक्षाने जाहीरनामा प्रसिध्द केला असून आपल्या महाविकास आघाडीची सत्ता आल्यास आपण आरक्षणाची ५० टक्केची मर्यादा काढून टाकणार आहोत. शेती औजारे खरेदी वर असणारा कर काढणार असून जीवनावश्यक व नेहमी वापरातील वस्तूवरील जीएसटी रद्द करणार आहोत. शेती मालाचा हमी भाव निश्चित करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली जाईल. युवक व गरीब महिलांना वर्षाला एक लाखाचे मानधन दिले जाईल. गॅस सिलेंडरची किंमत ५०० रूपयापर्यंत खाली आणणार आहोत. सत्यजित पाटील हे स्वतः शेतकरी असून त्यांना १० वर्षाचा आमदार म्हणून अनुभव आहे. ते खासदार म्हणूनही प्रभावी जबाबदारी पार पाडतील. त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा.

शिरूर लोकसभा मतदारसंघात ज्यांना पाडण्यासाठी सतत प्रयत्न केले, मागीलवेळी पाडले, त्यांनाच उमेदवारी देऊन त्यांच्याच प्रचार करण्याची वेळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर आली आहे. त्यांच्याबद्दल मनापासून वाईट वाटते. एखाद्याची एवढी वाईट अवस्था होऊ नये.

लोकसभेची निवडणूक जनतेने हातात घेतली आहे. जनताच महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे सांगत पाटील म्हणाले, देशावर २१० लाख कोटींचे कर्ज आहे. शेतकऱ्यांच्या अवजारांवर, अन्नधान्यांवर वस्तू व सेवा कर (जीएसटी) लावला आहे. जनतेकडून पैसे लुटण्याचे काम केंद्र सरकारकडून केले जात आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस महाग झाला. काँग्रेसच्या सत्ता काळात गॅसची किंमत चारशे रूपये होती. आता तोच गॅस एक हजारांच्या पुढे गेला आहे. देशाचे वातावरण बदलले आहे. संपूर्ण देश भाजपच्या विरोधात आहे. दहा वर्षात काय केले, याचा जाब देशातील जनता भाजपच्या उमेदवारांना विचारत आहे. मात्र, त्याचे उत्तर उमेदवारांना देता येत नाही.

काही लोक सांगतील ही माझी शेवटची निवडणूक आहे. मात्र, त्यांची संधी मागच्यावेळीच गेली आहे. आता नवीन चेहरा आहे. परिस्थिती वेगळी आहे. महाविकास आघाडीच्या बाजूने वातावरण चांगले आहे, मतदारांच्या घरापर्यंत पोहचावे, त्यांना मतदानासाठी बुथपर्यंत आणावे, चिन्हाबाबत गैरसमज पसरविण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे घराघरापर्यंत तुतारी चिन्ह पोहचविले पाहिजे. मराठी माणसाने स्थापन केलेले शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फोडण्याचे पाप भाजपने केले आहे. त्यामुळे जनतेच्या मनात चीड, संतापाची भावना आहे. मतदानातून ही भावना व्यक्त करण्यासाठी जनता सज्ज असल्याचे राज्यभरात दिसून येत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या ३२ ते ३५ जागा निवडून येतील. तर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आठ खासदार निवडून येतील. संसदरत्न पुरस्काराविषयी काही लोकांना कावीळ झाली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांना दहा वेळा तर अमोल कोल्हे यांना तीन वेळा संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे. सभागृहात ज्यांनी कधी तोंडच उघडले नाही, त्यांना पुरस्कार मिळण्याचा प्रश्नच येत नाही. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात राजकीय भूकंप होणार असून महायुतीतील १० ते १२ बडे नेते आमच्या पक्षात प्रवेश करणार आहेत. या नेत्यांचा माझ्यासोबत करार झाला आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे किमान ६० आमदार निवडून येतील, असा आमचा प्रयत्न आहे.

# शेवटचे पान

# ऐक्य, मन व बुद्धीचे



संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी गीतेवर भाष्य करताना ज्ञानेश्वरीत जी एक ओवी लिहिलेली आहे, ती राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष असलेल्या माननीय शरद पवार साहेबांना किती तंतोतंत लागू होते यासंबंधीचा विचार माझ्या मनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटल्यापासून सातत्याने येतो आहे. आणि विशेषतः आता जी निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे ती पाहिल्यावर तर ही ओवी सतत मनात उचंबळून येते आहे. ज्ञानेश्वरांची ओवी अशी आहे -

**"अर्जुना समत्व चित्ताचें । तेंचि सार जाणें योगाचे ।**
**जेथ मन आणि बुद्धीचें । ऐक्य आधी" ।।**

(अध्याय दुसरा, ओवी - २७३)

मनाचा समतोल राखण्याची हातोटी, तेच योगाचे सार आहे. ज्या स्थितीत मन आणि बुद्धीचे ऐक्य असते.

गेल्या ५६ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत पवार साहेबांनी अनेक वादळी संकटे पाहिली. त्यांचा प्रभावीपणे सामना केला. या संकटांचा सामना करताना ते कधी उद्विग्न झाले नाहीत, संतापले नाहीत, खचले नाहीत आणि निराशही झाले नाहीत. प्रत्येक संकटाशी संयम बाळगून धैर्याने विचारपूर्वक त्यांनी दोन हात केले. पण यावेळचे संकट, वादळ हे घरातूनच उभे राहिलेले होते त्यामुळे त्याच्याशी लढणे, दोन हात करणे इतके सहज शक्य नव्हते. कारण शेवटी पवार साहेबही एक माणूस आहेत. त्यांना मन आणि भावना आहेत. आणि मुख्य म्हणजे प्रेम, माणुसकी, जिव्हाळा, करुणा त्यांच्यात इतकी ठासून ठोसून भरलेली आहे की तिचं वरवर जरी दर्शन होत नसलं तरी ते कृतीतून जाणवतं. तेही एक पालक आहेत, वडील आहे, आजोबा आहेत. आपणच वाढविलेली, लहानाची मोठी केलेली व ज्यांच्यासाठी प्रचंड खस्ता खाल्ल्या ती घरातली माणसं जेव्हा उलटतात, कृतघ्नपणे वागून त्रास देऊ लागतात तेव्हा मनाला, अंतःकरणाला होणाऱ्या वेदनांचे, दुःखाचे मोजमाप करता येत नाही. आजही जेव्हासमोरून अनेक खोटेनाटे आरोप, टीका उद्दामपणे व जाणीवपूर्वक बदनाम करण्यासाठी केली जाते तेव्हाही पवार साहेब अगदी शांतपणे, स्थितप्रज्ञ भूमिकेत हिमालयासारखे कसे काय उभे राहू शकतात याचे आश्चर्य, कुतूहल व नवल वाटते. निष्काम कर्मयोगाने आपण आपले काम करीत राहावे. काम यशस्वी झाले तर ठिक आणि अयशस्वी झाले तरी ठीक. मनाला लावून घेण्याचे कारण नाही. मला साहेबांकडे पाहिले की एक प्रश्न वारंवार पडतो तो म्हणजे मनाने मनाचा अभ्यास ते कसा करीत असतील ?

आपण सारेजण सतत असे ऐकत आलो आहोत की, मनापासून आपण काम केले पाहिजे. काम संपले तरीही मनाचा समतोल टिकला पाहिजे. मूळात काम कधीही संपत नाही. मानले तर, कामाला अनेक परिमाणे असतात. राजकीय-सामाजिक जीवनात मनापासून व झोकून देऊन काम करणाऱ्या माणसाला तर रोज नित्यनूतन प्रश्नांशी लढावे लागते. दिवसभरात पवारसाहेब किती लोकांना भेटून किती प्रश्नांची सोडवणूक करीत असतील याचा विचारदेखील आपण करू शकत नाही. पण सोडवणूक केलेल्या कामाची आणि केलेल्या मदतीची ते कुठेही वाच्यता करीत नाहीत आणि डांगोराही पिटत नाहीत. निःस्वार्थपणे व निरपेक्ष भावनेने ते जे काम करतात त्यातूनच त्यांना नवनवीन कल्पना सुचतात. सुचणे हा मनाचा स्वभाव आहे. पण चांगले सुचण्यासाठी मन तयार ठेवले पाहिजे. मनाला भरकटू देता कामा नये. एकदा का मन सैरभैर झाले की, माणसाचा पूर्ण तोल जातो. त्याला काहीही सुचत नाही. समोरच्या काही विरोधी माणसांची अशी अवस्था या लोकसभा निवडणुकीत झाल्याचे आपण पाहतो आहोत. त्या पार्श्वभूमीवर पवार साहेबांचे वागणे, बोलणे, भाषण किती संयमी आणि समतोल व विचारी आहे हे दृष्टोत्पत्तीस येते. हे गुण आपल्यालाही अंगीकारता येतील का? विचार तर करून पाहा !

